

अविनाश टिळक

# निखळलेलं मोरपीस

# निखळलेलं मोरपीस

(कथासंग्रह)

श्री. अविनाश टिळक

प्रियांजली प्रकाशन

पुणे ९.

© श्री. अविनाश टिळक
१/८, राजवाडा,
सांगली- ४१६४१६
फोन: (०२३३) ३२३१३८.

✪

- मुखपृष्ठ -
पराग लोणकर

✪

- मुद्रक / टाईपसेटिंग -
मधुश्री प्रकाशन
तावरे कॉलनी, सुरभी कार्यालयासमोर,
अरण्येश्वर, पुणे ९.

✪

- प्रथमावृत्ती -
रामनवमी
२१ एप्रिल २००२.

✪

- मूल्य रु. -
१४०/-

✪

- प्रकाशक -
पराग लोणकर (प्रियांजली प्रकाशन)
१४ जीवन प्रकाश सोसायटी,
४७/२ पर्वती, सुरभि कार्यालयासमोर, पुणे - ९.
फोन - ४२२७७२६

## - अर्पण -

अनेक प्रमाद पोटात घालून
सातत्याने माझ्या पाठीशी उभ्या असणाऱ्या माझ्या हसतमुख,
प्रिय पत्नीस, **सौ सुमनला...**

--- अविनाश टिळक

# अनुक्रमणिका


| कथा | पृष्ठ क्रमांक | पूर्व प्रसिद्धी |
|---|---|---|
| १. आटपाट नगर होतं | ७ | महाराष्ट्र टाईम्स (१९८७) |
| २. सिद्धार्थ आणि गौतम | १० | केसरी- दिवाळी (२०००) |
| ३. पराभूत | १६ | लोकप्रभा (१९८४) |
| ४. निकाल | २१ | स्वप्ना- दिवाळी (१९८६) |
| ५. बिनकण्याची माणसं | २६ | स्वप्ना- दिवाळी (१९८५) |
| ६. एका कादंबरीची शोकांतिका | ४० | आरती-दिवाळी (१९९८) |
| ७. आगळे कन्यादान | ४९ | स्वप्ना- दिवाळी (१९८७) |
| ८. सावधान! सावधान!! सावधान!!! | ५६ | विजयंत- दिवाळी (१९९८) |
| ९. आयता जोशी | ६१ | मार्मिक- दिवाळी (१९८७) |
| १०. माझी अतूट सखी- सर्दी | ६७ | स्वप्ना- दिवाळी (१९९०) |
| ११. माझी पत्रकारिता | ७१ | विजयंत- दिवाळी (१९९८) |
| १२. थँक यू मि. डेथ | ७७ | विजयंत- दिवाळी (१९९९) |
| १३. तडजोड | ८२ | आरती- दिवाळी (२०००) |
| १४. इतिहासाचा साक्षात्कार | ८७ | आरती- दिवाळी (२००१) |
| १५. इजा, बिजा आणि तिजा | ९३ | सा. विशाल विटा- दिवाळी (९९) |
| १६. श्रीमंतीचं दुखणं | १०२ | स्वप्ना- दिवाळी (१९९८) |
| १७. बॉम्बस्फोट | ११० | सा. विशाल विटा- दि. (१९९८) |
| १८. अंधारयात्रा | १२१ | दैवज्ञश्री- दिवाळी (१९९९) |
| १९. घापी पोटाचा प्रश्न | १२७ | स्वप्ना- दिवाळी (१९९९) |
| २०. ईश्वरी शापित | १३२ | सुगंध- दिवाळी (१९९५) |
| २१. निखळलेलं मोरपीस | १४४ | तरूण भारत- दिवाळी (१९९२) |

## मनोगत

'आधारवड' व 'सांगली आणि सांगलीकर' या पुस्तकानंतर प्रकाशित होणारे 'निखळलेलं मोरपीस' हे माझे तिसरे पुस्तक. पहिली दोन्ही पुस्तके अनुक्रमे चरित्र आणि चरित्राच्या अंगाने जाणारे अशा स्वरुपाची होती. प्रस्तुत पुस्तकात गेल्या १५ वर्षात दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झालेल्या माझ्या कथांपैकी २१ कथांचा समावेश करण्यात आला आहे.

कथा हा माझा अत्यंत आवडता वाङ्मयप्रकार आहे. उत्तम कथा लिहिता याव्यात ही माझी आंतरिक तळमळ आहे. तथापि या तळमळीला भरपूर चिंतनाचे आंतरिक पाठबळ लागते. त्यात मी उणा पडत असल्याने दर्जेदार कथा-लेखनापासून अद्याप मी दूर आहे याची मला जाणीव आहे! प्रस्तुत संग्रहातील काही कथांची निर्मिती मनाला चटका लावणाऱ्या प्रसंगांतून झाली आहे. एके काळी शांततेत राहणाऱ्या डोंबिवलीवासियांची 'बिल्डर' या जमातीने कशी फरफट केली त्याची लघुत्तम कहाणी 'आटपाट नगर होतं!' या महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या कथेत आहे. सर्वच उपनगरांची स्थिती कमी-जास्त फरकाने तशीच, विशेषत: १९७० ते १९८०च्या दशकात बनल्यामुळे, अनेक वाचकांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया त्यावेळी म.टा.मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. अशाच तऱ्हेच्या मानसिक आंदोलनांतून 'सिद्धार्थ आणि गौतम', 'ईश्वरी शापित' अशा कथांची निर्मिती झाली आहे. १९९२च्या मार्चमध्ये मुंबईत बॉम्ब-स्फोटांचे भयानक तडाखे सर्वसामान्य जनतेला सहन करावे लागले त्याचे पडसाद 'बॉम्बस्फोट' आणि 'अंधारयात्रा' या कथांमध्ये उमटले आहेत. इतिहासाचा जाज्वल्य अभिमानी असणाऱ्या एका इतिहास-पुरुषाचा माझ्यावर एका भेटीत एवढा प्रभाव पडला होता की तो अनुभव शब्दबद्ध केल्याशिवाय मला चैन पडेना; त्यातूनच 'इतिहासाचा साक्षात्कार' या कथेचा जन्म झाला. माझ्या मित्रवर्तुळात विनोदप्रचूर संभाषण आणि सहजसुंदर कोट्या करणारा अशी माझी एक बरीवाईट प्रतिमा बनली आहे. त्यामुळे मी विनोदी कथा-लेखन करावं असा एका साहित्य-प्रेमी मित्राचा सतत आग्रह असे; त्यामुळेच 'आयता जोशी', 'पापी पोटाचा प्रश्न', 'माझी अतूट सखी- सर्दी' अशा विनोदी अंगाने जाणाऱ्या कथा मी लिहिल्या.

तथापि मला स्वत:ला ज्या प्रकारचे कथा-लेखन करायला आवडेल अशी एकच कथा या संग्रहात आहे. पुस्तकाचे शीर्षक असणारे 'निखळलेलं मोरपीस' ही ती कथा. मद्रासला आमच्या ऑफिसच्या ट्रेनिंग सेंटरच्या आणि मरीना बीचच्या रम्य परिसरात बऱ्यापैकी चिंतन करुन लिहिलेली ही कथा मला स्वत:ला आनंद देणारी आहे. अनेक प्रकारच्या कौटुंबिक ताणतणावातून मोकळीक मिळाली तर अशा स्वरुपाच्या कथा लिहायला मला आवडेल.

अशी एकूण माझ्या कथांची ही एक लघुत्तम कथा!

हा कथासंग्रह देखण्या स्वरुपात आणि नेमक्या वेळेत प्रकाशित केल्याबद्दल 'प्रियांजली प्रकाशन'चे श्री. पराग लोणकर यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

**अविनाश टिळक**
१/८, राजवाडा,
सांगली-४१६४१६.

# १. आटपाट नगर होतं ...!

आटपाट नगर होतं. छोटे छोटे रस्ते. टुमदार घरं. रस्त्याच्या दुतर्फा झाडी. प्रत्येक घराला भलं थोरलं अंगण. अंगणात तुळशीवृंदावन. सभोवती हौसेनं केलेली फुलबाग. शांताआजीच्या बोटाला धरून छोटी मिनू परडीत फुलं गोळा करायची. शांताआजी तोवर हिरवळीवरच्या दुर्वा काढत. भाऊकाका गदागदा पारिजात हलवायचे. पांढरा शुभ्र सडा पडायचा. मिनूला आपल्या चिमुकल्या हातांनी किती फुलं गोळा करू नि किती नको असं होऊन जायचं. तेवढ्यात महादू न्हावी दुकान उघडायला जाता जाता दारातूनच ओरडून विचारायचा,

''शांताआजी, शेवग्याला खूप बहर आलाय. चार शेंगा काढू का?''

''मेल्या, त्यात विचारायचं ते काय? तुला घे. आम्हालाही चार काढून ठेव.''

सकाळचा 'मॉर्निंग वॉक' घेऊन येता येता गणूतात्या, मोरूभाऊ दाराशी थबकत. ओरडून विचारत,

''भाऊ, पेपर आला का रे?''

पेपर आला असो वा नसो. पेपराशी देणंघेणं थोडंच असायचं? ती हाळी म्हणजे केवळ त्यांच्या आगमनाची सूचना असे. मग भाऊंबरोबर व्हरांड्यातच बैठक होई. शांताआजींच्या हातचा कमी साखरेचा चहा झाला की मंडळी बाहेर पडत. मग ऑफिसात जाणाऱ्या मुलांच्या, सुनांच्या धावपळी चालू होत. त्यांची पोळी भाजी झाली की निघाली मंडळी स्टेशनच्या दिशेने लोकल गाठायला.

•••

थोड्याफार फरकाने साऱ्या आटपाट नगरांचं हेच दृश्य असायचं. मंडळी मोजकी होती. जिव्हाळा घराघरातून ओथंबून वाहत होता. एकमेकांना एकमेकांविषयी कौतुक होतं, आदर होता.

पण सुखाने नांदत असलेला चितोडगड कोण्या अल्लाउद्दीन खिलजीला कसा

बघवणार?...

गावात भली माणसं होती, तशी राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगणारी मंडळी होती. स्वार्थानं स्वत:ची तुंबडी भरू पाहणारी माणसं होती. त्यांना हा सगळा भागच 'इंडस्ट्रिअल इस्टेट' म्हणून घोषित करून हवा होता. गावाजवळ मोठा कारखाना हवा होता. तशी त्यांची अनेक दिवस सरकार दरबारी खटपट चालू होती. त्यांना यश आलं. मोठा थोरला कारखाना गावाजवळ उभारला गेला. आसपासचा भाग 'इंडस्ट्रिअल एरिया' म्हणून जाहीर झाला. शे-दोनशे कारखाने उभारले गेले. स्टेशन मोठे झाले. रस्ते रुंदावले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पाव-भाजीच्या गाड्या आल्या. रुंद रस्त्यावरून मोठमोठ्या कंपन्यांच्या बसगाड्या धावू लागल्या. दुकानं वाढली. इंडस्ट्रिअल एरीयात जाण्यासाठी स्टेशनपासून बसेस् धावू लागल्या. जुने-पुराणे पाच-पंचवीस टांगेवाले भांबावून बघत होते. तेवढ्यात त्याच्या अंगावरून 'पोऽपो' करीत रिक्षा धावू लागल्या. एक व्ही. टी. कडची लोकलगाडी आली की एखादा सिनेमा, सर्कसचा खेळ सुटावा तशी प्रचंड संख्येने माणसं रस्त्यावर दिसू लागली. जाता येता, रस्त्याच्या कडेला उभं राहून बटाटावडा, पावभाजी खाऊ लागली. वर गरमागरम चाय् तर कधी मेवाडवाल्याचं आईस्क्रिम.

आटपाट नगर विस्मयचकीत मुद्रेने बघायला लागलं. आपलं गाव मोठं होतंय, होऊ द्या. चांगलंच आहे असं गाववाले म्हणू लागले. पूर्वी सदूभाऊ-रामभाऊंची गिरगाव-दादरवाल्या मित्रांशी भांडणं व्हायची.

''काय रे तुझं गाव? किती लांब? किती दूर? नुसतं ऑफिसला पोचायचं म्हणजे दीड-दोन तास मोडतात आणि डास किती रे तुझ्या गावात?''

''अरे, माझ्या गावात जितके डास, तितकी शिंची तुझ्या दादर-गिरगावला माणसं! जरा रस्त्यानं चालायची सोय नाही. नसता कलकलाट, गोंगाट. त्यापरीस डास बरे.''

सदूभाऊ - रामभाऊ - मोरुतात्यांची मुलं आता मोठी झाली होती. गाव मोठं झालं, तशी वस्ती वाढली. वस्ती वाढली तशी छोटी घरं पुरेनाशी झाली. त्या शांत अशा चितोडगडावर एका नव्याच अल्लाउद्दीन खिलजीची स्वारी झाली होती. त्याचं नाव होतं, 'बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर' ऊर्फ 'बिल्डर'. त्यांनी सदूभाऊ-रामभाऊंच्या नादी न लागता त्यांच्या मुलांना गाठलं. त्यांना सांगू लागले, ''अरे घर पाडायचं म्हणजे काय? नव्यानं बांधायचे. मोऽऽट्टी थोरली बिल्डिंग बांधायची. तुम्ही काऽऽही करायचं नाही. म्युनिसिपालिटीची परवानगी वगैरे सर्व आम्ही करू. तुम्हा प्रत्येक भावंडाला एक-एक स्वतंत्र ब्लॉक आणि वर शिवाय एक लाख रूपये रोख.'' रेल्वेत, म्युनिसिपालिटीत काम करणारी ती माणसं. प्रॉ. फंड अधिक ग्रॅच्युइटीच्या वेळीच मोठ्या रकमांचे आकडे त्यांच्या

कानावर यायचे. ती हरखून गेली. स्तिमित् झाली. काही न करता, घरबसल्या एवढे पैसे? विचार कसला करताय्? घ्या आमचीही अॅग्रिमेन्टवर सही आणि मारा कुदळ. हां हां म्हणता अल्लाउद्दीन खिलजीने गावभर आपले पाय पसरले. कुणाच्या घरी थोडी आदळआपट झाली. तरण्याताठ्या मुलांनी, सुनांनी आपापल्या घरी 'म्हाताऱ्याला' चक्क सुनावलं, ''आता तुमचे असे कितीसे दिवस राहिलेत या जगात? का उगाच 'माझं घर, माझं घर' म्हणून उर पिटताय? का आमच्या सुखाच्या आड येताय?'' बघता बघता घरं कोसळून पडली! दारासमोरची नारळीची झाडे कोलमडली. आंब्यांच्या झाडावर कुऱ्हाड पडली. तुळशीवृंदावन उखडलं गेलं. फुलबाग उध्वस्त झाली. शेवग्याच्या शेंगा परसात मिळेनाशा झाल्या. भलं थोरलं अंगण इतिहासजमा झालं. एकमेकांच्या सहवासात उन-पाऊस झेलत राहणाऱ्या छोट्या-छोट्या वास्तू बिल्डरच्या यज्ञात बळी जाऊ लागल्या. अल्लाउद्दीनची पापी नजर पडण्याआधी जिवाचा जौहार मांडणाऱ्या रजपूत-रमणीसारखी त्यांची अवस्था झाली होती......

अजून कधीमधी शांताआजी संकष्टीला उठतात. दूर्वा काढायला हव्यात म्हणून सवयीने अंगणाकडे निघतात. बाहेर आल्यावर बघतात, तो अंगण कुठे आहे? साऱ्या फरसबंदी पोर्चवर हताशपणे डोळे फिरवतात. त्यांच्या घशात अडकलेला हुंदका कोणालाच ऐकू येत नाही.....

एक आटपाट नगर होतं आणि नव्हतंही.

# २. सिद्धार्थ आणि गौतम

सकाळीच रमाकांत सांगून गेला.

''आज रात्री पार्टी आहे. लक्षात आहे ना? मी बरोबर रात्री आठ वाजता न्यायला येतो.''

पार्टी भिकूशेठच्या बंगल्यावर होती. भिकूशेठवर एक परिचयपर लेख मी लिहिला होता. त्याच्या एकसष्टीच्या निमित्ताने. सर्व वृत्तपत्रांनी फोटोसह त्या लेखाला प्रसिद्धी दिली होती. भिकूशेठला अभिनंदनाचे फोनवर फोन येत होते. त्याच्या कर्तृत्वाचा आलेख सुरेख शब्दात मी काढून दिला होता. त्याच्या अंगी असलेले (आणि खरं म्हणजे नसलेले!) सर्व गुण मी 'मॅग्निफाय' करून सजविले होते.

खरं म्हणजे हे सगळे विचित्र होते. त्याच्यासारख्या गुंड आणि छुप्या स्मगलरवर मी अशी स्तुतीपर लेखणी चालवायला नको होती. पण रमाकांत माझा फार जुना वर्गमित्र. त्याने नवीनच मोठी जाहिरात संस्था काढली होती. या साऱ्या बड्या-बड्या धेंडांच्या जाहिराती त्याला मिळवायच्या होत्या. मी त्याला म्हटलं, ''रमाकांत, असल्या माणसांवर काय लिहायचं? लिहिण्यासारखं आहेच काय?''

तेव्हा रमाकांत हसून म्हणाला,

''मग काय तू त्या तात्या मास्तरवर लिहिणार? कोणी छापेल ते?''

त्याचं म्हणणं खरं होतं. तात्यांसारखा चारित्र्यवान, सत्शील माणूस, तुरुंगात ब्रिटिशांच्या लाथा खाऊनहि ताठ मानेने उभा राहणारा माणूस, आता समाजाच्या कोणत्या कोपऱ्यात जाऊन पडला होता? त्यांचा त्याग, कर्तृत्व, सध्या ते चालवत असलेला आश्रम या साऱ्या गोष्टींवर मी तळमळून लिहिलं, पण कोणी ते छापायलाच तयार नव्हतं. समाजाची दुःखं वेशीवर टांगण्यासाठी लिहिलेल्या माझ्या आदर्शवादी कथा आणि कविता सगळीकडून 'साभार' परत येऊन कपाटात धूळ खात पडल्या होत्या आणि भिकूशेठच्या लेखासाठी मला तीनशे रुपये मोबदला म्हणून मिळणार होते. ''काय? तीनशे रुपये?'' असं मी आश्चर्याने त्यावेळी जवळजवळ ओरडलोच होतो. तेव्हा रमाकांत म्हणाला, 'लिहून बघ तर खरं.'

काही का असेना, रमाकांतच्या आग्रहाखातर मी 'हो' म्हंणून गेलो खरा. त्याच्या मैत्रीचा दबाव की पैशाचा प्रभाव, यातील कोणत्या नेमक्या कारणाने मी होकार दिला, ते माझं मलाच कळलं नाही. मग आम्ही भिकूशेठच्या एअरकंडिशन ऑफिसात गेलो. त्याची दोन-तीनदा मुलाखत घेतली. त्याचे वेगवेगळे उद्योगसमूह बघितले. टिपणे तयार केली आणि एक छानपैकी लेख सजविला. रमाकांतने काय काय खटाटोप केला देव जाणे, पण जवळजवळ सर्व ठिकाणी त्याने लेखाला प्रसिद्धी मिळवून दिली. या लेखाचा खूप बोलबाला झाला. माझे कौतुक झाले. रमाकांत खुष झाला.

'सर्वे गुणा: कांचनम् आश्रयन्ते' हेच खरं.

•••

रात्री आठ वाजता आम्ही भिकूशेठच्या बंगल्यावर पोहोचलो. दाराशीच अंगावर फाटके-तुटके कपडे असलेले एक जोडपे उभे होते. बाईच्या हातात एक लहान मूल होतं. वर्ष-सव्वा वर्षाचं असावं. खूप रडून-रडून निपचित पडलेलं दिसत होतं. बाई दीनवाणेपणाने रडत होती. नवरा केविलवाणेपणे उभा होता. भिकूशेठच्या मुकादमाकडे पैसे मागत होता. त्यांचा मुलगा आजारी दिसत होता. ताबडतोब हॉस्पिटलला न्यायचे होते. भिकूशेठच्या काम चाललेल्या एका मोठ्या बिल्डिंग कॉम्प्लेक्सवर दोघं नवरा-बायको मजूर म्हणून काम करत होती. 'आता काही पैसे द्या. हॉस्पिटलमध्ये मुलाला ॲडमिट करायचंय. नंतर आमच्या मजुरीतून पैसे कापून घ्या', असं ती दोघं त्या मुकादमाला डोळ्यात प्राण आणून सांगत होती. मुकादम त्यांना हाकलून लावत होता. शिव्या घालत होता. एवढ्यात भिकूशेठ बाहेर आला.

''काय गडबड आहे रे?'' मुकादमाने सगळे सांगितले. ती नवरा-बायको भिकूशेठच्या पायावर लोळण घ्यायला लागली, तेव्हा भिकूशेठ कडाडला, ''चला चालते व्हा xxx ढोंग करतात. दारू ढोसायची असेल. चला फुटा. काही पैसे-बिसे मिळायचे नाहीत.''

तरी ती नवरा-बायको दीनवाणेपणाने रडत-रडत 'मालक, दया करा' असं म्हणत भिकूशेठच्या पायावर पडायला लागली, तेव्हा त्याने फाडकन् नवऱ्याच्या मुस्कुटात मारली आणि म्हणाला,

'थांबा xxx तुमच्या अंगावर आमच्या टायगरलाच सोडतो, म्हणजे तुमची तोंडे बंद होतील. दौलती, आपल्या टायगरची साखळी सोडा रे.'

तेव्हा ती नवरा-बायको घाबरली. वाघासारखा भयानक तो टायगर मोकळा

सुटल्यावर मोठमोठ्याने भुंकत येईल, आपले लचके तोडेल, बाळाचा चावा घेईल......

'नको मालक, दया करा. टायगरला सोडू नका,' असं म्हणत लगबगीने ती दरवाजाबाहेर पडली.

भिकूशेठ बाहेर आला. आम्हाला बघताच म्हणाला, ''रायटरसाहेब, तुम्ही उभं का? चला आतल्या लॉनवर जाऊ.''

त्याच्याबरोबर रमाकांत आणि मी आत हिरव्यागार लॉनवर गेलो. तिथं मोठ-मोठे गालिचे पसरले होते. बैठका मांडल्या होत्या. लोड-तक्के ठेवलेले होते. आजूबाजूच्या सर्व झाडांवरून, फुलझाडांमधून दिव्यांची रंगीबेरंगी रोषणाई केलेली होती. पलीकडे स्विमिंग टँक होता. आतवर सोडलेल्या निरनिराळ्या रंगांच्या प्रकाशझोतामुळे स्विमिंग टँकचे पाणी चमकत होते. त्यातून एक इंद्रधनुष्य चमकल्यासारखे वाटत होते. क्षणभर मला म्हैसूरच्या वृंदावन गार्डनमध्ये बसल्याचा भास होत होता. भिकूशेठच्या परिवारातील एकेक माणसं जमली. विविध उद्योगधंद्यातील वीस-पंचवीस उद्योगपती आले होते. सारेच्या सारे लक्षाधीश, सॉरी, कोट्याधीशच. रमाकांतचा बहुतेकांशी परिचय दिसत होता. त्याने आणि भिकूशेठने माझी सगळ्यांबरोबर ओळख करून दिली.

'मराठीतला मोठा रायटर हायेत हं ये साहेब.' सर्वजण नमस्कार करायचे. मला ओशाळवाणे वाटत होते. त्या श्रीमंती वातावरणात आणि धनाढ्य मंडळींमध्ये माझ्यासारख्या कारकुनी पेशाच्या माणसाला 'मिसफिट' वाटणं स्वाभाविकच होतं! मी रमाकांतला तसं म्हटलं पण. तेव्हा तो म्हणाला, 'अरे ही सुरुवात आहे. हळूहळू तू रूळून जाशील. श्रीमंतीची सुद्धा सवय करून घ्यावी लागते.'

'ते ठीक आहे रे. पण तुझा हा भिकूशेठ ओळख करून देताना, मराठीचा मोठा रायटर म्हणून कसली ओळख करून देतो? कुणाला कळलं तर लोक काय म्हणतील?' तेव्हा रमाकांत म्हणाला, 'अरे बाबा, साहित्यातील काही 'कळणारी' ही माणसं असती तर ती अशी कोट्याधीश झालीच नसती! तुझे फडके, खांडेकर यांसारख्या चार मराठी लेखकांची नावे पण त्यांना माहीत नाहीत. भिकूशेठचा लेख तू लिहिलास म्हणजे त्यांच्या मते तूच आता लेखक....... आता तुला किती 'ऑर्डर्स' मिळतील बघ.'

आणि खरंच, भिकूशेठने भलावण केल्यावर मला तिथल्या तिथंच रमाकांतच्या भाषेत म्हणजे 'ऑर्डर्स' मिळाल्या. कुणाच्या व्यवसायाला पंचवीस वर्षे पुरी होत असल्याने रौप्यमहोत्सव होता, तर कुणा उद्योगपतीची पंचाहत्तरावी साजरी व्हायची होती. कुणी उद्योगपती परदेशी निघाला होता, तर कुणा एकाला सरकारने जे.पी./ दंडाधिकारी नेमलं होतं. या सर्वांवर मला लेख तयार करायचे होते. मनात विचार येत होते, एक लेख

म्हणजे तीनशे रुपये. म्हणजे तीनशे गुणिले...... माझं विमान उडू लागलं! स्वाभाविकच होतं. इथं माझ्या कथा-कवितांना फार फार तर पन्नास-शंभर मिळायचे. ते सुद्धा कधीकधीच!

पार्टी रंगात आली होती. भिकूशेठचे नोकर एकसारखे खारे काजू आण, वेफर्स आण, सलाड आण, असं 'सर्व्ह' करता करता थकून गेले. व्हिस्कीच्या बाटल्या, सोड्याच्या बाटल्या कचाकच फुटत होत्या. आता मलाहि व्हिस्की चढली होती. ठेवणीतले एकाहून एक सरस असे 'नॉन-व्हेज' जोक्स सांगून मी सर्वांना मनमुराद हसविलं. सर्वजण माझ्यावर आता फिदा होते. भराभर पुढील मुलाखतींच्या तारखा ठरत होत्या. ऑर्डर्स मिळत होत्या. आयुष्यात एक नवीनच दालन माझ्यासाठी उघडत होतं. अलिबाबाची गुहाच म्हणानात!

मध्यरात्री केव्हातरी पार्टी संपली. सगळेजण पांगले. भिकूशेठने माझ्या हातावर लेखाचा मोबदला म्हणून पाचशे रुपये ठेवले. मी आश्चर्याने बघतच राहिलो. तेव्हा तो म्हणाला, 'रमाकांतने तीनशे रुपये ठरवले होते, पन आपन लई खुष हाई बगा. तुमच्या लेखामुळं आपलं इंपार्टन्स लई वाढलं बगा. म्हनून हे पाचशे. यापुढं कवाबी या. आमच्या उद्योगधंद्यांना तुमची गरजच आहे.'

भिकूशेठने जाताना गाडीने पोहोचवतो, असं सांगितल्यावर मीच म्हटलं, 'घर जवळ आहे. चांगलं चांदणं आहे. चालतच जाईन. पाय पण जरा मोकळे होतील.''

रमाकांत त्याच्या स्कूटरवरून गेला. मी सिगारेट शिलगावली. शिटीवर गाणे गुणगुणत घरी निघालो. मोकळ्या हवेतला मध्यरात्रीचा गारवा मोठा प्रसन्न वाटत होता. आज मी स्वत:वर फार खूष होतो. तसा पोटापुरता पैसा नोकरीत मिळत होता. पण आता रमाकांतने माझ्यासाठी अलिबाबाची गुहाच उघडली होती. नवी-नवी सुखं घ्यायला मन आसुसलं होतं. बायकोसाठी वॉशिंग मशीन, मुलाला स्कूटर, मुलीसाठी व्हि.डी.ओ....... माझ्या मनातली यादी लांबतच राहिली.

मी चालता-चालता कोपऱ्यावर आलो. तिथं भिकूशेठच्याच एका नव्या बिल्डिंगचे काम चालू होते. वाळूच्या ढिगांवर काही माणसं झोपली होती. माझं लक्ष एकदम एका बाजूच्या ढिगाऱ्यावर गेलं. मी चमकून बघितलं. हो, शंकाच नाही. भिकूशेठने कुत्रे सोडतो म्हणून घाबरवलेलं ते मघाचंच जोडपं दिसत होतं. ती नवरा-बायको अस्ताव्यस्त पसरली होती. अंगावरल्या तुटपुंज्या वस्त्रांची त्यांना शुद्ध नव्हती. त्या टायगरला सोडला असता, तर आता अंगावर होती ती पण चिरगुटं दिसली नसती! काय झालं असेल त्या मुलाला? पैशाच्याअभावी आपण मुलाला औषधोपचार पण करू शकत नाही, म्हणून किती कष्टी झाली असतील ती दोघं! त्या आईच्या मनाला किती यातना झाल्या

असतील! त्या बाईनं मुलाला आधी आपल्या कुशीत झोपवलं असावं. पण त्यानंतर ते घसरत खाली आलेलं होतं. कारण त्याच्या अंगाखाली म्हणून घातलेलं जुनेरं बाजूला झालेलं होतं. कसं जगवणार ती दोघं आपल्या मुलाला? का हताशपणे औषधाला पैसे नाहीत, म्हणून आपल्या डोळ्यांदेखत ते मूल देवाघरी निघालेलं त्यांना पहावं लागणार होतं? आता या क्षणी तरी ते मूल जिवंत असेल ना? का आताच ते मूल....?

'त्या' विचारासरशी माझ्या अंगावर सरसरून काटा आला! माझी व्हिस्की खाडकन् उतरली! हिरव्यागार मखमलीवरून चालता चालता टचकन काटा घुसून पाय रक्तबंबाळ व्हावा, तशी माझी स्थिती झाली. मन सुन्न होऊन गेलं. त्याच विमनस्क अवस्थेत मी घरी गेलो. लॅच-कीने हळूच दार उघडले. गार पाण्याचा सपकारा मारून बाल्कनीत आरामखुर्चीत जाऊन पडलो. काही केल्या झोप येत नव्हती. डोळ्यासमोर भिकूशेठची भली मोठी तिजोरी दिसत होती. त्यातील नोटांची बंडले दिसत होती आणि त्याचवेळी त्या बंडलांमधून मुलाच्या औषधासाठी पैसे मागणारी ती गरीब नवरा-बायको आणि निष्पाप मूल दिसत होतं. एकाएकी मला स्वत:ची लाज वाटली! त्या पाचशे रुपयांची पण चीड आली. त्या भिकूशेठच्या काळ्या पैशात मी सहभागी व्हायला नको होतं. त्याच्यावर स्तुतीसुमनं उधळायला नको होती. ज्या गोरगरिबांच्या घामावर, इमारतींचे इमल्यावर इमले उठवायचे, त्यांच्या दुखण्याखुपण्याकडे मात्र बघायचं नाही, मग करायचेत काय ते पैसे? ही भयानक क्रूरता होती. दुसऱ्यांच्या दु:खाने मी खूपवेळा दु:खी होतो. पण ते तेवढ्यापुरतंच क्षणिक असतं. पण आज मात्र त्या लहान बाळानं मला फार अस्वस्थ केलं. त्या क्षणी गौतमबुद्धाच्या कारुण्यबुद्धीने माझ्या मनाचा कब्जा घेतला होता. बस, मी मनाशी निश्चयच केला की, सकाळी उठल्याबरोबर त्या वाळूच्या ढिगाऱ्याजवळ जायचं. त्या मजूर नवरा-बायकोच्या हातावर भिकूशेठने दिलेले ते पाचशे रुपये ठेवायचे आणि म्हणायचं, 'हे पैसे घ्या. मुलाला औषधपाणी करा. ते मूल जगलं पाहिजे.' त्या निश्चयाच्या सात्विक समाधानातच केव्हा तरी मला झोप लागली.

•••

सकाळी उठलो. रात्रीची अस्वस्थता पार निघून गेली होती. पँटच्या खिशातील शंभराच्या पाच नोटा काढल्या. काय बरं वाटत होतं त्या कोऱ्या करकरीत नोटा बघताना! काय सुंदर वास होता त्या नोटांना. किती सुखद ऊब जाणवत होती त्या नोटांच्या सान्निध्यात! रात्रीची ती नवरा-बायको, त्यांचं ते आजारी मूल, मनाची घालमेल, सारंऽ, सारंऽ काही मी पार विसरून गेलो. त्यांचं नशीब! आपण तरी जगात कुणा-कुणाला पुरं पडणार? असे जगात कितीतरी लोक असतील. ज्याचं त्याचं नशीब! आपण एकटं काय

करणार? चला, आपल्याला तो वॉकमन घ्यायचाय ना? तोच आज घेऊन टाकावा. सगळे कसे चकित होतील! मी मनाशी विचार करत होतो.

मनाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात कसातरी तग धरून बसलेला कारुण्यमूर्ति गौतमबुद्ध पार मरून पडला होता नि माझ्या अंतर्यामातील भोगवादी सिद्धार्थ त्याच्या उरावर स्वार होऊन बसला होता.

मला मात्र त्यातलं काहीच दिसत नव्हतं!

# ३. पराभूत

तात्या मास्तर दवाखान्यातून बाहेर पडले तेव्हा त्यांचे पाय जड झाले होते. डॉक्टरांनी सांगीतलेले सगळे ऐकायचे म्हणजे किमान कांही सहस्त्र रूपयांना फटका. बरं ऑपरेशन् करून तरी संपूर्णपणे बरे होऊ याची खात्री डॉक्टर देत नाहीतच. म्हणे हा रोग असा आहे की, घशातील गांठी ऑपरेशनने काढल्या तरी पुन्हां शरीरात कोठे उद्भवणार नाहीत ह्याची ग्वाही देता येत नाही. जानकी गेली. तिच्यामागे दहा वर्षे आपण जगलो. एकुलता एक मुलगा बबनचे दोहोचे चार हात झालेले बघितले. त्याच्या ओढग्रस्तीच्या संसाराला होईल तितकी मदत केली. आता पदरात तीन मुली आणि एस्. टी. मधील नोकरी. त्याची अगदी फरपट होतेय, पण आता आपण काय करणार! आयुष्य सगळे आदर्शवादाची जोपासना करण्यात गेलं. इतरांसारखे चार पैसे गाठीला बांधून राहाणं आपल्याला कधी जमलंच नाही. गरीब, अनाथ विद्यार्थ्यांना जमेल तितकी मदत करत बसलो. विनामोबदला शिकविलं. आपण व्यवहारी वृत्तीने राहिलो असतो तर आता बबनच्या संसाराला नसती कां मदत झाली? आता आपल्या दुखण्यासाठी आजारीपणात बबन बिचारा कुठले पैसे खर्च करील? तेव्हा आता हॉस्पिटल, तपासण्या, एक्स रे वगैरे फंदात पडाच कशाला? डॉक्टर म्हणतात हळूंहळूं गिळता येणे बंद होईल, बोलता येणे कठीण होईल. हळूंहळूं संपूर्ण घसा बंद होईल. सर्व शरीरभर रोग पसरेल आणि शेवटी एक दिवस... भोग आपले. असूं देत. पण निदान त्यासाठी पैशाची तरी फोडणी नको जायला. यातले सुनंदा-बबनला कांहीच सांगता कामा नये. दोघं बिचारी हादरून जातील. म्हणून तर शंका येताच हा अनोळखी डॉक्टर गांठला. डॉ. विश्वासकडे जायची सोयच नव्हती. आपला आवडता विद्यार्थी. आपल्याला खूप मानतो. त्याने तपासणीचे पैसे घेतले नसते, पण औषधे, इंजेक्शन्स् आणि मग मुंबईत गेल्यावरच्या इतर खर्चाचे काय? तेव्हा सुनंदा-बबनला कांहीच कळता कामा नये. कळेल तेव्हा कळेल. असा विचार मनाशी घोळवत तात्या घरी आले.

•••

पण घरी तात्यांनाच हादरा बसायचा होता. बबन सस्पेंड झाला होता.

स्टोअरकीपर होता. कोणाच्या तरी नादाने म्हणा पण एस्. टी. स्टोअरच्या मालखरेदीच्या कामात अफरातफर केल्याच्या प्रकरणात सापडला. खरं तर त्याची चूक नव्हती. खरेदीच्या कागदपत्रांत कोणीतरी खाडाखोड करून बबनची सही घेतली होती. तो असा काही कचाट्यात सापडला की वरीष्ठांपुढे सर्व काही त्याने घाबरून कबूल केलेन्. आता चौकशी होईल. पोलिसात जाईल. गुन्हा नक्कीच शाबूत होईल. मग कोर्ट. शिक्षा. दंड नि कदाचित् तुरुंगवाससुद्धा. नोकरी तर जाईलच, पुन्हा गावभर चर्चा. पुन्हा नोकरी मिळणार नाही. कदाचित् वृत्तपत्रांतून पण येईल. राष्ट्रपती पदकाचा सन्मान मिळालेले आदर्श शिक्षक आणि समाजसेवक श्री. तात्या कुलकर्णींचा मुलगा पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून तुरूंगात. तात्यांच्या डोळ्यासमोर सारी दृष्यं चित्रपटासारखी पटापट सरकून गेली. बबनशी त्यांनी बोलायचा खूप प्रयत्न केला, पण त्यांच्या कुशीत शिरून मुसमुसून रडण्यापलीकडे त्याला काहीच जमले नाही. बिचारी सुनंदा गलबलून गेली. तिन्ही मुली आपले बाबा रडतात हे बघून कावऱ्याबावऱ्या झाल्या.

काय बरे करावे आता? तात्या विचारात पडले. त्या अभ्यंकर वकिलांकडे जावे का? वाटेल तशा अवघड केसेसमधून त्यांनी अनेकांना सोडीवले आहे. ते बबनला सोडवितील? तात्यांच्या मनात क्षणभर आशा पालविली. पण नाही सुटला तर? आणि सुटला तरी काय फरक पडतोय? एकदा माथ्यावर कलंक बसला की पुन्हा थोडीच त्याला नोकरी मिळणार आहे? आणि उजळ माथ्याने त्याला नंतर हिंडता येईल? आणि अशा या राक्षसी महागाईच्या दिवसात सुनंदा आणि तीन मुलींना घेऊन काय करेल बिचारा? तात्यांच्या घशात आवंढा आला. आपल्या दुखण्याच्या आठवणीबरोबर त्यांनी कसाबसा आवंढा गिळला. अभ्यंकर वकिलाकडे जायचे असा विचार करून तात्यांनी खुंटीवरचा कोट काढण्यासाठी हात वर केले पण पुन्हा झटक्यासरशी हात खाली घेतले. त्यांच्या डोळ्यासमोर अभ्यंकर वकिलांचा उग्र चेहरा दिसू लागला. त्यांचा चेहरा, आपले धारे डोळे विस्फारत बोलू लागला, 'तात्या, अहो तुम्ही मला बबनची केस हातात घ्यायला सांगताय? अहो, तुम्ही जगाला आदर्श शिकविणारे. अपराध घडला की त्याचे शासन मिळालेच पाहिजे असंच ना तुम्ही म्हणायचेत? मागे मी जोशी मास्तरांची केस हातात घेतली तेव्हा तुम्हीच ना मला जोरदार विरोध केलात? त्यावेळी तुम्ही काय म्हणाला होतात, ''जोशी मास्तरांनी शिक्षक क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे पांच वर्षांचे हिशेब पुरे केले नाहीत. शिक्षकांची जमा केलेली रक्कम जमा केली नाही, तेव्हा तुम्ही त्यांना अजिबात पाठीशी घालू नका; आणि आता बबनने धडधडीत गुन्हा कबूल केलेला असताना तुम्हीच त्याला पाठीशी घालायला सांगताय्? केवळ ''तुमचा तो मुलगा म्हणून?'' हताशपणे तात्यांनी कोट पुन्हा खुंटीवर टांगून ठेवला. काय करावे? कोणाकडे जावे? भाई शेटे, पुराणिक गुरुजी अनेक नावे तात्यांच्या डोळ्यांसमोरून सरकली. पण

छे, यांचा काही उपयोग नाही. सगळी मंडळी नुसत्या साधनशुचितेच्या गप्पा मारतील. आपल्याला माहीत असलेले आणि आपणच सांगितलेले तत्त्वज्ञान आपल्याला शिकवतील. मग भोगू दे का बबन आपल्या कर्माची फळे? पण मग त्या बिचाऱ्या सुनंदाचे आणि त्याच्या तीन निष्पाप मुलींचे काय होईल? छे, काहीतरी केलेच पाहिजे. आपली तत्त्वे, आपले आदर्श आपल्याबरोबर स्मशानात जावोत. त्याची बबनला अडचण होता कामा नये. त्याची झळ सुनंदाला आणि माझ्या तीन नातींना पोहोचता कामा नये. काही करून बबन सुटला पाहिजे. नुसता नाही. त्याच्या अफरातफरीच्या प्रकरणाबद्दल जगाला काही कळता कामा नये. जसं काही घडलंच नव्हतं.

•••

'दख्खनदौलत' बंगल्यात दौलतशेटचा दरबार भरला होता. अनेक मंडळी अनेक गाऱ्हाणी घेऊन आलेली. शेटजींचा मुक्काम दोनच दिवस बंगल्यावर होता. लागलीच त्यांना मुंबईला जायचं होतं. नव्या मंत्रिमंडळात त्यांना मंत्रिपद मिळणार हे काही आता गुपित राहिले नव्हते. म्हणून तर आज बंगल्याकडे नुसती माणसांची रीघ लागली होती. कोणाला इरिगेशन पंप पाह्यजे होते. कोणाला नव्या औद्योगिक वसाहतीत प्लॉट पाहिजे होता. तर कोणाला पेट्रोलपंपासाठी लायसन्स पाहिजे होते. दौलतशेट होतेच तसे लोकप्रिय. जिल्ह्यासाठी त्यांनी खूपच परिश्रम घेतले होते. जिल्ह्यातील सर्व बेकारी नष्ट करण्याचा त्यांनी चंग बांधला होता. नवनवीन उद्योगधंदे सुरू करण्याच्या त्यांच्या योजना होत्या. आता मंत्रीपद हाती आल्यावर तर काय सारे अधिकारच ताब्यात येणार होते. आता या माणसात थोडे दोष होते, पण त्याच्याशी काय करायचेय्. नुसत्या मोठमोठ्या गप्पा मारणाऱ्या लोकांच्या हातून काही होत नाही. त्याला दौलतशेटसारखीच धडाडी पाहिजे.

बंगल्यासमोरची गर्दी पाहून तात्या हबकलेच. आता या गर्दीत आपला कसा काय निभाव लागणार या काळजीने त्यांना भेडसावले. का आपण आपल्या तत्त्वापासून रेसभरही मागे सरू नये म्हणून परमेश्वरानेच ही गर्दीची भिंत आपल्यासमोर उभी केलीय? आपण? आणि दौलतशेटच्या दाराशी वशिला लावायला? आणि तोसुद्धा आपल्या अपराधी मुलासाठी? आणि दौलतशेट कोण? तर ज्याला आपण शाळेच्या कामात ढवळाढवळ सहन करणार नाही असे ठणकावून सांगितले तो? शाळेच्या इन्स्पेक्शननंतरचे ताशेरे इन्स्पेक्टरला दम भरून त्याने बदलायला सांगितले तेव्हा साऱ्या गोष्टी नियमानुसारच झाल्या पाहिजेत म्हणून आपणच ना त्याला खडसावले? खरं म्हणजे दौलतशेट आपला एकेकाळचा विद्यार्थी. मराठी सहा-सात यत्तेनंतर त्याची बुद्धी शाळेत

चालली नाही. आपल्याला खरं म्हणजे किती मानतो तो. मराठे मास्तरांची सिनिऑरिटी डावलून आपल्याला हेडमास्तर करायला निघाला तेव्हा करडेपणाने आपणच त्याला समजावले. अशा एक ना अनेक गोष्टी तात्यांना आठवल्या. काय म्हणेल हा दौलतशेट आपल्याला? आपल्याला हिणवेल? पण नाही. तसा तो दिलदार आहे. त्याचे मार्ग काही असोत आणि आपल्याला तरी दुसरा मार्गच कोठे राहिलाय? तात्या बंगल्यासमोरच्या बगिचात विचारमग्न उभे होते. तेवढ्यात तिकडून हरि आला. त्यांचा जुना विद्यार्थी.

''तात्या, इकडे कुठे वाट चुकलात? दौलतशेटचे अभिनंदन करायला काय?''

''आँ, होय.'' तात्यांना आपसूकच निमित्त मिळाले. ''अरे बाबा एवढी गर्दी. मी कसा पोचणार तुझ्या शेटपर्यंत?''

''तुमी काय बी फिकीर करू नका. मी हाय ना. मी करतो समदी वेवस्था. फकस्त तुमी एक चिट्ठी द्या.''

तात्या मास्तरांची चिठ्ठी वाचून दौलतशेट चरकला. आमचा हा रामशास्त्री काही नुसतं अभिनंदन करायला आला नसेल? काही तरी सुनवायलाच आला असेल. आपल्याला बुवा जगात पैसे घेणारीच माणसं आवडतात. त्यांनी घेतले. आपण दिले. त्यांनी दिले. आपण घेतले. पण ही तात्यांसारखी माणसं म्हणजे भारी अडचणीची. आपण खायची नाहीत आणि दुसऱ्याला खाऊं द्यायची नाहीत. वर काहीतरी तत्त्वज्ञान सांगत राहतील. सांगावं कां आता वेळ नाही म्हणून. तेवढ्यात दौलतशेटच्या मनात एक कल्पना सळसळून गेली. तात्यांना आपल्याकडे पाठवायची त्या कमळाबाईची तर मसलत नसेल? कमळाबाईच्या आठवणीनं नाही म्हटलं तरी दौलतशेटचं तोंड जरा कडू झालंच. कालचा प्रकार जरा जास्तीचाच झाला. कमळाबाई मुलींच्या वसतिगृहाची व्यवस्थापिका. आपण संस्थेचे अध्यक्ष म्हणून राऊंड घेतला. काल कमळाबाईशी आपण जरा वाजवीपेक्षा जास्तीच सलगी केली.... ती बाई तर बिथरली नसेल ना? तिनेच तर तात्यांना सगळं सांगून पाठवलं नसेल? एरवी सगळं दडपलं असतं. पण आता मंत्रिपद तोंडावर आलंय्. मध्येच काही भानगड उपटायला नको. काय असेल तर आतांच त्याचा 'बंदोबस्त' केलेला बरा. दौलतशेटने तात्यांना आत घेऊन यायला हरीला सांगितले. तात्या हॉलमध्ये आले. भोवतालची गर्दी पाहून थोडेसे हिरमुसलेच. प्रश्नार्थकपणे त्यांनी दौलतशेटकडे बघितले. दौलतशेट समजला. चार लोकांत तात्यांना बोलायचे नाही. म्हणजे आपला अंदाज बरोबर म्हणायचा. हा रामशास्त्री काही अभिनंदनासाठी आला नाही. कमळाबाईचंच काम दिसतंय्!

''चला तात्या, आपण आतल्या खोलीत बसूं. मंडळी तुम्ही थोडा वेळ बसा. आम्ही गुरुजींशी बोलून येतो.''

एअर कंडिशन्ड् खोलीत बसूनसुद्धा सर्व हकिगत सांगताना तात्यांना घाम फुटला होता. बबनची कर्मकहाणी सांगताना इकडे तात्यांचा ऊर धपापत होता. तर तिकडे दौलतशेटला मनावरचे मणामणाचे ओझे उतरल्यासारखे वाटत होते. तात्यांची हकिगत संपल्यावर लागलीच तेथूनच दौलतशेटने एस्. टी. ऑफीसला फोन लावला. कंट्रोलरसाहेब दौलतशेटचा फोन म्हटल्यावर हादरले.

''हे बघा. ते बबन कुलकर्णीचे प्रकरण आहे ना ते ताबडतोब हश्अप् करायचे.''

''आँ, पण साहेब त्याचा कबुलीजबाब झालाय. रेकॉर्डवर नोंद झालीय.''

''कंट्रोलरसाहेब, तुमची सगळी प्रकरणं बाहेर काढूं कां?''

''नाही, नाही, साहेब. तसं नाही. पण...''

''हें बघा. तुम्हाला गावांत नीट नोकरी करायची आहे. तुमच्या मुलाला जूनमध्ये पॉलिटेक्निकमध्ये ॲडमिशन घ्यायचीय ना? मग नीट काय सांगतो ते ऐका. अजून बबनच्या प्रकरणाचा बभ्रा झाला नाही. तेवढ्यातच मिटवून टाकायचंय. कोणाला अजिबात कळता कामा नये. बबनला कालचा आणि आजचा दिवस रजेवर दाखवा. सगळे पेपर्स घेऊन संध्याकाळी माझ्याकडे या. म्हणजे कसं निस्तरायचं ते नीटपणे सांगता येईल. समजलात? उद्यापासून बबन कामावर हजर होईल. त्याला कोणताही त्रास होता कामा नये. माझा माणूस समजायचा. कळलं ना मी काय म्हणतोय ते?''

''होय साहेब.'' त्या बाजूला कंट्रोलर बहुधा घामच पुसत असावा. दौलतशेटचा आवाज भलताच करडा होता.

''झालं ना तात्या काम तुमचे. आतां आम्हांला तुमचे आशीर्वाद पाहिजेत.'' तात्यांनी आशीर्वाद दिला.

तात्या घरी परतले. दवाखान्यांतून परततांना झाली होती त्यापेक्षा त्यांची पावले आज अधिक जड झाली होती.

दुसरे दिवशी बबन कामावर रूजूं झाला. संध्याकाळी खुशीत घरी आला. सगळा दिवस छान गेला होता. जसं काही घडलंच नव्हतं. आनंदाने तात्यांना हाका मारीत सांगायला माडीवर गेला. पण... तात्यांना त्याची हांक ऐकूं जात नव्हती? कारण.....

# ४. निकाल

रामजी अभ्यासिकेत सकाळचे टपाल घेऊन आला तेव्हां भाऊसाहेब आरामखुर्चीत रेलून बसलेले त्याला दिसले. थोड्याच वेळापूर्वी त्याने बनवून ठेवलेला चहा तसाच होता आणि त्यावर आता जाडसर साय धरली होती. भाऊसाहेब विचारमग्न होते. त्यांची नजर कोठेतरी शून्यात होती. त्या नजरेने अर्थातच रामजीच्या येण्याची दखल घेतलेली नव्हती. तेव्हा रामजी म्हणाला,

'साहेब'

''आँऽ''

''नाय म्हटलं, सकाळची च्या तशीच थंड पडली हाय्. आता दुसरी बनवून आणतो.''

''नको,नको, आज चहा नकोसा वाटतोय, बाईसाहेबांना सांग, चांगली स्ट्रॉंग कॉफी बनवून इकडेच घेऊन या.''

हे नवलच होते. भाऊसाहेबांना चहा अत्यंत प्रिय होता. सकाळच्या दोन-तीन प्रहरात तीन चार वेळा तरी ते चहा घेत. रामजीच्या मनात आलं, इतर बंगल्यांतून कचाकच बाटल्या फुटत्यात. पण आपल्या साहेबांनी अमृतकोकमखेरीज दुसरं रंगीत पाणी कधी बघितलं नसेल. हा झांगोजीरावाचा खटला केव्हा पुरा होतोय, कुणास ठाऊक? पण आपल्या साहेबाचे किती रक्त आटवतोय! एकसारखे निरोप काय, फोनवरून धमक्या काय---

विचार करत करत रामजी गेला. साहेबावर त्याची फार फार भक्ती होती.

थोड्याच वेळाने सुमतीबाई कॉफीचा ट्रे घेऊन आल्या. वास्तविक रामजीखेरीज अभ्यासिकेत कोणीच आलेले साहेबाना आवडत नसे. आज ज्याअर्थी आपणहून बोलावलं आहे त्याअर्थी जिवाची तगमग, प्रक्षोभ वाढलेला दिसतोय, कॉफी कपात ओततां ओततां त्या म्हणाल्या.

''काल रात्रभर जागेच होता ना?''

''तुला काय माहीत?''

''अभ्यासिकेत दिवा दिसत होता ना!''

''म्हणजे तू पण झोपली नव्हतीस ना?'' भाऊसाहेब सुमतीबाईंकडे स्नेहार्द दृष्टीने पहात म्हणाले.

''तुला कितीवेळा मी बजावलेले आहे. आमची कामे ही अशी. असा एखादा महत्त्वाचा खटला समोर असला की दिवसाच्या गडबडीत दोन्ही बाजूंचा शांतपणे, नि:पक्षपातीपणाने विचारच करता येत नाही; म्हणून अशावेळी रात्री शांतपणे चिंतन होते. अशा वेळी माझी चिंता करत बसायचे नाही. आपले काम आंवरले की झोपून जायचे.''

कांही न बोलता सुमतीबाईंनी कॉफीचा कप पुढे केला, भाऊसाहेबांच्या मनात आलं, कशाला पुन्हां पुन्हां बजावायचं. आयुष्यात हिने आपल्या काळजीखेरीज दुसरं केलेच आहे काय? दोन वर्षांपूर्वी आपण हॉस्पिटलमध्ये होतो; तेव्हां रात्री ड्युटीला स्पेशल नर्स ठेवलेली होती. पण तिच्यावर भरवसा न ठेवतां रात्र रात्र हीच जागी असायची, खरं पहायला गेले तर ही सुमती केवढी बुद्धीवान आहे? मनात आणले असते तर चांगली वकील झाली असती, आणि कदाचित आपल्याच बेंचसमोर युक्तिवाद मांडत बसली असती; पण ते नाही; स्वतंत्र कर्तृत्व दाखवायची हौस कधी तिने दाखविलीच नाही. दुधात खडीसाखर विरघळून जावी तशी आपल्या संसारात पूर्णपणे विलीन झाली. आयुष्यभर आपल्यामागे सांवलीसारखी राहिली. आणि आता ह्यापुढे पुन्हा हिला बजावयाचा, समजावयाचा प्रश्न येतोच आहे कशाला? 'त्या' विचारासरशी भाऊसाहेब दचकले. छे, 'ती' कल्पनाच सहन होत नाही! पण....

भाऊसाहेब आरामखुर्चीत सावरुन बसले, जसे कांही त्यानी स्वत:च्या मनांतील द्वंद्वपण सावरले होते.

''अग काल सुधीरची केबल आली होती.''

''आँऽऽ मग बोलला नाहीत ते.''

''अगं रात्री उशीरा आलो आणि कामाच्या गडबडीत राहून गेलं.''

''काय म्हणतोय? बरा आहे ना?''

''तो छान आहे. पण छायाला बरं नाही. म्हणजे काळजी करण्यासारखं कांही नाही. कांही तरी 'गोड' आजार आहे.''

''अग बाई हो? छानच.'' सुमतीबाईंची लागलीच कळी खुलली.

''सुधीरने ताबडतोब तुला बोलावलंय. छायाला त्रास होतोय, तिचा थिसिस् जवळजवळ पुरा होत आलाय, तेव्हां त्यांना आता तुझी फार गरज आहे. तुला न विचारताच मी तुझे शनिवारचे विमानाचे बुकिंग केले आहे.''

''म्हणजे तुम्ही येणार नाही?'' सुमतीबाईंनी काळजीच्या स्वरात विचारले.

'अगं तू पुढे हो. एवढे खटल्याचे काम आटोपले की मी सरसाहेबांची परवानगी घेतो आणि निघतोच.''

''बघा बाई, मला कांही तुमचं खरं वाटत नाही.''

पण सुमतीबाईंचे बोलणे तेवढ्यावरच थांबले. बाहेर कोणी मंडळी आल्याचे रामजी सांगत आला तेव्हां त्या अभ्यासिकेतून बाहेर पडल्या. भाऊसाहेबांना कोण मंडळी आली असावीत आणि कशासाठी ह्याची पूर्ण कल्पना होती. त्यांनी जरा रागानेच रामजीला विचारले.

''कोणाला भेटायला मला आवडत नाही, तुला माहीत आहे ना?''

''होय साहेब.... पण मंडळी ऐकेचनात.''

''माझ्यासाठी कांहीतरी जहागीर वगैरे घेऊन आले असतील ना? आणि तुझ्यासाठी एखादा चांदीचा तोडा-बिडा.''

''होय साहेब.'' साहेबांनी अचूक ओळखले म्हणून रामजीला हसू आले. ''ही मंडळी त्यातलीच वाटतात. त्यांची उगाच थोडी समजूत काढाया मी आत आलो. त्यांना आतां कसं घालवायचं ते ठावं हाय मला. कमिशनरसाहेबांनाच फोन करतो म्हटल्यावर चटदिशी जातील.''

भाऊसाहेबांनी अभ्यासिकेचे दार लावून घेतले. त्यांचे मन विषण्ण झाले. आजवर त्यांच्यापुढे आलेले खटले वेगळे आणि आजचा वेगळा. आजवरच्या खटल्यात जास्तीतजास्त चार-दोन मंडळींचे हितसंबंध गुंतलेले असत. पण आताचा मामला वेगळा होता. राज्याच्या मुख्यमंत्र्यांवरच, झांगोजीरावांवर आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचा आरोप होता- सरकारी यंत्रणेचा आणि अधिकाराचा दुरुपयोग करून, अमर्याद लांचलुचपत केल्याबद्दल कांही जागरूक आणि धाडसी समाजसेवकांनी न्यायालयात धाव घेतली होती. राज्याच्या सत्ताधीशांविरुद्ध हजारो लाखो लोकांनी केलेली ती कैफियत होती. जुलुमी, मग्रूर आणि बेमुर्वतखोर अशा सत्तांधांना कायद्याचा लगाम घालायलाच हवा होता. हो! केवळ कायद्याचाच. कारण नीतीमत्ता, चाड या साऱ्या गोष्टी त्यांनी केव्हांच गुंडाळून ठेवल्या होत्या. भाऊसाहेबांना स्वत:चे नवल वाटले. अत्यन्त नि:पक्षपातीपणे विचार करणारा म्हणून नांवाजलेला आपल्यासारखा ज्येष्ठ न्यायाधीश इतका विकारवश कसा झाला.?

पण न्यायाधीश असले तरी देशाचे ते एक सुजाण नागरिक पण होते. कायद्याच्या चौकटीत हातपाय बांधले गेले असले तरी सामान्य देशप्रेमी माणसाप्रमाणे त्यांचे मन पण

देशाच्या सुखदु:खाच्या चिंतेने व्याकूळ झाले होते.

शनिवारी मध्यरात्रीच्या विमानाने सुमतीबाई सुधीरकडे अमेरीकेत रवाना झाल्या. या खटल्याच्या संदर्भात अनेक उलट सुलट बातम्या येत असत. लोक कांहीबाही बोलत. त्यामुळे अशा परिस्थितीत भाऊसाहेबाना सोडून जाण्यास त्या बिलकूल तयार नव्हत्या. पण भाऊसाहेब त्यांचे कांही एक ऐकायला तयार नव्हते. आणि सुधीरला त्यांची गरज पण होती. त्यांचा नाईलाज झाला.

•••

सोमवारचा दिवस उजाडला. कोर्टात ठासून गर्दी होती. दोन्ही बाजूंचे सज्जे लोकलच्या डब्यासारखे गच्च भरले होते. आणखी काही लोक आंत शिरायला पाहात होते. पण त्यांना पोलीसांच्या दंडुक्याचा प्रसाद खाऊनच परतावे लागत होते. वृत्तपत्रांचे बातमीदार आपापल्या लेखण्या सरसावून बसले होते.

बरोबर अकराच्या ठोक्याला भाऊसाहेबांनी आपल्या स्पष्ट नि स्वच्छ आवाजात निकालपत्र वाचून दाखवण्यास सुरवात केली. दोन्ही बाजूंच्या साक्षी पुराव्याची तर्कशुद्ध छाननी करत करत त्यानी अत्यंत सुस्पष्ट शब्दात, मुख्यमंत्र्यांची कार्यपद्धती ही त्यांना घटनेने दिलेल्या अधिकाराबाहेरची आहे हे स्पष्ट केले. परवाने-वाटप, अखत्यारीतील निधीचा गैरवापर, ह्या साऱ्या बाबी फिर्यादी पक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन नि:संशय सिद्ध झाल्या आहेत हे मान्य करून त्यांनी मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी हे संपूर्णपणे दोषी आहेत असा निकाल दिला.

जसजसे निकालपत्राचे वाचन होत होते, तसतसे प्रेक्षकांच्या चेहऱ्यांवरचे भाव बदलत होते. प्रथम औत्सुक्य, कुतूहल वाटणाऱ्या नजरा, अखेरीअखेरीस चिंताक्रांत वाटू लागल्या. न्यायसंस्थांवरचे सरकारचे वाढते दडपण माहीत असल्याने हा निकाल जरी लोकाना अपेक्षित होता, हवाहवासा होता तरी पण त्याच्या परिणामांची परिणती कशात होईल ह्याची शाश्वती नव्हती. म्हणून प्रथम जरी कोलाहल होता तरी निकालपत्रातील शेरे ऐकताऐकता त्या कलकलाटाचे कुजबुजीत रुपांतर झाले आणि चार तासाचे वाचन भाऊसाहेबांनी पुरे केले तेव्हां तर अगदी स्मशान-शांतता पसरली होती...

भाऊसाहेबांनी वाचन संपविले. सही करून सर्व कागदपत्रांवर शिक्कामोर्तब केले. आपल्या कोटाच्या खिशातून दोन गोळ्या काढल्या. समोर ठेवलेला पाण्याचा ग्लास घेतला. एकदा शांत चित्ताने सर्व कोर्टरुमकडे बघितले. दोन्ही गोळ्या तोंडात टाकल्या

आणि वर थोडेसे पाणी घेतले.

भाऊसाहेबांनी पुढे बोलायला सुरुवात केली. एक न्यायाधीश म्हणून माझे कर्तव्य संपलेले आहे. खरे पाहता ह्या खटल्यात निर्णयाचे काम अगदीच सोपे होते. कारण फिर्यादी पक्षाने जमा केलेला पुरावा बिनतोड आहे. कायद्याच्या मर्यादा, आरोप असलेल्या उच्चपदस्थ मंडळींनी बिनदिक्कतपणे ओलांडलेल्या आहेत. तेव्हा कायद्यात तरतूद असलेंल्या कलमांप्रमाणे त्यांना दोषी धरणे हे अगदी सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे ही गोष्ट माझ्यासमोर खटला आला त्या क्षणापासूनच स्पष्ट होती. आता मी जो तुमच्यासमोर बोलतोय तो तुमच्यासारखाच एक सामान्य नागरिक म्हणून. ह्या खटल्यातून तथाकथित उच्चपदस्थ मंडळींची सुटका व्हावी, बिनशर्त मुक्तता व्हावी यासाठी माझ्यावर अनेक प्रकारे आणि अनेक व्यक्तींचे दडपण येत होते. मोह आणि प्रलोभने अनंत होती. अर्थात् उभ्या आयुष्यात ज्या गोष्टी आम्ही निग्रहाने टाळत आलो त्यांचा आतां आयुष्याच्या अखेरीला मोह पडेल हे सर्वथा असंभवनीय. फक्त काळजी होती ती, हा निकाल दिल्यानंतरच्या परिस्थितीची. काही वर्षांपूर्वी अशीच परिस्थिती माझ्या दोन ज्येष्ठ सहकाऱ्यांवर आली होती. त्यांनी कोणाचाही मुलाहिजा न ठेवता निर्भयपणें रास्त निकाल दिले होते. आपल्या देशातील न्यायसंस्थेची प्रतिष्ठा वाढवलेली होती. पण हे 'निर्णय' उच्चपदस्थांना मानवणारे नव्हते, परिणाम इतकाच झाला की माझा सहकारी अचानक आपल्या बाल्कनीतून तोल जाऊन 'अपघाताने' खाली रस्त्यावर पडून गेला! आणि दुसरा मानसिकदृष्ट्या दुर्बल ठरून दूर केला गेला!! मला माझी स्वत:ची अशी परवड करून घ्यायची नाही. माझ्या कुटुंबियांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना आधीच मी परदेशी पाठविलेले आहे. मला स्वत:ला पळून जाणे अशक्य नव्हते. पण तसे करणे भ्याडपणा दिसला असता. न्यायसंस्थेचीही प्रतिष्ठा गेली असती. मघा मी ज्या दोन गोळ्या घेतल्या त्या काहीं नेहमीच्या डोकेदुखीच्या नव्हत्या तर माझ्या जीविताचा अंत घडविणाऱ्या होत्या. माझ्या मरणाने तरी आजच्या भ्रष्टाचारी समाजजीवनाची भयानक अवस्था तुम्हां सर्वांच्या ध्यानी येईल आणि तुम्ही तुमची मरगळ आणि उदासीनता टाकून राष्ट्रहिताचा विचार राज्यकर्त्यांना करायला लावाल एवढी तरी किमान अपेक्षा मी करुं नये काय?''

भाऊसाहेबांच्या एकेका शब्दासरशी लोक प्रक्षुब्ध होऊ लागले होते, त्यांनी आपले निर्वाणीचे शब्द उच्चारले तेव्हां त्यांच्या स्नेह्या-सोबत्यांनी आणि सहकाऱ्यांनी त्यांच्या खुर्चीकडे धांव घेतली; पण...,...पण सारे संपत आले होते....

भाऊसाहेबांचा हा निर्णय कोणी कधीच अपेक्षिला नव्हता!

❖❖❖

# ५. 'बिनकण्याची माणसं'

साठे, मोडक, गोडबोले आणि फाटक सर्वजण मिळून आलेले शांताबाईंनी बघितले. आज काहीतरी ह्यांच्याकडे महत्त्वाचे काम दिसतेय; त्याशिवाय फिरकायची नाहीत ही मंडळी, असा विचार करत त्यांनी सर्वांना बाहेरच्या हॉलमध्ये बसायला सांगितले. बेडरुममध्ये वाचत बसलेल्या बापूरावाना त्यानी सांगितले, तसे बापूराव अंगात झब्बा चढवित बाहेरच्या हॉलमध्ये आले. आपल्या नेहेमीच्या खड्या सुरात त्यानी विचारले,

''हंऽ, बोला मंडळी, काय काम काढलत्?

''त्याचं असं आहे बापूराव'' साठेंनी सुरवात केली.

''ह्या सीतारामाचा उपद्रव हल्ली फार वाढलाय्. इतके दिवस आपल्या सोसायटीच्या बिल्डिंगसमोर नुसते मासणीचे वाटे विकत बसायचा तोंवर ठीक होतं. पण हळूहळू गोळ्या बिस्किटं विकूं लागला. समोरच असलेल्या शाळेच्या मुलांमुळे विक्री वाढायला लागली. धंदा वाढतोय् बघितल्यावर त्याची हांव पण वाढायला लागलीय्. दोन तीन दिवस झाले. आपल्या सोसायटीच्या कंपाऊंडला लागून एक दुकान बांधायला सुरवात केलीय्. एकदा दुकान बांधून झालं म्हणजे आपल्या सोसायटीवर ते चांगलंच आक्रमण ठरणार आहे. हे सगळं बांधकाम बेकायदेशीर आहे. तुम्ही गेले १५-२० दिवस बाहेरगांवी होतात.''

''तुम्ही काय काय केलत?''

''आम्ही सर्व पुरुषमंडळी ऑफिसला गेल्यावर तो येतो. गवंडी वगैरे आणून काम करतो. बिल्डिंगमधल्या बायकांनी हटकलं तेव्हां अत्यंत अर्वाच्य अशा शिव्यांचा भडिमार त्याने केला. तशी त्या घाबरल्या.''

''म्युनिसिपालिटीत तक्रार दिलीत?''

''हो, काल मी आणि मोडक रजा काढून म्युनिसिपालिटीच्या ऑफिसात गेलो. पुष्कळ खात्यांमधून फिरलो. अनेकांना भेटलो पण आमची कोणी दाद घेतली नाही. नुसती अुडवाअुडवी केली.''

''तुम्हीच लक्ष घातल्याशिवाय कांही जमायचं नाही बापूराव. तुमच्या शब्दाला

तेथे किंमत आहे'' आता मोडक आणि गोडबोलेनी पण भर घातली. बापूराव अशा स्तुतीने फुशारून जात. म्हणजे ते स्तुतीप्रिय होते अशातला भाग नव्हता. पण त्याना बरं वाटत असे. विशेषत: सगळे थकले आहेत- हताश झाले आहेत, सारी परिस्थिती आतां आपल्यालाच हाताळायची आहे अशी 'सिच्युएशन्' असली की बापूरावाना अधिकच स्फुरण चढे. आणि खरं म्हटलं तर ही 'पूर्ववैभव' सोसायटी, त्यांनी संपूर्णपणे स्वत:च्या हिंमतीवर उभी केली होती. बाकीची मंडळी होती, नाही असं नाही. पण भजन म्हणणारा मुख्य म्होरक्या असावा व बाकीच्यांनी नुसते 'जीऽजी रे जीऽजी' करत साथ द्यावी तशातला प्रकार होता. त्यामुळे सोसायटीची बिल्डिंग पुरी झाल्यावर आजूबाजूच्या परिसरात ती 'बापूरावांची सोसायटी' म्हणूनच ओळखली जायची. सोसायटीच्या बिल्डिंगचा पाया भरण्यापासून तो बिल्डिंग उभी राहीपर्यंत आणि अगदी अंगणात फुलंझाडं लावण्यापासून तो बॅडमिंग्टन कोर्ट आखण्यापर्यंत सगळ्याच कामात खरी मेहनत बापूरावांचीच होती. अनेक सामाजिक कार्यांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या ओळखी खूप होत्या. एखादे काम हाती घेतल्यावर त्याच्या पूर्णतेपर्यंत पाठपुरावा करण्याची विलक्षण चिकाटी व ज़िद्द त्यांच्या अंगी होती आणि त्यापेक्षा आजकाल दुर्मिळ असलेला मोठा गुण त्यांच्या ठिकाणी होता तो म्हणजे निरपेक्ष बुद्धी. सोसायटीच्या लाखों रुपयांच्या उलाढालीतून त्यांनी एका पैशालाहि स्पर्श केला नव्हता किंवा साधा सुतळीचा तोडा स्वत:साठी घेतला नव्हता. अर्थात लोक म्हणायचे, नवरा बायको दोघेच दोघे, पैसा करायचा तरी कुणासाठी? सर्वजण एकत्र राहायला आल्यानंतर मात्र बापूरावांनी जाणीवपूर्वक सोसायटीच्या कामातून आपले अंग काढून घेतले होते. आणि आपल्या सहकाऱ्यांवर बाकीची जबाबदारी सोपवून ते आपल्या आवडत्या वनवासी कल्याण केंद्राच्या कामात अधिकाधिक लक्ष घालू लागले. त्यासाठी त्यांना अधूनमधून बाहेरगांवी जावे लागे. ह्या सीतारामाचा उपद्रव व्हायला लागला त्या काळात ते असेच बाहेरगांवी होते आणि नुकतेच घरी परतले होते. त्यांची पत्नी शांताबाई नावाप्रमाणेच शांत बाई होती. आपल्या नवऱ्याच्या बरोबरीने ती त्यांच्या कामात सहभागी होत असे. मात्र आपल्या नवऱ्याच्या सरळ, अतिसरळ स्वभावाचा त्याना कधीकधी राग येई. आपला नवरा जितक्या निरपेक्षपणे कामे करतो तशी इतर मंडळी नाहीत ह्याची त्यांना खंत वाटे, खेरीज आपल्या नवऱ्याच्या कामाची बूज इतर मंडळी काम संपल्यावर ठेवीत नाहीत ह्याचे त्यांना सखेद वाईट वाटे. म्हणून आतासुद्धां सगळी मंडळी आल्यावर त्यांना थोडासा रागच आला होता. म्हणजे आतां आपल्या नवऱ्याला पुन्हा सोसायटीच्या कामात पडावे लागणार तर? चहा फराळाचे घेऊन त्या हॉलमध्ये आल्या तेव्हा चर्चा संपत आली होती व सगळी 'स्किम्' अगदी पक्की झाली होती.

•••

रात्री मिटींग झाली. सोसायटीतर्फे म्युनिसिपालिटीकडे रीतसर अर्ज पाठवायचे ठरले. सीताराम सोसायटीच्या हक्कावर आक्रमण करतोय्. सोसायटीच्या मालकीच्या भू-पट्ट्यावर बांधकाम करतोय्. तेव्हा हे बांधकाम बेकायदेशीर असल्याने म्युनिसिपालिटीने ताबडतोब कारवाई करुन हे दुकान जमीनदोस्त करावे अशा अर्थाचा ठराव सर्वानुमते संमत झाला. सारा अर्ज बाबुरावानी एकहाती लिहिला आणि दुसरे दिवशी स्वत: नेऊन म्युनिसिपालिटीत दाखल केला. अर्थात् सध्याचे पदाधिकारी म्हणून साठे-मोडकाना त्यावर सही करावी लागली.

•••

पंधरा एक दिवस लोटले. नगरपालिकेकडून कोणतीच हालचाल नव्हती. तोंडावर आलेल्या निवडणुकांकडेच सर्वांचे लक्ष लागले होते. तेव्हां 'पूर्ववैभव'च्या असल्या किरकोळ गाऱ्हाण्याची कोण दखल घेणार? इकडे सीतारामच्या कटकटीपण वाढल्या होत्या. सीताराम आणि त्याची साथीदार मंडळी आजूबाजूच्या लोकांची टिंगल-टवाळी करीतच, खेरीज सोसायटीच्या मुलींची पण छेडछाड काढत. बापूरावानी सीतारामाला चुचकारण्याचा, समजावण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. पालथ्या घड्यावर पाणी. उलट आपल्याविरूद्ध सोसायटीच्या लोकांनी नगरपालिकेत तक्रार अर्ज केल्याचे कळले, तेव्हांपासून तर तो अधिकच उन्मत्त झाला. ''कसे माझे दुकान पाडताय् बघू दे तरी! एकेकाची नाही तंगडी तोडली तर नावाचा सीताराम नाही, असे मिशीला पीळ देऊन बोलू लागला. आतां मात्र गप्प राहणं बापूरावांना शक्य नव्हतं. त्यानी एखाद्या कामाला हात घातला आणि ते तडीला नेले नाही असे कधी व्हायचंच नाही. सोसायटीची इतर सभासद मंडळी आपणहून कांही करायची नाहीतच आणि वर 'बापूराव आतां सीताराम कायमचाच राहणार काय?' असे विचारीत. बापूराव आतां इरेला पडले. एक दिवस त्यांनी रजा घेतली व तडक जाऊन थेट कलेक्टर ऑफिस गांठलं. हर प्रयत्नांनी त्यानी कलेक्टरची भेट घतली. जुनी ओळख काढली. आजची सामाजिक परिस्थिती, वाढती गुंडगिरी, राज्यकर्त्या वर्गाची अनास्था असे बरेच कांहीसे बापूराव त्यांच्याशी बोलत राहिले. अखेर कलेक्टरसाहेबांनी जातीने ह्या कामात लक्ष घालण्याचे कबूल केले.

•••

कलेक्टरसाहेबांनी आपले अभिवचन खरोखरच पाळले. त्यांचा हुकूम गेल्यावर चार पांच दिवसातच म्युनिसिपालिटीचे लोक आले. आणि बघतां बघतां त्यानी सीतारामचे दुकान जमीनदोस्त केले. सगळी जागा साफसूफ केली. सोसायटीकडून मोठी बक्षिसी

घेऊन नोकरवर्ग परतला. तो दिवस सर्वांनाच खूप आनंदाचा आणि उत्साहाचा वाटला. बापूरावानी मनावर घेतलं म्हणूनच हे सोसायटीवरचं गंडांतर टळलं. बरेचजणांनी तसं बोलून दाखविले. त्या दिवशी सर्वांच्या गप्पा अगदी रात्री उशीरापर्यंत चालल्या होत्या. सर्वजण खुशीत होते, कां कोणास ठाऊक पण शांताबाई मात्र गंभीर होत्या.

•••

दोन दिवसानंतरच्या एका संध्याकाळी बापूराव लोकलमधून उतरले. बरोबर साठे, गोडबोले व मोडक हे नेहमीप्रमाणे होतेच. बाजारांतून भाजी वगैरे घेऊन गप्पा मारत मारत ते 'पूर्ववैभव'च्या कोपऱ्यावर आले असतील नसतील, एवढ्यात अचानक सीताराम त्यांच्या पुढ्यात येऊन उभा राहिला. त्याच्या डोळ्यात फुललेला अंगार तेवढ्या संधीप्रकाशातही सर्वांना दिसला. त्याच्या हातात एक काठी होती. त्याच्याबरोबर आणखी दोघेजण होते. त्यांच्या हातातहि काठ्या होत्या. खेरीज एकाच्या हातात लोखंडी शीग होती. त्यांच्या एकूण अवतारावरून दोघे चांगले अट्टल गुंड दिसत होते. सीतारामने बापूरावांच्या दिशेने बोट दाखवितांच ते दोघेजण काठ्या उगारून बापूरावांच्या बाजूला आले. त्या तिघांचा एकूण रुद्रावतार व त्यांच्या हातातील काठ्या बघून मोडक, साठे आणि गोडबोलेंच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले! दुकान पाडताना बरे वाटले, पण सीताराम एवढा डूख धरील असे वाटले नव्हते. त्यांच्या डोळ्यांसमोर बायका-मुले दिसू लागली. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला आपला जीव बचावला पाहिजे एवढेच आकलन त्यावेळी त्यांच्या मेंदूला होत असावे कारण जेव्हा सीताराम 'थांबा भडव्यानो, आतां एकेकाची गठडी वळतो' असे म्हणत धांवून आला तेव्हां त्या तिघांनीहि आपापल्या ऑफिस बॅगस्, भाजीच्या पिशव्या तेथेच टाकून मागच्या मागेच पळायला सुरवात केली. इतर दोघेजण बापूरावांवर तुटून पडलेले त्यांना दिसत होते पण सीताराम काठी उगारून आपल्यामागे धांवत येतोय् हे बघितल्यावर त्यांनी आणखीनच जोरात पळायला सुरवात केली. सीताराम क्रूरपणे हंसला. 'हत् भटांनो, पळपुटे कुठले' असे म्हणाला आणि त्याने आपला मोर्चा बापूरावांकडे वळविला. बापूराव त्या दोघा गुंडांशी प्राणपणाने झुंजत होते. दोघांच्या काठीचे वार आपल्या हातांतील ब्रीफकेसवर ढालीसारखे झेलत होते. एकदा तर मोका साधून त्यांनी ब्रीफकेस एकाच्या डोक्यात हाणली, तेव्हां दुसरा साथीदार बापूरावांच्यावर तुटून पडला. एवढ्यात सीतारामने त्यांच्या डोक्यावर, छातीवर काठीचे सपासप वार केले. मघा डोक्यावर मार बसलेला गुंड आता चेवाने पुढे आला. त्याने बापूरावांचा शर्ट कॉलरपाशी धरला, दुसऱ्याने त्यांचे तोंड धरले व फडाफड् डोळ्यांवर, कानावर व नाकावर जोरदार मुष्टिप्रहार केले. एकटे, निःशस्त्र बापूराव किती वेळ तग धरणार? सीतारामने डोक्यावर मारलेल्या काठ्यांच्या सपासप वाराने ते खाली कोसळले

आणि भोंवळ येऊन पडले. ते खाली पडलेले बघतांच सीताराम व त्याचे साथीदार गल्लीतून पळाले.

बापूरावांचा आरडाओरडा ऐकू येत होता, पण त्या तिघांच्या हातातील काठ्या व लोखंडी शिगा बघून रस्त्यावरचे पादचारी दूरवर पळाले होते. आधी त्या रस्त्याला फारशी रहदारी अशी नव्हतीच. एव्हाना शांताबाई हातात धुण्याची काठी घेऊन धांवत आल्या. बापूरावाना कोणीतरी मारतय् एवढेच रस्त्यावरुन त्याना कोणीतरी ओरडून सांगितले होते. तेवढे ऐकताच ताबडतोब त्या रस्त्याने धावत निघाल्या आणि बापूरावांना रक्ताच्या थारोळ्यात, धुळीत पडलेले पाहून मटकन् खालीच बसल्या. एव्हांना बरीच मंडळी गोळा झाली. त्यानी त्यांना सांवरले. बापूराव निश्चेष्ट दिसत होते. त्यांच्या कपाळावर मोठी खोक पडली होती. डोक्यावरुन, खांद्यावरुन, गालावरुन रक्त वाहात होते. इतक्या ठिकाणी रक्त वाहात होते की कोठे कोठे मार बसलाय् तेच कळत नव्हतं. सगळं अंग रक्ताने माखले होते, त्यांना ग्लानी आलेली होती.

•••

डॉ. पुरोहितांच्या हॉस्पिटलमध्ये 'पूर्ववैभव'ची बरीच मंडळी गोळा झाली होती. बापूरावांची वृद्ध आई, बहिणी व इतर नातेवाईक आले होते. सर्वांना ती रात्र मोठी काळजीची गेली. सर्व मंडळी शांताबाईंच्या भोंवती बसली होती. त्यांना धीर देत होती. बऱ्याच वेळाने डॉक्टर बाहेर आले. सुदैवाने बापूरावांच्या जीवाला धोका नव्हता, पण बऱ्याच ठिकाणी टांके पडले होते. मुका मारपण बसला होता. सगळे शरीर कपड्यांऐवजी बँडेज्‌मध्येच गुंडाळल्यासारखे दिसत होते. बरेच दिवस अंथरुणावरच पडून राहावे लागणार होते.

साठे, मोडक नि गोडबोले ह्या त्रिकुटाला लोकांनी टोचून टोचून अगदी हैराण केले होते. बापूरावाना मारहाण होतेय्, त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न होतोय्, अशा वेळी त्यांना मदत करायची सोडून, आपण त्याना एकाकी टाकून पळून गेलो ह्यामुळे त्यांचे अपराधी मन त्यांना खात होतेच. पण इतरांच्या निर्भत्सनेमुळे त्यावर मीठ चोळले जाई. सुरवाती सुरवातीला त्याना वाईट वाटले. पण नंतर त्यांना पटले की आपण केलं तेच बरोबर होतं. उगाच सुखासुखी आपला जीव काय म्हणून धोक्यात घालायचा? आणि आपल्याचा थोडीच मारामारी जमली असती? आणि सीतारामसारख्या गुंडांशी आपण किती काळपर्यंत टक्कर देत बसणार? उद्या सीतारामने आमच्यापैकी एकेकट्याला गांठायचं ठरवलं तर? आणि नेमकी हीच भीती प्रत्येकाला मनोमन भेडसावत होती. सीताराम म्हणजे साप आहे साप. त्याचे दुकान जमीनदोस्त करून आपण त्याच्या

शेपटीवरच पाय दिलाय्. तो आपल्यावर डूख धरल्याशिवाय राहायचा नाही. उद्यां बापूरावांचे झाले तसेच आपले.... छे, ती कल्पनासुद्धां कोणी सहन करूं शकत नव्हते. इतिहासकाळांत मोगल सैनिकांना जसे पाण्यातसुद्धां धनाजी संताजींचे प्रतिबिंब दिसे तसे त्या सर्वांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, सीताराम आणि त्याचे गुंड साथीदार दिसायला लागले! प्रत्येकाच्या मनात असणाऱ्या या भीतीचे सोसायटीच्या मिटिंगमध्ये प्रकटीकरण झाले. खरं म्हणजे ह्याचसाठी खास मिटिंग बोलावली गेली. सीतारामबरोबर नमतं घेऊन वागावं. त्याच्याशी समझौता करावा ह्या निर्णयाला 'पूर्ववैभव'ची सर्व सभासद मंडळी आली. साठे, मोडक आणि गोडबोले ह्यांना सर्वाधिकार देऊन त्यांनी याबाबतीत योग्य ती कारवाई करावी आणि तीसुद्धा लौकरात लौकर करावी असे ठरले. त्यानंतर मात्र प्रत्येकाला थोडी निवांत झोप लागली.

•••

त्यानंतर पंधरा एक दिवस लोटले. बापूरावाना हॉस्पिटलमधून घरी आणलं होतं. जखमा अजून संपूर्णपणे बऱ्या झाल्या नव्हत्या. त्यांचं ड्रेसिंग करायला एक नर्स आता घरीच येत होती. बापूरावाना घरी आणलं तसं त्यांची पाहुणेमंडळी घरोघरी परतली. बापूराव जेमतेम घरातल्या घरात हिंडू फिरू शकत. सोसायटीतील मंडळी जात, तेव्हां ते कोणाशी फारसं बोलत नसत. बहुतांशी त्यांचे मौनच अधिक असे. त्यांना मधल्या प्रकारामुळे मानसिक धक्का बसलाय. म्हणूनच ते बोलण्याचं टाळतायत अशीच सर्वांची कल्पना झाली. तरीपण नेहेमी बोलणारा माणूस एवढा गप्प गप्प असावा हे बरं वाटत नव्हतं. त्यातून बापूराव कांही चार सामान्य लोकांसारखे कच्च्या दिलाचे नव्हते. सीताराम आणि इतर गुंडांशी त्यानी एकटे असतानाहि प्रखर झुंज दिली होती. मग आपल्यावर बापूराव रागावलेले तर नसतील? साठे आणि मोडक ह्याना ह्याच कल्पनेचे मनोमन भय अधिक वाटे. बापूराव एकदा बोलायला लागले म्हणजे बरे!

आणि एक दिवस अचानक बापूराव खरोखरच बोलूं लागले!

रात्रीचे दहा वाजण्याचा सुमार होता. बापूरावानी साठेंच्या दाराची कॉलबेल वाजविली तेव्हां ते आश्चर्यचकीतच झाले. खरं म्हणजे मनातून थोडेसे गडबडलेसुद्धा. वरकरणी तोंडावर चांगले रुंद हास्य आणून त्यांनी बापूरावांचे स्वागत केले. त्याना कोचावर बसविले. मात्र तेवढ्या घाईघाईतसुद्धां त्यानी मुलाला पाठवून गोडबोले आणि मोडकला बोलावून घेतले.

''वा बापूराव, आतां पुष्कळच तब्येत सुधारलेली दिसते. आपणहून तुम्ही

आमच्यात गप्पा मारायला आलात. बरं वाटलं.'' गोडबोले म्हणाले.

''मी कांही शिळोप्याच्या गप्पा मारायला आलो नाही.'' बापूरावांच्या पहिल्याच फटक्यासरशी सर्वजण एकदम सावध झाले.

''सीतारामकडे जाऊन आलात?''

''अं; होऽऽ, पण तुम्हांला कसं कळलं?''

''कुणाकडून कळलं त्याला महत्त्व नाही. तिथे काय घडलं ह्याला महत्त्व आहे. मला सगळं तुमच्याकडून ऐकायचं आहे: बोला साठे, काय काय झालं?''

''तुम्हाला मारहाण झाल्यानंतरची गोष्ट. आम्ही तांतडीची मिटिंग घेतली.''

''कशासाठी?''

''सीतारामबद्दल कांहीतरी ठरवायलाच हवं होतं. सीताराम हा साप आहे. त्याच्या शेपटीवर आपण पाय दिलाय्. तो आतां आपल्याला दंश केल्याखेरीज राहणार नाही. त्याच्या पाठीशी गुंड आहेत. आपण नोकरदार माणसं. सकाळी ८॥ वाजतां बाहेर पडणार ते संध्याकाळी सात-साडेसातनंतर परत येणार. घरी बायका-मुले, कोणाकोणाकडे कॉलेजला जाणाऱ्या तरुण मुली. म्हणून आम्हीच निर्णय घेतला आणि...'' येथे साठे थोडेसे थांबले. पुढची हकीक़त कशी सांगायची? पण बापूरावाना दम नव्हता. तेच म्हणाले.

''हं, बोला, पुढे काय झाले?''

'' आम्हीं सर्वजण मिळून सीतारामच्या झोपडपट्टीत गेलो.''

''तुम्हाला घर माहीत होतं? आणि तुम्हाला भीती नाही वाटली?'' बापूराव उपरोधिकपणे हंसून विचारताहेत असंच सर्वांना वाटलं.

''आम्ही आपल्या झाडूवाल्या भूपतला बरोबर घेतलं होतं. त्याला घर माहीत होतं. आणि तुमच्या दुसऱ्या प्रश्नाचं खरं उत्तर द्यायचं तर जाताना भीती वाटत होतीच. पण असं कायमचं भीत राहण्यापेक्षां एकदाच काय तो सोक्षमोक्ष लागेल ह्या विचाराचा आधार सोबतीला होता. आम्ही सीतारामशी बोलणी केली. तो म्हणाला माझं दुकान तुम्ही पाडलत. त्याची नुकसान भरपाई द्या.''

''आणि तुम्ही दिलीत? किती?''

''त्याने पांच हजार रुपये मागितले.''

''काय? पांच हजार? आणि तुम्ही दिलेत?'' बापूरावांचा चेहरा विचारतांनासुद्धा लालबुन्द झाला होता.

''हो, दुसरा इलाजच नव्हता. आम्हीं सर्वांनी वर्गणी घालून पांच हजार रुपये गोळा केले आणि त्याला दिले. त्याने सर्वांसमक्ष आतां पुन्हां 'पूर्व-वैभव'च्या कोणालाही त्रास देणार नाही असे कबूल केलंय!''

''हे सारं तुम्हांला खरं वाटतय्? तो पुन्हा दुकानाची शेड बांधणार नाही ह्याची खात्री वाटते?'' बापूरावांनी सर्वांकडे ठामपणे पहात विचारले. सर्वजण गप्प होते. काय उत्तर द्यायचे?

''मला मारायला सीताराम आपल्या साथीदारांबरोबर आला तेव्हां तुम्ही पळालात कां? मला मदत करावी, माझा जीव वाचविण्यासाठी धडपडावं असं नाही वाटलं कुणाला?'' बापूरावांनी सर्वांकडे पहात मोठ्याने विचारले.

नेमक्या ह्याच प्रश्नाला ते तिघेजण मनोमन घाबरत होते.

खरं म्हणजे नेमका हाच प्रश्न त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या मनाला भेडसावीत होता. बाहेर सर्वजण हेच विचारून त्यांना हैराण करीत. आणि आतां ज्यांच्यामुळे हा प्रश्न उद्भवला ते प्रत्यक्ष बापूरावच त्यांना आतां विचारत होते. कांही तरी बोलणं भागच होतं. साठे म्हणाले.

''अचानक झालेल्या हल्ल्याने आम्हीं गडबडून गेलो. लोखंडी शिगा आणि काठ्या बघितल्यावर आम्ही पार घाबरलो. जीव वाचविणे, कांही करून आपला जीव वाचविणं एवढंच आम्हाला सुचण्यासारखं होतं. तेवढंच आम्ही केलं. नंतर या गोष्टीचा आम्हांला खूप पश्चात्ताप झाला. तुमची माफी मागावी, तुमचे पाय धरावेत म्हणून खूपदां वाटलं. पण त्यानंतर तुम्हांला बरं नव्हतं. आणि तुम्ही आम्हांला टाळताय् असं वाटून आम्हाला तुमची मनोमन भीती वाटायला लागली.''

''पण त्यांचा हल्ल्याचा रोख फक्त माझ्यावरच होता. तुम्हाला त्यांनी खुशाल पळूं दिले आणि तितक्याच आरामात मला टाकून तुम्ही पळालात देखील! मी एकट्याने काय त्या सीतारामचे घोडे मारले होते?''

''हे दुकान उडविण्यामागे फक्त तुम्हीच आहात असं सीतारामला वाटतंय्!''

''त्याला तसं वाटलं की तुम्हीच त्याला तसं वाटूं दिले? सीतारामचे दुकान ही काय माझी डोकेदुखी थोडीच होती? तुम्हाला तुमच्या मुली-बाळींसाठी त्रास वाटायला लागला म्हणून तुम्हीच माझ्याकडे आलात ना? मला थोडीच मुलंबाळं आहेत? मी माझ्या नेहमीच्या संवयीनुसार ह्या कामात पडलो तर निदान माझा पाठपुरावा तरी करायचा? खुशाल भेकडासारखे पळून गेलात. सीताराम कोणाच्या वाटेला जावूं नये म्हणून त्याला पांच हजार दिलेत. त्यामुळे फार तर तो सध्या गप्प बसेल. उलट तुम्ही असे

घाबरतां म्हटल्यावर पुन्हां पुन्हां तुमचा छळ मांडेल. वारंवार पैशाची मागणी करेल, हे कसं तुमच्या डोक्यांत शिरत नाही? मला, आपल्याच बिल्डिंगमधील माणसाला, आपल्याच कामासाठी धडपडणाऱ्या माणसाला मारहाण झाली. जीवे मारायचा प्रयत्न झाला. त्याचा प्रतिकार करायचा, सूड घ्यायचा कां वर त्या हरामखोर हल्लेखोरालाच दक्षिणा द्यायची? मला स्वत:ला झालेल्या शारिरीक जखमांचे काहीच वाटत नाही. पण तुमच्यासारखी धडधाकट माणसं अशी शेळपटासारखी वागतात त्याचे मानसिक क्लेश अधिक होतात. त्यामुळे सर्व जखमांवर मीठ चोळल्यासारखे होतेय्. असह्य वेदना होतात. तुम्हां सर्वांचा उबग वाटतो. किळस आलीय् तुम्हां सर्वांची.''

बापूरावांच्या एकेका शब्दासरशी सर्वजण हादरत होते. बाहेर बिल्डिंगची इतर मंडळी जमायला लागली होती. सर्वांना बापूरावांचे बोलणं पटत होतं. नाही असं नाही पण त्यापेक्षां सीतारामच्या इंगळीसारख्या लालबुंद डोळ्यांची भीती जास्ती वाटत होती!

''पोलिसात जावून तक्रार कां नाही गुदरलीत?''

''पोलिसकडे जाल तर मार खाल अशी सीतारामने धमकी दिली होती.''

''अरे मूर्खांनो, रक्त माझं सांडलं. सीतारामचा रोख माझ्यावरच होता ना? मग तुम्ही असे किती दिवस घाबरत बसणार? आपण एकमेकांना सहकार्य करण्यासाठीच ना एकत्र येऊन सहकारी सोसायटी स्थापन केली? सीतारामचं दुकान पाडायला माझी मदत हवी वाटली. मग त्याची व्यवस्था लावण्यापूर्वी निदान मला विचारायचे तरी. खुशाल त्याच्या बोडक्यावर पैसे घालून मोकळे झालात?''

''तुम्हाला एक तर बरं नव्हतं. आणि तुम्ही बरे होईपर्यंत सीताराम आणखी काय काय प्रकार करील ह्याची आम्हांला भीती वाटत होती हे आम्ही कबूल करतो.''

ही वादावादी आणखी किती वेळ चालली असती कोणास ठाऊक? शांताबाई अखेर मध्ये पडल्या. त्यानी बळेबळे बापूरावाना ओढून आपल्या ब्लॉकमध्ये नेले.

दुसरा दिवस उजाडला. एकंदरीत झाला प्रकार कांही बरा नाही झाला. आपण बापूरावांच्या बाबतीत बरोबर नाही वागलो ह्याची टोंचणी साठ्यांना रात्रभर लागली होती. सकाळी उजाडल्यावर निदान त्यांची माफी मागावी, दिलगिरी व्यक्त करावी म्हणून जिना उतरुन साठे, बापूरावांच्या दाराशी गेले. पाहातात तो काय? दाराला भले मोठे कुलूप! म्हणजे बापूराव एवढ्या पहाटे गेले कुठे? आजूबाजूला कोणालाच माहिती नव्हती. दोन दिवस गेले. सर्व माहितीच्या ठिकाणी चौकशा झाल्या. कोणालाच कांही पत्ता नव्हता. तिसरे दिवशी खुद्द बापूरावांच्याच हातचे पत्र आले. पुण्याहून आलं होतं. मायना वगैरे कांहीच नव्हता.

''मी 'पूर्ववैभव' सोसायटी कायमची सोडत आहे. माझी बदली पुण्याला करून घेण्याच्या खटपटीत आहे. रीतसर कायदेशीर व्यवहार परस्परांच्या सोयीनुसार करूं.''

आपला

बापूराव फाटक

पत्र श्री. साठेना ते पदाधिकारी होते म्हणून आले होते. बापूरावांचा सोसायटी सोडण्याचा निर्णय म्हणजे 'पूर्ववैभव'च्या मंडळींना प्रचंड धक्काच होता. 'पूर्ववैभव' व बापूराव हे एक सर्वमान्य समीकरण होते. या सोसायटीच्या उभारणीसाठी त्यांनी तन-मन-धन वेचलेले होते. आणि 'पूर्ववैभव' भयमुक्त रहावी म्हणून तर अक्षरश: रक्त सांडले होते. त्यांचा सर्वांनाच मोठा आधार वाटे. कोणतेही कठीण प्रसंग येवोत अथवा कोणालाही कसलीही अडचण येवो, बापूराव प्रत्येकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहात. आतां बापूराव नाहीत म्हणजे पाठीचा मणकाच गेल्यासारखा. नुसता आधार जाण्याचा प्रश्न नव्हता तर त्यांचे जाणे म्हणजे साऱ्या सोसायटीला एक लांछन होणार होते. आपल्या भेकडपणामुळे असं झालं. आपल्या नाकर्तेपणामुळे बापूराव आपल्याला दुरावले ही जाणीव आयुष्यभर पाठपुरावा करणार होती. सर्वजण सैरभैर झाले. एकमेकांच्या विचाराने कांहीजण पुण्याला जाऊन आले. बापूरावांना त्यांनी परोपरीने विनवलं. पण बापूरावांच्या निर्णयात आता काडीचाहि फरक होण्यासारखा नव्हता. त्यांचे मनच उडालेले होते. सर्वजण निराश होऊन पुण्याहून परतले. आपण पहिल्यापासून हिंमत दाखवून बापूरावांच्या पाठीशी उभं राहायला पाहिजे होतं हे आता प्रत्येकाला मनोमनी पटत होतं. पण आता फार उशीर झाला होता.

•••

दिवस नित्याप्रमाणे उगवत होता, मावळत होता. लोकल गाड्या तुडुंब लोक भरून धावत होत्या, रिकाम्या होत होत्या. भाजीपाला घेऊन लोक घरी परतत होते. सर्व जगरहाटी नित्याप्रमाणे चालूच होती. बापूराव नव्हते म्हणून काय झाले? 'पूर्ववैभव'ची दैनंदिनी यथाकाल चालू होती. बापूरावांची अनुपस्थिती हळूहळू पचनी पडायला लागली होती. पण अचानक एक रविवार उजाडला तो साठ्यांच्या पोटात गोळा घेऊनच. सकाळीच सीतारामचा एक माणूस त्यांच्या दाराशी आला आणि सीतारामदादाने बोलावलंय, एवढा सांगावा देऊन गेला! साठेंनी सर्वांना बोलावले. सीताराम ह्या नांवाच्या उच्चारासरशी घाबरायची सर्वांना संवयच लागली होती. त्याप्रमाणे सर्वजण घाबरले. आता काय असेल आणखी? पैशाची पुन्हा मागणी असेल? का पुन्हा दुकान उभं करायचं असेल? कां

आता एकेकाला बोलावून सरळ 'ठोकायचा' विचार आहे? सरळ पोलिसात वर्दी द्यावी कां? चर्चा करता करता सगळ्यांच्या मेंदूचा भुगा उडाला. साठ्यांचे ब्लड-प्रेशर वाढले. कारण प्रत्यक्ष निरोप त्यांनाच होता! अनेकांची ॲसिडिटी वाढली! हा 'बकासूर' एकेकाला बोलावून खाणार की काय? आता बोलावलंय तर लागलीच जावं की जाऊ नये ह्यावर बराच खल झाला. शेवटी लगेच काही जायला नको. पुन्हा निरोप आला तर 'जाणं' आहेच, ह्या निर्णयावर मंडळी आली. आता बापूराव असते तर? प्रत्येकाच्या मनात हाच विचार आला. रविवारची आठवड्याची एकच सुट्टी. बायका-मुलांसमवेत एकत्र बसून जेवावे असा हा एकच दिवस. पण त्या दिवशीचे जेवण कांही कुणाला गोड लागले नाही. साठे दुपारच्या वामकुक्षीसाठी आडवे झाले ते काळजी करतच. दुपार टळून गेली. अजून सीतारामकडून काही हालचाल नव्हती. एखादेवेळी नसेलच 'तसं' काही. आपल्याला घाबरवण्यासाठी कोणीतरी खोटाच निरोप दिला असेल, या शक्यतेचा विचार करताना साठ्यांना जरा बरं वाटलं. हलकं वाटलं. असं असेल तर काय छान होईल? पण ते सुख काही फार काळ टिकले नाही. त्यांचा मुलगा त्यांच्या कानाशी येऊन म्हणाला,

''बाबा, सीताराम येतोय.''

''आँ?'' आपल्या मुलासमोर तरी घाबरल्यासारखे दाखवू नये एवढेहि साठ्यांना सुचले नाही.

''एकटाच आहे की आणखी बरोबर कोणी आहे?''

'फक्त एक म्हातारेसे गृहस्थ बरोबर दिसताहेत.''

साठ्यांनी बाल्कनीतून फाटकाचा आवाज आल्यावर बघितले. खरोखरच सीताराम बिल्डिंगमध्ये शिरत होता. त्याचेबरोबर कोणीतरी वृद्ध गृहस्थ दिसत होते. गळ्यातील रुद्राक्षांची माळ आणि एकूण पेहराव पाहतां कोणीतरी वारकरी पंथाचे वाटत होते. साठ्यांनी बाकीच्या सभासदांना आपल्या घरी बोलावले. गोडबोले, मोडक आले. आणखी दोघा-तिघांचा येतोय म्हणून निरोप आला. बाकीचे बहुधा घरातच बसले. आपला चेहरा सीतारामच्या 'ओळखीचा' व्हावा ही कल्पनाच त्यांना पसंत दिसत नव्हती.

ते वृद्ध गृहस्थ आणि सीताराम साठ्यांच्या प्रशस्त हॉलमध्ये आले आणि सर्वांना नमस्काराचे हात जोडत खाली कारपेटवरच बसले. कोचावर बसण्याचा साठ्यांनी आग्रह केला पण खालीच 'बरे आहे' म्हटल्यावर बाकीची मंडळी पण खालीच बसली.

''हं, बोला. काय काम काढलंत्?'' साठ्यांनी धीर करून विचारले.

''आमच्या काकाला तुम्हां मंडळींना भेटायचं व्हतं. म्हातारा हाये म्हणून तुम्हां लोकांना सांगावा धाडला. तुम्ही नाय् आलात् म्हनून काका म्हनला आपूनच जाऊं''

''आम्ही येणारच होतो. पण सकाळची जरा घाईची कामं होती. म्हणून संध्याकाळी येणार होतो.'' साठ्यांनी घाईघाईत खुलासा केला. हो, उगाच तेवढ्यावरुन सीतारामचा राग ओढवायला नको. पण तो एकंदरीत आज शांत दिसत होता. नेहमीची मग्रुरी आणि डोळ्यांतील खुनशीपणा औषधालाहि दिसत नव्हता.

''असूं दे, असूं दे'' आतां तो वृद्ध गृहस्थ बोलायला लागला. ''मला संभूकाका म्हणतात. मी सीतारामचा काका. मी आता गांवाकडे असतो. माझी सगळी हयात ह्याच भागात गेली. तुम्हा लोकांच्या संघटनांमधून मी अनेक वर्ष कामं केली. आता वय झालं. हरीऽहरीऽ करत 'वरच्या' बोलावण्याची इच्छा करतोय.'' माणूस चांगला पांढरपेशा दिसत होता. लांब हाताचा पांढरा शुभ्र कुडता, स्वच्छ धोतर, गळ्यांत माळ, कपाळाला गंध, चेहऱ्यावर अत्यंत प्रसन्न भाव. सीतारामचा काका जाणवतच नव्हता.

''तुमचे बापूराव आता कोठे आहेत? इकडे अजिबात येत नाहीत?'' संभूकाकानी विचारले.

साठ्यांनी त्यांना थोडक्यात सगळी हकीगत सांगितली. पण सीतारामचा उल्लेख शक्य तितका कमी करत.

''मला ठाऊक आहे सगळं.'' मध्येच त्यांना तोडत संभूकाका म्हणाले.

''फार वाईट झालं. तेच सांगायला मी मुद्दाम आलो. सीताराम तू आता जा. मी ह्यांच्याबरोबर थोड्या गप्पा मारतो आणि येतो.''

'जी काका.' असे म्हणून सीतारामने काकांना एक दंडवत घातला आणि कोणाकडेही न बघता तो दाराबाहेर पडलासुद्धा. मनोमन सर्वांना हायसं वाटलं. मोठं दडपण दूर झालं. साठ्यांना वाटलं त्याला चहा विचारायला हवा होता. तेवढीच जवळीक.

''हं बोला मंडळी, तुमच्याशी मुद्दाम बोलावं, चार गप्पा कराव्या म्हणून मी आलोय. आता तुम्हा सर्वांच्या ओळखी करून द्या बघू.''

मग साठ्यांनी स्वत:सकट सगळ्यांच्या ओळखी करून दिल्या.

''तेव्हां बरं का मंडळी, तुम्ही केलंत ते काही बरोबर नाही झालं. त्या बापूरावाला आमचा सीत्या मारत होता तर तुम्ही पळून गेलात. अरे ठाम उभं राह्यचं होतं. जरा दोन हात करायचेत. बोंब मारायची. तुम्ही प्रतिकार करताय म्हटल्यावर सीत्या आणि त्याचे दोस्त गडबडले असते. पळाले असते.''

सर्वजण दिग्मूढच झाले. खरंच सीतारामचा काका असं बोलतोय? खरं की खोटं? का यात म्हाताऱ्याचा काही कावाबिवा आहे? संभूकाकांना बहुधा हे जाणवलं. कारण तेच पुढे म्हणाले.

''अरे बाबानो, मी सीतारामचा काकाच असं बोलतोय म्हणून तुम्हाला नवल वाटतंय ना? पण माझ्यासारख्यानंच सांगायला हवंय म्हणून मुद्दाम सांगायला आलोय.''

''पण संभूकाका, त्यांच्या हातात काठ्या होत्या, लोखंडी शिगा होत्या, आम्ही नि:शस्त्र होतो. आमचं काही चाललं नसतं.''

'अरे बाबांनो, हे धर्मयुद्ध थोडंच आहे? मारेकरी म्हटला की तो अवचितच गाठणार आणि आता देवाला स्मरून अगदी मनापासून खरं सांगा- तुमच्या हातात काठ्या असत्या तर केला असतात का प्रतिकार? बोला, अगदी खरं बोला.''

सर्वजण गप्प बसले. हे खरंच होतं.

'बाबानो, तुम्ही गप्प बसलात ह्यातच सगळं आलं. काठ्या नव्हत्या म्हणून तुम्ही पळालात हे खोटंच. खरं तर मनाची म्हणून जी ताकद लागते ती तुमच्याकडे औषधाइतकी सुद्धा नाही म्हणून तुम्ही पळालात. लांब कशाला? आज सकाळी सीतारामचा निरोप आल्यावर यायचं टाळलत ते याचमुळे. खरं की नाही साठेसाहेब?'

'होय, खरं आहे काका.' वरमलेल्या सुरात साठ्यांनी एकदम शरणागती दिली.

'तुम्ही सकाळी मैदानावर जाता. तब्येतीने दिसताय तर सगळे दणदणीत. आमच्या फाटक्या सीतारामच्या तुलनेत तर नक्कीच सणसणीत आहात. अंगकाठी मजबूत दिसली तरी तुम्हाला मनाची ताकद नाही. झाडावरून पान पडलं तरी आभाळच कोसळलंय समजून धांवणारी तुम्ही मंडळी. तुमच्याच कुणी पुढाऱ्याने म्हटलंय ना- जरा वाकून चाला असं कोणी दरडावून सांगितलं की तुम्ही सरपटायलाच लागता.'

'पण काका, ही तर सगळ्यांचीच स्थिती आहे. आम्ही एकटं दुकटं काय करणार?'

'तेच सांगायला आलोय् बाबांनो. प्रत्येकजण असं म्हणायला लागला, दुसऱ्याकडं बोट दाखवून स्वत:च्या भ्याडपणाचं समर्थन करायला लागला तर तुम्ही मंडळी जाणार तरी कुठं? आणि तुमचं होणार तरी काय? अरे, घाबरत घाबरत दिवस काढायला लागलात तर भाकरीसाठी घराबाहेर पडायची पण तुम्हांला भीती वाटायला लागेल.'' हे मात्र गोडबोल्यांना मनोमन एकदम पटलं. एकदां लोकलमध्ये त्यांच्या ब्रिजच्या ग्रुपला एका गुंडाने बसायच्या जागेवरुन एवढा कांहीं दम भरला की त्या चौघा ब्रिजवाल्यांनी घाबरुन महिनाभर डबा बदलला. तेवढ्यानेहि भीती गेली नाही तेव्हां दुसऱ्याच लोकलने ऑफिसला जायला लागले!

''तेव्हा मला काय म्हणायचंय्?'' संभूकाका पुढे बोलू लागले. ''बाबानो, हे कुठंतरी थांबायला हवं. तुम्ही असा षंढपणा दाखवलात् म्हणून बापूरावांसारख्या उमद्या माणसाला मुकलात. त्या दिवशी जर त्यांच्याबरोबरीने हिंमतीने उभे राहिले असतात

तर त्यांना केवढी हिंमत आली असती? त्यांच्या बरोबरीने प्रतिकार करताय् हे बघितल्यावर त्यांना सिंहाचे बळ आले असते. खाल्ला असतात थोडा मार म्हणून कांही बिघडलं नसतं. तुमच्या सर्वांसाठी तो बापूराव धडपडतोय्. त्यानं एकट्यानं मार खायचा आणि तुम्ही पळपुटेपणा करायचा. कशाला त्याला तुमच्याविषयी प्रेम वाटेल? तो बापूराव तुम्हाला सोडून गेला ते बरोबरच आहे. गांडुळांच्या वस्तीत राहायला त्याच्यासारख्या मर्दाला कसं आवडेल'' संभूकाकांचा चेहरा सात्विक संतापाने क्रुद्ध झाला होता. संभूकाका त्या रागापोटी सरळसरळ सर्वांना षंढ म्हणत होते. गांडूळ म्हणत होते. नामर्द म्हणत होते आणि सर्वजण अवाक् होऊन ऐकत होते. त्यांना अडवायचं नैतिक बळ कोणामध्येच नव्हतं.

''तेव्हां बाबांनो, विचार करा'' संभूकाका थोडे शांत होऊन बोलूं लागले.

'मी तुमच्या संघटनेमध्ये वावरलोय. म्हणून तुमच्यासारखे बोलू शकतो, तुमच्यामध्ये वावरू शकतो. आम्ही आता म्हातारे झालो. गुंडगिरीला जात नसते. ती कांही आमच्या समाजाची मक्तेदारी नाही. फक्त या गुंडगिरीला आपण किती घाबरायचं, किती भ्यायचं हे आपणच ठरवायचं. सकाळी मैदानावर जाऊन व्यायाम करता, शरीरं तगडी करता तशी मनं तगडी करा. तुमच्या हातात एवढी संघटना असेल, ताकद असेल तर तिचा उपयोग करा. एखादं पथक काढा. बापूरावांवर झाला तसा हल्ला झाला अगर अन्याय झाला तर त्या गुंडाच्या घरी जाऊन त्याला मारून काढा. पहिल्या पहिल्यांदा मार खाल पण तेवढ्याने माघार घेऊ नका. तुम्ही प्रतिकार करताय म्हटल्यावरच मग गुंड मंडळी हबकतील, तुम्ही गुंडगिरीचा पाठपुरावा करताय म्हटल्यावर पोलिसांना पण दाद घ्यावीच लागेल. प्रत्येक वेळी नुसतं त्यांच्यावरच अवलंबून कसं चालेल? आता या गुंडगिरीत आमचा सीत्या आहे, बापूरावांना मारहाण केली ह्याची मला चुटपुट वाटली म्हणून मी आलो. आता करण्यासारखं माझ्या हातात काहीच नाही. ते सीत्याला दिलेले पांच हजार रुपये मी त्याला परत करायला लावणार होतो. पण नाही. तुमच्या भ्याडपणाचा तो दंड आहे. तुमच्यासाठी झटणारा तुमचा मित्र संकटाच्या खाईत असताना त्याला एकाकी टाकून जाण्याचा जो कृतघ्नपणा दाखवलात त्याचा तो दंड आहे. राहवलं नाही मंडळी म्हणून सांगायला आलो. अधिक-उणं कांही बोललो असेन तर माफ करा.''

सर्व मंडळी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती. संभूकाकांसारख्या सीध्या-साध्या माणसाचं साधं सरळ तत्त्वज्ञान ऐकून साठे आणि मंडळींना परमावधीची शरम वाटत होती. निदान त्याक्षणी तरी धरणीमातेनं दुभंगून पोटात घ्यावसं त्यांना वाटत होते!

❖❖❖

# ६. एका कादंबरीची शोकांतिका

जगात आजकाल विश्वास कशावर ठेवावा तेच कळत नाही. ज्यांच्यावर श्रद्धा म्हणून ठेवावी त्यांच्याविषयी असं काही बरंवाईट कळतं की त्या श्रद्धेचा पार चुराडा होऊन जातो. राजकीय जीवनात श्रद्धायोग्य व्यक्ति मिळणे दुरापास्तच; सामाजिक जीवनात शिक्षक, वेदशास्त्रसंपन्न पंडित, तळमळीचे समाज-सुधारक असे आदरणीय लोक दिसतात. कोणाविषयी नितांत आदर बाळगावा, त्याला श्रद्धास्थानी जपावं, तोच त्या व्यक्तिविषयी अशा काही धक्कादायक गोष्टी कळतात की मन अस्वस्थ होतं. हे सारं आठवलं आमच्या शरदवरुन आणि त्याच्या शिखरे गुरुजींवरुन. शरद आणि मी वर्गमित्र. इंजिनीअर होऊन तो भाक्रा-नान्गलच्या बाजूस नोकरीनिमित्त गेला त्या गोष्टीला आता १५-२० वर्षे होऊन गेली. त्यामुळे नाशिक सोडल्यापासून आमचा संबंध जवळजवळ संपुष्टात आला. जुन्या मैत्रीला अचानक उजाळा मिळाला तो परवाच्या नाताळच्या सुट्टीत. मी बायका-मुलांना घेऊन दिल्ली, हरिद्वार-मसुरीच्या बाजूला फिरायला गेलो होतो. फिरता फिरता चंदीगडला एका हॉटेलपाशी अचानक शरद भेटला. आम्हा दोघांना खूप आनंद झाला. त्याच्या आग्रहामुळे मला माझ्या बेतात बदल करुन त्याच्या साईटवरच्या बंगल्यावर दोन-तीन दिवस मुक्काम करावा लागला. त्याची बायकामुलं खूप लाघवी; त्यांच्या आग्रहामुळे दोन-तीन दिवस मजेत गेले. खूप दिवसांनी मराठी बोलायला मिळालं म्हणून ती सर्वजण खुषीत होती. एक जगप्रसिद्ध धरण, शरदमुळे आम्हाला बारकाईने आणि जाणकारीनं पहायला मिळाले. निघण्याच्या आदल्या रात्री शरदनं माझ्या हातात एक कादंबरीचं बाड ठेवलं आणि म्हणाला,

''तुझ्या लघुकथा-लेख इकडे येणाऱ्या मासिकांतून, वृत्तपत्रांतून वाचायला मिळतात. तुला पत्र लिहायचा विचार मनात यायला आणि नेमका त्याच वेळी तू चंदीगडला भेटायला गाठ पडली. म्हणून तर स्वार्थापोटी तुला आग्रह करून आणलं. ही कादंबरी तुला दाखवायची होती.''

''कमाल केलीस. नेहमी लिहितोस का?''

''नाही रे बाबा, आयुष्यात प्रथमच लिहिलं. खरं म्हणजे तुझ्यासारख्या लेखकाला दाखवायला मला संकोचच वाटायला हवा. पण एकतर तू माझा मित्र आणि कादंबरीचा विषय तुझ्या माहितीचा.''

''माझ्या माहितीचा? तो कसा काय बुवा?''

''सांगतो ना. आमची छबुमावशी तुझ्या लक्षात असेलच. आपण नाशिकला असताना एकदा भूतबाधेनं तिला पछाडलं होतं बघ.''

''हो, हो, आठवतं खरं. मी त्यावेळी प्रत्यक्ष काही बघितलं नाही. पण तू त्यावेळी तिच्या अंथरुणावर, कपड्यांवर पडणाऱ्या बिब्याच्या खुणा, तिचे वेळी-अवेळी धावत सुटणं, ग्राम्य भाषेत शिव्या देणं, याविषयी सगळं सांगायचास ते आठवलं.''

''तेच ते. त्यावेळी त्या शिखरे गुरुजींच्या मंत्रांमुळे आणि भस्माच्या पुड्यांमुळं ती बचावली.''

''हो, हो. तू सांगितलं होतस तसं. पण त्या विषयावर कादंबरी लिहिलीस म्हणजे ग्रेटच आहेस तू. कारण त्यावेळी तू जेमतेम पंधरा-सोळा वर्षांचा असशील?''

''हो, तसा मी लहान होतो खरा. पण सगळे प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर घडल्याने मनात अगदी खोलवर रुतून बसले होते. आमच्या दादांची आणि आईची बरेचदां शिखरे गुरुजींशी चर्चा व्हायची. ती मी कुतूहलापोटी ऐकत बसायचा. दादा गेले. नंतर आईशी चर्चा केल्यावर त्यातले गूढ अर्थ आता मला समजले. कादंबरी लिहिताना त्याचा मला फार उपयोग झाला.''

''पण एकदम कादंबरी लिहावसं कसं वाटलं? आणि ते सुद्धा आधी कधीच काही लिहिलं नसताना?''

''ते पण जरा आश्चर्यच म्हणायचं. आमचं साईटवरचं काम चालू होतं. तेव्हा एका बाईला अशीच भूतबाधा झाली होती. अनेक प्रकार केले पण ती काही सुधारली नाही. मी आईला म्हटलं की आपण तिला शिखरे गुरुजींचा मंत्र जपायला सांगू या का? तेव्हा आई म्हणाली की नको उगीच. एक तर त्यांच्यासारख्या भस्माच्या पुड्या नाहीत आणि मुख्य म्हणजे ''ओम् नमो शिवाय'' हा मंत्र ज्याच्याकडून घ्यायचा तो तसाच अधिकारी पुरुष हवा. उगाच आपण काहीतरी बरं करायला जायचं नि आपल्यावरच दोष यायचा. बरं, माणसं पण आपल्या माहितीतील नाहीत. त्यांची अशा गोष्टींवर श्रद्धा आहे नाही हेही आपल्याला माहित नाही. आईचं म्हणणं मला पटलं. मी गप्प बसलो. पण त्या पछाडलेल्या बाईच्या लीला बघून सारखी छबुमावशी आठवायची; आणि मग असा काही झटका आला म्हणतोस की त्या सपाट्यात आठ दिवस बसून लिहितच होतो. झपाटलेलाच होतो म्हणेनास!''

''बरं आता मी उद्या निघणार आहे. कादंबरी नेऊ म्हणतोस?''

''हो तर. त्यासाठीच तुला देत आहे. तू वाच, इष्ट वाटलं तर तुझ्या मित्रांना दे. वहिनींना पण वाचू दे. आणि तुझं प्रांजळ मत कळव. मित्र म्हणून भलावण नको. अगदी त्रयस्थ म्हणून मत दे. आणि तुझ्याकडचं मुख्य काम असं की ज्या शिखरे गुरुजींमुळे

आमच्या छबुमावशीचा पुनर्जन्म झाला ते शिखरे गुरुजी आता हयात आहेत किंवा कसे ह्याबद्दल चौकशी करुन कळव. तुझ्या मुंबईपासून नाशिक तसं लांब नाही. आमचे दादा सोडले तर तशी कादंबरीतील सर्व पात्रं सुदैवाने हयात आहेत. कादंबरीतील सत्यकथन जसंच्या तसं प्रकाशित करावं अशी माझा इच्छा आहे. छबुमावशीचं लग्न झालं. तिच्या मिस्टरांचा काही विरोध नाही. तेव्हा शिखरे गुरुजींशी तू संपर्क साध.''

''अवश्य.''

•••

कादंबरी घेऊन मी मुंबईला परतलो. निवांतपणे कादंबरी वाचली. खरोखरच अप्रतिम कादंबरी होती. सराईत लेखकाचा थाट होता. नवशिकेपणाची नामोनिशाणी नव्हती. सर्व पात्रांचं स्वभाव-रेखाटन उत्तम वठलं होतं. कादंबरीतील लेखनावरून भूतपिशाच्चांविषयी शरदने बरीच शास्त्रीय आधारभूत माहिती संकलित केलेली दिसत होती. त्याच्या साधक-बाधकतेविषयी बऱ्याच अधिकारी व्यक्तिंशी चर्चा केली असावी. तो म्हणतो तशी स्फूर्तीच्या एका झटक्यासरशी प्रत्यक्ष लेखन त्यानं केलं असलं तरी विषय त्याच्या डोक्यात बरेच दिवसपर्यंत घोळत असावा. कादंबरीचा 'फॉर्म'पण चांगला निवडला होता. प्रत्येक पात्र आपली हकीगत सांगतंय असं दाखविलं होतं. त्या त्या पात्रांच्या निवेदनांतून कथानक पुढं सरकत होतं. तसं कथानक साधं होतं. छबुमावशी ही शरदच्या आईची सर्वात धाकटी बहीण. ती कॉलेजला शिकत असे. एका उन्हाळ्याच्या सुट्टीत पुण्याहून ती शरदच्या आईकडे राहायला आली. आणि काय झालं देव जाणे! पण दिवसेंदिवस ती खंगायला लागली. एकसारख्या होणाऱ्या उलट्यांनी हैराण झाली. मधूनमधून बेशुद्धावस्थेत असल्यासारखी दिसे. बघता बघता अशी काही विचित्र वागायला लागे की जणू काही ती ह्या ''जगातली'' नव्हेच. पुढे पुढे तिला वेडाचे झटके आल्यासारखे दिसू लागले. सैरावैरा धावत सुटणं, ग्राम्य शब्दांत बोलणं; इतकं ग्राम्य की पाठ करुनसुद्धा असले शब्द घरंदाज स्त्रियांना उच्चारतापण येणार नाहीत. डॉक्टरांनी प्रथम प्रथम उपचार केले. पण त्यांना छबुमावशीच्या आजाराचे काहीच निदान होईना. शारीरिकदृष्ट्या कोणताच दोष आढळेना. त्यांनी दिलेली सगळी औषधं उलटून पडायची. हा आजार म्हणजे बाहेरची काहीतरी भूतबाधा आहे असेच सर्वांचे मत होऊ लागले. शरदच्या आईच्या माहितीच्या कोणी साठेबाई म्हणून होत्या. त्यांनी आईला शिखरे गुरुजींचे नाव सांगितले. तेव्हा शरदचे आई-दादा त्यांच्याकडे गेले. शिखरे गुरुजींनी त्याना धीर दिला. त्यांनी काही भस्माच्या पुड्या दिल्या. 'ओम नमो शिवाय' हा मंत्र सांगितला. हा मंत्र देवासमोर बसून छबुमावशीकडून १०८ वेळा रोजच्या रोज म्हणवून घ्यायला सांगितला. सुरवाती सुरवातीला छबुमावशी त्या मंत्राचा उच्चारच करू शकत

नसे. कोणी समोर बसवून म्हणवून घेतला तरी तिच्याकडून मंत्राचे उच्चारसुद्धा होत नसत. एवढी कॉलेजात जाणारी मुलगी, पण पाटीवर मंत्र लिहून दाखवला तर तिला वाचता पण येत नसे. गुरुजींच्या सांगण्याप्रमाणे मग तिच्या हाताला धरून शरदची आई, दादा आणि कधी शरद मंत्राचा जप करू लागले. एक दीड महिन्यांच्या कालावधीत अनेक प्रकार घडले. झिंज्या सोडून ''ते बोलावतात, ते बोलावतात'' असे म्हणत छबुमावशी रात्री-बेरात्री पळत सुटायची. घराच्या मागच्या बाजूला असलेल्या विहिरीकडे धावायची. गुरुजींच्या मताने हा सगळा सत् आणि असत्‌चा झगडा होता. तिच्या ठिकाणी असलेली भूतयोनीतील व्यक्ती आणि परमेश्वराचा नामोच्चार ह्यांचा तो झगडा होता. कादंबरीत अनेक प्रसंगांचे सुरेख वर्णन होते. एकेक प्रसंग, विशेषत: अमावस्येच्या रात्रीचे. इतके भयानक की शरदची आई-दादा पार गडबडून जातात. छबुमावशीला तिच्या आई-वडिलांकडे पोचवून मोकळे व्हावे असे अनेकदा त्यांच्या मनात येते. पण एक तर तिचीच बदनामी व्हायची. शिखरे गुरुजींवरील ठाम श्रद्धेमुळे, त्यानी दिलेल्या दिलाशामुळे ते सर्वजण छबुमावशीला नेटाने संभाळतात; आणि एक दिवस अचानक त्यांच्या तपश्चर्येला फळ येते. छबुमावशीच्या मुखातून ते भूत आपला पराभव मान्य करते आणि निघून जाते. छबुमावशीच्या तऱ्हेतऱ्हेच्या लीला आणि सर्वांचे कसोशीचे प्रयत्न, कादंबरीतील सर्व प्रसंग शरदने अगदी प्रत्ययकारी रंगवलेले होते. कादंबरी वाचताना वाचक जागच्या जागी खिळून जावा अशी वातावरण-निर्मिती होती. शरदच्या कुटुंबियांची शिखरे गुरुजींवरील श्रद्धा ठायी ठायी दिसत होती.

•••

मी नाशिकला चौकशी केली. सुदैवाने शिखरे गुरुजी हयात असून तेथेच असल्याचे समजले. मी शरदला सविस्तर पत्र पाठवलं. कादंबरी अतिशय प्रभावी असल्याचे कळविले. खरोखरच कादंबरी एवढी प्रभावी होती की त्यातील गूढमय वातावरणामुळे वाचकांच्या अंगावर रोमांच उभे राहीले असते. माझी बायको कादंबरी-वाचनात गुंग असताना एकदम वाऱ्याच्या धक्क्याने भिंतीवरचे एक कॅलेंडर खाली पडले. तेव्हा ती इतकी घाबरली की भुताटकीचाच हा प्रकार समजून गांगरुन गेली. धावत जिना अुतरुन अंगणात जाऊन बसली ती मी घरी आल्यावरच वरती घरात आली! हे सुद्धा मी शरदला कळवले. शरद माझा मित्र होताच. पण त्याची कलाकृतीहि दर्जेदार असल्याने मी मनापासून त्याला धन्यवाद दिले. कादंबरीची बलस्थाने आणि कच्चे दुवे दाखवून मला जमेल तसे परीक्षण केले. त्याने लवकरात लवकर यावे आणि शिखरे गुरुजींना भेटावे असेहि त्याला मी सुचविले.

•••

अपेक्षेप्रमाणे लागलीच शरदचं पत्र आलं. माझ्या काही मुद्यांचं त्याने जोरदार खंडन केले होते. विशेषत: कादंबरीतील पात्रांची मूळ नावे बदलण्याबद्दल. त्याच्या तर्कशुद्ध पत्रोत्तराबद्दल मला त्याचे कौतुक वाटले. माझ्या दोघा-तिघा प्रकाशक मित्रांनाहि कादंबरीचं हस्तलिखित आवडलं. सातत्याने लिहित राहिला तर शरद चांगल्यापैकी लेखक होईल असं सर्वांचे मत झाले. शरद लौकरच येणार होता.

•••

त्यानंतर काही दिवसांतच शरद आला. एक-दोन दिवस विश्रांती घेऊन, गप्पागोष्टी करुन आम्ही रविवारी सकाळीच नाशिकला गेलो. शिखरे गुरुजींना आधी कळविले होतेच. त्यांचे घर शोधायला थोडा वेळ लागला. जुन्या नाशकाच्या गल्लीबोळांतून जावे लागले. गुरुजी घरीच होते. बाहेरच्या पडवीत आम्ही बसलो. शरदने नमस्कार केला म्हणून मी पण केला. गुरुजींचे वय साठीच्या आसपास असावं. अंगकाठी मजबूत होती. डोळ्यावरचा थोडासा जाड भिंगाचा चष्मा, डोक्याच्या पुढील बाजूने विरळ होत गेलेले केस सोडल्यास तशी वार्धक्याची खूण नव्हती. प्रथम इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. शरदला नाशिक सोडून बरीच वर्षे झाली होती. मध्यन्तरीच्या काळातील घटना, दादांचा मृत्यू, छबुमावशीचं लग्न, नंतरची तिची 'नॉर्मल वागणूक, त्याची नोकरी, नंतर कादंबरीचं प्रयोजन अशा सर्व गोष्टी शरदनं खुलासेवार सांगितल्या. नंतर तो म्हणाला,

''गुरुजी, कादंबरीची सर्व कथा तुम्हाला चांगली माहीत आहेच. ज्या क्रमाने घटना घडल्या त्याच क्रमाने मी त्या कादंबरीत आणल्या आहेत. तुमच्याशी संबंधित जो भाग आहे तेवढाच मी तुम्हाला वाचून दाखवतो. काही उणे-अधिक असेल तर अवश्य सांगा.'' असे म्हणून शरदने कादंबरी-वाचनास सुरुवात केली. शाळा-कॉलेजातून अनेकदां त्यानं नाटकातून कामे केलेली असल्यामुळे, त्याचं वाचन अतिशय प्रभावी आणि परिणामकारक होतं. प्रत्यक्ष वाचल्यापेक्षा त्या कादंबरीचं वाचन ऐकताना ती मला अधिक प्रभावी वाटत होती. गुरुजी तर चांगलेच खूष दिसत होते. आणि त्यांनी तसं असायलाच हवं होतं म्हणा. कारण संपूर्ण कादंबरी त्यांच्याच व्यक्तिमत्वावर पेललेली होती. रुढार्थाने नसले तरी कादंबरीचे धीरोदात्त नायक तेच होते. कादंबरी त्यांना आवडली. मग शरद त्यांना म्हणाला,

''गुरुजी, ही कादंबरी बऱ्याच जणांना आवडली. सर्वानुमते ती प्रकाशित करावी असं ठरत आहे. मूळ नावं कादंबरीत मी जशीच्या तशी ठेवणार आहे. छबुमावशी, तिचे यजमान वा कादंबरीतील अन्य पात्रांची कोणाचीच हरकत नाही. तुमची पण नसावी अशी माझी कल्पना आहे.''

''हरकत असण्याचं काही कारणच नाही. माझी संमती आहे.''

''मग तुमचा संपूर्ण पत्ता आणि थोडी वैयक्तिक माहिती मला हवी आहे.''

''अवश्य'' असे म्हणून गुरुजीनी आपली वैयक्तिक माहिती सांगितली. गेली ३० वर्षे करीत असलेल्या कामाची माहिती सांगितली. त्यांनी माहिती सांगायला सुरवात केली असेल नसेल एवढ्यांत त्यांचा मुलगा आणि सून बाहेर आली. मुलगा बँकेत ऑफिसर होता तर सूनबाई एका स्थनिक कॉलेजात प्राध्यापिका होत्या. त्यानी आमचे सगळे बोलणे ऐकले असावे. कारण मुलाने कादंबरी थोडीशी चाळली आणि म्हणाला,

''कादंबरीलेखन उत्तमच झालंय. फक्त एक दुरुस्ती मला सुचवायची आहे.''

''ती कोणती?'' शरदने थोड्या उत्सुकतेने विचारले.

''कादंबरीच्या इतर नावांविषयी आमची काही हरकत असण्याचे कारणच नाही, पण आमच्या अप्पांचं नाव मात्र बदलायला हवं.''

''ते काय म्हणून? एक सत्यकथा म्हणून मला तिचं मोल आहे. नाव बदलले की त्या सत्यकथेला गौणत्व येते. माझ्या सर्व मित्रांनी सुचविलं तरी नावं बदलण्याचे मी साफ नाकारलं. आता गुरुजींच्या नावाला विरोध असण्याचे कारणच काय? तुम्ही तर प्रत्यक्ष पुत्र असल्याने तुम्हाला तर आनंद आणि अभिमानच वाटायला हवा.''

''खरं आहे तुमचं म्हणणं. पण परिस्थिती थोडी वेगळी आहे. अप्पांचं नाव त्यात प्रसिद्ध झालं की अनेकांची पत्रं येतील. कोणी असेच तुमच्या छबुमावशीसारखे पीडित असतील तर ते आशेने आमच्याकडे येतील.''

''मग येऊ देत ना. उलट माझ्या कादंबरी-प्रकाशनामागचा तो तर हेतू आहे. श्रद्धेचा आजकाल लोप होत चाललाय. तेव्हा गुरुजींच्या ठायी श्रद्धा ठेवून, त्यांचा मंत्र कोणी घेतला तर त्यात घेणाऱ्याचे कल्याण होईलच, पण गुरुजींना पण श्रेय''....

''पण हल्ली अप्पांनी असा मंत्र देणं, भस्माच्या पुड्या देणं बंद केलं आहे.'' आता गुरुजींच्या सूनबाई शरदचं बोलणं अर्धवट तोडून बोलल्या.

''पण मघाशी तर गुरुजी अजून आपण मंत्र द्यायला तयार आहोत असं म्हणाले.''

''ते खरं आहे. पण माणूस बघून मी मंत्र देईन. कारण गेल्या वीस-पंचवीस वर्षातला माझा अनुभव काही चांगला नाही.'' गुरुजी म्हणाले.

''तेव्हा असं कोणी आमच्याकडे यायला आम्हाला नको आहे; आणि मुख्य म्हणजे येथील परिसरात आणि आमच्या नातेवाईकांत या कादंबरीद्वारे अप्पांचं नाव प्रसिद्ध व्हावं असं आम्हाला वाटत नाही.'' मुलगा म्हणाला.

''पण शरदनं गुरुजींच्याविषयी चांगलंच तर लिहिलं आहे. त्यांची इमेज-प्रतिमा ही केवढ्या लोकोत्तर उंचीची आहे हेच तर दाखविलेलं आहे. तुमच्या परिचित मंडळीत आणि नातेवाईकांत त्यामुळे तुमच्या वडिलांचा गौरवच होणार आहे.'' मी शरदच्या बाजूने उतरलो.

''आता थोडं स्पष्टच बोलायचं म्हणजे तेच आम्हाला नको आहे. मी त्यांचा मुलगाच असं म्हणतोय याचं तुम्हाला आश्चर्य वाटत असेल. पण परिस्थितीच तशी आहे. आता आणखी परखडपणे सांगायचे तर, खरं म्हणजे मी असं बोलू नये, पण तुम्ही कादंबरी-प्रकाशनाच्या मागेच लागलात म्हणून काही गोष्टी स्पष्टच सांगायला हव्यात.'' गुरुजींचा मुलगा तीक्ष्ण नजरेने पहात बोलला. गुरुजींच्या चेहऱ्यावरची चलबिचल माझ्या नजरेतून सुटली नाही.

''गेल्या इतक्या वर्षांत अप्पांना, तुमच्या भस्माच्या पुड्यांमुळे आणि मंत्रामुळे कोणी पीडित बरा झालाय असं सांगायला एकजणही आला नाही. काय अप्पा, खरं आहे ना?''

''हो, म्हणजे नाही, म्हणजे तसं खरंच आहे. गेल्या काही वर्षांत आपला हिंदू समाज कमालीचा बदलत चालला आहे. कोणाकडून काही ग्रहण करण्याची कुणाची पात्रताच उरली नाहीय.''....

''ते राहूं द्या अप्पा'' मुलगा मध्येच त्यांना तोडत बोलला. ''त्या भस्माच्या पुड्या आणि मंत्र देणे वगैरे आम्हीच त्यांना बंद करायला लावलं. उगाच लोकांना नादी लावायचं, त्यांच्या आशा पल्लवीत करायच्या आणि मग शिव्याशाप खायचे. त्यापेक्षा हे सारं बंदच करावं असं आम्हीच त्यांना सुचवलं. खरं म्हणजे तुमची हकीगत ही अगदीच अपवादात्मक म्हणावी लागेल. त्याहूनहि स्पष्ट सांगायचं तर तुम्हाला अप्पानी मंत्र द्यायला आणि तुमची छबुमावशी बरी व्हायला गाठ पडायला, मला तरी कावळा बसायला आणि फांदी मोडायला याच म्हणीची आठवण करुन देणारी गोष्ट वाटते.''

मुलगा इतका परखडपणे बोलत होता म्हणजे घरात बाप-लेकाचे पटत नसावे असाच ग्रह होण्यासारखा होता. आपल्या पित्याचा गौरव होतोय आणि तो त्याच्याच प्रत्यक्ष मुलाला आणि सुनेला बघवत नाही म्हणजे हा मुलगाच वाईट असावा. किंवा नव्या युगातील असल्याने त्याला कदाचित् आपल्या वडिलांचे मंत्र-तंत्राचे, भस्माचे प्रकार पसंत नसावेत! पण इतके होतंय तरी गुरुजी असे गप्प गप्प का? आता काहीतरी तोडगा काढणे भागच आहे असा विचार मनात येऊन मी म्हटले.

''समजा, शरदनं कादंबरीची नावं बदलली आणि लोकांच्या भावना दुखावू नयेत म्हणून या कादंबरीतील पात्रांशी कोणा हयात व्यक्तिंशी साधर्म्य आढळले तर तो केवळ

योगायोग समजावा अशी तळटीप टाकली तर चालेल का?''

''छे, छे, मला अशी पळवाट बिलकूल मान्य नाही'' शरद त्वेषाने म्हणाला, ''कुणीकडून तरी कादंबरी प्रसिद्ध करायची या गोष्टीचं मला अप्रूप नाही. सत्यकथा, अगदी निखळ सत्यकथा म्हणून जशी घडली तशी आणि मूळच्या सर्व व्यक्तिंबरहुकूम कादंबरी वाचकांपुढे जावी यातच मला स्वारस्य आहे. कोणत्याही पळवाटा काढून आणि तडजोडी स्वीकारुन मला मूळच्या सत्यकथनाला गौणत्व आणायचं नाही, हीनत्व प्राप्त करुन द्यायचं नाही.''

शरदच्या तडफदार बोलण्यामुळे शिखरे-मंडळी स्तिमित झाली; मी सुद्धा नाही म्हटलं तरी थोडासा चक्रावलोच. गुरुजी असहाय्यपणे मुलाकडे-सुनेकडे बघत होते. मुलगा आणि सून एकमेकांकडे पहात होती. हाच त्यांच्या 'दौर्बल्याचा'' क्षण पकडावा या हेतूने मी जोर केला, आणि म्हटलं,

''गुरुजी, होऊन जाऊ द्या कादंबरी प्रसिद्ध. नातेवाईक काय दोन दिवस बोलतील आणि मग विसरुन जातील. नाही तरी आजकाल कोणाचं कोणाला भलं बघवतं कुठे? मुळीच तुम्ही नातेवाईकांची फिकिर करु नंका...'' मी माझे बोलणे पुरे करायच्या आतच गुरुजींच्या पत्नी बाहेर आल्या आणि म्हणाल्या,

''ह्यांचं नाव मुळीच प्रसिद्ध करायचं नाही. आणि ह्यांचं नाव बदललं तरी त्यातील साठेबाईंचे अुल्लेख टाळायचे'' त्यांच्या बोलण्याने आम्ही चक्रावलोच. गुरुजींची चर्या एकदम म्लान झाली! शरद आणि मी धास्तावून एकमेकांकडे बघायला लागलो. तेव्हा वातावरणातील तणाव कमी व्हावा म्हणून कदाचित् मुलाने संभाषण सुरु केले.

''हो, महिलांचा आश्रम अप्पांनी काढला तेव्हापासूनच आमच्या नातेवाईक मंडळींनी अप्पांविषयी आणि साठेबाईंविषयी नाही नाही त्या कंड्या पिकवायला सुरुवात केली. कादंबरीत, ''साठे बाई गुरुजींना घेऊन आमच्या घरी आल्या, आम्ही गुरुजींच्या आश्रमात गेलो तेव्हा त्यानी चहा करुन आणला'' वगैरे जे उल्लेख आहेत ते संपूर्णपणे टाळायला हवेत. नाहीतर नातेवाईकांच्या हातात उगाचच कोलीत मिळायचं.''

आतापर्यंत गुरुजींचा मुलगा आणि सून ह्यांच्याशी चर्चा चालली होती तोवर ठीक होतं. पण आता प्रत्यक्ष धर्मपत्नीच विरोधात उभी राहिली तेव्हा फारच अवघड होऊन बसलं! ज्या पोटतिडिकेनं त्या बोलल्या त्यावरुन 'मामला' बराच गंभीर दिसत होता. कदाचित पूर्वी गुरुजी आणि त्यांच्या आश्रमातील साहाय्यिका साठेबाई ह्यांच्यावरुन त्यांच्या घरात काही 'महाभारत' पण घडलं असावं! आणि कादंबरी प्रकाशनानंतर त्या जुन्या खपल्या निघून गुरुजींची कुटुंबिय मंडळी रक्तबंबाळ-घायाळ होण्याची शक्यता होती. गुरुजींची उच्च प्रतीची, आदर्शवत्, समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या

दीपस्तंभासारखी जी प्रतिमा शरदनं रेखाटली होती ती मुळातच अत्यंत भुसभुशीत पायावर डगमगत होती! मला तर टागोरांच्या 'गोरा' कादंबरीची आठवण झाली. शरदला यातले सर्व 'काही' उमगलं किंवा नाही ह्याची मला शंकाच वाटत होती कारण तसा तो सीधासाधा माणूस होता. गुरुजींच्या सुनेनं सरबत आणलं. कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. आता बोलणं संपल्यासारखंच होतं. तरीपण एकदा शेवटचा प्रयत्न करावा म्हणून मी कोडगेपणानं शांततेचा भंग करीत म्हणालो,

''ह्या कादंबरीतील गुरुजींच्या व्यक्तिरेखेमुळे तुम्हा कुटुंबियांच्या भावना प्रक्षोभित झाल्यासारख्या दिसतात. त्यामुळं आता या विषयावर चर्चा होणं इष्ट वाटत नाही. मी एक सुवर्णमध्य सुचवतो. तुम्ही कादंबरी ठेवून घ्या. काही दिवस जाऊ देत. मग शांतपणे आणि त्रयस्थपणे आपण विचार करा आणि जे जे फेरबदल तुम्हाला सुचवावेसे वाटतात ते सुचवा. मी दोन महिन्यानंतर पुन्हा येऊन जाईन. शरद चंदीगडच्या बाजूला असल्याने त्याला जमणार नाही.''

''नको; अजिबात नको. कादंबरीचं हस्तलिखित घेऊन जावं हे बरं. मी हें मोठ्या दुःखाने सांगते आहे. सासूबाईनी बरंच दुःख गिळलेलं आहे! आताच कुठं त्या सुखाचे दिवस बघायल्या लागल्या आहेत. त्याला तडा जावा असं आम्हाला वाटत नाही.'' सूनबाई बोलत असतानाच गुरुजी उठले; निरोप वगैरे न घेताच आतल्या खोलीतून वरच्या माडीत गेलेले दिसले. त्यांच्या पत्नी पण आत गेल्या.

सूनबाई खुर्चीवरुन अुठल्या. मुलगा अुठला. म्हणजे आम्हाला पण ही समारोपाचीच सूचना होती. म्हणून आम्ही दोघेपण उठलो. कादंबरीचं हस्तलिखित शरदच्या हातात देत सूनबाई म्हणाल्या.

''तुमचा विरस होतोय ह्याची आम्हाला जाणीव आहे. परस्पर न छापता तुम्ही पूर्वसंमती मागण्यासाठी आलात हा तुमचा मोठेपणा. तुमच्या भलेपणाला तशाच चांगुलपणाने साद देता येत नाही हे आमचं दुर्दैव. या घरात सून म्हणून मी पंधरा वर्षांपूर्वी आले. सगळ्याच गोष्टी काही उघडपणे बोलता येत नाहीत. निळसर डोंगर दुरुन चांगले दिसतात, पण जवळ गेल्यावर ते तसे असतातच असं नाही एवढंच मी थोडक्यात सांगू शकते. यातच काय तें समजा.''

शरद आणि मी बाहेर पडलो. मला वाईट वाटत होतं. कुणीकडून तरी प्रसिद्धी मिळवावी म्हणून कोणतीहि तडजोड स्वीकारणारा आमच्यासारखा लेखक तो नव्हता. कादंबरी प्रसिद्ध करता येत नाही ह्याचं त्याला रतिमात्र दुःख होणार नाही जितकं त्याला त्याच्या श्रद्धेला तडा गेल्याचं होणार होतं!

❖❖❖

# ७. आगळे कन्यादान

''अरे दिनेश, कळलं का त्या रघुकाकांचं पत्र आलंय् ते.''

''नाही बुवा. काय म्हणतात?''

''मालू पसंत नाही म्हणे.''

''काय म्हणतेस काय आई? अगं मालूला बघून गेले त्यादिवशी मनोहरचा चेहरा काय फुलून गेला होता. मी त्याच्याबरोबर स्टेशनपर्यंत गेलो तर हळूच म्हणाला देखील.''

''काय म्हणाला?''

''मुलगी पसंत आहे म्हणाला! आतापर्यंत बघितलेल्या सर्व मुलीत ही नक्कीच उजवी आहे असं म्हणत होता. मग आतां कुठं माशी शिंकली?''

''मी सांगते हा सगळा रघुकाकांचा कारभार असणार! किती मुली बघितल्या आजवर. माझ्याच माहितीतल्या दहा-बारा असतील.''

''काय अपेक्षा आहेत या रघुकाकांच्या आणि सुधाकाकूंच्या तेच कळत नाही?''

''आणि आई, तसं बघायला गेलं तर हा मनोहर तरी काय लागून गेलाय? जेमतेम बी.ए. झाला. आणि नोकरी तरी काय साध्या स्टोअर कीपरची. आता देखणा आहे म्हणून काय एवढ्या उड्या मारायच्या?''

''मनोहर गरीब आहे रे. हा सगळा रघुकाकांचाच शिष्टपणा आहे. एरवी इतके चांगले आहेत पण या मनोहरच्या लग्नाच्या बाबतीत एवढे तऱ्हेवाईकासारखे कां वागतात तेच कळत नाही. बरं सुधाकाकू पण कांही पुढाकार घेत नाहीत. मुलाची आई म्हणजे सुनेसाठी कशी उतावीळ असते? आता आमच्या नशीबी ते सुख नाही म्हणा.....''

हा शेवटचा टोमणा मला होता. संघटनेच्या कामासाठी जन्मभर अविवाहित राहून मी काम करायचे ठरविले होते. आईच्या इच्छेविरुद्ध. आईचा तो राग असा अधेमधे उफाळून येत असे. मनोहर माझा बालमित्र आणि वर्गमित्र. आता माझ्याच वयाचा म्हणजे तिशी उलटून गेलेली. पहिल्यापासूनच मुळमुळ्या स्वभावाचा, अबोल. स्वत:ला काय हवं वा नको ते कधी ठासून सांगायचं नाही. रघुकाका गॅझेटेड ऑफिसर. प्रत्येक

बाबतीत अगदी आक्रमक स्वभावाचे आणि मनोहर मात्र अगदीच त्यांच्या तुलनेत शामळू. थोडासा आईसारखा म्हणजे सुधाकाकूंसारखा. त्यामुळेच रघुकाकांनी काही खोड काढली की हा गप्प. रघुकाकांच्या ओळखीनंच एका खाजगी कंपनीत स्टोअरकीपर म्हणून चिकटला. मी संघटनेच्या कामाला वाहून घेतल्यावर रात्रंदिवस त्यातच गुरफटून गेलो. त्यामुळे अलीकडे आमच्या गाठीभेटी कमीच होत. नंतर रघुकाकांना वरळीला ऑफिस क्वॉर्टर्स मिळाल्यावर तर कधी-मधी भेट होई ती पण बंद झाली. पण तोवर मात्र मनोहरचं आमच्या घरात भलतंच प्रस्थ होतं. माझे इतर सर्व मित्र माझ्यासारखेच चळवळे, म्हणून आईला मनोहर फार प्रिय असे. सुधाकाकूंचं आणि आईचं पण कांही तरी लांबचं नातं होतं. त्यामुळे घरोबा होता. आमच्याजवळ त्यांचं बिऱ्हाड होतं तोपर्यंत घरात कांही गोडधोड झालं की त्यात मनोहरचा हक्काचा वाटा असे. मी संघटनेच्या कामासाठी आजन्म वाहून घ्यायचं ठरवलं तेव्हा आईने खूप आकांडतांडव केलं. माझा निश्चय अगदी ठाम स्वरूपाचा आहे हे बघितल्यावर मात्र तिनं माझ्या लग्नाच्या खटपटी कमी केल्या. आणि मग माझ्या एकेक मित्रांच्या मागे लागली. फावल्या वेळेत ती एक वधूवर सूचक मंडळ चालवीत असे. त्यामुळे स्थळांना तोटा नव्हता. मनोहरला तिनं किती स्थळं आणली असतील. पण दाखविण्याच्या कार्यक्रमापर्यंत गाडी यायचीच नाही. रघुकाका फार चिकित्सा करीत. रेसच्या शौकिनाने घोड्याच्या कुळाची, जातीची वगैरे चौकशी करावी तशी पत्रिकेची खोदून खोदून छाननी करत. मग गण जमत नाहीय, पत्रिका जुळत नाही असं सुरू होई. आणि समजा या 'अडथळा शर्यतीतून' एखादी मुलगी दाखविण्यापर्यंत वेळ आलीच तर मग त्यांचं आणि सुधाकाकूंचं मुलगी गोरीच नाही, केसच लांडे वाटतात, मुलगी शिष्ट वाटते असं कांही तरी सुरू होई. एवंच काय मनोहरच्या लग्नाचं घोडं पेंड खात राही. आमची आई एवढी खनपटीस बसणारी. ती पण अखेर कंटाळली. मनोहरच्या लग्नाचा विषय तिच्या मनात पुन्हा उफाळून आला तो मालूला बघितल्यावर.

त्याचं असं झालं.

कुठल्या तरी कार्यासाठी मी आईला घेऊन कोकणात देवळ्याला गेलो होतो. तेथे मामाच्या घरी ही मालू तिला दिसली. आई-बाप लहानपणीच गेले असल्याने ती अनाथ मुलगी आमच्या मामांच्या मोठ्या परिवारात आश्रयाला होती. साध्या धुवट पातळांतून सुद्धा तिचे देखणे रुप कुणाचंहि लक्ष वेधून घेई. मामांच्या घरच्या एवढ्या गडबडीतूनसुद्धा आईने मला हळूच परसदारी नेलं. आणि म्हणाली,

''ती मुलगी बघितलीस?''

''कोणती?''

मालू त्यावेळी विहिरीजवळच्या डोणावर कपडे पिळत होती. स्वच्छ गोरा वर्ण,

मोठे टपोरे डोळे आणि अपुऱ्या वस्त्रातून दिसणारा तिचा सुडौल बांधा. क्षणभर ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय डळमळतोय की काय अशी शंका वाटण्याइतकी ती देखणी आणि आकर्षक होती.

''तुला आवडली?'' आईने विचारले तेव्हां भानावर आलो. पण क्षणात स्वत:ला सांवरलं.

''आई, तुला माहीत आहे...'' माझा स्वर करडा लागल्यावर आईने घाईघाईने बोलायला सुरूवात केली.

''ही मला सून मिळण्याइतकी मी कुठं भाग्यवान आहे? पण मनोहरसाठी आपण हिला मुंबईला नेऊं या कां? एक गरिबी सोडली तर लाख मुलगी आहे.''

मला ही कल्पना आवडली. मी म्हटलं.

''चांगलं होईल मनोहरशी जमलं तर. तूं मामांना विचारून तर ठेव.''

मामांचा प्रश्नच नव्हता. एवढ्या पसाऱ्यातून एक माणूस गेलं काय नि आलं काय? मालू आमच्याबरोबर मुंबईला आली. आमच्या घरात पटकन रूळून गेली. आल्या दिवसापासून आईच्या हाताखाली ग्राहक मंडळात काम करू लागली. आईने मनोहरच्या पत्रिकेला जुळेल अशी तिची पत्रिका 'बनवून' आणली. आणि मगच मनोहरसाठी रघुकाकांच्याकडे पाठविली. लगोलगच्याच रविवारी पाहण्याचा कार्यक्रम झाला. त्या दिवशी आईने मुद्दाम सत्यनारायणाचा बेत काढून रघुकाका, सुधाकाकू आणि मनोहरला दिवसभर ठेवून घेतलं. दिवसभर मालूचं वावरणं, तिची कामातील तडफ, विनम्र स्वभाव ह्यामुळे सर्वजण तिच्यावर खूष दिसत होते. मधून मधून आईची साखरपेरणी होतीच. मनोहर रघुकाकांचा एकुलता एकच मुलगा असल्याने पैशाची अपेक्षा नव्हतीच. त्यामुळे मालू पसंत पडणारच अशी आईची शंभर टक्के खात्रीच होती.

•••

पण अखेर झालं ते उलटच. रघुकाकांचं नकाराचं पत्र आलं तेव्हां मी हतबुद्धच झालो. नकाराचं कारणहि पत्रात नव्हतं. आई वैतागली.

''या माणसाना म्हणायचं तरी काय? रघुकाका एरवी या पोराचे किती लाड करतात. या लग्नाच्या बाबतीतच एवढे कठोर आणि कोरडे कां होतात तेच कळत नाही.''

''पण आई, या खेपेला मी गप्प बसणार नाही. असं किती दिवस चालायचं.''

दुसरे दिवशी मी मन्याला ऑफिसातच गाठला.

''मन्या, लेका लग्न करायचं नां?''

''हो, करायचं तर!''

''मग मालूला नापसंत करण्यासारखं काय आहे? त्यादिवशी तर लेका हुरळून गेला होतास. मग कुठे माशी शिंकली?''

''काका म्हणाले...''

''मन्या, लग्न तुझं व्हायचंय कां काकांचं? आता या खेपेला मी गप्प बसणार नाही आणि तुला बसू देणार नाही. इतकी देखणी आणि सालस मुलगी पुन्हा मिळायची नाही. आईची खास पारख आहे तुझ्यासाठी. हे बघ, आतां तू ठाम रहा. मी परवाचे दिवशी म्हणजे रविवारी आईला घेऊन येतोय. बरोबर नानाकाकांना पण आणतो. त्यांचं जरा ऐकतील रघुकाका. तू मात्र अजिबात माघार घ्यायची नाहीस. करीन तर याच मुलीशी लग्न, नाहीतर मला लग्नच नको असाच पवित्रा घ्यायचास.''

''बरं.'' मन्या म्हणाला. मन्याचा चेहरा उत्तेजित बघून मला पण आनंद झाला. रविवारी नक्की येतो असं त्याच्या खांद्यावर थोपटून मी त्याला सांगितलं आणि मी घरी आलो.

घरी आल्यावर मी आईला सगळं समजावून सांगितलं. मी घेतलेल्या पुढाकाराने ती पण खूष झाली. मालूची जोखीम तिनं उचलली होती. ती मार्गाला लागतेय हे बघून आईला आता निश्चिंत वाटत होतं. अगदी रघुकाका-सुधाकाकूंनी विरोध केला तर वेळप्रसंगी आपल्याच घरातील एक खोली मनोहरला द्यायची व मालूचा आणि त्याचा संसार थाटून द्यायचा असं आम्ही ठरवलं होतं.

मधला शुक्रवार गेला. शनिवार संपला. रविवार उजाडला. पण तो रविवार मनोहरसाठी नव्हता. मला अचानक संघटनेच्या कामासाठी नागपूरला निघावं लागलं. जो जाणारा सहकारी होता त्याला अचानक दुसरीकडे जाण्याचा आदेश आल्याने मला नागपूरला जाणं भाग होतं. आई म्हणालीच.

''या पोराचं बाशिंगबळच कमी दिसतंय.''

''छे ग, असं कांही नसतं, आपल्याच मनाच्या समजूती असतात एकेक. तीनचार दिवसात येतोच. मग मार्गी लागेल सगळं.''

•••

पण मी यायच्या आधीच मनोहर मार्गी लागला होता! ऐकलं ते सगळंच भयानक

होते. सोमवारी मनोहर नेहमीप्रमाणे कामाला गेला. बसल्याजागीच तो अचानक बेशुद्ध झाला. नाकातोंडातून रक्त यायला लागलं. सगळ्यांनी घाई करून टॅक्सीने त्याला के. ई. एम्. मध्ये पोचविला. पण कांही उपयोग झाला नाही. ब्रेनहेमरेजने त्याचे निधन झाले. सारेजण चुटपुटले, हळहळले. इतक्या लवकर जगाचा निरोप घेण्याचं वय कां होतं त्याचं? ईश्वरेच्छा बळीयसी हेच खरं.

•••

मनोहरच्या अकाली निधनाला आता पंधरा दिवस होऊन गेले होते. एक दिवस रात्री ऊशीरा मी मिटींगवरुन परत आलो. जेवण झाल्यावर आई माझ्या खोलीत आली. किंचित दार लोटून घेतले. आणि ती ढसाढसा रडू लागली. मनोहरवर तिचा खूप जीव होता, त्या रविवारी मी न गेल्यामुळे मनोहर बिचारा भांबावून गेला. निराश झाला, त्याचाच मन:स्ताप त्याच्या मेंदूला झाला अशीच तिची भाबडी समजूत होऊन बसली होती. खरं म्हणजे मला पण थोडंस अपराधी वाटत होतं. मनोहरने खरोखरच माझी रविवारी वाट बघितली असेल का? घरी 'त्याबद्दल' तो कांही बोलला असेल का? रघुकाकांचं आणि त्याचं काही भांडण तर झालं असेल का? त्या भांडणाचा तर त्याच्या मनावर ताण पडला नसेल? अनेक शंकांच्या इंगळ्या माझ्याहि मनाला डंख करीत होत्या. आईने डोळे पुसले, पदराने चेहरा सारखा करीत म्हणाली.

''आपण उगाच सुधाकाकूंना आणि रघुकाकांना बोल लावत होतो. मनोहरच्या लग्नात ते जाणून बुजून खो घालत होते. त्यांचंच बरोबर होते.''

''काय म्हणतेस काय आई? सख्खे आईबाप असं कसं करतील?''

''हे पत्र वाच. तुझ्याच नांवाने खाजगी म्हणून आलंय. अर्थात तुझं खाजगी कधी नसतंच. म्हणून मी वाचलं.''

मी वाचायला घेतलं.

चि. दिनेश,

माझं पत्र पाहून तुला खूप आश्चर्य वाटेल नाही? पण गेली दहा वर्षे पोटात ठेवलेल्या दु:खाला प्रथमच मी वाचा फोडत आहे. त्याचे कारण मी शेवटी दिलं आहे.

सुमारे दहा वर्षापूर्वीची गोष्ट. तुझा मनोहर नुकताच बी. ए. होऊन नोकरीला लागला होता. त्याची आई घरी सून आणायची म्हणून उत्सुक होती. आमचा एकुलता एक मुलगा म्हणून मनोहर किती लाडात वाढला होता ह्याची तुला कल्पना आहेच. अशा

दिवसात एक दिवस आमच्याकडे पाठक गुरुजी आले होते. मनोहरची पत्रिकाच आम्ही केली नव्हती म्हणून जन्मवेळ वगैरे सांगून त्यांचेकडून त्याची पत्रिका करून घेतली आणि तीच आमच्या सुखी आयुष्यांतील कदाचित घोडचूकच ठरली. पाठक गुरुजींनी सचिंत चेहऱ्याने पत्रिका दिली. पण म्हणाले, ''रघुकाका, एक अत्यंत वाईट गोष्ट तुमच्या कानावर घालायचं माझ्या जीवावर येतंय. मनोहरच्या पत्रिकेत मृत्युषडाष्टक आहे. त्याला अल्पवयीन म्हणजे तीस वर्षाच्या आंतच मृत्युयोग आहे.'' आमच्या दोघांच्या मनावर हा वज्राघातच होता. आम्ही पाठक गुरुजींचे निदान चुकीचं असावं अशा भाबड्या कल्पनेने आणखी दोघा-तिघां दूरदूरच्या ज्योतिषांना पुन्हां पत्रिका दाखवली; पण भविष्यवाणी तीच होती. एक दोघांनी तर त्याचे लग्न केल्यास मृत्यू आणखीन आधीच होईल असे सांगितले. त्या दिवसात मनोहर पुण्याला मावशीकडे गेला होता म्हणून बरे. सुधा वेडीच व्हायची पण मी तिला सावरले. जे होणार ते टळत नाही. आपण मनोहरच्या पस्तीसाव्या वर्षापर्यंत वाट पाहूं. काही अनिष्ट नाहीच घडले तर ज्योतिषशास्त्र एक थोतांड आहे असे समजून आनंदोत्सव करू. पण तोवर त्याला यत्किचिंतहि कल्पना न देतां त्याला जास्तीत ज़ास्त आनंद मिळवून देऊ. असं समजावल्यावर मात्र सुधाला कधी पुन्हा काही सांगावं लागले नाही. काश्मीरपासून कन्याकुमारी आणि कलकत्ता-दार्जिलिंगपासून पश्चिमेस सौराष्ट्रापर्यंत जमतील त्या सर्व ट्रीपस् आम्ही केल्या. त्याला जास्तीतजास्त ह्या इहलोकीचे सौख्य लाभावे म्हणून आणखी कांही गोष्टी त्याच्यासाठी आम्ही केल्या. ज्याचा उच्चार आम्ही कधीहि करणार नाही. फक्त लग्नाच्या बाबतीत मात्र कठोर राहिलो. विषाची परीक्षा आम्हाला बघायची नव्हती आणि दुसऱ्या घरांतील एखाद्या मुलीचे आयुष्य बऱबाद करायचे नव्हते. जाणूनबुजून कोणा तरुण मुलीला वैधव्याच्या खाईत आम्ही कसे लोटू? तुमच्या मालूला नकार कळविताना आमच्या मनावर कोणते आभाळ कोसळले असेल? पोटातले आसू लपवून चेहऱ्यावर उसने हास्य आणताना आम्हाला किती वेदनांच्या कळा सोसाव्या लागल्या असतील! पण परमेश्वरानेच सारे संपविले. असो.

हे पत्र मी तुला काही खास कारणासाठी लिहित आहे, तुमच्या नक्षत्रासारख्या गोड मालूला सून म्हणून करून घेण्याचे आमच्या नशिबात नव्हते. सुधाचा त्या अनाथ मुलीवर मनोमन फार जीव जडला आहे. तिचे कन्यादान करण्याची आम्हा दोघांची इच्छा आहे. मनोहरला, तुझ्या मित्राला ती मनापासून आवडली होती. तू आता आम्हाला मनोहरसारखाच आहेस. तेव्हां आम्हा दोघांच्या इच्छेला मान देऊन तूच त्या मालूला पदरात घे आणि तुला कन्यादान करण्याचे पुण्य आम्हांला मिळू दे आणि कै. लक्ष्मणरावांच्या माघारी तळहातावरील फोडाप्रमाणे तुझे जतन करणाऱ्या तुझ्या आईला सूंन आणि कन्या एकाचवेळी मिळण्याचे सुख लाभू दे. आपल्या भारतमातेची सेवा तू खूप

केलीस. आता तुझा निश्चय बाजूला ठेवून तुझ्या खऱ्या आईला आनंदी कर. तुला 'कन्यादान' करून आम्हाला सुखाने कन्याकुमारीला विवेकानंदपूरममध्ये उर्वरीत आयुष्य घालवायला बरं. तुझा दृढनिश्चय आम्हाला माहीत असूनहि आम्ही तुला हा लग्नाचा आग्रह करीत आहोत म्हणजे आजवर मनोहरवर केलेल्या अन्यायाचे परिमार्जन केल्याचे समाधान मिळेल. आम्हाला निराश करू नको. मुलगा गेलाच. निदान कन्यादानाचा तरी आनंद मिळू दे. तुझ्या लाडक्या मनोहरसाठी आणि आम्हा सर्वांसाठी तुला एवढे केलेच पाहिजे.

पत्र मिळताच तुझ्या आईला, आणि मालूला घेवून ये. आम्ही वाट पहात आहोत.

तुझे,

रघुकाका

मनाच्या कोणत्या अवस्थेत पत्र वाचताना मी होतो ते माझे मलाच कळत नव्हते. कारण आईने रघुकाकांकडे जायचे ना? असं केव्हां विचारलं आणि माझ्या तोंडून 'हं' केव्हा गेलं ते माझं मलाच कळलं नाही.

❖❖❖❖

# ८. सावधान! सावधान!! सावधान!!!

रात्रीचे दोन अडीच वाजले असतील. कुठं तरी मांजरं विचित्र स्वरात रडत होती का ओरडून एकमेकांशी भांडत होती ते कळत नव्हतं. पण साऱ्या शांत, नि:शब्द वातावरणात त्यांचा आवाज अत्यंत बेसूर वाटत होता. मी मनोमन हबकलो होतो. काही तरी विलक्षण घडणार होतं, नक्की मला चांगलं आठवतंय. अशाच एका भयाण मध्यरात्री मी दचकून उठलो होतो. जागच्या जागीच अंथरूणावर अस्वस्थपणे बसलो होतो. कोणाला तरी उठवावं आणि काही तरी घडणार आहे हे सांगावं असं मला फार वाटत होतं. पण एकतर मी सांगेन त्यावर कोणी विश्वास ठेवला नसता. कदाचित वेड्यातच काढलं असतं म्हणून मी गप्प राहिलो....

मला मात्र ती रात्र एकसारखी आठवत होती. त्या रात्री असंच अस्वस्थ वाटत होतं. भीतीची भूतं भेडसावीत होती. क्षणाक्षणाला मनाची अस्वस्थता, तगमग वाढत होती.... अचानक 'ती' वेळ आली! सगळीकडे एकच आरडाओरडा झाला. मोठमोठ्या किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या. सारी बिल्डिंगच्या बिल्डिंग एखाद्या महाकाय राक्षसाने लीलया गदागदा फिरवावी तशी हालत होती. लाईट गेले तरी त्या अंधारातहि समोरच्या इमारती वाकड्या-तिकड्या होताना, उन्मळून पडताना दिसत होत्या. बॉम्बस्फोट व्हावा तसे मोठमोठे धडाडधूम आवाज, लोकांच्या किंकाळ्या, मनाचा थरकाप उडवीत होत्या. अंदाजाने आम्ही चाळीच्या जिन्याच्या दिशेने धावलो, तो काय जिनाच जागेवर नव्हता! गच्चीच्या कठड्यांना कसंबसं धरून आम्ही जीव वाचवत होतो....

अनेक वर्षांपूर्वीची ती भूकंपाची दुर्घटना जशीच्या तशी मला डोळ्यांसमोर दिसत होती!

त्या भूकंपाच्या प्रसंगी मला 'सूचना' मिळाली ती आयत्या वेळी, अगदी आयत्यावेळी. पण त्या आधीच्या पानशेत धरणाच्या दुर्घटनेच्या वेळी तर दोन दिवस आधीच्या मध्यरात्री मला घराघरातून वाहात जाणारे पाण्याचे लोंढेच्या लोंढे दिसत होते! रस्त्यारस्त्यातून धोंऽधों वाहणारे पाणी, त्यातून वाहत जाणारी माणसं, जनावरं दिसूनसुद्धा मी मूर्खासारखा स्वस्थ बसलो होतो. भविष्यातील घटनांचा वेध घेणारी काही 'अतिमानवी' शक्ती खरोखरच माझ्या ठिकाणी आहे का? माझाच मला संभ्रम

पडला होता. तेथे इतर कोणी कसा विश्वास ठेवायचा? भूकंपाच्या वेळी नाही तरी निदान पानशेतच्या दुर्घटनेच्या वेळी मी अनेकांचे प्राण वाचवू शकलो असतो? अर्थात कुणी विश्वास ठेवला असता तर!.......

आताहि माझ्या मनाला मागच्या दोन्ही वेळेसारखेच अस्वस्थ वाटतंय. एक फरक मात्र नक्की जाणवतोय. मागच्यासारखे कांही तरी अशुभ घडणार असं मात्र वाटत नाही. पण काय घडणार तेहि कळत नाही. मात्र मघा ओरडत असलेल्या मांजरांचा ओरडा आता वाढलाच आहे. एवढ्यात समोरच्या बिल्डिंगमधून कोणी तरी झोपमोड होऊन चिडून उठलं असावं. मांजरांच्या दिशेने दोन-चार दगड फेकलेले ऐकू आले. मांजरं पळाली. पुन्हा सारं शांत झालं. घरात सगळी झोपली होती. ही शांतताच मला असह्य झाली होती. त्यापेक्षा मांजरांच्या ओरडण्याची जरा जाग तरी वाटत होती. या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत पडलो होतो. काहीच सुचत नव्हतं. काय घडणार असेल ह्याचा विचार करून मेंदूचा भुगा झाला होता. चारी बाजूंनी कान कानोसा घेत होते....

असाच काही वेळ गेला. अचानक रेडिओ, टी.व्ही. सुरू झाल्याचा मला भास झाला. एवढ्या मध्यरात्री कसला आवाज? आणि तोसुद्धा लष्कराच्या बँडच्या आवाजासारखा. अचानक सायरनचा आवाज आला. पोलिसांच्या जीपस् रस्त्यावरून फिरू लागल्या. ध्वनिक्षेपकांवरून घोषणा होत होत्या. 'आपापले रेडिओ-टेलिव्हिजन सेटस् चालू करा, सर्व काही नीट ऐका. रस्त्यावर येऊ नका, गडबड करू नका, रस्त्यावर उतरलात तर निष्कारण गोळी खाऊन मराल. शांतता पाळा. रेडिओ, टी.व्ही. नसणाऱ्या जनतेसाठी थोड्याच वेळात रस्त्यारस्त्यातून निवेदने करूच. एकामागोमाग पोलिसांच्या गाड्या घोषणा करीत जात होत्या. पाठोपाठ लष्कराच्या चिलखती गाड्या फिरू लागल्या, जमावबंदी पुकारली होती. सकाळी आठपर्यंत रस्त्यावर आल्यास गोळी खावी लागेल, असे इशारे वारंवार दिले जात होते.

आम्ही घरातील सर्वजण जागे झालो. सगळ्या घरांतून लोक दबकत दबकत कुजबूजत होते. पण कुणी मोठ्याने बोलत नव्हते, घराबाहेर पडत नव्हते. टी.व्ही. वर लष्करी संचलने दाखविली जात होती. थोड्याच वेळात निवेदक आला. दूरदर्शनखेरीज बाकी चॅनेल्स बंद होती. मुख्य निवेदन हिंदीमध्ये होते. पाठोपाठ सर्व भाषांमध्ये त्यांची भाषांतरे प्रसृत होणार होती. लष्करी गणवेषातील निवेदकाने घनगंभीर आवाजात छापील निवेदन वाचावयास सुरुवात केली. 'भारताच्या नव्या राष्ट्रप्रमुखांचे निवेदन जसेच्या तसे मी वाचून दाखवत आहे.'...

'भारताच्या स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनो, काही वेळापूर्वीच मी एक प्रमुख राष्ट्रसेवक या नात्याने जुनी व्यवस्था मोडून काढून या देशाची सत्ता हातात घेतली आहे. पूर्वीच्या

व्यवस्थेमधील कोणाही उच्चपदस्थासाठी अश्रू गाळण्याचे कारण नाही. माझ्या या कृतीला लष्कराच्या तिन्ही दलांचा संपूर्ण पाठिंबा आहे. एक अत्यावश्यक कर्तव्य म्हणून अत्यंत नाईलाजाने देशाचा कारभार ताब्यात घेणं मला क्रमप्राप्तच झाले आहे. मात्र कोणत्या परिस्थितीत सत्ताग्रहणास मी उद्युक्त झालो, हे तुम्ही समजून घेणे आणि त्याप्रमाणे सहकार्य करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

आपल्या वाड-वडिलांनी आत्यंतिक हालअपेष्टा भोगून स्वप्राणांची आहुती देऊन आपला देश परकीय दास्यातून मुक्त केला. त्याची आता आपण बेगडी सुवर्णजयंती साजरी करतोय. आपण सर्वजण अशा समजुतीत होतो की, स्वातंत्र्यातील आपले दिवस सुखासमाधानात जातील. पण या देशातील नतद्रष्ट राजकारणी मंडळींनी आपली किती घोर फसवणूक केली ते आता आपल्या पूर्णपणे लक्षात आलंय. अमुक एका पक्षाचे लोक फसवतात आणि अमुक एका पक्षाचे लोक प्रामाणिक आहेत, असं बिलकूल नाही. प्रमाण थोडे कमी जास्त असेल इतकेच. या सर्वांनाच पक्षीय स्वार्थ आणि त्यापेक्षाहि अधिक म्हणजे वैयक्तिक स्वार्थाने अधिक पछाडलेले आहे. हिंदुस्थान देश ही एक अलीबाबाची गुहा आहे आणि त्यातील सोने-नाणे, जडजवाहर दुसरा कोणी सत्तेवर यायच्या आत फस्त केले पाहिजे, अशीच या सर्वांची समजूत झालेली दिसते. या आत्यंतिक स्वार्थापोटी या सर्वांनी राजकारण आणि केवळ राजकारणच केले. देशाच्या सर्वोच्च पदावरील व्यक्ति जर यापासून दूर राहू शकत नसेल, तर इतर पामरांची काय कथा? या नीच कामासाठी त्यांनी गुंड आणि बुवाबाजी करणारे स्वामी यांना जवळ केले. स्मगलर्सच्या गळ्यात गळे घातले. काळाबाजारवाले ह्यांच्या पंक्तीला राजरोस जेवू लागले! समांतर अर्थव्यवस्थेचा प्रचंड काळा पैसा या राजकारण्यांनीच निर्माण केला; वर दांभिकपणे आम्ही काळ्या पैशाविरूद्ध लढू म्हणून ही मंडळी सांगत राहिली; आणि सारी जनता भोळसटपणे, बावळटपणे ऐकत राहिली. त्यामुळेच भ्रष्टाचार फोफावला. इतका आता तो हाडीमांसी खिळला आहे की, कॅन्सरसारखे सारे शरीरच त्याने पोखरून काढले आहे. कॅन्सर कालांतराने शरीरभर पसरून रोग्याच्या जीवालाच धोका निर्माण करतो, तसा ह्या भ्रष्टाचाराच्या भस्मासुराने साऱ्या देशाचा अंतच जवळ आणला आहे.

आज देशाच्या कारभारात असा एकही विभाग नाही, की जो या भ्रष्टाचारापासून मुक्त आहे. कोणतेहि आणि कितीही क्षुल्लक काम सरकार दरबारी असेल, तर ते 'वजन' ठेवल्याशिवाय होतच नाही, हा प्रत्येकाचाच अनुभव आहे. ह्याला पायबंद दूरच, उलट कोणत्या खात्यात किती भ्रष्टाचार आहे, याची तौलनिक आकडेवारीच वाचायला मिळते. मग पोलीस खात्याने स्वत:ची समजूत घालायची की, इन्कम टॅक्सवाल्यांच्या तुलनेत आपल्याकडे भ्रष्टाचार कमी, इन्कम टॅक्सवाल्यांनी म्हणायचं की, रेव्हेन्यू डिपार्टमेंटच्या

मानाने आम्ही बरे, मग रेव्हेन्यूवाल्यांनी कस्टम एक्साईजकडे बघून आपली पाठ थोपटून घ्यायची आणि या देशातील सर्वात दुर्दैवाची बाब म्हणजे ज्या खात्याकडे न्याय मिळेल म्हणून अपेक्षेने जायचे त्या न्याय खात्याचाच तराजू आता डगमगायला लागलाय!

या साऱ्या परिस्थितीचा सम्यक परिणाम माणसावर म्हणजे पर्यायाने साऱ्या समाजावर झालेला आहे. सत्प्रवृत्त बुद्धीवादी समाज, गुंडशाही आणि झुंडशाहीविरूद्ध, त्यांच्या पातळीला जाऊन लढता येत नाही म्हणून उदासीन झालाय. सर्वसामान्य माणूस चंगळवादी बनलाय. त्यामुळे देशाच्या भवितव्याविषयीच्या संवेदना पूर्णपणे घालवून निर्लज्ज, कोडगा आणि मुर्दाड बनत चाललाय. दिवसाढवळ्या माय-बहिणी, छोट्या छोट्या शाळकरी मुली यांच्यावर होणाऱ्या पाशवी बलात्कारांच्या घटना त्याला अस्वस्थ करत नाहीत.

वैयक्तिक सुखदु:खांच्या हानीपोटी आम्ही चिडून उठत नाही मग राष्ट्राच्या इभ्रतीचा कसला कपाळ विचार करणार? आपल्या देशाचा सर्वोच्च मानबिंदू असा आपला प्रिय तिरंगा भर चौकात राष्ट्रद्रोही मंडळी जाळतात, पायदळी तुडवतात तरी आपण पेटून उठत नाही. मग ऑलिंपिकसारख्या जागतिक स्पर्धेत आपला ९६ कोटींचा प्रचंड देश आपल्या एखाद्या जिल्ह्याएवढ्या असलेल्या छोट्या राष्ट्रापेक्षा कमी दर्जाचा ठरतो म्हणून थोडेच व्यथित होणार? कधी तरी या देशातील लोक चिडून उठतील, प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध बॅस्टिलचा तुरुंग फोडणाऱ्या फ्रेंच लोकांसारखे सर्वंकष क्रांतीला उद्युक्त होतील, अशा अपेक्षा व्यर्थ. कोणत्याहि प्रकारच्या त्यागाची आणि बलिदानाची समाजाची मानसिक तयारीच नाही.

तेव्हा कोणत्या परिस्थितीत मी या देशाची सूत्रे हातात घेत आहे हे कळावे म्हणून विस्ताराने सांगितले. आपला देश पूर्णपणे विकण्याच्या राजकारणी मंडळींच्या योजनांचा गुप्त अहवाल हाती पडल्यामुळे, तातडीने काही कठोर कार्यवाही करावी लागली, त्याचा तपशील आता उघड करता येत नाही. लष्करी सत्तेच्या पाठिंब्यावर या देशातील नि:स्पृह, बुद्धीवान, देशप्रेमी अशा सर्व क्षेत्रातील अभ्यास मंडळींचे एक राष्ट्रीय कौन्सिल आम्ही बनविलेले असून त्यांनी घेतलेल्या निर्णयानुसारच देशाचा कारभार हाकला जाईल. ही क्रांती नव्हे, मी या देशाचा सर्वसत्ताधीश नाही तर केवळ या राष्ट्रीय कौन्सिलचा निमंत्रक व संयोजक आहे. उद्या सकाळी तुम्ही सूर्याची पहिली किरणे पहाल, त्याच्या आधीच काळ्या यादीतील सर्व गुंड, स्मगलर्स, काळाबाजारवाले तुरूंगाच्या गजाआड असतील. कौन्सिलचे निर्णय धडाधड अंमलात आणण्यात येतील. त्याच्या आड येणाऱ्यांना सरळ लष्कराच्या हवाली करण्यात येईल. सामान्य जनता, कामगार, शेतमजूर वगैरे सर्वांनी कसे वागावयाचे, याची संहिता लवकर उपलब्ध करुन दिली जाईल. आम्ही काय करणार

आहोत ते सार्वजनिक सुरक्षेस्तव सांगता येणार नाही. पण काय काय केले ते दर तीन महिन्यांनी सांगितले जाईल. आपण राष्ट्रीय कौन्सिलला संपूर्ण सहकार्य करावे, आमच्यावर विश्वास ठेवावा, असे संयोजक म्हणून मी आपणा सर्वांना आवाहन करतो.

जयहिंद.... भारत माता की जय!

भाषण संपताच मी उत्स्फूर्तपणे ओरडलो. 'वा वा फार छान! ब्रेव्हो राष्ट्रीय कौन्सिल! नव्या मनुचे स्वागत असो. देशाचे भले इच्छिणारी राजवट चिरायू होवो!!!'

माझ्या टाळ्यांच्या कडकडाटाने घरातील सारी मंडळी घाबरीघुबरी झाली. पाण्याचे सपकारे मारून मला जागे करू लागली. मी जागा झालो, फार हळहळलो. इतके सुंदर चित्र मी बघितले ते खोटेच असावे ना? अरेरे काय हे दुर्दैव!

पण मित्रांनो, सुज्ञ मित्रांनो, हसण्यावरी नेऊ नका. मागचे दोन्ही 'अनुभव' मी तुम्हाला सांगितले. मी काही द्रष्टा नाही. पण काही अतिंद्रीय शक्ती, भविष्याचा वेध घेणारी अतिमानवी बुद्धी, सुप्त रूपाने माझ्या देहात वावरत आहे. माझी मनोदेवता मला सांगतेय की इजा, बिजा नि तिजा नक्की होणार आहे. दोन वेळेला दिसले तसे तिसऱ्या वेळी निश्चित घडणार आहे. प्रतीक्षा करा. येणाऱ्या क्रांतीला सामोरे जाण्यासाठी उत्तिष्ठ! (सावधान! सावधान!!)

# ९. आयता जोशी

आमच्या जोशीबुवांना 'आयता' जोशी म्हणतो तो केवळ त्यांची देहयष्टी 'आयताकृती' आहे म्हणून नव्हे. पण आयुष्यात सगळं काही त्यांना 'आयतं' मिळत गेलं. म्हणजे तसा हा जोशी 'आयत्या' पिठावर रेघोट्या मारणारा आहे असं तुम्हाला वाटलं तर मात्र तुमचा तो गैरसमज ठरेल. पण त्याचं बेटं नशीबच असं सुदैवी आहे की आयुष्यांतील महत्त्वाची संधी त्याच्याकडे आपल्या पायाने चालत येते.

आता मुंबईसारख्या ठिकाणी घर मिळणं, नोकरी मिळणं सोपं कां आहे? किती ठिकाणी अर्ज पाठवा, मुलाखतीला जा किंवा एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या दारावर शेकडो फेऱ्या मारा. शेवटी उपयोग शून्य. नोकरी नाही म्हणून छोकरी नाही. छोकरी नाही म्हणून घरसंसार नाही. वैतागून मुंबईचा अथांग समुद्र जवळ करावा किंवा एखाद्या गगनचुंबी इमारतीवरून स्वत:ला फेकून द्यावे असं वाटण्याइतकी परिस्थिती अनेकांच्या वाट्यास येते; पण आमचे जोशीबुवा अगदी 'आयते' आरामात एका खुर्चीत बसले. म्हणजे त्याचं असं झालं.

जोशीबुवा सिद्धार्थ कॉलेजात ज्युनियर बी.ए.च्या वर्गात होते. बुद्धि तशी सर्वसाधारणच. नियमितपणे वर्षाच्या वर्षाला पास होत गेले एवढीच त्यांची जमेची बाजू. साध्या बी.ए.ला कोण विचारतोय? या अफाट विश्वात हे कसे काय तगणार ह्याची जोशीबुवांच्या इतर मित्रमंडळींना काळजी पडलेली असे. पण जोशीबुवा निवांत असत. कोणतीही काळजी फार काळ त्यांच्या मनात राहूच शकत नसे. शेवटचे वर्ष पार पडले; तेव्हा रिझल्ट लागायच्या मधल्या काळात आपणही इतर मित्रांसारखी नोकरीसाठी धडपड करावी असं त्यांना वाटू लागले. प्रत्यक्ष अशा कामाला सुरूवात करणार तेवढ्यात एक दुर्घटना घडली. जोशीबुवांचे वडील अचानक हार्टअॅटॅकने गेले. ते युनियनचे कार्यकर्ते होते. युनियनच्या कामासाठी मिटींग चालू असताना एकाएकी अस्वस्थ वाटू लागले. डॉक्टर येईपर्यंत खेळ खलास. त्यावेळी ते काम करीत असलेल्या बँकेत एक नवीन नियम झाला होता. बँकेच्या एखाद्या कर्मचाऱ्याला नोकरीत असताना मृत्यू आला तर त्याच्या सज्ञान मुलाला/मुलीला 'कॅम्पॅशिनेट ग्राऊंडवर' म्हणजे निव्वळ दयाबुद्धीने नोकरी द्यायची. मग तो पाल्य नुसता मॅट्रिक असला तरी पुरे. मग मात्र त्याला बँकेच्या

रिक्रुटमेंट टेस्टला बसायला नको की इंटरव्ह्यूला जायला नको. जोशीबुवांचे वडील अचानक गेले हे वाईट झालं. पण त्या वाईटातून चांगलं जन्माला आलं. जोशीबुवांना नोकरी मिळाली, अगदी आयती. वडील युनियनमध्ये असल्याने जी काही थोडीफार खटपट करायची ती पण युनियनच्या कार्यकर्त्यांनी केली; जोशीबुवांचे काम फक्त समोर आलेल्या अर्जावर सही करणे एवढेच!

मुंबईत रहायला जागा मिळविणे म्हणजे किती दुरापस्त. डिपॉझिट - पागडीच्या फेऱ्यातून गेल्याशिवाय जागा दिसत नाही! एखादी गृहनिर्माण संस्था बघावी. सभासद व्हावे. पहिला हप्ता, दुसरा हप्ता करत करत पैसे भरावेत. कॉन्ट्रक्टर बरा भेटला तर ठीक आणि तसा बहुधा भेटत नाहीच. बिल्डिंग तयार होत आली की बरोबर तो खिंडीत पकडतो! अशा सगळ्या आर्थिक, शारीरिक आणि मानसिक मन:स्तापातून जागा ताब्यात येईपर्यंत कोणीही माणूस अर्धमेला होऊन जातो. पण आमच्या जोशीबुवांचे नशीबच आगळे. जोशीबुवांच्या ऑफिसांतील मंडळींनी अशीच एक हाऊसिंग सोसायटी स्थापन केली होती. गेली चार-पाच वर्षे अविश्रांत परिश्रम करून आता त्यांची बिल्डिंग उभी राहिली. मेंबर, म्हणजे पैसा भरू शकणारे मेंबर गोळा करणे, प्लॉट शोधणे, एन.ए. करणे, सोसायटी रजिस्टर्ड करणे, कॉन्ट्रॅक्टर शोधणे, त्याच्याशी वितंडवाद, हिशोबाच्या झटापटी, मेंबर मंडळींची आपापसांतील भांडणे ह्या सर्व दुष्टचक्रांच्या चक्रव्युहांतून गेल्यावर आता बिल्डिंगचे 'पझेशन्' घेण्याचा सुवर्णक्षण जवळ आला आणि एका मेंबरला राजीनामा देण्याची बुद्धी झाली! सोसायटीचे हप्ते, बँकेचे हौसिंग लोन, दर महिन्याचा मेंटेनन्सचा खर्च ह्या साऱ्याचे म्हणे त्याला एकदम 'टेन्शन' आले! तसा तो माणूस पहिल्यापासून रडत होता पण इतर मेंबर्सनी त्याला दादापुता करत, विनवण्या करत संभाळले; पण आता प्रत्यक्ष घोड्यावर बसायची वेळ आली तेव्हा हे रडतराऊत गडबडले.

नेमके ह्याच वेळी जोशीबुवांच्या हातात दिवंगत वडिलांचे प्रॉव्हिडंट फंड आणि ग्रॅच्युइटीचे पैसे आले. सोसायटीला मेंबर हवा होता आणि बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेतलाच हवा होता. जोशीबुवांकडे एकदम सगळे पैसे भरण्याची 'ऐपत' आली आहे हे सोसायटीला माहीत होते. सोसायटीच्या मेंबरांनी जोशीबुवांना गळ घातली आणि जोशीबुवांनाही नाही म्हणण्यासारखे त्यात काही दिसले नाही. आणि आजमितीला पंचवीस हजाराच्या त्या ब्लॉकची किंमत, लाख-दीड लाखावर चढून बसली आहे! असा 'तय्यार' ब्लॉक आपला देह जरासुद्धा इकडचा तिकडे न हलवता जोशीबुवांच्या ताब्यात 'आयता' हातात आला!

जी गोष्ट जागेची, नोकरीची तशीच छोकरीची. एकदा जोशीबुवांकडे जबलपूरहून त्यांच्या वडिलांचे जुने स्नेही आले. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी आणि सुस्वरूप उपवर

मुलगी होती. इतकी गोड की कधी नव्हे ते आमचे जोशीबुवा मनोमन का होईना, पण पुरते विरघळले! ही मुलगी आपल्याला पत्नी म्हणून मिळाली तर किती छान होईल? असा विचार मनात येऊन ते सुखावले. पण क्षणभरच. कठोर वस्तुस्थितीची त्यांना लागलीच जाणीव झाली. कारण त्या मुलीला एका 'स्थळासाठी' तिचे आई वडील तिला दाखवायला म्हणून घेऊन आले होते. त्या कटू जाणिवेने जोशीबुवा सैरभैर झाले. आयुष्यात प्रथमच ते इतके व्याकूळ झाले होते. पण काही इलाज नव्हता. निराशेने त्या दिवशी संध्याकाळी ते एकटेच दूरवर फिरायला गेले. मन शांत व्हावं म्हणून. संध्याकाळी घरी आले. दार उघडताच त्यांच्या आईने त्यांना बाजूला घेतले आणि हळूच विचारले.

''मधू, ही दातारांची सुमन तुला कशी काय वाटते रे? मला खूप आवडलीय. सून म्हणून अऽऽशी मुलगी मला फार आवडेल.''

''म्हणजे काय आई? तिला त्या वाटव्यांच्या मुलाला दाखवावला आणलंय ना?''

''अरे हो, पण तिथलं सगळं फिसकटलंय बघ. मुलानं परस्पर कुठल्या तरी नोकरीवाल्या मुलीबरोबर जमवलंय म्हणे. सुमनचे आई-दादा अगदी खट्टू झाले बघ नकार कळल्यावर. जबलपूरच्या बाजूला महाराष्ट्रीय स्थळं मिळत नाहीत. ह्या वाटव्यांच्या स्थळाचं कळलं म्हणून इतके दिवस पत्रव्यवहार करून दाखवायला आले. त्यांना मुलीला ह्याच भागात द्यायचं फार मनात होतं. आणि पेन्शन घेतल्यावर इकडेच येऊन स्थायिक व्हायचं होतं. फार निराश झाली आहेत बघ. जबलपूर म्हणजे काय? जवळचा कां पल्ला आहे?''

''पण तू काही विचारलंय का त्यांना?''

''हो, त्यांना मी म्हटलं की मधुची तयारी असेल तर मला आवडेल तुमची सुमन सून म्हणून. दोघं इतकी गहिवरली म्हणतोस? एकटा मुलगा. सुसज्ज ब्लॉक. आणि तुझ्या वडिलांचा लहानपणाचा स्नेह. त्यामुळे ती दोघंना अगदी खूष आहेत. तुझ्याच होकाराची काळजी आहे त्यांना!''

''आणि सुमन? तिचे काय?'' जोशीबुवांचा स्वर कधी नव्हे तो कातर झाला होता.

''अरे तिचे काय? ती तुमच्या मुंबईच्या मुलीसारखी थोडीच आहे? तिला विचारूनच मी तिच्या आईशी बोलले. सुमनला घरसंसाराची फार हौस. नोकरी करायची अजिबात इच्छा नाही. मी म्हटलं आम्हांला कुठं आता ब्लॉक घ्यायचाय, म्हणून नोकरीवाली सून बघत बसू? आता तुझं बोल.''

''आता तुला पसंत आहे तऽऽर.'' कधी नव्हे ते जोशीबुवा लालीलाल झाले!

जोशीबुवांना नवल वाटत होतं. गेले दोन दिवस ते इतके बेचैन होते, की आपल्याइतका निराश माणूस जगात दुसरा नसेल असे त्यांना वाटत होतं. आणि या क्षणी या भूतलावर आपल्याइतका सुखी प्राणी कोणी नसेल असं त्यांना वाटायला लागलं. नशीब आपलं त्या वाटव्यांच्या मुलानं सुमनला बघितली नाही ते. बघितलं असतं तर नक्कीच त्यानं आपला बेत फिरवला असता!

बघा म्हणजे अन्न, (अंग), वस्त्र आणि निवारा ह्या तिन्ही बहुमोल गरजा जोशीबुवांच्या 'आयत्या' भागल्या. पण एरवीसुद्धा आमचे जोशीबुवा तसेच नशीबवान असतात. कधी कोणाचा आयत्या वेळी बेत कॅंसल होतो म्हणून जोशीबुवांच्या हातात कधी सिनेमाची तर कधी नाटकाची तिकिटं पडतात तर कधी अशाच कारणानं मेहुण आलं नाही म्हणून त्यांना 'आयत्या' वेळेचं मेहुण म्हणून जेवायला जावे लागते. जोशीबुवांचं एक बरं आहे. कोणताही कार्यक्रम ते ठरवून ठेवत नाहीत. केव्हाही तसे अव्हेलेबलच असतात. मोकळेच असतात. त्यामुळे कोणाकडे कधी पाहुणे वगैरे आले आणि नाटक सिनेमाची तिकिटं फुकट जायची वेळ आली तर जोशीबुवा वेळ मारून नेतात. मात्र तसे ते फुकटे मात्र नाहीत हं. पण त्यांच्या निष्पाप वृत्तीमुळे कोणालाच त्यांचेकडून पैसे घ्यायला आवडत नाही. आता पाहुण्यांवरून जोशीबुवांचा एक किस्सा आठवला तो सांगतो.

एकदां काय झालं? रविवारचा दिवस होता अन् सकाळी साडे अकरा-बाराचा सुमार असावा. जोशीबुवांकडे जबलपूरहून अचानक चार-पाच पाहुणे आले. त्यांनी पाठविलेले पत्र जोशीबुवांना मिळालेलं नव्हते. जोशीबुवांच्या सासऱ्यांच्या ऑफिसमधील मंडळी होती. संध्याकाळी लागलीच त्यांना त्रिंबकेश्वरला जायचं होतं. आम्ही सारं बघत होतो. म्हटलं, चला आमच्या जोशीबुवांची जरा धांदल उडेल. जरा गंमत येईल...

एवढ्यात समोरच्या ब्लॉकमधल्या गोखल्यांकडे तार आली. 'स्टार्ट इमिजिएटली.' गोखल्यांच्या सासऱ्यांना अपघात झाला होता. गोडबोल्यांनी घाईघाईत टॅक्सी बोलावली. जोशीबुवांकडे घराच्या किल्ल्या द्यायला गेले. नेमके त्याच दिवशी गोखल्यांच्या पुतणीचे केळवण होते. जोशीबुवांकडे त्यांची पाहुणेमंडळी येऊन हाशऽहुश् करून बसतात न बसतात तेवढ्यात हा गोखल्यांकडचा प्रकार...

मला वाटतं पुढचं काही सांगायलाच नको... जोशीबुवांकडची पाहुणे मंडळी श्रीखंडपुरी, भजी, पुलाव-चटणी कोशिंबीरीसह उभे आडवे हात मारत जेवली! निहायत खुष झाली. 'आयता' तयार स्वैपाक मिळाला.

एक दिवस जोशीबुवांना मी बोलावलं. म्हटलं, 'जोशी बुवा, तुमच्यावर एक कथा रचतोय. ऐकवू का?''

''ऐकवा.''

मी जोशीबुवांना त्यांच्यावरची कथा ऐकवली. त्यांनी लक्षपूर्वक ऐकली. आणि कागद हातात घेऊन म्हणाले,

''कथेला शेवट नाही?''

''शेवट कसला? एक व्यक्तीचित्रासारखं रेखाटलंय् झालं.''

''असं नको. माझ्यावर एवढी 'आयती' कथा रचलीत् निदान तुम्हाला 'आयता' शेवट तरी देतो!''

मी बघतच राहिलो. जोशीबुवा माझ्या टेबलाशी बसले. एक-दोन कागदाचे ताव ओढले. भरभर लिहू लागले. त्यांच्याच शब्दांतील शेवट ऐका.

''कोणता तरी सुटीचा दिवस होता. गोखल्यांची वृद्ध आई दोन दिवस जरा जास्तीच आजारी होती. सकाळपासूनच जोरदार धाप लागली होती. जाणकारांच्या मते पाच-सहा तास काढणे म्हणजे अगदी शिकस्त. वशा फाटक गोखल्यांच्या आईची 'प्रकृति' बघून बाहेर आला. बिल्डिंगमधल्या काही जणांना त्याने बाहेर काढले आणि म्हणाला,

''म्हातारी दोन-चार तासांवर वेळ काढेल असं वाटत नाही. आपण आपलं पुढच्या तयारीला लागलेलं बरं.''

'पुढची तयारी' हा वशाचा अगदी खास अधिकाराचा विषय होता. आजूबाजूच्या परिसरात वसंता उपाख्य वशा हा 'वशा खांदेवाईक' म्हणनूच विख्यात होता. आजवर अनेकांना त्याने 'खांदा' दिला होता; नव्हे तो ते पवित्र कर्तव्यच मानत असे. आजारी माणसांनी तर त्याचा एवढा 'धसका घेतलेला होता की, तो कधी कुणा आजारी माणसाला नुसता 'बघायला' जरी गेला तरी त्यांना आपल्याला 'न्यायलाच' आलाय् असेच वाटे.

गोखल्यांच्या ब्लॉकमधून तो बाहेर पडला तेव्हाच त्याचे डोळे 'लकाकत' होते. या 'खेपेला' थोडं खास कारण होतं. आजवर त्यानं मोजून नव्याण्णव लोकांना खांद्यावरून 'पोचविले' होते. 'शतक' पुरे व्हायला एकाच 'विकेट' ची आवश्यकता होती. आणि आज तशी 'संधी' आली होती. सुटीचा दिवस असल्याने रजा पण घ्यावी लागणार नव्हती.

एवढ्यात गोखल्यांच्या ब्लॉकमधून डॉक्टर बाहेर आले. एक दोघे जण चिंतातूर चेहेऱ्याने पुढे झाले. डॉक्टर हसले. म्हणाले की आता काळजीचे कारण नाही. इंजेक्शनला पेशंटचा चांगला रिस्पॉन्स आहे. धोका टळलेला आहे.

कोणीतरी बिल्डिंगच्या पिछाडीला 'तयारीला' लागलेल्या वशाला हे सांगितले. एक कोकणी शिवी हासडून वशा म्हणाला.

''च्यायला, सगळी तयारी फुकट गेली.''

एवढ्यात जोशीबुवांच्या घरातून अचानक आरडाओरड आणि रडारड ऐकू आली. सगळीजण तिकडे धावले. जोशीबुवांना जबरदस्त हार्टअ‍ॅटॅक आला होता. डॉक्टरांना बोलवायला पण वेळ मिळाला नाही. बाथरूममध्ये हात धुवायला म्हणून गेले. तेथेच कोसळले. दोन मिनिटांत खेळ खलास!

वशाची 'तयारी' फुकट गेली नाही! 'आयता' जोशी मिळाला.

आपल्याच कथेचा जोशीबुवांनी केलेला शेवट क्रूर होता. मस्करीची कुस्करी करणारा होता. मी अस्वस्थ झालो होतो. डोळ्यात पाणी तरळत होते.

❖❖❖

# १०. माझी अतूट सखी- 'सर्दी'

साध्या सर्दीला कंटाळून कुणी आत्महत्त्या केली असं कधी तुम्ही ऐकलंत? नाही ना? मग आता तसा 'योग' लौकरच येईल. हो, म्हणजे अस्मादिकांच्याच बाबतीत! इतका सर्दीने मी बेजार झालोय. ऑफिसात बसलं की एअरकंडिशनचा त्रास. लोकलमध्ये गार वाऱ्याचा त्रास तर कधी डोक्यावरच्या पंख्याचा. घरी तर सारीचजणं पंख्याचे 'फॅन' आहेत. त्यामुळे बघायलाच नको.

खरं म्हणजे भीतीच बाळगायची तर ती कॅन्सर, टी.बी., हार्ट डिसिज्, हाय ब्लड प्रेशर अशा मोठमोठ्या अथीरथींचीच. पण साध्या सर्दीने आपल्याला सर्द करून टाकावे म्हणजे काय?

रात्रभर माचणावर शिकाऱ्याने क्रूरं नरभक्षक वाघांच्या प्रतीक्षेत सावधपणे डोळ्यात तेल घालून बसावं आणि एखाद्या य:किश्चित् माशीने त्याच्याभोवती घोंघावत त्याला हैराण केलं तर त्याला कसं वाटेल? तोच अनुभव, तीच चीडचीड सध्या मी अनुभवतोय. ऑफिसात कामावर लक्ष राहात नाही, घरी काही लिहायला-वाचायला सुचत नाही. कोठेच मन केंद्रित करता येत नाही. सगळा वेळ नाक साफ करायला नि खाकरायला.

तशी सर्दी ही माझी बालपणापासूनची सखी. जाऊन येऊन असायची. तेव्हा या सखीचा कधी दु:स्वास करावासा वाटला नाही. उलट तिचं कौतुकच व्हायचं. आई चांगला गवती चहा द्यायची. रात्री निलगीरीचा वाफारा हळद-साखर मिश्रीत उकळलेले दूध. असा दोन चार दिवसांचा पाहुणचार घेऊन परत जायची.

पुढे पुढे येताना आपल्या 'खोकला' नामक लाडक्या भावाला घेऊन यायची! बहीण पुढं यायची. आपलं दोन-चार दिवस कौतुक करून घ्यायची, मग भावाला 'ठेवून' जायची. बहिणीच्या तुलनेत भाऊ मात्र महा खट्याळ. सदैव घशात मुक्काम ठेवून असायचा. दिवसा मधून खोकायचा पण दिवसभराच्या कामात त्याच्याकडं दुर्लक्ष होतंय असं दिसलं की रात्री हट्कून खनपटीलाच बसायचा! झोपू द्यायचा नाही. खोकून खोकून छाती वाजेपर्यंत लहान मुलासारखा अडेलतट्टूपणा करायचा.

मग त्याच्या कुरबुरीकडं लक्ष द्यावंच लागायचं. गरम पाणी, त्यात मध, अडुळशाचा काढा, ज्येष्ठमध, खडीसाखर, असे घरगुती उपाय आई करायची. फार 'रागात' नसला तर एवढ्या सरबराईवर खूष होऊन जायचा. पुढं पुढं दोघंहि बहीण-भावंडांचा हटवादीपणा

फारच वाढायला लागला. मग व्हिक्स फॉर्म्युला ४४, ग्लायकोडिन अशा आंग्ल वस्तूंची त्यांना चटक लागली. डॉक्टरांकडे एकसारखं जाणं आवडायला लागलं मग स्टेथॅस्कोपने छाती तपासून घे, एक्स रे काढून घे अशा 'चाळ्यांची' गरज वाटायला लागली!

एक मात्र बघितलय. डॉक्टर मंडळी कांही म्हणोत पण त्यांना ह्या बहीण-भावांनी तशी कधीच दाद दिली नाही! त्यांच्याच मनात यायचं तेव्हांच आणि फक्त तेव्हाच ही बहीण भावंडं निघून जायची! आम्ही मात्र उगाचच डॉक्टरांच्या 'करणीला' घाबरली असं म्हणून स्वत:ची फसवणूक करून घ्यायचो!

असेच दिवस गेले. चाळीशी उलटली. बालपणीची ही 'सखी' मनाच्या सांदीकोपऱ्यातून साऱ्या शरीरभर हातपाय पसरायला लागली. मग आम्ही सर्दीनं घसा धरलाय. सर्दीन डोकं दुखतंय. सर्दीनं अंग मोडून आलंय. असं म्हणायला लागलो. डॉक्टरांकडील आणि त्यांच्या स्पेशॅलिस्ट जमातीकडील फेऱ्या वाढल्या. मग ॲलर्जीचा शोध लागला. सर्दीला दह्याची ॲलर्जी आहे, धुळीची ॲलर्जी आहे, केळाची ॲलर्जी आहे, सर्दीला आईस्क्रिम अजिबात नको अशी भाषा सुरू झाली. पुढे पुढे तिच्या पाठोपाठ तिचा खट्याळ भाऊ येईल या भितीने भजी नकोत, बटाटेवडे नकोत. चिवडे नकोत, सगळं बिनतेलाचं हवं, असं सगळं 'हवं-नको' सुरू झालं.

वास्तविक एकेकाळी हिमालयात जाऊन बर्फात ट्रेकिंग करून आलेला माणूस मी. पण या सखीनं मला अगदीच बापुढवाणं करून टाकलं. रात्री झोपताना मी विक्सचा वाफारा घ्यायचा. झोपताना गळ्याभोवती मफलर, कानात कापसाचे बोळे, डोक्याला घट्ट बांधलेला मऊ रुमाल, पायात पायमोजे अशा पक्क्या 'संरक्षणात' झोपायला लागलो! पण इतक्या कडेकोट 'बंदोबस्तातून' सकाळी उठावे तो डोळे बारीक झालेत. नाकावर आणि डोळ्याच्या खाली सूज आलीय. डाव्या डोळ्याच्या वर कपाळ दुखतेय. डोळे आणि नाक गळतेय. नाक एका बाजूने चोंदलेय. अंग मोडून आलंय. सर्वांगाला थंडी वाजतेय. अशा अवस्थेत माझं रोजचं 'सुप्रभात' व्हायला लागलं.

पुढे पुढे तर नाक असं चोंदायला लागले की, रात्र रात्र झोप येईना. आपण कलकत्त्याच्या त्या कुप्रसिद्ध अंधारकोठडीत अडकलेल्या कैद्यासारखे श्वास घुसमटून जाणार अशीच एकसारखी भीती वाटायला लागली. नाकात कागदाची बारीक सुरळी घालून भरपूर शिंका काढाव्यात तेव्हा कोठे थोडं हलकं वाटायचं. पण असे किती दिवस काढणार? काही केल्या नाकातून 'चोंदणकर' महाराज मुक्काम हलवायला तयार होईनात! मग मोठे मोठे स्पेशॅलिस्टस् गाठले. नाकाचे एक्स रे काढले. या साऱ्या 'मंथनातून' माझ्या डाव्या नाकपुडीत 'पॉलिप्' वाढलाय असे 'निदान' झाले, आणि तो ऑपरेशन करूनच काढायला हवा असंहि ठरलं. या निर्णयाने मी घाबरलो. धीर

एकवटून त्या स्पेशॅलिस्टला म्हटलं, 'समजा नाही ऑपरेशन केलं तर काय होईल?'

तेव्हा तो शांतपणे म्हणाला, 'मग हळू हळू दुसऱ्या नाकपुडीतहि 'पॉलिप्' तयार होईल. आता थोडासा श्वसनमार्ग चालू आहे तो पूर्णपणे बंद होईल. आणि मग हळूहळू.. पुढचं 'मरण' टाळण्यासाठी मी ताबडतोब बॉम्बे हॉस्पिटल मध्ये धाव घेतली!

आणि इथूनच त्या न परतीच्या रस्त्याला मी लागलो. हॉस्पीटलमधील पहिल्याच दिवशी माझ्या शेजारच्या बेडवरील एका सिंधी म्हाताऱ्याने माझी 'सर्द-कहाणी' ऐकून भाकित केले. तो म्हणाला 'बेटा कुछ नही फरक पडेगा! ये सर्दी जैशी की तैसी रहेगी! ये डॉक्टरलोग हमें ऐसेहि फसाते है!' ऑपरेशन झाले. पॉलिप् निघाला. आठ दिवस हॉस्पिढलमध्ये काढून घरी आलो. शांत झोप काढली आणि हाय रे दुर्दैवा! सखी सर्दी सुहास्य मुद्रेने स्वागतास हजर!

ऑपरेशननंतर सर्दी कायमची जाईल म्हणणाऱ्या त्या स्पेशालिस्टकडे रागाने गेलो तो तोच बिचारा 'कायमचा' गेल्याचे कळले. (प्रभूची इच्छा!) ईश्वरेच्छेने तो डॉक्टर कायमचा गेला पण माझी सखी मात्र आता कायमची मुक्कामाला आलीय. ऑपरेशन-पूर्व काळातील तिच्या सर्व 'लीला' पुन्हा सुरू झाल्या आहेत. पूर्वी ती थोडी 'अमूर्त स्वरूपात वावरायची. आता तिची भीड चेपली म्हणा वा सुडबुद्धीने म्हणा, आता ती 'मूर्त' स्वरूपात वावरते. 'मूर्तिमंत सर्दी उभी' अशी माझ्या नाकाची 'स्थिती' असते!

वास्तविक माझे नाक एखाद्या चिनी वा जपानी सम्राटासारखे आहे. (नुसतेच नाक बसके आहे, चपटे आहे असे सांगितले की तुम्ही कुचेष्टेने बघाल म्हणून माझ्या नाकाचे हे उदात्तीकरण!) एवढ्या छोट्या 'वास्तूत' एवढी प्रचंड 'सर्दी' कशी 'गर्दी' करून राहते ह्याचा मलाच अचंबा वाटतो! जगातील उच्चयावत 'ओलावा' माझ्याच श्वसनेंद्रियाच्या अंतर्भागात 'गिलावा' करण्यासाठी हजर झालाय अशीच मला कधी कधी शंका येते!

मध्यंतरीच्या काळात आमच्या ऑफिसच्या कुलाब्याच्या 'कफ-परेड' ब्रँचमध्ये काम करणारी एक सहचरी माझ्या सेक्शनमध्ये आली. एका जीवघेण्या आजारात प्रत्यक्ष मृत्यूशी ती 'शेकहँड' करून आल्यापासून ॲलोपाथी डॉक्टर्स, हॉस्पिटलस् या साऱ्यांचा ती भयानक तिरस्कार करते. आता ती नॅचरोपाथी हा एकमेव आपला 'पंथ' मानून निसर्गोपचारावरची मोठमोठे ग्रंथ वाचत असते.

माझ्या सर्दभऱ्या कहाणीने आणि मी पण डॉक्टर्स आणि ॲलोपाथीची औषधे याबाबतीत कडवटपणा धारण केलेला असल्यामुळे थोड्याच काळात आमच्यात 'दर्द का रिश्ता' निर्माण झाला! माझं सगळं ऐकून घेतल्यावर ती उत्स्फूर्तपणे म्हणाली, 'अरे, हा साऱ्या त्या कफाचा परिणाम.' मग तिने शरीरातील कफदोषावर दीर्घ व्याख्यान

दिले. माझ्या साऱ्या सर्दीचे कारण ह्या कफाच्या ठायी आहे तर?

हा कफ शरीरात 'काँग्रेसी गवतासारखा' माजलेला आहे. छाती, आतडी, मेंदू ह्या सर्व ठिकाणी तो अजगरासारखी वेटोळी घालून बसलाय. ह्या कफरूपी खलपुरुषाला 'बाहेर' काढल्याशिवाय सर्दी जाणार नाही ह्या विचाराने मी एवढा प्रभावीत झालो की माझ्या 'कफनिर्मूलन-समितीचे' तहहयात अध्यक्षपदच मी या माझ्या मैत्रिणीला देऊन टाकले! तेव्हापासून तेलकट पदार्थ वर्ज्य केले. काकडी, गाजर, मुळा, कच्चा कोबी, बीट, सर्व फळे ह्या साऱ्या पदार्थांस भोजनात अग्रस्थान दिले. माझी मैत्रीण वेळोवेळी माझी प्रगती पहायची. त्यानुसार कधी माझा कफ वरच्या बाजूस सरकायचा, तर कधी मानेच्या मागच्या बाजूस. कधी डोक्यात मेंदूच्या बाजूने जायचा तर कधी छातीभोवती गोळा व्हायचा. एकंदरीत जाम टरकला होता, त्यामुळे अक्षरश: माझ्या शरीरात मोठी 'कफपरेडच' चालू होती म्हणानात.

कफावर केलेल्या हल्ल्यामुळे आणि मोर्चेबंदीने तो आता काढता पाय घेण्याच्या मार्गावर होता. आता शेवटचा निकराचा हल्ला चढविण्याची तयारी सुरू केली, दोन-तीन दिवस टर्कीश टॉवेल पाण्यातून पिळून काढून छातीवर ठेवले, पोटावर ठेवले. गळ्यावर ठेवले. आता कफ नेस्तनाबूत होणार या विचाराने मी अतिशय उत्तेजित झालो होतो. पण हाय रे दुदैवा, मलाच सडकून ताप भरला. हुडहुडी भरली. दुखणं न्युमोनिआवर जाईल या काळजीने घरच्यांनी धावाधाव केली. पुन्हा डॉक्टर, हॉस्पिटल, टॅबलेटस्, इंजेक्शन्स् ह्या चक्रव्यूहात मला अडकवले गेले.

आता मी एकंदरीत बरा आहे. What Can't be cured must be endured हे आता मला पटलेले आहे. ही सर्दी माझी चिरकालीन 'सखी' आहे. ॲलोपॅथी होमिओपॅथी, नॅचरोपॅथी कोणीही तिला माझ्यापासून हिरावून नेऊ शकणार नाहीत. ही जाईल ती माझ्याबरोबर 'वर' जाईल! जमा केलेला पैसा, दागदागिने, पॉलिसी, शेअर्स, कोणी अखेरीस माझ्याबरोबर येणार नाहीत. खुद्द माझी धर्मपत्नीसुद्धा माझ्याबरोबर 'सती' बनून येणार नाही. येईल, अखेरपर्यंत साथ देईल ती माझी सखी-सर्दीच!

हा 'साक्षात्कार' झाल्यावर मी परमेश्वराची प्रार्थना केली. माझ्या सखीला उद्देशून गहिवरल्या स्वरात म्हटलं, 'हे प्रिय सखे, दुनियाकी कोई ताकद हमें जुदा नही कर सकती!'

त्याच क्षणी माझ्या सखीनं मला मनोमनीची खूण पटल्याची साद दिली! कारण त्याचवेळी मला फटाफट तीन शिंका आल्या!

'त्रिवार' सत्य आहे ना?

❖❖❖❖

# ११. माझी पत्रकारिता

पत्रकारितेचं आकर्षण मला पहिल्यापासून होतं. पण नेमकं काय करावं म्हणजे पत्रकार म्हणून मिरवता येईल हे काही मला फारसं उमगत नव्हतं. त्यामुळं पत्रकारितेत उडी वगैरे मी काही मारली नाही. फुटकळ लेखन मात्र करत राहिलो. दिवसभर कारकुनीचे लेखन आणि शनिवार-रविवार घरची कामं आटोपून आपल्या आवडीचं लिखाण असा क्रम मी चालू ठेवला. मधून मधून कविता, लेख, लघुकथा छापून यायच्या. लिहितांना आपलं लिखाण अगदी ग्रेट आहे. सर्वत्र त्याची चर्चा होणार, बोलबाला होणार, कोण बरं हा लेखक अशी चर्चा होणार अशा स्वप्नरंजनांत मी असायचा! पण पोस्टमननं 'साभार परत' आसं पुडकं घरात फेकलं की मग मी जमिनीवर यायचा! बरं, त्यातून काही छापून आलं, कोपऱ्यात आपलं नाव बघितलं की धन्य वाटायचं. पण इतरांच्या ते गावीही नसायचं.

पण लिहिण्याची उर्मी गप्प बसू देत नव्हती म्हणून लिहित राहिलो.

मात्र जगात एक व्यक्ती कौतुकानं माझा खटाटोप पहातेय याची मला कल्पनाच नव्हती.

एक दिवस शामकांत मला म्हणाला, 'तुझ्या कविता, लघुकथा चांगल्या असतात पण तू आता पत्रकारितेत शिर.'

मी उडालोच. हा एवढं माझ्या मनांतलं कसं बोलतोय? त्याची कसली तरी जाहिरात संस्था होती. त्याच्याकडं बड्या, बड्या उद्योगांचं आणि उद्योगपतींची जाहिरात करण्याचं काम होतं. त्यानं मला एका उद्योगपतीकडे नेलं. त्याच्या अनेक उद्योगांची माहिती दिली. माहितीपत्रकं दिली. त्या उद्योगपतीच्या आलिशान चेंबरमध्ये बसून त्याची मुलाखत झाली. आणि मग मी शामकांतने सांगितलं त्याप्रमाणं मालमसाला वापरून त्याच्यावर लेख लिहिला. शामकांतकडे दिला.

'साभार परत' अशा भीतीपोटी रोज मी पोस्टबॉक्स घाबरत घाबरत उघडत असे.

आणि एक दिवस त्या उद्योगपतीच्या फोटोसह माझा लेख मी एका प्रचंड खपाच्या वर्तमानपत्रांत बघितला. ह्याच वृत्तपत्रानं माझे अनेक लेख धाडकन परत पाठवले होते!

त्या उद्योगपतीची, दगडूशेठची एकसष्टी होती. भली दांडगी पार्टी होती. मला आवर्जून आमंत्रण होतंच. मी शामकांतबरोबर गेलो. यजमानांनी माझ्या हातावर पाचशे रुपये ठेवले तेव्हा मी उडालोच!

शामकांत म्हणाला की अशा पार्ट्या म्हणजे किस झाड की पत्ती? त्यांच्याकडं काळा-गोरा पैसा आहे. त्यांना समाजात प्रतिष्ठा हवीय आणि ते काम तुझ्या लेखानं केलंय.

त्या पार्टीत ज्याला त्याला तो दगडूशेठ माझी ओळख 'रायटरसाब' म्हणून करून द्यायचा. मग शामकांताच्या शब्दांत सांगायचं म्हणजे मला तिथं अनेक ऑर्डर्स मिळाल्या. कुणा उद्योगपतीची पंच्याहत्तरावी, तर कुणाच्या उद्योगाचा रौप्यमहोत्सव. कुणाचं परदेशगमन तर कुणाचं परदेशातून आगमन. रंगीबेरंगी फुलं, निळं आकाश, हिरवीकंच झाडी, चंद्र तारे, सारे सारे मी विसरलो! लोखंड, सिमेंट, हळद, तंबाखू, खाडीतील रेती, वाळू अशा विषयांवर, त्यांच्या मालकांवर मी लिहित होतो. शामकांत सांगत होता त्याप्रमाणे. तो कुठून कुठून छापून आणायचा. नाही म्हटलं तरी मनाला आतून खटकत होतं. वृत्तपत्रातून 'व्यक्तीविशेष', 'व्यक्तीवेध' अशा सदरांतून माझं नाव झळकत होतं तरी मनाला आनंद नव्हता की समाधान नव्हतं. असली कसली पत्रकारिता? पण मग माझं दुसरं मन मला समजावी. काही काही अभिनेत्री नाही का आधी देह प्रदर्शन करून सिनेमासृष्टीत प्रवेश करतात. जरा नाव मिळालं की मग आपली अभिनयसंपन्नता दाखवून मान्यता मिळवतात. लोक त्यांना डोक्यावर घेतात. मागचं सगळं विसरलं जातं. तसंच माझं आहे. आधी या प्रचंड वृत्तपत्रक्षेत्रांत मला उभं तर राहू दे. मग मी पण चांगल्या पत्रकारितेचा अविष्कार करायला लागेन! एक दिवस नक्कीच मी अरुण शौरी बनेन. कुलदीप नय्यर बनेन.

दरम्यान शामकांत मला मुंब्रा-दिवा या बाजूला घेऊन गेला. भली मोठी पसरलेली खाडी, त्यातून निघणारी रेती, मोठमोठे ड्रेनर्स, तो रात्रंदिवस चालणारा प्रचंड उपसा, पाण्यात डुब्या मारणारे, तिथंच झोपड्या टाकून राहणारे मजूर हे सगळे मी सूक्ष्मपणे बघितलं. डोळ्यांच्या कॅमेरात बंदिस्त केलं. अनेकांशी बोललो, टिप्पणे काढली. शामकांतच्या कॅमेऱ्याने सगळ्या परिसराचे फोटो टिपले. या विषयावर काम करायला मला आवडणारं होतं. मोठी माहितीपूर्ण लेखमाला तयार करता येणार होती. पण मालक शंकरदादा त्याविषयी फारसे उत्सुक दिसले नाहीत. शामकांत म्हणाला की तू आधी शंकरदादांवर गौरवलेख लिही. बाकी तुझ्या मनात आहे ते आपण नंतर लिहूच. मला हे विशेष पसंत नव्हते. एक तर मनाला अजिबात न भावलेल्या लोकांबद्दल लिहायचं; त्यांना शब्दांनी गोंजारायचं; त्यांच्यात नसलेले गुण त्यांना चिकटवायचे म्हणजे जरा

अतीच होतं. पण आता मी, कोळ्याच्या जाळ्यात अडकावं तसं शामकांतच्या रुटीनमध्ये सापडलो होतो. त्याच्या मदतीनं एका ध्येयवादी डॉक्टरच्या जीवनावरची माझी कादंबरी क्रमश: प्रसिद्ध होण्याची शक्यता होती. पत्रसृष्टीतील बड्या धेंडांची शामकांताशी जवळीक होती. त्यानं पुढं केलेल्या शिडीच्या आधारानंच मला वर चढायचं होतं. नाही तर मी एकटा काही करू शकत नव्हतो. मी होतोच कोण? शामकांताच्या पांगुळगाड्याशिवाय मला एक पाऊलही पुढे जाणे शक्य नव्हते.

मी मुकाट्याने शंकरदादावर लेख लिहायला सुरुवात केली. एक दिवस रविवारी दुपारीच शामकांत माझ्याकडे आला. मला म्हणाला, 'चल, तुला पाहिजे तशी पत्रकारितेची संधी आली आहे.'

मी, प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडं पहात राहिलो. त्याला ते आवडलं नाही. स्वाभाविक होतं. त्यानं उठ म्हटलं की उठावं, बस म्हटलं की बसावं असा त्यानं अधिकार माझ्याबाबतीत प्राप्त करुन घेतला होता. निदान तशी त्याची समजूत होणं रास्त होतं.

मी जरा घुश्श्यात 'नाही' म्हणायच्या मूडमध्ये होतो. पण त्याच्या शब्दांनी चमकलो.

'ताजमहाल हॉटेलात पार्टी आहे. एक औरंगबादची पार्टी आहे. अमेरिकन कोलॅबरेशनने प्रॉडक्ट सुरू करतेय. मोठमोठे पत्रकार यायचे आहेत.'

'पण मी कुठं पत्रकार आहे? कुठल्या नात्यानं मी यायचं?'

'मग मी कशाला xxxx बसलोय का इथं? एका वृत्तपत्राचा प्रतिनिधी यायचा नाही. त्याच्या जागी तुला नेतोय. चल, लवकर तयार हो.'

जास्ती बोलण्यात अर्थ नव्हता. मी तयार होऊन निघालो.

मुंबईत राहून मुंबईचं जगविख्यात ताजमहाल हॉटेल मी प्रथमच पहात होतो. पत्रकार परिषदेचे आकर्षण होतंच. एका मोठ्या दालनांत आम्ही जमलो. अमेरिकन पाहुणे यायला वेळ होता; तोवर कोल्ड्रिंक्स पीत, वेफर्स, काजू तोंडात टाकत सगळ्यांच्या गप्पा चालल्या होत्या. मी इकडे तिकडे हिंडून ताज, न्यू ताज दिसेल तेवढं बघून घेतलं.

कोपऱ्यावरचा स्वीमींग पूल बघितला. मुक्तपणे खिदळणारे, पोहणारे परदेशी नागरिक बघितले. जास्ती वेळपर्यंत पहायला आवडलं असतं पण तेवढ्यात कंपनीचे अमेरिकन प्रेसिडेंट आल्याचा गलका झाला. आम्ही आपापल्या वृत्तपत्रांच्या अधिकृत जागेवर बसलो. ऑफिशिअली मी मि. जॉन सायमन होतो! एका इंग्रजी वृत्तपत्राचा प्रतिनिधी.

प्रेसिडेंटनी आमचा आधीच सत्कार केला. एका आकर्षक खोक्यातून सर्वांना

गिफ्टस् वाटण्यात आल्या. कंपनीच्या नव्या प्रॉडक्टची माहिती पुरविणारं लिटरेचर आम्हाला पुरवण्यात आलं. मग दहा मिनिटं प्रेसिडेंटचं भाषण झालं. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. कुणाला काही शंका असल्यास विचारायला सांगण्यात आलं. तशी कुणाला शंका नव्हतीच. पण त्यांनी आधी 'पुरवलेले' प्रश्न एक दोघांनी विचारले. प्रेसिडेंटनी 'गुड क्वेश्चन्स' म्हणनू कौतुक करून उत्तरे दिली.

अर्ध्या तासात प्रेस कॉन्फरन्स् खतम्.

खरी पत्रकार परिषद नंतरच सुरू झाली! दुसऱ्या मोठ्या दालनात. एकजण म्हणाला, 'चला थ्री पॉईंट फाईव्ह सुरू.' शामकांतनं खुलासा केला. व्हिस्कीचे तीन पेग आणि नंतरचा अर्धा पेग, स्पॉन्सरच्या भरभराटीसाठी! अशा पार्ट्या नेहमीच असतात. स्वतःवर बंधन रहावं म्हणून थ्री पॉईंट फाईव्हचा फॉर्म्युला! अर्थात एकदा विमान हवेत चढायला लागल्यावर कोण कशाची मोजदाद ठेवतोय? अचकट विचकट गप्पा. पत्रसृष्टीतील लफडी आणि भानगडी.

शामकांतला जाताना मी म्हटलं, 'प्रेसिडेंटच्या भाषणाच्या आधारे मी माझा 'रायटप' तयार करतो. जिथं द्यायचा तिथं तू दे.' त्याने मला वेड्यात काढलं. म्हणाला, 'अरे ते लिटरेचर दिलंय ना, तेच द्यायचं असतं आपला प्रेस रिपोर्ट म्हणून.'

अशी माझी पहिली प्रेस कॉन्फरन्स. शामकांताच्या मदतीने माझी पत्रकारिता सुरू झाली. रांगू लागली. चालू लागली. पण 'पिऊ' लागली हे मात्र वाईट झालं!

दरम्यानच्या काळात माझी के. सत्यमूर्तींची ओळख झाली. सडाफटींग आणि कलंदर माणूस. अंगापिंडानं एकदम फाटका माणूस. पण भल्या भल्यांना त्याचा वचक वाटे. दरारा जाणवे. त्याची लेखणी तेज होती. एखाद्या शहाळीवाल्याने सपासप धारदार चाकूने शहाळ्याचे छिलके काढावेत तसे त्याचे लेखणीचे फटकारे एकेकाच्या लफड्याचे सालटे काढत असे. त्याची शोध-पत्रकारिता मला फार आवडायची. त्याची लिहिण्याची स्टाईल आवडायची म्हणून त्याची आर्टिकल्स मी पाठ करत असे. त्याचे मार्गदर्शन मिळवावे म्हणून मी आवर्जून त्याच्याकडं गेलो.

पहिल्या भेटीतच त्यानं मला फटकारलं. म्हणाला की, 'तुझ्यासारखे लोक पत्रकार या अर्थाने एकदम कुचकामी आहेत. नुसतं प्रत्येकाविषयी गोडगोड लिहून तुलाच एक दिवस अजीर्ण होईल. तू गोंडस शब्दांत ज्यांच्याविषयी लिहितोस ते सगळे तुरुंगात डांबून ठेवण्याच्या लायकीचे आहेत. तुला खरोखरच शोध-पत्रकारीतेचे अप्रूप असेल तर तुझ्या त्या शंकरदादानं इतरांना डावलून खाडीतून किती रेती उचलली त्याचा शोध घे. त्याचा रेती उचलायचा लायसेन्स केव्हा संपलाय ते बघ. नंतर तू ज्या हरीभाई पटेलचं

गुणगान केलंस त्याच्या अनधिकृत बिल्डिंगज् किती आहेत? त्या त्यानं कशा उभ्या केल्या, कोणा कोणाच्या जमिनी कशा हडप केल्या याचा शोध घे. डोळे उघडे ठेवून वागलास तर तुला खूप काही लिहायला मिळेल. मात्र त्या शामकांताची संगत सोड. या साऱ्या धनिकांचा तो दलाल आहे. तुला तो नुसता 'वापरतोय'. कुणाचं मिंधत्व पत्करायचं नसेल, जीवाची तमा बाळगायची नसेल, तरच पत्रकार बनायचा प्रयत्न कर.

सत्यमूर्तीने माझी चांगलीच निर्भत्सना केली होती. तिखट शब्दांत खरडपट्टी काढली होती.

पण ते सगळे खरे होते.

दोन दिवसांनी एका आवेशासरशी मी मुंब्रा गाठलं. मुद्दाम शामकांतला न सांगता गेलो. सत्यमूर्ती म्हणाला तशी चौकशी सुरू केली. शंकरदादाचे लोक माहिती देईनात तेव्हा त्याच्याशी उभा दावा असलेल्या चुलतभावाकडे निघालो. त्याच्याकडून जी माहिती मिळाली ती भयानक होती. शंकरदादा एवढा नीच आणि ढासळलेला माणूस असेल याची मला कल्पनाच नव्हती.

बराच 'मालमसाला' मिळवून मी परतलो. आता थेट के. सत्यमूर्तीच्या शैलीत शब्दांचे फटकारे मारायचे म्हणून जेठा मारून रात्री लिहायला बसलो. त्याच रात्री माझ्याकडे तिघेजण आले. दोन धटिंगण मवाली दिसत होते तर एक त्यातल्या त्यात जंटलमन दिसत होता. त्यानं माझ्या टेबलावरची टिपणं वाचली आणि टरकन् फाडली. मी काही बोलायला तोंड उघडणार तो एका धटिंगणानं फाडकन् माझ्या श्रीमुखात भडकवली. माझ्या डोळ्यांसमोर काजवे चमकले. दुसऱ्याने माझी शर्टची बाही पकडली. गुर्मीत तो जंटलमन म्हणाला, 'अहो रायटर, मुंब्रा-दिव्याच्या खाडीतून आम्ही रेती काढू, नाही तर सोनं काढू. पण तू काही लिहायच्या फंदात पडशील तर या सुऱ्यानं तुझा कोथळा काढूं.' आयुष्यात एवढा धारदार सुरा मी प्रथमच पहात होतो. माझ्या उत्तराची वाट न बघता आले तसे पाच मिनिटांत ते सर्वजण गेले.

मी हबकलोच. माझी खोली एका बाजूला असल्याने घरच्या कोणाला पत्ता लागला नाही.

एक दोन दिवसांत तीन बायका आल्या. अणि घरात त्यांनी खूप कलकलाट केला. आरडाओरडा केला. त्यांच्या एका महाराजांच्या विचित्र वर्तणुकीच्या संबंधात मी लेख लिहिला होता. त्या संदर्भात अब्रुनुकसानीचा दावा गुदरण्याची त्या धमकी देत होत्या. मी माझी माहिती कशी बरोबर आहे आणि कुणाकडून मिळाली वगैरेचा खुलासा करत होतो. म्हणजे तसा प्रयत्न करत होतो. पण आमच्या गल्लीत जसजशी बघ्यांची गर्दी वाढायला लागली तशी घरच्या मंडळींनी दादापुता करून त्या बायकांचा ओरडा

थांबवला.

त्याच दिवशी संध्याकाळी ऑफिस बंद होता होता मॅनेजरनी मला बोलावून घेतलं. आणि त्या महाराजांची मी माफी मागावी अशी जवळजवळ ऑर्डरच दिली. नाही तर दूर जंगलातील कोंडवली - खोडाळा अशा आडवळणाच्या गावाला बदलीची गर्भित धमकी दिली. महाराजांच्या परिवारापैकी एक बाई त्यांच्या नात्यातली होती.

तुझ्यामुळे आम्ही अडचणीत येतो म्हणून घरच्यांची कटकट चालू होतीच.

हे सगळं झालं बाहेरचं. मुळात माझ्यात कुठं हिंमत होती वाटेल त्या परिस्थितीला तोंड देण्याची? कुठं होतं ते धाडस सर्व यातना सहन करुन ताठ उभं रहाण्याचं? आपली बेडकी घरातल्या घरातच उड्या मारणारी. सिंहाची गर्जना ऐकेपर्यंतच आपली कोल्हेकुई चालायची. त्या तेजस्वी पत्रकारीतेच्या जवळपास तरी जाण्याची आपली लायकी आहे का?

आपली 'कुवत' पिवळ्या सरकारी कागदावर काळ्याचे पांढरे करण्यापुरतीच.

अशी माझ्यातली पत्रकारिता गर्भातच गारद झाली!

हल्ली हल्ली माझ्या घरासमोरच टोलेजंग बिल्डिंगचे काम चाललंय. अर्थातच अनधिकृत. माझ्या छोट्याशा गल्लीत बांधकामाच्या सगळ्या विटा, दगड, वाळू पडलीय. चालायला रस्ताच उरला नाही. मी एकदा घाईत निघालो तेव्हा त्या चिंचोळ्या पाऊलवाटेवरनं दोन तीन माणसं एकापाठोपाठ येत होती. कारण त्या सिमेंट विटांच्या गर्दीत रस्त्यावर तेवढीच वाट शिल्लक होती. मला पुढे जायला वाव मिळेना म्हणून थोड्या चिडक्या स्वरांत 'जरा रस्ता द्या ना.' म्हणून खेकसलो. तेव्हा त्यातील एका माणसाने शांतपणे माझ्याकडे बघितले आणि म्हणाला, 'अहो, आम्ही गरीब पादचारी, आमच्यावर खेकसताय, हिंमत असेल तर हा सगळा रस्ता बिल्डिंगच्या कामासाठी दगड विटा ठेवून अडविणाऱ्या त्या बिल्डरवर खेकसाना!'

मी क्षणभर वर बिल्डिंगकडे बघितलं. तिथल्या शेठजींचा मुकादम कुत्सितपणे दात विचकून हसत होता.

मी मान खाली घातली. महात्मा गांधीची ती तीन 'सुप्रसिद्ध' माकडे माझ्याकडंच रहायला आली होती!

❖❖❖

# १२. ''थँक यू मि. डेथ!''

जिना चढता चढता आप्पा पायरीवरच बसले. त्याना दरदरून घाम आला होता. जोराची धाप लागली होती.

समोरचे राघुअण्णा तेवढ्यात आले. पाणी प्यायला दिलं. फॅन सुरु केला. जोरदार वाऱ्याच्या झुळुकेने आप्पांना बरं वाटलं.

''चक्कर आली का आप्पा?'' राघुअण्णांनी विचारलं.

''नाही रे, आज जरा जास्ती फिरलो म्हणून असेल कदाचित. तीनऐवजी चार फेऱ्या मैदानाला घातल्या. तेच बाधलं असेल. तू चल. तुझी ऑफिसची गडबड असेल ना?''

''मी जातो. ऑफिसला जाताना अतुलला बघून जायला सांगतो. जयंताला यायला अजून तीन-चार दिवस आहेत.''

''बरं'' आप्पा हुंकारले.

आता एक तासाची डुलकी काढल्यावर आप्पांना थोडी हुशारी वाटली. पण त्यांचं मन विचार करू लागलं. हल्ली वारंवार असं आपल्याला का बरं होतंय? पंधरवड्यापूर्वीच अशीच आपल्याला घेरी आली होती. श्वास कोंडल्यासारखा वाटला. घाबरल्यासारखं वाटलं. जयंता-सुलुला उठवावसं वाटलं. पण निग्रहपूर्वक त्यांनी तो विचार टाळला. शक्यतो कुणाला त्रास न देण्याचा त्यांचा स्वभाव होता. दोघं बिचारे नोकरी करून दमतात. लोकल गाड्यांच्या धावपळीनं मेटाकुटीस येतात. आपली कटकट नको. आप्पांचं लक्ष सिंधूच्या हार घातलेल्या फोटोकडं गेलं. एक सुस्कारा टाकत ते म्हणाले, ''काय म्हणतेस सिंधू? तुझं बरं झालं. झटकन सुटलीस. मला पण पटकन् सोडव बघ. कुणाला त्रास नको.''

तेवढ्यात दार वाजलं. अतुल आला होता. निरोप मिळताच क्लिनिककडे जातानाच आलेला दिसतोय.

''काय म्हणताय आप्पा?'' त्यानं हसत हसत स्टेथॅस्कोप काढला. नाडी बघितली. छाती, पाठ, पोट, तपासलं. थोडा गंभीर झाला.

''आप्पा, मी तुम्हाला जयंतासारखा ना? माझ्यापासून काही लपवायचं नाही. सांगा बघू काय काय होतय ते?''

आणखी कोणी असता तर आप्पांनी उडवाउडवी केली असती. पण अतुल, त्यांच्या मित्राचा मुलगा. त्यांचा लाडका, बुद्धिवान विद्यार्थी. त्यांच्यावर नितांत श्रद्धा ठेवणारा. एरवीसुद्धा त्यांच्याशी प्रतारणा करणं जमणार नाही; आणि एक डॉक्टर म्हणून अशक्यच.

आप्पांनी त्याला सर्व काही सांगितलं. थकवा, गरगरणं, पाठदुखी, कधी कधी एकदम अंधुक दिसणं वगैरे वगैरे.

''आप्पा'' तो गलबलून म्हणाला, 'खरं तर तुम्ही आधीच मला सगळं सांगायला यायला हवं होतं.''

तो क्षणभर थांबला. आप्पा मनात म्हणाले. मी यायचं. तू फी पण घ्यायचा नाहीस. अतुल एकदम म्हणाला,

''आप्पा, नाही तरी तीन-चार दिवस जयंता येणार नाही. मी तुम्हाला माझ्या मित्राच्या क्लिनिकमध्ये ठेवतो. आपण सगळ्या तपासण्या करुन घेऊ.''

''तुला कसली शंका येतेय? काही सिरीयस आहे का?''

''तसं नाही आप्पा. पण चेक-अप केलेला बरा. वाटल्यास जयंता आल्यावर करु.''

''नको, नको'' आप्पा घाईघाईत म्हणाले, ''तू म्हणतोस, तसंच करु.'' आप्पांना जयंता-सुलुची धावपळ व्हायला नको होती.

''ठीक आहे. मी सखारामला पाठवून देतो.''

आप्पा 'संजीवनी' क्लिनिकमध्ये दाखल झाले. टेस्टस् सुरु झाल्या. रक्त, लघवी, थुंकी तपासायला दिली. एक्स-रे. ई.सी.जी. झाले. बेरियम टेस्ट, पल्स् चेकिंग झालं. तिसऱ्या दिवशी सगळे रिपोर्टस् मिळायचे होते. जेवण-चहा वगैरे सर्व व्यवस्था अतुलनेच केली होती. त्यामुळे बिल्डिंगमध्ये काही गाजावाजा झाला नाही. फक्त शेजारच्या राघुअण्णांना माहीत होतं. पण कुणाकडेहि, अगदी जयंताजवळसुद्धा, याविषयी अवाक्षर न काढण्याबद्दल आप्पांनी त्याला बजावलं होतं. तो सांगितल्याप्रमाणे ऐकेल याची आप्पांना खात्री होती.

'संजीवनी'चे डॉ. दीक्षित आप्पांना रिपोर्टस्चा रिझल्ट सांगेनात आणि फी पण सांगेनात. मग आप्पा त्याच्या रुममध्ये त्याच्याशी सफाईदार इंग्रजीत बोलू लागले.

आपल्या आजाराची आपणच चर्चा करु लागले. संभाषणातून व्यक्त होणाऱ्या आप्पांच्या व्यक्तिमत्वाने, चिंतनशील स्वभावाने आणि कणखर वृत्तीने डॉक्टर भारून गेले. काही सांगितले तरी हा पेशंट घाबरुन जाणार नाही ह्याची खात्री झाल्यावर त्याने आप्पांना विश्वासात घेत त्यांच्या हृदयविकाराविषयी सविस्तर सांगितले. बाय पास सर्जरीने आप्पा पूर्ववत् होणार होते. अशा बाय पास आजकाल अगदी सोप्या झाल्या होत्या. अगदी एखाद्या अपेंडिक्सच्या ऑपरेशनसारख्या.

खर्च फक्त दीड लाख रुपयांचा होता!

संपूर्ण चर्चेत आप्पांना एवढी एकच अवघड गोष्ट वाटली. के.ई.एम्. मध्ये खर्च कमी येणार होता. तिथे जाण्यासाठी एक चिठ्ठी आणि शुभेच्छा देऊन डॉ दीक्षितांनी निरोप घेतला.

आप्पा उठले. बरं झालं. अतुल कॉन्फरन्ससाठी आठ दिवस दिल्लीला गेलाय ते. एरवी या दीक्षितांनी काही सांगितलं नसतं.

जयंता, सुलू आले. आप्पांनी घर लख्ख करुन ठेवलं होते. सुलू मात्र आप्पांना बघून म्हणाली, ''आप्पा काही होतंय का तुम्हाला? अगदी थकलेले दिसताय.''

''छे ग, चार दिवसात तुझ्या हातचं जेवलो नाही ना? बसा तुम्ही. मी फक्कड चहा बनवतो. जयंता-शेखरची लाडकी मस्का खारी बिस्किटं आणलीत बघ. मग सगळं सांग वारणानगरच्या ॲडमिशनचं.

''आप्पा, शेखरला पाहिजे त्या कोर्सला ॲडमिशन मिळेल, पण-''

''पण काय?''

''पन्नास हजार डोनेशन भरावी लागेल. शेखरचे मार्कस् चांगले म्हणून कमी. एरवी लाख-दीडलाख लागले असते.''

''बाप रे, दीड लाख?''

''आप्पा, तुमच्या एकसष्टीला कशी तुमच्या विद्यार्थ्यांनी तुम्हाला ६१ हजाराची थैली दिली, तशी आता सत्तरी करायला हवी.''

शेखर गमतीने म्हणाला. पण सुलू उसळून म्हणाली, ''वाऽरे चोरांनो, ते पैसे आप्पांनी या ब्लॉकसाठीच खर्च केलेत ते आहे ना लक्षात?''

''अगं सुलू, तो गमतीने म्हणतोय. जयंता, तू पन्नास हजाराचं कर्ज मिळव. इंग्रजीचे क्लासेस काढतो. हां हां म्हणता पैसे फिटतील. उगाच इतकी वर्षे फुकट शिकवलं सगळ्यांना.''

''असं कसं म्हणता आप्पा? एकसष्टीच्या वेळी गुरुदक्षिणा फेडलीय सर्वांनी.''

रात्री निजानीज झाली. आप्पांना झोप येईना. जयंता-सुलुच्या बेताच्या नोकऱ्या. आता शेखरचा इंजिनिअरींगचा खर्च. यंदा ज्योत्स्नाचं दहावीचं वर्ष. या सगळ्या धावत्या वाहनांच्या गर्दीत उद्या आपला 'पांगुळगाडा' उभा राहिला तर सगळ्यांचीच पंचाईत होईल! ही 'बाय पास' कशी झेपणार कुणाला? आज कुणाला माहीत नाही. पण उद्या अतुल आल्यावर कळेलच. मग काय होईल सगळ्यांचं? सुलू तर कोसळेलच. नावाची सून. खरी ती मुलगीच म्हणायची. किती माया आहे तिची आपल्यावर? आपल्या बायपासच्या खर्चासाठी ती आकाश-पाताळ एक करेल. सगळ्यांना करायला लावेल. ब्लॉक विकून पुन्हा चाळीत राहू या असं सुद्धा म्हणेल. जयंता, शेखर, ज्योत्स्ना. सगळ्यांचं किती प्रेम आहे आपल्यावर. शेखर-ज्योत्स्ना अजून लहान मुलासारखी गोष्टी ऐकत आपल्या कुशीत झोपतात. किती जपतात आपल्याला. छे, एवढी माया लावली नसती तर कुठंतरी जीव तरी देता आला असता! शेखरच्या पन्नास हजाराची सोय बघितली पाहिजे. कुणाला तरी भेटायला हवं. उद्या आधी के.ई.एम्. हॉस्पीटलमध्ये जाऊन सर्व रिपोर्टस् ताब्यात घ्यायला पाहिजेत. अतुल आला की त्याला पूर्ण विश्वासात घेऊन समजवायला हवं की... केव्हा तरी आप्पांना झोप लागली.

•••

दुसऱ्या दिवशी के.ई.एम्. हॉस्पिटलच्या पायऱ्या चढत चढत आप्पा कॉरिडॉरमध्ये आले तेव्हा अघटितच प्रकार घडला. दोन-तीन पेशन्टस् जीवाच्या आकांताने धावत होते. आणि त्यांच्यावर गोळ्या झाडत चौघे पाचजण स्टेनगन्, पिस्तूल झाडत पाठलाग करत होते. ''पळा, धावा, भागो स्मगलर्स'' असा आरडाओरडा होत होता. आप्पांना चपळाईने पळता येईना. सूं सूं करत बंदुकीच्या गोळ्या त्यांच्या डोक्यात घुसल्या. छातीत घुसल्या. आप्पा रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. आजूबाजूचे आणखी काहीजण गोळ्या लागून पडले. हॉस्पिटलचा डगला घातलेल्या दोन्ही पेशंटस्च्या शरीराची घुसलेल्या गोळ्यांनी नुसती चाळण झाली. मारेकरी पळाले.....

•••

जयंता-सुलू, शेखर, ज्योत्स्ना, नातेवाईक, बिल्डिंगची माणसं आप्पांच्या फोटोसमोर उभी होती. उन्मळून उन्मळून रडत होती. अतुल, आपल्या मित्रांसह आपल्या

आदर्श शिक्षकासमोर उभा होता. त्याच्या डोळ्यांतील पाणी थांबत नव्हतं.

तेवढ्यांत कुणीतरी शासकीय अधिकारी पुढे आला. के.ई.एम्. हॉस्पिटल्मध्ये स्मगलर्सनी केलेल्या बेछूट गोळीबारात जे मृत झाले, त्यांच्या जवळच्या नातलगांना प्रत्येकी पन्नास हजाराचा चेक शासनातर्फे द्यायला तो आला होता.

फोटोतील आप्पांचे ओठ काही तरी बोलण्यासाठी विलग झाले होते. ते म्हणत होते, ''थँक यू, मि. डेथ.''

पण त्यांचे शब्द फक्त नियतीलाच ऐकू जात होते!

❖❖❖❖

# १३. तडजोड

मला गार वाऱ्याने जाग आली तेव्हा घड्याळात पहाटेचे साडेपाच वाजले होते. महालक्ष्मी एक्सप्रेसने बहुधा कराड स्टेशन नुकतंच सोडलं असावं. कारण बाहेरच्या शेतीवाडीवरून किर्लोस्करवाडी येत असावं. आता निखिलला उठवायला हवं. त्याला सकाळचं उठवायचं म्हणजे अगदी हलवायला लागतं. त्याच्या शांत, निरागस चेहेऱ्याकडं बघून मला त्याची दया आली. बिचाऱ्यानं वर्षभर छान अभ्यास केला. आता पी.सी.एम्. ग्रुपमध्ये ८४% मार्क्स म्हणजे काही कमी नव्हते. पण इंजिनिअरींगच्या अ‍ॅडमिशनला कमी होते. निदान ज्या जातीत तो जन्मला होता, त्यासाठी तर नक्कीच कमी होते. त्याचे इतर मित्र त्याच्यापेक्षा कमी मार्कस् मिळवूनही त्याच्यापुढं जाणार होते.

तो आणि त्याच्यासारखे अनेकजण या विचित्र व्यवस्थेचे बळी ठरणार होते. अ‍ॅडमिशन न मिळाल्याने नैराश्यापोटी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांचा विषय रात्री त्याच्या बोलण्यात आला तेव्हा माझ्या काळजात गलबललं. हर प्रयत्नानं मी संभाषणाची गाडी हलक्या-फुलक्या विषयावर आणली. त्यामुळे पुणे स्टेशन सोडेपर्यंत आम्ही जागे होतो. रात्री झोपलो तेव्हा एक वाजून गेला होता.

सांगली स्टेशन आल्यावर रिक्षाने घरी आलो. दादा म्हणाले म्हणून वरच्या माडीत झोपून गेलो.

दोन तास अगदी छान झोप लागली. सकाळचे ९ वाजून गेले होते. निखिल अजून झोपलाच होता. वहिनी म्हणाली की त्याला झोपू दे. मुखमार्जन करुन मी चहा घेत होतो, वृत्तपत्रावरुन नजर टाकत होतो. तेव्हा फाटकापाशी गाडीचा हॉर्न ऐकला.

बाहेर एक मारुती थांबली होती. त्यातून एक रुबाबदार गृहस्थ उतरले. कडक इस्त्रीचा लेंगा, सिल्कचा झब्बा, हातात एक उंची लेदर बॅग. दादांनी दारातच त्याचं स्वागत केलं.

''या, या, आबासाहेब या.''

मग दादांच्या आणि त्यांच्या गप्पा बऱ्याच वेळ चालल्या होत्या. चहापाणी झालं. निघताना आबासाहेब म्हणाले,

''बरंय, दादा, आता येतो पुढच्या पेन्सनच्या टायमाला.''

पेन्शन म्हटल्यावर माझे कान टवकारले. आबासाहेबांची गाडी हलल्यावर मी दादांना म्हटलं.

''दादा, हे गृहस्थ पेन्शनीचं काय म्हणत होते?''

''अरे, पेन्शन म्हणजे स्वातंत्र्यसैनिकाची. आपल्या घराजवळ ट्रेझरी ऑफिस आहे ना? तिथं पेन्शन न्यायला येतात. आधी इथं आपल्याकडं येतात. मला भेटतात. गप्पा मारतात आणि मग जातात. दर महिन्याचा असा कार्यक्रम असतो.''

''पण मारुती गाडी बाळगणाऱ्या माणसानं पेन्शन कशासाठी घ्यायची? ब्रिटीश सत्तेविरुद्ध लाठ्या खाऊन, गोळ्या झेलून तुरुंगवास भोगलेल्या, गरीब क्रांतीकारकांसाठीच सरकारनं अशा योजना सुरु केल्या असतील ना?''

''त्या योजना बाबा कागदावर असतात. त्याचा फायदा कसा उठवायचा, कुणी उठवायचा ते ज्यानं त्यानं आपापली विवेकबुद्धी वापरुन ठरवायचं.''

मग बोलता बोलता दादा भूतकाळात गेले. नेहमीसारखे रंगून स्वातंत्र्यलढ्यातील हकिगती सांगू लागले. शिंदे, वाघमारे, दत्ताजी पाटील लपत-छपत कसे घरी यायचे, पत्रके ठेवायचे, पुढच्या पार्टीसाठी बंदुका, दारुगोळा ठेऊन जायचे. शाळा सुटल्यावर विश्वासातील दामू शिपायाच्या मदतीने आपण पत्रके कशी पोचती करायचो हे सांगण्यात गुंगून गेले.

मध्येच त्यांची तंद्री भंग करत मी म्हटलं,

''पण दादा, तुम्ही सांगता त्या हकीगतींमध्ये या आबासाहेबाचं नाव मी कधी ऐकलं नव्हतं.''

''कसं ऐकणार? आबा म्हणजे मुलखाचा भित्रा माणूस. तो कशाला लाठ्या खायला घराबाहेर पडतोय?''

''मग हे स्वातंत्र्यसैनिकाचं पेन्शन?...'' मी आश्चर्यानं विचारलं.

''हंऽऽ'' दादांनी एक सुस्कारा सोडला.

मी मनाशी म्हटलं. ठीक आहे. म्हणजे कापडाचं दुकान, पेट्रोलपंप असणारे, मारुतीतून हिंडणारे हे आबासाहेब, फुकटची पेन्शन खातात हे निदान मनोमनी तरी दादांना पटत नसावं. मी संघवाला आणि ते काँग्रेसवाले. आमच्या राजकारणावरुन नेहमीच चकमकी झडायच्या. त्यांच्या स्वभावाप्रमाणे उघडपणं ते कधी कुणाला नावं ठेवायचे नाहीत की कुणाला गोंजारायचे नाहीत. नव्या राजकारणाशी स्वातंत्र्योत्तर

काळात दादांनी जमवून घेतलं असतं तर ते कुठच्या कुठच्या गेले असते. त्यांची विचारमग्नता भंग करीत मी म्हटलं,

''पण मग तुरुंगात न जाता या आबांना पेन्शन तरी कशी मिळाली?''

''अरे पेन्शन मिळवण्यासाठी तुरुंगातच गेलं पाहिजे असं थोडंच आहे? नुसती जेलरची सर्टिफिकेटस् मिळवून... पण ते जाऊं दे. निखिलच्या ॲडमिशनचे आधी बोलू.''

प्रचलित राजकारणाविषयी बोलायचं टाळत दादा म्हणाले.

पण मी पिच्छा सोडला नाही तेव्हा दादांचा नाईलाज झाला. ते हसत हसत म्हणाले,.

''अरे हा आबा खरोखरच तुरुंगात गेला होता.''

''ऑं?'' माझ्या आश्चर्यचकित चेहेऱ्याकडं पाहात दादा म्हणाले,

''आबाची गंमत सांगतो पण तुझ्याजवळच ठेवायचं सगळं.''

मी संमतीदर्शक मान हलवल्यावर दादा म्हणाले,

''अरे आम्ही स्वातंत्र्याची चळवळ चालवत होतो तेव्हा आबा मौजे वडगावला होता. शेतात काम करत असतांना एकदा बांधावरुन जात होता. बाभळीच्या रानात शिरणार एवढ्यात समोरचं दृश्य पाहून त्याची बोबडीच वळली. अण्णा सरपंचानं कुऱ्हाडीनं कुणाचं तरी डोकंच उडवलेलं होतं! रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या आणि त्याचवेळी अण्णा सरपंचाची नजर आबाकडं गेली. अण्णा आबाचा काटा काढण्यासाठी पुढं सरसावला. आबाला दरदरुन घाम फुटला. खून करतांना आपण बघितलंय. म्हणजे मग आपण प्रत्यक्ष घटनेचे साक्षीदार होऊ शकतो. म्हणजे पुरावा नष्ट करण्यासाठी अण्णा आपल्यावरच कुऱ्हाड...?

त्या 'भयानक' विचारासरशी आबा जीव तोडून पळत सुटला. गावाकडं पळता येणं शक्य नव्हतं. कारण वाटेवर रक्ताने माखलेली कुऱ्हाड घेऊन अण्णा पाटील उभा होता. आबा मागच्या मागं जो पाय लावून पळत सुटला तो कुठं न थांबता मोठ्या सडकेला लागला.' सापडेल ती बैलगाडी, मोटार करत करत थेट माझ्याकडं आला. भीतीनं त्याची दातखीळ बसल्यासारखी झाली होती. मग त्याला चहा पाजला. थोडा धीर दिला तेव्हा कुठं त्यानं तोंड उघडलं. सगळी हकीगत सांगितली. पण तोंडानं सारखं 'सरपंच मला जिता मारणार. मी त्याला खून करतांना बघितलंय. मला तो सोडणार नाही' असं सारखं बडबडत होता. मला कुठंतरी लपवा म्हणून मागं लागला.''

''मग कुठं लपवला?''

''अरे अशा सुरक्षित जागी त्याला लपविलं की त्यामुळं त्याचं आयुष्याचं कल्याण झालं.''

''म्हणजे?''

''तुला आपले जेलर नाना जोशी आठवतात?''

''हो. ते करड्या मिशांचे, भेदक डोळेवाले नाना.''

''तेच. ते त्यावेळी जेलर होते. ते आणि मी वर्गमित्र. मी त्याला जाऊन भेटलो. आबाची सगळी हकिगत सांगितली. नानाला त्याची दया आली. आबाच्या भीतीमध्ये थोडं तथ्य होतं. आपल्या घरात त्याला ठेवणं शक्य नव्हतं. घर छोटं आणि सारखी लोकांची वर्दळ. शेवटी नानालाच शक्कल सुचली. आबाला तुरुंगातच लपवायचा! आबाचं मौजे वडगांव त्यावेळी ब्रिटीश हद्दीत होतं तर आपला होता संस्थानी मुलुख. नानाच्या हातात सत्ता होती. आबाच्या अंगावर चक्क कैद्याचा पोशाख चढवला. चांगले तीन महिने लपवला. नानाने काय काय कागदपत्रं केली, का केलीच नव्हती देव जाणे. यथावकाश अण्णा सरपंचाला अटक झाली. शिक्षा झाली. आबाची मात्र तुरुंगात चैन झाली. आपल्या घरचा डबा जायचा. आबाचं वजन वाढलं. समाजातलं पण वजन वाढलं.''

''म्हणजे?''

''आजचे तुझे मंत्री दिनकर अण्णा, मोहनराव त्याच वेळी तुरुंगात होते. आबा गोष्टीवेल्हाळ. त्याची सगळ्यांशी दोस्ती झाली. आबा तुरुंगात कसा आला ते फक्त नानाला आणि मला माहीत! स्वातंत्र्य मिळाल्यावर आबानं या दोस्तीचा चांगलाच फायदा उठवलान. मग पेट्रोलपंप काय, महामंडळ काय. चैनच चैन. आबाचा बघता बघता आबासाहेब झाला. त्याच्या शिक्षणसंस्थांचं नुसतं जाळं पसरलंय. आपल्या निखिलला इंजिनिअरींग कॉलेजची ॲडमिशन तोच देणार आहे.''

''काय? हाच तो माणूस? मग नकोच आपल्याला ॲडमिशन.'' मी आवेशाने म्हणालो.

''मला माहिती आहे तुला आवडणार नाही ते.''

''आणि तुम्हाला पटणार आहे ते दादा? आजवर आयुष्यात तुम्ही कुणापुढं कधीच हात पसरला नाही. मनात आणता तर आज.....''

दादांनी मला मध्येच थांबवलं. अर्धवट स्वत:शी आणि अर्धवट माझ्याशी बोलत ते म्हणाले,

''असं वैतागून कसं चालेल? आयुष्यात स्वत:साठी मी काही मागितलं नाही.

मिळत होतं तेव्हा नम्रपणे नकार दिला. आम्ही मंडळी स्वातंत्र्यासाठी लढलो. देश स्वतंत्र झाला तेव्हाच आम्हाला आमची बक्षिसी मिळाली. आमची तत्त्वं आमच्यापाशी आणि आमच्यासाठीच. आता आपल्या निखिलला मेरीटमध्ये थोडे कमी मार्कस् मिळाले. डोनेशन द्यायला आपल्याकडं पैसा नाही. कुठून आणणार ऐंशी हजार रुपये? आबा माझ्या शब्दासाठी निखिलला ॲडमिशन मिळवून देतोय. पूर्वीचे उपकार जाणून खुशीने देतोय तर कशाला त्रागा करायचा? निखिलचं भविष्य बिघडवण्याचा आपल्याला काय अधिकार? आजकाल चालू असलेली ही व्यवस्था आपल्याला मान्य असो वा नसो. परिस्थितीशी आपल्याला जुळवून घ्यायलाच हवं.''

तत्त्वासाठी कधीही तडजोड न करणाऱ्या माझ्या त्यागी वडिलांचं हे नवं रुप बघून मी चकित झालो. त्यांचे एकेक शब्द माझ्या मेंदूच्या अंतर्भागापर्यंत जाऊन थडकत होते....

एका नव्या 'जीवनव्यवस्थेत' सामील व्हायला मीपण निघालो होतो.

❖❖❖❖

# १४. इतिहासाचा साक्षात्कार

सरदारसाहेबांनी दिलेल्या वेळेबरहुकूम मी त्यांच्या बंगल्यावर पोचलो. बंगला कसला, जुन्या काळची ऐतिहासिक गढीच होती ती. बाहेरच्या चौकी-पहाऱ्यांची शर्यत ओलांडून झाली. माझ्या कामाचे स्वरुप, नाव-गाव, वगैरेची रीतसर नोंद झाली. मला दिवाणखान्यात बसवण्यात आलं. नोकरांनी ट्रेमध्ये पाणी आणून ठेवले. इंटरकॉमवरुन सरदारसाहेब येत असल्याचं कळलं. मी पुन्हा माझ्या कामाची उजळणी केली. प्रश्न बघून ठेवले. अनेक ठिकाणी जाऊन आल्यामुळे तसं सगळं तोंडपाठ होतंच. म्हणून मी दिवाणखान्याचं निरीक्षण करीत बसलो. भिंतीवर मोठमोठे फोटो होते. बहुधा सरदारसाहेबांचे पूर्वज असावेत. शिकारीत मारलेल्या वाघांचे शिकाऱ्यांसमवेत फोटो होते. दुसऱ्या भिंतीवर जनावरांची मुंडकी लटकत होती. ढाल तलवार, भाले एकमेकांना कोन करुन रोवलेले होते. तिसरी भिंत बघत होतो. तेवढ्यात खुद्द सरदारसाहेबांचं आगमन झालं. माझ्या पाठीवर थाप मारत ते म्हणाले,

''माझ्या तरुण मित्रा, तुझं इतिहासाचं प्रेम बघून मला आनंद वाटतो. नेमकं काय करायचा विचार आहे?''

पहिल्याच भेटीत इतकी सलगी दाखवलेली पाहून मला बरं वाटलं. एरवी, त्यांची भक्कम देहयष्टी, अक्कडबाज मिशा आणि बरोबर असलेला लांडग्यासारखा कुत्रा बघून मी जरा दडपलेलाच होतो.

''शिवकाळात आणि पेशवाईच्या उदयापर्यंत स्वराज्य संस्थापन आणि स्वराज्य संरक्षण या कामांमध्ये मराठा सरदारांनी जी बहुमोल कामगिरी बजावली, त्यातील प्रमुख घराण्यांविषयी सांगोपांग लिहायचा विचार आहे.''

''अरे बामणा, पेशव्यांसंबंधी लिहायचं सोडून मराठ्यांविषयी कशाला लिहित बसलास?''

संभाषणाला असं वळण लागावं हे मला अजिबात रुचलं नाही. कदाचित् सरदारसाहेबांच्याही लक्षात ही नाराजी माझ्या चेहऱ्यावरुन आली असावी. ते लगबगीने म्हणाले, ''मित्रा, मी म्हटलं ते गमतीनं. मला आजवर आलेल्या अनुभवावरुन, तुझ्या प्रामाणिकपणाबद्दल मला अजिबात शंका घ्यायची नाही. चल, आपण आधी नाश्ता करू. मग तुला हवी ती पुस्तकं आपण बघू. मघाचं विसरून जा. बाळासाहेबांनी फोनवरुन

तुझ्याविषयी सगळं सांगितलंय.''

''अरे हो, त्यांची चिट्ठी द्यायला मी विसरलोच.''

''राहू दे, राहू दे. आता त्याची काही आवश्यकता पण नाही.' ते म्हणाले. नंतर आम्ही एका मोठ्या दालनात गेलो. मक्याची गरम गरम भाजलेली कणसं, भुईमुगाच्या शेंगा, लुसलुशीतशी मक्यांच्या कणसांची उसळ, रसरशीत पपया, केळी, असा नाश्त्याला गावरान मेवा होता. नाही म्हटलं तरी मी लोभावलोच! सरदारसाहेब अघळपघळ बोलत होते. मनमोकळेपणाने जुन्या गंमतीजमती सांगत होते. माझी भीड चेपली. संकोच गळून पडला. बराच वेळ आमचा नाश्ता चालला होता. मी मनातल्या मनात चुळबुळत होतो. नुसत्या आदरातिथ्यातच वेळ वाया जाणार की काय? माझ्या पोटात ही काळजी होती. अनेक अमीर उमरावांच्या घरात माझी अशीच बोळवण झाली होती. हाती माहिती काहीच लागली नव्हती. येऽऽरे माझ्या मागल्या.

पण सरदारसाहेब मनकवडे असावेत. म्हणाले, ''चल, आपण माझ्या अभ्यासिकेत जाऊ.''

मग आम्ही मुख्य बंगल्याला लागून असलेल्या एका छोट्या बंगलीत गेलो. सरदारसाहेबांचा कारकून लगबगीने पुढे आला. मान लववून त्याने त्यांना नमस्कार केला आणि त्याबरोबर मला पण. मलाच ओशाळल्यासारखे झाले.

अभ्यासिका म्हणजे एखाद्या जुन्या संस्थानिकाचा दप्तरखाना होता. मला पाहिजे होता, अगदी तसाच म्हणजे अनेक सरदार घराण्यांच्या वंशावळी, त्यांचे पत्रव्यवहार, काही बखरी, हस्तलिखिते, सनावळी, ऐतिहासिक ग्रंथ, दुर्मिळ इतिहास विषयक पुस्तके असा सगळा मामला. म्हणजे ते एक वस्तुसंग्रहालयच होते. हॉलमध्ये म्हणजे अभ्यासिकेच्या हॉलमध्ये दोन मोठ्या खिडक्यांच्या जवळ दोन शिसवी लाकडाची टेबले आणि खुर्च्या होत्या. एक आरामखुर्चीपण होती.

कारकुनानं मला सगळं दाखवलं. पुस्तकांच्या याद्या दिल्या. मी सर्व बघून बाहेर आलो.

सरदारसाहेब दिसले नाहीत म्हणून इकडे-तिकडे बघू लागलो. तेवढ्यात एक नोकर बाहेर आला. म्हणाला, ''साहेब व्हरांड्यामधी बसल्याती. तकडंच बलावलय.''

सरदारसाहेबांकडे तीन-चार माणसं आली होती. मला बघताच ते म्हणाले, ''मी तुमचं नाव घरात सगळ्यांना सांगून ठेवलंय. सगळी व्यवस्था आहे. पाहिजे तितका वेळ बसा आणि काम करा. एकदम आठवल्यासारखं करत ते म्हणाले, ''महिनाभर रहाणार ना?''

''हो. बहुधा तेवढ्यात काम होईल.''

''मग आमच्या बंगल्यावर का राहात नाहीत? संकोच नको. चांगल्या कामासाठी आमचं घर नेहमी उघडं आहे.''

''थँक्स, पण बाळासाहेबांनी आधीच सगळी व्यवस्था केलीय.'' ''ठीक आहे. मी घरात असतो-नसतो. काय लागेल ते मागून घ्या. मी कारकुनाला, आमच्या आण्णाप्पाला सांगून ठेवलंय.''

त्यानंतर मी नियमितपणे त्या अभ्यासिकेत जाऊन बसायला लागलो. इतक्या सुंदर वातावरणात आणि सुसज्ज अभ्यासिकेत काम करण्याचा योग कधीच आला नव्हता. मी कामाला सुरुवात करण्यापूर्वी चहाचा ट्रे येत असे. सरदारसाहेब बरेचदा नसत. त्यांच्याकडे नेहमी कुणाची ना कुणाची ये-जा असे. अथवा त्यांना कुठं ना कुठं जायचं असे. पण जेव्हा केव्हा बंगल्यावर असत तेव्हा आवर्जून माझं काम बघून जात. मी काढलेली टांचणे काळजीपूर्वक बघत. काही सूचना देत. माझं काम त्यांना आवडलं असावं कारण मी एक दिवस कामाला सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी मला बोलावलं. अतिशय सुंदर वेष्टनाचा देखणा आणि भला दांडगा ग्रंथ त्यांनी माझ्या हातात ठेवला. हिंदुस्थानातील विलिनीकरणाच्या वेळी अस्तित्वात असलेल्या सहाशे-सातशे राजघराण्यांविषयी इत्थंभूत माहिती त्या ग्रंथात संकलित केलेली होती. त्यात माझ्या कामाला उपयुक्त अशी अनेक नामवंत सरदार घराणी होती. मी हरखूनच गेलो. माझ्या चेहेऱ्यावरचा परमावधीचा आनंद आणि औत्सुक्य न्याहाळीत व आपल्या भरदार मिशा कुरवाळीत ते म्हणाले,

''मी प्रौढी म्हणून सांगत नाही. परंतू हा प्रचंड ग्रंथ महाराष्ट्रात फार तर पाच-सहा ठिकाणीच आढळेल. तू खूप मेहनती आणि होतकरू दिसतोस. म्हणून तुला अभ्यासासाठी देतोय. मात्र काम करून परत जाताना आठवणीनं आण्णाप्पाच्या ताब्यात देत जा.''

मला नवल वाटलं. पुणं मुंबई सोडून एखाद्या आडगावात अशी अमूल्य माहिती मिळेल, अशी दानत, दिलदारी आढळेल याची सुतराम् कल्पना नव्हती. आपला प्रकल्प चांगलाच यशस्वी होणार याची मला नव्यानेच उमेद वाटू लागली. मी दुप्पट उत्साहाने कामाला लागलो.

महिन्याभरात माझं काम संपलं.

मी सरदारसाहेबांचा निरोप घ्यायला गेलो तेव्हा ते बागेत बसले होते. गप्पा मारता मारता सरदारसाहेबांनी विचारलं, '' जोशा, (माझ्या जोशी आडनावाचं संक्षिप्तीकरण) मराठ्यांचा इतिहास हा तुझ्या आवडीचा विषय ना?''

''हो.''

''मग तुला कोणता कालखंड जास्ती आवडतो?''

''अर्थात शिवकाल. शिवछत्रपतींविषयी जे जे मिळेल ते वाचून काढतो. प्रत्येकवेळी महाराजांचा नवीन पैलू लक्षात येतो. मला प्रामाणिकपणाने वाटतं की, खरेखुरे शिवराय त्यांच्या संपूर्ण योग्यतेसह, कर्तृत्वासह अजून आपल्या हाती आलेच नाहीत...''

मला मध्येच तोडत सरदारसाहेब म्हणाले, 'त्याविषयी प्रश्नच नाही. साऱ्या जगतात असा अलौकिक पुरुष आढळायचा नाही. पण इतिहासापासून काहीतरी शिकायला हवं, बोध घ्यायला हवा.''

मला सरदारसाहेबांचा रोख लक्षात येईना. ते पुढे म्हणाले, ''त्यादृष्टीने तू १६८० ते १७०७ या कालखंडाचा अधिक विचार कर, मनन कर.''

''हो, त्याला तर आपण मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचाच कालखंड समजतो.''

''मग त्या पार्श्वभूमीवर आजच्या परिस्थितीचा विचार कर.''

''म्हणजे कसा?''

''असं बघ. शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर मराठी राज्य तसं निर्नायकी होतं. म्हणजे छत्रपती संभाजी, राजाराम आणि ताराबाईसाहेब यांनी या कालखंडात जरूर नेतृत्व पुरवलं तरी शिवरायांच्या उत्तुंग अशा नेतृत्वाच्या तुलनेत ही सारी नेतृत्व तशी खुजी होती. सर्वंकश नेतृत्व देणारी नव्हती. हे पटतं ना?''

''हो तर, ती एक वस्तुस्थिती होती.''

''मग आजची राजकीय परिस्थिती लक्षात घे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी जी उत्तुंग, निष्कलंक चारित्र्याची, देशहिताला प्राधान्य देणारी, अशी नेतृत्वं या देशाला लाभली तशी स्वातंत्र्योत्तर काळात लाभली नाहीत. आज एका मागोमाग एक मंत्रिमंडळं कोसळणं, पंतप्रधान बदलणं, पर्यायाने स्थैर्य गमावणं ही सारी परिस्थिती कुणामुळे निर्माण होत आहे असं वाटतं?''

''कुणामुळे?''

''अर्थातच तुझ्या-माझ्यामुळे. म्हणजेच सर्वसामान्य जनतेमुळे. मला जर विचारशील तर सर्वसामान्यांनी आपल्यासमोर सतत १६८० ते १७०७ हा कालखंड आणि त्या काळातील सर्वसामान्य जनतेची वर्तणूक डोळ्यांसमोर ठेवावी. अवघं मराठी राज्य बुडवायला आलेला बलाढ्य औरंगजेब पुरता नेस्तनाबूत झाला. तो काही नुसत्या संताजी धनाजीच्या पराक्रमामुळे नव्हे किंवा रामचंद्रपंत अमात्य आणि शंकराजी नारायण यांच्या मुत्सद्देगिरीमुळे नव्हे, तर सर्वसामान्य रयतेच्या जागरूकतेमुळे. खऱ्या अर्थाने ते

एक लोकयुद्ध होतं. अशा दृष्टीनं की हे युद्ध नुसतं रणांगणावर लढलं गेलं नाही तर ते गावागावातून, शेताशेतातून लढलं गेलं. शिवछत्रपतींनी स्वराज्य कमावलं. पण त्यापेक्षाही अधिक मोठं काम केलं ते म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची आणि स्वराज्याभिमानाची अखंड ज्योत रयतेतील प्रत्येकाच्या अंत:करणात तेवत ठेवली. प्रत्येक लहानथोर माणसाने हे राज्य माझं आहे आणि ते माझंच राहिलं पाहिजे अशी जणू काही शपथच घेतली होती. औरंगजेबाने हाय खाल्ली ती संताजी धनाजीच्या पराक्रमामुळे हे खरंच. पण संपूर्ण जनता त्याच्याशी सर्व स्तरावर युद्ध करीत होती. हे दृश्य त्याला अगदी नवीन होते. दाणा-वैरण न मिळू देणारी, गावंच्या गावं जाळून औरंगजेबाच्या सैन्याला पाण्याच्या थेंबालासुद्धा मोताद बनविणारी सामान्य जनता औरंगजेबाला सळो की पळो करून सोडत होती. त्या काळातील कवी विठ्ठलदासाचे कवनच ऐक. म्हणजे समाजाच्या सर्व थराची माणसं या लोकयुद्धात कशी गुंतली होती ते कळेल. तो कवी म्हणतो, ''पाटील, सेटे, कुणबी, जुलाई, चांभार, कुंभार, परिट, न्हावी, सोनार, कोळी, ऊदीम, पुलारी यावेगळे लोक किती बिगारी....'' मला सगळी कविता पाठ नाही. पुढे युद्धाचं वर्णन आहे. मराठी रयतेच्या विविध थरातील लोक तसे या स्वातंत्र्ययुद्धात उत्स्फूर्तपणे सामील झाले होते. ते तुला मला सांगायचं होतं.''

सरदारसाहेब त्या ऐतिहासिक काळातच स्वत:ला हरवून बसले होते. पुण्यात शिक्षण झाल्यानं आणि विद्वानांच्या सहवासात सतत वावर असल्यानं त्यांची बोली शुद्ध झाली होतीच पण कधी कधी पुस्तकी वाटायची. त्यांना माझ्या अस्तित्वाची जाणीव तरी होती की नाही हेच कळत नव्हतं. एखादे स्वगत बोलल्यासारखं त्यांचं बोलणं चाललं होतं. त्यांच्या बोलण्याचा नेमका उद्देश मला मात्र उमगत नव्हता. माझ्याकडं वळून पहात सरदारसाहेब पुन्हा बोलू लागले.

''मला काय सांगायचं आहे ते मी स्पष्ट करतो. जनता अशी सर्व स्तरांवर जागरूक आणि सावध असल्यामुळं त्याचं एक नैतिक वजन आपोआपच राज्यशकट चालवणाऱ्या मुत्सद्यांवर आणि सेनापतींवर पडलं होतं. त्यामुळेच त्या स्वातंत्र्ययुद्धात लोकांचा विजय झाला. औरंगजेबाचा पराभव झाला. आज स्वराज्य मिळून अर्धशतक लोटलं. स्वराज्य म्हणजे परकीय दास्यातून मुक्तता एवढाच अर्थ होत नाही तर स्वकीय, जुलुमी, अत्याचारी, स्वैराचारी आणि बेजबाबदार लोकांपासून मुक्तता असाही स्वराज्याचा अर्थ असायला हवा. नाही कां?''

मी मान डोलावली. सरदारसाहेब पुढे म्हणाले,

''जसं शिवबानं मिळवलेलं राज्य पुन्हा परकीयांच्या घशात जाऊ नये म्हणून त्यावेळची रयत जागृत राहिली. आपापली कर्तव्ये पार पाडत राहिली, तशा समाजाची आज आत्यंतिक गरज आहे. आजच्या घडीला आपला देश तसा निर्नायकीच आहे.

आज औरंगजेब एक नाही तर अनेक आहेत. सर्व क्षेत्रांमध्ये आहेत. आपल्या रक्ताचं खतपाणी करुन, आपल्या वाडवडिलांनी मिळविलेलं स्वराज्य हे खऱ्या अर्थानं स्वराज्य व्हायला हवं असेल तर आज समाजपुरुषानं शिस्तपालनाचे, कर्तव्यपालनाचे धडे, आपले धुरिणत्व करणाऱ्या नेत्यांना घालून दिले पाहिजेत. समाजाच्या नैतिकतेचा दबाव, अंकुश म्हण, त्यांच्यावर राहिला पाहिजे. 'यथा प्रजा तथा राजा' अशी प्रक्रिया सुरु झाली पाहिजे. कारण राज्यशकट हाकणारी माणसं आता प्रजेमधूनच निर्माण होतात. लोकशाहीची हीच मागणी आहे.''

''पण सरदारसाहेब हे कसं काय जमणार? लोकांचा प्रभाव नेतृत्वावर कसा पडू शकेल?''

''पडायला हवा. इथंच तर आपली परीक्षा आहे! गंमत म्हणून आमच्याच गावातलं एक उदाहरण देतो. आमच्या गावच्या शाळेत एक मास्तर होता. मुलांना शिकवण्याकडं त्याचं लक्ष कधीच नसायचं. गावच्या गुंड, बेरकी सरपंचाच्या टोळक्यात त्याची उठबस असायची. वर्गात मास्तरच नसल्यानं मुलं काय हुंदडायला पसार व्हायची. त्या वर्गात एक मुलगा होता. सगळ्या मुलांपेक्षा वेगळा होता. त्याला हा प्रकार सहन होईना. गावातील चार चांगल्या लोकांकडं जाऊन त्यानं सगळ्या विषयांचा अभ्यास सुरु केला. शाळेत वेळेवर जायचा. स्वत: घंटा द्यायचा. वर्गावर जायचा. हजेरीबुक भरायचा आणि चक्क शिकवायला लागायचा! सुरुवातीला त्याची खूप टिंगल झाली. टवाळी झाली. क्वचित मारहाणही झाली. पण घोरपडीसारखा तो मुलगा आपल्या कार्यक्रमाला चिकटून राहिला. त्याची चिकाटी, निश्चय बघून आणखी दोन चार मुलं त्याला मिळाली. मग त्यांनी कामं वाटून घेतली. रोज अकराच्या ठोक्याला झाडून पुसून शाळा लख्ख व्हायची. हळूहळू मुलं कुतूहलापोटी जमायला लागली. तेव्हा या दोन चार मुलांनी सगळ्यांचा अभ्यास घ्यायला सुरुवात केली. सगळ्यांना कौतुक वाटलं. काही वडीलधारी माणसं, मुद्दाम शाळेत येऊन शेरेबुकात उत्तम शेरा लिहून जायची. शाळेची ही 'कीर्ती' त्या मास्तरच्या कानावर जायला लागली. सर्वत्र त्याचं हसूं व्हायला लागलं. मुलांच्या नैतिकतेचा दबाव त्याला सहन होईना. मग मात्र मुकाट्यानं एक दिवसं तो शाळेत आला. व्यवस्थित शिकवू लागला....''

''सरदारसाहेब बस्'' मी एकदम नमस्कार केला. ''आजवर मी इतिहास नुसताच वाचत होतो. आज मला इतिहासाचा साक्षात्कार झालाय. या उजेडात वाटचाल कशी करायची, इतरांकडून कशी करुन घ्यायची याची स्पष्ट जाणीव मला व्हायला लागलीय.''

मी सरदारसाहेबांकडं बघितलं तर त्या इतिहास-पुरुषाच्या डोळ्यात पाणी तरळत होतं!

# १५. इजा बिजा आणि तिजा

गेल्या काही दिवसात 'चैतन्य' सोसायटीमधला सगळा उत्साहच मरून गेला होता.

अवघ्या चार-सहा महिन्यांपूर्वी बांधलेल्या बिल्डिंगमधील माणसांचे चेहेरे रंग उडालेल्या, टवके निघालेल्या भिंतीसारखे दिसत होते. थाटामाटात वास्तुशांतीचा समारंभ झाल्यावर सगळी माणसं कशी नववधूच्या नवलाईने वावरत होती. प्रत्येक रविवारी कुणाला तरी कापून 'सेलेब्रेशन' व्हायचं. शनिवारच्या रात्री पान खाण्यासाठी पुरुष मंडळी कोपऱ्यावर घोळक्यानं जायची. टिंगलटवाळी चालायची. मग कॅरम खेळायची. कुणी रमी नाहीतर ब्रिजचे डाव मांडायचे. मुलं अंगणात बॅडमिंटन खेळायची. क्रिकेटचा आरडाओरडा व्हायचा. बायकांची भिशी चालू झाली होती. 'आता नव्या वास्तूमध्ये पुन्हा एकदा 'चान्स' घ्यायला पाहिजेस हं.' अशी एकमेकींची चेष्टा चालायची. सोसायटीची मीटींग उगाचच कुठल्या तरी मुद्यावरून लांबत चालली. दूरवरचे रात्रीचे बाराचे टोल ऐकू आले की सोसायटीचा 'कोट्याधीश' निकम डोळे मिचकावत म्हणायचा, ''चला आता 'जवळजवळ' झोपायची वेळ झालीच म्हणायची.'' त्याच्या कोटीला दाद देत मनातलं बोलला असं म्हणत सर्वजण सभा बरखास्तीची सूचना आनंदाने मान्य करत.

पण अचानक या सगळ्याला दृष्टच पडली म्हणायची!

तीन नंबर ब्लॉकचा, धडधाकट प्रकृतीचा रास्ते तडकाफडकी हार्ट अ‍ॅटॅकने गेला. ध्यानी मनी नसताना मस्त हिरवळीवरुन चालता चालता अचानक बाभळीचा काटा खुपल्यासारखं झालं.

त्यानंतर दोनच महिन्यात पाच नंबरच्या ब्लॉकमधील कुलकर्ण्यानं प्राण सोडला तेव्हा सगळीजण दिग्मूढच झाली. खरं तर त्याच्या आजाराचं निदानच नीटसं झालं नाही. कुणा डॉक्टरच्या मते कावीळ होती. कुणाच्या मते आंतड्यांचा कॅन्सर होता. कुणी खाजगीत हळूच कानात सांगत की ''तो फार प्यायचा. ऑफिसातील कस्टमरबरोबर जायचा आणि हूंऽऽ म्हणून व्हिस्की, रम, बीअर ढोसायचा. कधी कधी कंट्रीपण प्यायचा म्हणे. खरं खोटं देव जाणे.'' स्मशानात निकमने जाधवकडं पहात तेवढ्यात विनोद केलाच. तो जाधवला म्हणाला, ''लेका तू पण फार ढोसतोस. या कुलकर्ण्याला बघ

काही सरपणच लागलं नाही. कापरासारखा भर्रकन् जळला.'' त्यावर जाधव म्हणाला, ''तू माझी टवाळी केलीस तर मी तुला कधीच फुकट पाजणार नाही. पण मी खरच गेलो तर माझ्या बॉडीतून निळी फ्लेम येते का ते बघून ठेव. पोटात सगळी अल्कलीच भरलीय म्हणून म्हणतो.''

जाधवचा बिनधास्तपणा बघून बाकीचे हबकायचेच.

तीन महिन्याच्या आत दोन मृत्यू! तसा काही आजार नसताना, दोघांचीही पस्तीशी जेमतेम उलटली असताना!

घटना दु:खदायक नक्कीच होती.

पण अख्खी बिल्डिंग हवालदील झाली होती. भयग्रस्त झाली होती. त्याला दोघांचा आकस्मिक मृत्यू एवढंच कारण नव्हतं!

मोठं कारण होतं ते त्या निनावी पत्राचं. बरं, ते पत्र एकाला कुणाला तरी यावं की नाही? सोसायटीच्या प्रत्येकाच्या लेटरबॉक्समध्ये तांबड्या शाईनं लिहिलेलं पत्र.

सगळ्याचा मजकूर एकच. ''पूर्वी या जमिनीत एका मजुराचा नरबळी गेलाय. आमच्या 'भूत'शास्त्राप्रमाणे तो तिघांचा बळी मागतोय. दोन गेलेत. तिसरा जाणार. इजा, बिजा..... आणि .....''

त्या पत्रापासून मनोमन सगळी हबकून गेली होती. सेक्रेटरी देशमुख म्हणजे डॉ. लागूंचा अवतार! अंधश्रद्धा-निर्मूलन समितीचा अध्वर्यू. त्यानं पत्र वाचताच सगळ्यांसमोर तुकडे केले. कुणी काही त्यावेळी बोललं नाही. पण देशमुखाचा उद्धटपणा कुणाला आवडला नाही.

आणि त्यानंतर खरोखरच सर्वजण हवालदील झाले. कारण सगळीकडे विचित्र साथ आली. घरोघरी माणसं आजारी पडू लागली. डॉक्टरांना पण सुरूवातीला निदान होईना. पेशंटला भरभरून ताप येई. मळमळ होई. अस्वस्थ वाटे. मेडिकल असोसिएशनच्या बैठकी झाल्या. तज्ञ डॉक्टर आले. ताबडतोबीने संशोधन झालं. औषधे निघाली. लस टोचली गेली. टॉयफॉईड-मलेरीया आणि जाँडिस अशा 'त्रिमूर्ती' ज्यात एकरूप झाल्यात असा कुठला तरी भयानक आजार होता. कुणी म्हणत की पाणी पुरवणाऱ्या पाण्याच्या टाकीत एक बाई मरून पडली. कुणी म्हणत की त्या पाण्यात डुकरांचे, कबुतरांचे मृतदेह सापडले, म्हणून साथ फैलावली.

पण विचित्र गोष्ट म्हणजे सगळीकडची साथ आटोक्यात आली तरी 'चैतन्य' सोसायटीमधील आजारपणं संपेचनात. प्रत्येकाच्या घरातून कुणी ना कुणी आजारी पडायचं. कुणाला ताप चढायचा. कुणाला पोट पिरगळून उलट्या निघतात असं वाटायचं.

कुणाला डिसेंटरी तर कुणाला नुसतीच पोटदुखी. अंथरुण धरलं की प्रत्येकाला त्या पत्रातला मजकूर आठवायचा.

''इजा, बिजा आणि ........'' मनोमन थरकाप व्हायचा.

सेक्रेटरी देशमुखला सर्वजण फैलावर घ्यायचे. सात नंबरच्या जोशीकडे कुणी तरी बोअरींग काढणारे तज्ज्ञ पाहुणे म्हणून आले होते. ते म्हणाले,

''अहो, तुम्ही पाणी चेक करून घ्या. माझ्या हिशोबाने बोअरींगचे पाणी आणि रस्त्याकडेच्या गटारातून जमिनीत खोलवर झिरपत जाणारं पाणी एक होतंय. त्या दूषित पाण्यामुळेच सोसायटीत सगळ्यांना त्रास होतोय.''

बोअरिंगची आयडिया होती सेक्रेटरी देशमुखची. त्याचं म्हणणं म्युन्सिपाल्टीचं पाणी काही चोवीस तास मिळत नाही. म्हणून आपण बोअरिंग काढू. म्हणजे तेच पाणी प्यायला होईल. आणि गच्चीवरल्या टाकीमध्ये चढविलं की घरकामाला पण होईल. म्युन्सिपाल्टीचं पाण्याचं बील आयतं कमी होईल.

त्यावेळी सगळ्यांनी माना डोलावल्या होत्या.

आता माना 'मोडायची' वेळ आली तेव्हा सगळेजण कुरकुरू लागले. सात नंबरच्या जोशीची बातमी होती की त्यावेळी सेक्रेटरी देशमुखनं आपल्याच नातेवाईकाला बोअरींगचं काम देऊन 'कमिशन' उपटलं. आता पुन्हा खोदाई करून लीकेज वगैरे नाही ना हे बघावं लागेल. पाण्याचा नमुना लॅबोरेटरीतून चेक् करावा लागेल.

पण अकरा नंबरच्या महाजनने एक वेगळाच स्फोट केला. इमर्जन्सी मीटींग असल्यासारखे त्याने सर्व पुरुष सभासदांना गच्चीत बोलावलं. त्याच्याबरोबर बिल्डिंगचं काम चालू असताना, सोसायटीच्या प्लॉटमध्ये झोपडं टाकून राहणाऱ्या रखवालदाराला-आण्णाला पाहून सर्वांना आश्चर्य वाटलं. पण खरं आक्रित तो बोलल्यावर घडलं.

महाजन त्याला म्हणाला,

''हंऽऽ, आण्णा पाया खणताना तू काय बघितलंस ते तुझ्या काळभैरवाची शपथ घेऊन खरं खरं सांग.''

आण्णानं एकवार सगळ्याकडं बघितलं, मग सेक्रेटरी देशमुखकडं पाहून खाली मान घालून तो म्हणाला,

''आता सप्पत घेतलीय तवा खोटं कसं बोलणार? पाया खणताना आम्हाला एक कवटी आणि काही हाडं मिळाली होती. देशमुख सायबाना ठावं हाय.''

हा म्हणजे एक बॉम्बस्फोटच होता. बापरे, म्हणजे खरंच या जागेवर नरबळी

दिला होता की काय? आणि त्याच जागेवर आपण त्याच्या उरावर बिल्डिंग बांधून राहतोय?

सर्वांच्या अंगावर सरसरून काटा आला! म्हणजे त्या निनावी पत्रातला मजकूर खरंच काही तरी 'इशारा' देतोय.

सगळ्यांनी देशमुखवर हल्ला केला. जाब विचारला. भरपूर तोंडसुख घेतलं. सगळ्यांची तोंडं बोलून बोलून दुखू लागल्यावर ढीम्म बसलेला देशमुख म्हणाला,

''अरे तुम्ही कुठल्या युगात राहताय? नरबळी वगैरे केव्हा देतात ते तुम्हाला माहीत आहे कां?''

''केव्हा?''

''एखादा पूल बांधतात, टोलेजंग राजवाडा बांधतात तेव्हा जर का बांधकाम खचायला लागलं किंवा ढासळायला लागलं तर फार पुरातन काळात असली नरबळीची प्रथा होती. आता बांधकामाचं शास्त्र एवढं पुढं गेलय की....''

''मग पाया खणताना कवटी आणि हाडं मिळाली त्याचं काय? ते तर खोटं नाही ना?'' महाजनानं जाब विचारला.

''नाही ते खोटं नाही.'' देशमुख म्हणाला.

''मग आम्हाला का नाही सांगितलंत?'' सगळ्यांनी एकदम गिल्ला केला.

''अरे बाबांनो, त्यात काय सांगायचं? पूर्वी इथं माळरान होतं. पाया खणतानाच कशाला, एरवीसुद्धा खड्ड्यातून तुम्हाला हाडं दिसतील. कुत्रीसुद्धा इकडून तिकडून आणून टाकतात. तुम्ही सगळ्यांनीच बघितली असतील.''

देशमुख सांगत होता ते काही अगदीच खोटं नव्हतं. पण ते सगळं स्वीकारण्याची कुणाची तयारी नव्हती.

सगळ्यांच्या डोळ्यांसमोर ते पत्र नाचत होतं! महाजन म्हणाला,

''मग ते पत्र लिहिणाऱ्याला कसं माहिती?''

''मी सांगतो. हे निनावी पत्र लिहिण्याचा हलकटपणा त्या कुडमुड्या हरीभटाचा असणार.''

''म्हणजे?'' सगळ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटलं.

''त्या हरीभटाला उद्योग नसतो. पहिली कुदळ मारायची, त्या आधीच तो माझ्याकडं आलां होता. या आण्णानंच त्याला कवटीचं, हाडाचं सांगितलं असणार. चार-पाच हजार खर्चून शांत करू या असं सांगत होता. वास्तूशांत करायला त्याला मी

बोलावलं नाही ना म्हणून त्याचा डूख असेल.''

''मग आपले दोन सभासद तडकाफडकी गेले त्याचं काय? आणि आता आजारपणं मागं लागलीत ती कशापोटी? त्यालाही तुझा हरीभट कारणीभूत आहे?''

''आपले रास्ते-कुलकर्णी गेले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आजारपण म्हणाल तर सगळीकडं साथ आहेच. हळूहळू ती कमी होईलच. तरीपण आपण पाणी टेस्ट करून बघू आणि तुम्ही सर्वांनी एवढं घाबरायचं काहीच कारण नाही. उद्या मी सुद्धा फटकन् मरू शकतो.''

खरंच तसं झालं तर बरंच होईल. एकदा 'तिजा' झाली की सुटलो. देशमुखवर नेहमी खार खाणाऱ्या महाजनच्या मनात आलं!

मग मंडळी पांगली.

सांगायचं नव्हतं तरी महाजनच्या बायकोनं सगळ्यांच्या घरात हळूहळू जाऊन सभेचा सगळा अहवाल दिला. सगळ्या बायका मुळापासून हादरल्या. खरंच काही तरी करायला हवं. उगाच विषाची परीक्षा कशाला बघायची? सरळ त्या हरीभटाकडं जावं आणि सांगावं. काय शांत-बिंत म्हणतोय ते सगळं करून टाक म्हणावं. असा विचार सगळ्या बायकांमधून मूळ धरायला लागला होता. प्रत्येक बाई दुसऱ्या बाईला सांगत होती. तुझ्या नवऱ्याला जरा त्या हरिभटाकडं जायचं मनावर घ्यायला सांग असं आग्रह करून करून सांगत होती. खबरदारी म्हणून एकीने आपल्या मुलाचं हिमालयातलं ट्रेकिंग कॅन्सल केलं. दुसरीनं नवऱ्याच्या स्कूटरलाच कुलूप घालून टाकलं. तिसरीनं गिझरला शॉक बसतो असं सांगून गॅसवर पाणी तापवायला सुरुवात केली. वास्तविक पुरुष मंडळी काही भित्री नव्हती. पण बायकांच्या दहा दहा वेळेला बजावण्यानं लोकलमध्ये चढताना जपून चढू लागली. धावती लोकल, धावती बस पकडण्याचे प्रकार बंद झाले. सर्दी-पडसेसुद्धा एकमेकांपासून लपवू लागली. जोशीबुवांना जिन्यामध्येच लागोपाठ शिंका आल्या. त्यांच्या शिंका दणदणीत असत. सगळ्या बिल्डिंगला जाग आणत असत. जिन्यामध्ये त्यांच्या शिंकांचा आवाज ऐकून निकमने दार उघडलं. ''काय रे जोशा, आजच्या शिंका काही नेहमीच्या वाटत नाहीत. काय होतंय तुला?'' निकमचं बोलणं ऐकताच जोशीणबाईंनी लगबगीनं जोशीबुवांना घरात घेतलं. व्हिक्स चोपडून झोपवलं!

सगळ्यांच्या डोक्यावर पत्रातल्या ''इजा, बिजा आणि....'' सवार झाल्या होत्या!

आणि महाजनानं तर सगळ्यांना घाबरावयाचा चंगच बांधला असावा. तो म्हणे हरीभटाकडे जाऊन आला होता. निनावी पत्राचं ते कशाला कबूल करतील? त्यांनी पुन्हा बजावलं. उगाच विषाची परीक्षा बघू नका. त्या नरबळी गेलेल्या मजुराला म्हणे बायको आणि एक तान्हा मुलगा होता. त्यामुळे तीन बळी तो नक्की घेणारच. त्या

हरिभटजीकडं आलेल्य। एका माणसाला वेगळंच वाटलं. तो म्हणाला की तुमच्या सगळ्या ब्लॉक्सची दारं दक्षिणेकडे उघडतात. वास्तुशास्त्राच्या दृष्टीनं ही गोष्ट अशुभ आहे.

महाजन असं काही सांगायला लागला तेव्हा मात्र सोसायटीचा सगळ्यात सिनीअर मेंबर बुवा गोसावी उखडला.

''काय मूर्खपणा चालवलाय रे तुम्ही लोकांनी? अरे कुणी घाबरवलं की लगेच आपण घाबरायचं का? दक्षिणेकडे दारं असणारी जगात किती घरं दाखवू तुम्हाला? आणि हरिभट काय? आपल्याकडून पाच-दहा हजार उकळेल आणि गप्प बसेल. त्यानं शांत केली म्हणजे आपण सगळे अमर होणार आहोत कां? उद्या त्यानं आणखी काही उठवलं की आपण पुन्हा असंच रडत बसायचं का? इतकं सशासारखं भित्रं होणं चांगलं का?''

मग काही दिवस ''चैतन्य'' मध्ये शांतता होती.

काही दिवसच.

बारा नंबरच्या ब्लॉकमधल्या साठेकडे डॉक्टरांच्या व्हिजिटस् दिसू लागल्या. तशी पुन्हा भीतीच्या नागानं फणा काढायला सुरूवात केली! साठेच्या बायकोनं एक-दोन दिवस नवऱ्याचा आजार लपवण्याचा प्रयत्न केला पण तिसऱ्या मजल्यावरचा ब्लॉक असल्याने औषधाला जाता-येताना आणि डॉक्टरांना घेऊन येताना तिला काहीच लपवता आले नाही. साठेला हुडहुडी भरून ताप चढायचा. कितीही ब्लँकेटस् घातली तरी थंडी वाजत रहायची. एकशे चार-एकशे पाच डिग्री असा ताप चढायला लागला तेव्हा मात्र डॉक्टरांनी साठेला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायला सांगितलं. साठेबाईंचं धाबं दणाणलं. बिचारा आपला गरीब नवरा. ना कुणाच्या अध्यात ना मध्यात. कुणाचा तरी शाप आम्हाला भोगायला लागतो! इजा, बिजा, आमच्या कां मागे लागावी? तिनं मनोमन सगळ्या देवांना नवस केले. तिसऱ्या मजल्यावरून स्ट्रेचरवर झोपवून साठेला खाली आणलं. तेव्हा दारा-दारातून गर्दी जमली होती. ॲम्बुलन्समध्ये ठेवताना सगळ्या सोळा ब्लॉक्समधील एकसष्ठ लोक अंगणात जमले होते. ती सगळी गर्दी बघितल्यावर साठे कुटुंबियांच्या चेहऱ्यावरील चीड स्पष्ट दिसत होती. एरवी एवढी माणसं प्रेमापोटी थोडीच जमली असती? सर्वांना मनातून वाटत असेल की 'चैतन्य' सोसायटीच्या वतीने साठेच 'शहीद' व्हायला निघालाय.

इजा, बिजा आणि तिजा!

खरंच वाईट वाटलं. साठे बिचारा अगदी सीधासाधा, नाकासमोर चालणारा शांत माणूस. त्याच्यावर उगाच वेळ आली!

शेवटी जोशीला राहवलं नाही. आजूबाजूला सेक्रेटरी देशमुख नाही आहे असं बघून तो म्हणाला. ''आता बस् झालं. आपण आपलं त्या हरिभटाकडं जाऊन काय म्हणतो ते करून टाकू. उगाच विषाची परीक्षा नको बघायला?''

सगळ्यांनी माना डोलावल्या. पण तसं कुणाच्याच फारसं मनात नसावं. कारण नियतीनं आपला 'बळी' निवडलाय. आता साठेला वाचवायचं म्हणजे पुन्हा त्याच्या 'जागी' दुसऱ्या कुणाला तरी जावं लागणारंच आणि तो दुसरा कुणी म्हणजे 'मीच' निघालो तर?

प्रत्येकाच्या मनात तीच शंका होती!

•••

हॉस्पिटलमध्ये साठेची 'लोकप्रियता' वाढत चालली होती. ''इजा, बिजा'' ची कथा एव्हाना षटकर्णी झाली होती. त्यामुळे हॉस्पिटलमधील वर्दळ वाढू लागली होती. सेक्रेटरी देशमुख साठे कुटुंबियांना धीर देत होता. एक दोन दिवस जरा काळजीचे गेले पण तिसऱ्या दिवसापासून ताप पूर्णपणे आटोक्यात आला. देशमुख सारखा हॉस्पिटलच्या फेऱ्या करत होताच. पण सोसायटीच्या लोकांना त्याने व्यवस्थित कामे लावून दिली होती. साठेसाठी चहा कुणी आणायचा, जेवणाचा डबा कुणी आणायचा हा सगळा कार्यक्रम व्यवस्थित आखूनच दिला होता. सगळी सोसायटी उभी करण्यात त्याचा सिंहाचा वाटा होता. जमीन खरेदीपासून बिल्डिंग उभी करण्यापर्यंतची सगळी मेहनत त्याचीच होती. बाकीचे सगळे आळशी होते. हा साठे मात्र देशमुखाच्या विश्वासातला होता. त्याचं इंग्रजी-मराठी ड्राफ्टिंग सुरेख होतं. म्हणून देशमुख कॉरस्पॉन्डन्सच्या बाबतीत पूर्ण निर्धास्त होता. आपल्या जे मनात आहे ते शब्दात नेमके साठे लिहायचा. त्यामुळे या साठेवर देशमुखाचा जीव होता. ऑफिस सांभाळून रात्री हॉस्पिटलमध्ये झोपायला तो स्वत:च यायचा. नेहमी नकारात्मक बोलून दुसऱ्याला निरूत्साही करणाऱ्या महाजनला त्याने मुद्दामच दूर ठेवलं होतं. साठे मनानं भित्रा होता. ह्या ''इजा, बिजाच्या'' पार्श्वभूमीने तो आणि त्याचे कुटुंबीय हादरलेत याची देशमुखला कल्पना होती.

पण इतकी काळजी घेऊनही वशा खांदेकरच्या अनपेक्षित आगमनानं निर्माण होणाऱ्या कटकटीची देशमुखलाही कल्पना नव्हती. वशा खांदेकरचं खरं नांव वसंत खांदेपारकर असं होतं; पण लोकांना 'खांदा' देण्यात त्याचा प्रचंड उत्साह बघून त्याचा लौकिक ''वशा'' 'खांदे'कर असा झाला होता. सोसायटीमधले रास्ते, कुलकर्णी गेले तेव्हा सगळी 'व्यवस्था' त्याचीच होती. एरवी सुस्त असणाऱ्या या वशाचे खांदे कुणी

'गेला' म्हटलं की फुरफुरायला लागायचे! लगबगीने सगळं 'सामान' त्वरेने मिळवण्यात त्याचा हातखंडा होता. 'स्मशान सम्राट' म्हणवून घेण्यात त्याला फुशारकी वाटायची. त्याची 'वाणीपण' या त्याच्या 'छंदा'ला शोभेशी होती. येता-जाता दिसेल त्याला आपल्या दंडावर थोपटत या 'समर्थ' खांद्यावरून आपली 'पालखी' केव्हा न्यायची असे विचारत असे. या देशमुखचेच वृद्ध काका संध्याकाळी ढास लागली म्हणून थांबले तेव्हा हा 'वशा' त्यांना आपल्या खांद्यावरून आजवर नव्व्याण्णव लोक 'गेले' आता शंभराव्या 'विकेटची' वाट बघतोय असं सांगत होता! देशमुखच्या काकांना तेव्हा दरदरून घाम फुटला! 'चैतन्य' सोसायटीच्या इजा बिजाची कथा त्या वशाच्या कानावर गेली तेव्हा या सोसायटीवाल्यांचे लौकरच 'तीन तेरा' वाजणार अशी भविष्यवाणी त्यानं उच्चारली होती! कुणी न विचारताच 'तीन तेरा'ची फोड तो स्पष्ट करून सांगत असे. तीन तेरा म्हणजे या सोळा मेंबर्सच्या सोसायटीत 'तीन' जाणार आणि 'तेरा' राहणार!

तेव्हा असा एवंगुणविशिष्ट 'वशा' जेव्हा साठेला भेटायला हॉस्पिटलमध्ये आला तेव्हा साठेचं धाबंच दणाणलं! दातखीळ बसायचीच बाकी होती. चेहरा पांढराफटक पडला. हा वशा आता आपल्याला 'न्यायलाच' आला आहे असाच ग्रह त्याने करून घेतला की काय कोण जाणे? सबंध दिवस कोणाशी बोलला नाही. कोणी आलं की मान फिरवून झोपायचा. घरच्या मंडळींना 'वशा'खांदे'कर प्रकरण माहीत असण्याची शक्यताच नव्हती. त्यामुळे साठेच्या वागण्यातील चमत्कारीकपणा हा त्यामुळे आहे हे त्यांच्या कसे लक्षात येणार? रात्री देशमुख आला तेव्हा सगळा हा प्रकार त्याच्या लक्षात आला. तरीपण साठेनं त्याचा इतका धसका घ्यावा हे त्यालाही नवलच वाटलं. त्यानं जेव्हा खोदून विचारलं तेव्हा साठेकडून कळलेल्या हकीगतीनं त्याला हसू फुटलेच. पण हॉस्पिटलमधील बेडवर झोपलेल्या साठेची पण कीव आली. आजारपणात माणूस किती सैरभैर होतो याची कल्पना आली. गंमत अशी झाली होती की जेव्हा सोसायटीचा बिल्डिंगमधील कुलकर्णी रास्तेच्या पाठोपाठ गेला तेव्हा 'पुढच्या' तयारीसाठी वशा आलेला होता. अंगणात सगळी जमली होती. वशा सराईतपणे काठ्या बांबू जुळवून, पांढरा मांजरपाट त्यात पांघरून तिरडी बांधायच्या तयारीत गुंग होता. मोठ्या उत्साहात त्याचं काम चाललं होतं. अचानक तो अंमळ विचारात पडला. उभ्या असलेल्या पुरूष मंडळींकडं बारकाईनं पहाता त्याची नजर एकदम साठेवर स्थिरावली. काही तरी कोडं सुटल्यासारखा आनंद त्याच्या चेहऱ्यावर पसरला. त्याने पटकन् साठेला जवळ बोलावलं. साठेला वाटलं की काहीतरी ब्लेड, कात्री, काथ्या असलं काही वशाला हवं असेल. पण वशा एकदम म्हणाला-

''अहो साठे, हा गेलेला कुलकर्णी तुमच्याएवढाच उंचीचा असेल ना?''

साठे अभावितपणे म्हणाला ''हो''

''मग प्लीज जरा या तिरडीवर पडून दाखवा ना. म्हणजे मला बांधायला सोपं पडेल.''

तेव्हापासूनच साठेनं वशाचा धसका घेतलेला होता!

देशमुखने बरीच खटपट करून साठेला मूडमध्ये आणलं. त्याला असं कोसळू देणं धोक्याचं आहे असं जाणवून देशमुखनं सरळ दोन दिवस रजा घेतली. केवळ साठेच्या देखभालीसाठी. हॉस्पिटलच्या डॉक्टर्सच्या संमतीने आपल्या नात्यातील दुसऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांना घेऊन आला. साठेबरोबर एकसारखं वावरून त्याला पूर्ण उत्साहात, आनंदात ठेवलं. त्याच्या परिश्रमाला फळ आलं.

साठे आठ दिवसातच डिस्चार्ज मिळून सुखरून परत आला.

साठेला सुखरूप घरी आलेला पाहून सोसायटीत सर्वांनी आनंद झाल्याचं दाखवलं. पण त्यांच्या चेहऱ्याआड लपलेली 'अंदरकी बात' देशमुखला कळली. सर्वांच्या मनावर भीतीची छाया पुन्हा पसरली. अन्न गोड लागेना. साठे मरता मरता वाचला म्हणजे मृत्यूरूपी बकासूराच्या तोंडी जाणारा तिसरा कोण? प्रत्येकजण मनातल्या मनात 'तिसऱ्या' बळीसाठी दुसऱ्याचीच योजना करू लागला! परमेश्वरानं त्याला 'उचलावं' अशी आशा करू लागला.

अशा अनिश्चिततेत दिवस जात होते.

दुसऱ्या बाजूला महाजनने देशमुख आणि बुवा गोसावीखेरीज सर्वांना विश्वासात घेऊन हरिभटाला बोलावून तो म्हणेल तसा आणि तो म्हणेल तितका पैसा खर्च करून शांत करण्याची योजना आखली तारीख नक्की करून सगळीजणं घरी आली.

आणि त्याच रात्री देशमुखच्या घरातून किंकाळी फुटली. देशमुखच्या वृद्ध काकांना हार्ट अॅटॅक आला आणि तडकाफडकी त्यांना मरण आलं.

घरात शोकमग्न होऊन बसलेल्या सर्वांचे 'सुस्कारे' मनातल्या मनात स्पष्टपणे ऐकू आले. झाली ऽऽ एकदाची ''इजा बिजा आणि तिजा.''

बुवा गोसावी तेवढा कपाळावर हात मारत म्हणाला, ''देवा तू पण आजकाल याच लोकांच्या बाजूचा झालास का रे?''

'तिजा' झाल्यानं महाजन आणि मंडळी खुशीनं एकमेकांच्या हातावर टाळी देत असलेली त्याला अंधारातही दिसत होतं.

❖❖❖

# १६. श्रीमंतीचं दुखणं

तसा मी अलीकडेच श्रीमंत झालो. अगदी अचानक. जगात काही गोष्टींची संगतीच लागत नाही. राज्याचा स्वामी असलेला राजा निपुत्रिक मरतो. त्याचा वारस शोधण्यासाठी हत्तीच्या सोंडेमध्ये पुष्पमाला दिली जाते. आणि तो हत्ती गावाबाहेर भटकणाऱ्या पोराला तो हार घालतो. त्याला राजपद मिळतं.

तसं माझं झालं. कोण्या एके काळी आफ्रिकेत गेलेल्या माझ्या चुलत्याची इस्टेट जवळचा एकमेव वारस म्हणून माझ्या हाती आली.

प्रचंड मोठी इस्टेट! म्हणजे नक्की किती ते सांगत नाही. सार्वजनिक सुरक्षिततेच्या कारणासाठी!

गंमत म्हणजे या काकाला, मी काळा की गोरा बघितला नव्हता. आई म्हणते त्यानं मात्र लहानपणी मला खेळवलं होतं. कधीहि बाहेरुन आला की न चुकता माझ्या हातावर खाऊ ठेवत असे.

आणि आता 'जाताना' बिचारा प्रचंड खाऊ ठेवून गेला! आम्ही वाशीकर माणसं आयुष्यात कधी वेशीबाहेर पडलो नाही. आणि आमचा हा काका चक्क आफ्रिकेलाच गेला.

ते काही असो. पण हाताच्या मुठीत न मावणारा हा खाऊ 'सांभाळायचा' कसा याची आता मला चिंता लागली होती.

त्यातच अत्यानंदाच्या पहिल्या ऊर्मीसरशी मी माझ्या धनगौडा वीरगौडा बँकेतील नोकरीचा राजीनामा देऊन आलो होतो; त्यामुळे तर काळजी करण्याचा कालावधी अधिकच वाढला होता! एरवी कामात गुंतलेला असतो म्हणजे अचानक लाभलेल्या या श्रीमंतीची चिंता मला लागली नसती!

हल्ली तर आमच्या घरात लोकांची ये-जा पण वाढली होती. माहीत असलेले, नसलेले अनेक सगे-सोयरे भेटून गेले. समाचाराला यावेत तसे! बायको म्हणते 'असतील शिते तर जमतील भूते' अशातला प्रकार होता. पण मला मात्र ते पटलं नाही. केवळ मी पैसा कसा चांगला 'इन्व्हेस्ट' करावा एवढंच सांगण्यासाठी सारीजणं झटत होती. आलेला

पैसा कसा दुप्पट होईल, तिप्पट होईल ते बिचारी समजावत होती. पण माझा प्रश्न गंभीर होता. दुप्पट, तिप्पट काय, पण हाती आलेला पैसा मुळातच शतपट, सहस्त्रपट होता!

मग आम्ही कुटुंबियांनीच एकत्र बसून हा श्रीमंतीचा अचानक उद्भवलेला 'लाखमोला'चा प्रश्न सोडवण्याचं मनावर घेतलं. ऐकावं जनाचं करावं मनाचं हेच खरं. आमचं शांत जीवन किती सुखात चाललं होतं. हा काका कुठून मध्येच उपटला?

प्रथम आम्ही ठरवलं की गावाबाहेर एक छान प्रासादतुल्य असा एक मोठ्ठाऽऽ बंगला बांधायचा. भोवतीनं प्रचंड मोठी बाग. जमलं तर ते फार्म हाऊस, ग्रीन हाऊस म्हणतात तसं. किमान तीन-चार तरी गाड्या राहतील एवढं मोठं गॅरेज. बंगल्याच्या प्रवेशदाराशी रखवालदारासाठी, पॅगोडासाठी बांधतात तशी पर्णकुटी. सर्वत्र लॉन, कारंजी यांची लयलूट. बंगल्याकडं येणारा रस्ता दुतर्फा फुलझाडांनी मढवून टाकायचा. बागेत आंबा, चिकू, पेरु, नारळ, पपया अशा झाडांची लयलूट करायची. बायकोनं तेवढ्यात कढीलिंबाचं नाव सुचवलं! नेहेमीच स्वैपाकात लागणारा पदार्थ. उगाच तेवढ्यासाठी शेजारी-पाजारी जाऊन तोंड वेंगाडायला नको! व्यावहारिक विचार!

घराला नाव द्यायचं ठरलं ''काकस्मृती.'' त्या दयाळू काकाची आठवण आम्ही नाही ठेवायची तर कुणी ठेवायची?

पण लालचुटुक गुलमोहराच्या सावलीत बसून चहाचे घुटके घेत बसण्याचं स्वप्न सहजासहजी साकार होण्याचं लक्षण दिसेना. आम्हाला पसंत असलेली जागा, त्यातील कायदेशीर अडचणी, प्लॅनची मंजूरी, प्रत्यक्ष बांधकाम या सर्व कामात बराच वेळ जाणारसे दिसायला लागले. आणि आम्हाला तर लौकरात लौकर श्रीमंत व्हायची घाई होती!

आमच्या चलाख इस्टेट डेव्हलपरच्या लक्षात ही गोष्ट आली. मग त्यानंच एक आयडिया लढविली. तो म्हणाला की साहेब, इथल्या पॉश, एकदम पॉश वस्तीत त्याच्या एका कस्टमरचा एक आलिशान फ्लॅट आहे; तो कस्टमर सध्या सिंगापूरला आहे. सहा महिने तरी फ्लॅट रिकामा आहे. फर्निचरसह वेल-फर्निश्ड फ्लॅट मला राहायला मिळेल. तोपर्यंत बंगल्याचं काम मार्गी लागेल. फ्लॅटचं भाडं तसं फार नाही. सध्याच्या मार्केट-रेटप्रमाणे अवघे महिना पंधरा हजार! नोकरीत असताना माझी मासिक आमदनीची उलाढाल होती सहा-सात हजाराची! फ्लॅटचं भाडं ऐकून माझी छाती पाव इंचसुद्धा दडपली नाही. माझी छाती आता माझी नव्हतीच. ती होती काकाची!

एका सुमुहूर्तावर आम्ही फ्लॅटमध्ये शिफ्ट केलं. आता बिऱ्हाड केलं म्हणायचं नाही. आता आपला 'कल्चर' बदलायला हवा. फ्लॅट आणि त्यातील फर्निचर बघून मात्र आम्ही चाट पडलो. बाथरुम-सिंकमध्ये चकचकीत, इतके प्रचंड संख्येने असलेले स्टीलचे नळ मी प्रथमच पाहात होतो. एकातून गरमागरम पाणी तर दुसऱ्या नळातून गार पाणी.

सुरुवातीला या वेगवेगळ्या नळांचे उपयोगच मला कळेनात. वॉश बेसिनचा नळ उघडला रे उघडला की धबधबाच अंगावर कोसळावा इतक्या फोर्सने पाणी अंगावर यायचं. आम्ही सगळ्यांनीच लहान मुलासारखे अंगावरचे कपडे भिजवून घेतले! गुबगुबीत सोफा, बेडस्, एअर कंडीशनर असं सगळं बघून मला हिंदी सिरीअल्समधील चकचकीत घरं आठवायची; आणि अशा घरातून आपण राहायचं? अंगावर काटाच आला. फ्लॅटला दारं आणि खिडक्या इतक्या होत्या की एकसारखं भन्नाट वारं यायचं; पहिल्या दोन-चार दिवसातच बायकोला थंडी बाधली. फटाफट शिंका येऊ लागल्या. कुणी कौतुकानं घर बघायला आलेल्या माणसाशी बोलण्यासाठी तोंड उघडावं तर नाकच 'बोलू' लागायचं. एक खट्याळ आत्या म्हणाली.

''अरे तिला सर्दी होणारंच रे. श्रीमंतीची तिला सवयच नाही. कोंदट चाळीतून रहायची सवय होती ना तिला?''

ती डिवचून बोलली खरी. पण ते खरं होतं. श्रीमंतीची सुद्धा सवय असावी लागते. नुसतं श्रीमंत असून भागत नाही. श्रीमंत दिसावंहि लागतं!

आणि 'ह्या' मुद्यावर तर आम्ही चांगलाच मार खात होतो!

आम्ही सर्वजण एकजात टार काळे होतो. काळे म्हणजे अगदीच काळेकुट्ट होतो. त्यात पुन्हा काटकुळे होतो. एकाच्या अंगावर मूठभर मांस असेल तर शपथ. आरशात बघायची आमची आम्हालाच भीती वाटायची. काळ्या चेहऱ्यावर फेस पावडर लावली की सांगली कोल्हापूरकडचे खारे शेंगदाणे कसे दिसतात तसे आम्ही दिसायचो. एरवी या काळेपणाचे आम्हाला एवढं वाईट वाटलं नसतं. पण या पॉश सोसायटीतील सगळेच्या सगळे गोरेपान होते. कुठलाशा एका गेट-टुगेदरला आम्ही जमलो तेव्हा तर एखाद्या राजहंसांच्या कळपात कावळ्याची पिले सापडावीत तसे आम्ही दिसत होतो! सगळ्यांनाच ते जाणवत असावं म्हणून काही तरी थाप मारुन मी आमच्या सगळ्या फौजा काढून घेतल्या! सरळ घरी आलो.

हा न्यूनगंड आम्हांला फारच जाणवू लागला. आणि आम्ही त्या सोसायटीत राहायला गेलो तेव्हा तर समारंभांना उत आला होता. सोसायटीची निवडणूक, सोसायटीचा 'ॲन्युअल डे'- फंक्शन, रोझ डे, असे अनेक सामुदायिक स्वरुपाचे समारंभ हटकून त्याच वेळी आले. आणि इच्छा नसतानासुद्धा, सोशल एटीकेटस् म्हणून मला आमची 'शोभायात्रा' काढावी लागली. बायको तर फारच वैतागून गेली होती. सोसायटीत हळदीकुंकुवासारख्या, संक्रांतीसारख्या निमित्तानं कुणी बोलावलं तरी तिच्या अंगावर काटा यायचा! एखाद्या चॅरिटी शोची तिकिटे आपण मोठ्या धनिकांच्या गळ्यात बांधतो. पण बडी माणसं कशाला येतात चॅरिटी शोला? ती मंडळी आपले मुनीमजी, दिवाणजी,

नाही तर गडी-माणसं यांना आपली तिकिटं देऊन टाकतात. तशी कुणाची तर्रा तिकिटं घेऊन आल्यासारखे आम्ही त्या सोसायटीत दिसत होतो. आमच्या श्रीमंतीचे 'मूळ' कळल्यावर काळ्या आफ्रिकेतील काळ्या खाणीतील माणसं असं त्या सोसायटीतील मंडळी आमच्या माघारी चिंडवायची. आमचा काका म्हणे हिऱ्यांच्या खाणीत काम करायचा! कुणा टारगट मुलांनी तर आमच्या दारावर 'आफ्रिकेचे हायकमिशनर' असं लिहून ठेवलं होतं!

आमच्या या न्यूनगंडाची आम्हाला प्रखरतेने जाणीव झाली ती मारुती कारची चौकशी करताना. मी चुकून सोसायटीत कानविंदे यांजकडे त्यानी नवीनच घेतलेली मारुती-८०० बघताना एखादी कार घ्यायचा विचार बोलून दाखवला होता. एका सकाळी एक रुबाबदार माणूस आमच्याकडे आला.

''कानविंदेसाहेब म्हणत होते तुम्हाला गाडी घ्यायचीय म्हणून.'' माझ्याकडे आपादमस्तक न्याहाळत तो म्हणाला. एकूण त्याला ही गोष्ट फारशी विश्वसनीय वाटली नसावी!

मी चाचरत चाचरत हो म्हटलं. मग त्यानं आम्हाला तयार राहायला सांगितलन. एका गोल्डन कलरच्या ए.सी. कारमधून त्यानं आम्हाला त्यांच्या शो-रुमकडे नेलं. तो स्वत: इतका रुबाबदार होता की एखादा श्रीमंत, आपल्या नोकर-चाकरांना आणि त्यांच्या बायका-मुलांना फिरवून आणत आहे असंच वाटत होतं! आम्हाला धड दार लावता येत नव्हतं की गाडीच्या काचा लावता येत नव्हत्या. त्यांच्या मिटींग हॉलमध्ये एजंटस् अशी काही गाड्यांची नावं सांगत होता की जी नावं आमच्या कानांवरुनहि गेली नव्हती! गाड्यांविषयीची आमची प्राथमिक माहितीच अगदी तुटपुंजी होती. गाड्यांचे एवढे प्रकार असतात हेच मुळी आमच्या गावी नव्हतं! काही तरी थातूर-मातूर बोलून आम्ही परतलो.

दुपारी झोपून उठतोय तो पुन्हा आणखी एक एजंट आला. मनात धडकी भरली. म्हटलं, हा काही आणखी गाड्या-विमानं वगैरे दाखवायला नेतोय की काय?

''मला कानविंदेसाहेबांनी पाठवलंय. आपल्याला काही गुंतवणूक वगैरे करायची आहे ना? माझ्याकडं काही सेफ स्कीमस् आहेत. शेअर्स-डिबेंचर्स, एफ.डी.साठी काही करायचं असेल तर सांगा.''

त्याचा स्वर अगदी आर्जवी होता. त्याची पर्सनॅलिटी एवढी रुबाबदार होती की त्याला जा म्हणवेना. आणि एकदा संभाषण सुरु झाल्यावर त्याच्याविषयी इतका विश्वास वाटायला लागला की बोलण्याच्या भरात काका, त्यांची मिळालेली इस्टेट याविषयी मी मोकळेपणानं बोललो. पण सगळं काही ऐकून मला तर साऱ्या श्रीमंतांची कीव यायला

लागली. पंचवीस-तीस लाखांच्या इस्टेटीवर भरावा लागणारा दहा-बारा लाखाचा टॅक्स ऐकूनच माझी छाती दडपली. नवीन नियमांनुसार इस्टेटीवरचा वेल्थ टॅक्ससुद्धा मलाच भरावा लागणार होता म्हणे! फार काळजीपूर्वक गुंतवणूक करायला हवी होती.

बायको नंतर म्हणाली की ''बघा हं. कुणाला तरी आणखी विचारुन मग कुठं पैसा गुंतवायचा तो बघा. नाही तर काय म्हणतात ती इन्कमटॅक्सची धाड-बीड आपल्यामागं लागायची.''

एकंदरीत श्रीमंती कठीण असते तर!

त्यानंतर दोन दिवसातली गोष्ट.

मी घरात एकटाच होतो. सगळीजणं काही ना काही कारणानं बाहेर गेली होती. डोअर बेल वाजली म्हणून दरवाजा उघडला. दारात तिघे धटिंगण होते. माझ्या अंगावरुनच ते घरात शिरले आणि सोफ्यावर जाऊन बसले. मी प्रश्नार्थक नजरेने बघत राहिलो.

''सायेब, रहायला येऊन किती दिस झालं?''

''आँ?''

''ह्यो बघा. आम्ही गुंडुदादाची माणसं. इथं आमची खंडणी दिल्याशिवाय कुणीच राहू शकत नाही.''

''म्हणजे?''

''म्हणजे असं की या बड्या घरातून राहायचं म्हणजे आधी आमच्याम्होरं देवाला ठेवतात तसा 'नैवेद्य' ठेवावा लागतो. मग तुम्ही बिनधास्त राहा. कुणी चोर येणार नाही, कुणी तुमची गाडी पळवणार नाही की तुमच्या पोराबाळांच्या अंगाला हात लावणार नाही.''

''पऽऽण, पण किती द्यायचे?''

''धंदा काय तुमचा?''

आता मी काहीच करत नाही. अपघातानं काकाचा पैसा मला मिळालाय वगैरे सांगावं का? त्यातलं त्यांना किती पटेल? मग खंडणी किती मागतील? अशा प्रश्नांच्या संभ्रमात मी पडलो होतो.

तेवढ्यात डोअर-बेल पुन्हा वाजली. मला हायसं वाटलं!

बायको आली होती. घरात बाईमाणूस आलं म्हणून त्या धटिंगणांच्या चेहेऱ्यावर यत्किंचितहि चलबिचल नव्हती. मीच आवरतं घ्यावं म्हणून म्हटलं,

''काय तुमचं असेल तसं सांगा. मी विचारं करेन.''

''विचार-बिचार काही करायचा नसतो. आम्ही म्हणू ते गुमान द्यायचं असतंय. पुढच्या महिन्यात गुंडुदादाला इचारुन येतो. काय घ्यायचं, काय न्हाई ते प्रत्येकाचा धंदापाणी बघून त्योच ठरवतय.''

असं म्हणून ते उठले. मी दार लावून घ्यायला गेलो तेव्हा ते म्हणाले, ''उगाच पोलिसात कळवायला जाल तर फुकट मराल. समदीकडं आमची मानसं असत्यात.''

बायको विचारायला लागली तेव्हा मी आधी डबडबलेला घाम पुसला. घोटभर पाणी प्यालो आणि सगळा प्रकार तिला सांगितला.

ही फुकटची श्रीमंती आता अंगाशी यायला लागली.

प्रकार हतबुद्ध करणारा होता. चाळीत होतो तेव्हा पेपरमधल्या बातमीवरून असलं काही कानावर यायचं. आता काहीतरी विचार करायला हवा. पण नेमकं काय करायचं ते कळत नव्हतं. आम्ही दोघांनी ठरवलं की घरात काही वाच्यता करायची नाही. ते धटिंगण पुढच्या महिन्यात येतो म्हणालेत म्हणजे अजून 'मरण' लांब आहे.

दुसरे दिवशी डोअरबेल वाजली तसा मी मनातून घाबरलो. वरकरणी तसं न दाखवता मी दार उघडलं.

दारात पोस्टमन उभा होता. जुन्या घरी जाऊन शोधत शोधत इकडे आला होता.

आफ्रिकन कॉन्स्यूलेटकडून पत्र होतं. काकांनी ठेवलेल्या रकमेत आणखीन् थोडीशी वाढ झाली होती. रूपया-पौंडांचे विनिमय दरात फेरफार झाल्यामुळे. मला काही कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी मुंबईला बोलावलं होतं.

काका आमच्या राशीलाच बसला होता!

मी आणि बायको मुंबईला गेलो. एरवी आम्ही एखाद्या उंची हॉटेलात उतरून जिवाची मुंबई केली असती. पण आता सगळी चवच गेली होती. या श्रीमंतीचं ओझं, श्रीमंतीचा विळखा केव्हा सुटेल असं आम्हाला झालं होतं. आम्ही चाळीत राहणाऱ्या बापूमामांकडे उतरलो. बापूमामा मोठे स्वच्छ मनाचे आणि निरपेक्ष बुद्धीचे होते. आपली नोकरी इमाने इतबारे करत, बरंच काही सामाजिक कार्य करीत. एका अनाथाश्रमात कोणतेहि मानधन न घेता, वर्षानुवर्षे ते सेक्रेटरी म्हणून काम करत होते. मुंबईत त्यांच्या नावाला मान होता. सर्वत्र त्यांच्या शब्दाला किंमत होती. आम्हाला अचानक लाभलेल्या श्रीमंतीची त्यांना काहीच कल्पना नव्हती. आफ्रिकन वकिलातीमधलं काम झाल्यावर

आम्ही घरी आलो. रात्री बापूमामांना सगळं सांगावं आणि त्यांचा सल्ला घ्यावा असं आम्ही दोघांनी ठरविलं होतं. पण रात्री बापूमामांना घरी यायला खूप उशीर झाला. त्यांच्या अनाथाश्रमात कसला तरी समारंभ होता. ते म्हणाले म्हणून आम्ही दोघं आश्रम बघायला गेलो.

आम्ही आश्रमात गेलो तेव्हा प्रवेशद्वाराशीच गडबड उडालेली होती. एक छोटं अर्भक आश्रमाच्या दाराशीच कुणी तरी पहाटेच आणून ठेवलं होतं. नुकतंच जन्मलेलं असावं. मिटलेले डोळे, वळलेल्या मुठी, लालसर चेहरा असं त्याचं रूप मोठं गोंडस दिसत होतं. अनैतिक संबंधातून जन्मलेलं मूल कुणा तरी कुमारिकेने समाजाच्या भीतीने आणून टाकलं होतं. अशी अनेक छोटी अर्भकं, लहान मुलांच्या वॉर्डात आम्ही बघितली. बापूमामा म्हणाले तसं अशी अनेक अनाथ बालके असतील जी आश्रमांपर्यंत पोचू न शकल्यामुळे या जगात आल्या आल्याच त्यांना देवाघरी जावं लागत असेल. अशा तीनशे-चारशे अनाथ मुलांचं संगोपन, शिक्षण आश्रमात केलं जात होतं. नवऱ्यानं टाकलेल्या, आई-बाप वा अन्य कुणाचाच आधार नसलेल्या, निराधार स्त्रियांना या आश्रमाचाच आधार होता. इथली बरीचशी कामे त्याच करीत होत्या. समारंभासाठी आलेल्या पाहुण्यांना बापूमामा सांगत होते की अशा सर्व निराधार बालकांना, स्त्रियांना, वृद्धांना आश्रमात आश्रय द्यावासा वाटतो; पण पैशाच्या कमतरतेमुळे मनात अतीव इच्छा असूनही काही करता येत नाही. समारंभात पाहुण्यांनी स्वत: देणगी जाहीर केलीच पण भाषणात कळकळीचे आवाहन केले की समाजातील प्रत्येकाने आपल्याजवळ आहे त्यातील थोडं तरी अशा सेवाभावी संस्थांना दिलं पाहिजे.

नेमकं त्याचवेळी माझं लक्ष बायकोकडं गेलं. ती पण माझ्याकडेच बघत होती. दोघांच्याहि मनातले विचार आम्हा उभयतांना एकाच वेळी कळाले.

आश्रमातील एकेकीच्या करूण कहाण्या ऐकता ऐकता आमचा पाय निघत नव्हता. लहान लहान मुलं घट्ट बोट धरून विचारत, 'काका आम्ही येऊ का तुमच्याबरोबर?'

समारंभावरून येताना आम्ही एका हॉटेलात थांबलो. खूप विचार केला. बापूमामांना यायला थोडा उशीर होणार होता. आमचा विचार पक्का झाला.

रात्री जेवणं झाल्यावर, बापूकाकांना निवांतपणे सगळी, अथपासून इतिपर्यंत, इत्यंभूत हकीगत सांगितली. काकाकडून मिळालेली सगळी इस्टेट आश्रमाला देणगीदाखल देण्याचे ठरविले असल्याचं सांगितले. तेव्हा ते थोडे विचारात पडले. म्हणाले की असं भावनेच्या भरात काही ठरवू नका. वाटल्यास दोन दिवस राहून पुन्हा विचार करा.

आम्ही त्यांच्या आग्रहाखातर दोन दिवस राहिलो. आमचा विचार ठाम होता.

आणि कुणाला विचारायचे नव्हतेच. आई तर म्हणत होती की त्या काकाने पैसा कसा मिळवला असेल कोण जाणे. त्याचे लक्षण काही ठीक दिसत नव्हते. नकोच तो पैसा आपल्याला. बापूमामांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून चर्चा केली. पण आमचा निश्चय ठाम होता. शेवटी बापूमामाच म्हणाले,

'त्या काकाच्या पैशाचा अगदीच अनादर केला असं होऊ नये म्हणून आता विनिमयाचा दर वाढले म्हणून जे काल पाच लाख रूपये तुम्हाला मिळाले ते तुम्ही काकाचा आदर म्हणून मुलांच्या शिक्षणासाठी ठेवा आणि बाकीचे पंचवीस लाख आश्रमाला द्या. मी सॉलिसिटरना घेऊन येतो आणि मग सगळ्या कागदपत्रांची पूर्तता करू. म्हणजे तुला पंचवीस लाख मिळाले असं गावात जे सगळ्यांना माहीत झालंय ते सगळेच्या सगळे दान केले असे सगळ्यांना कळेल. कालच्या पाच लाखाचे कुणाला माहीत नाही ते इथल्याच बँकेत फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवा म्हणजे झालं.'

आम्हाला पटलं. आम्ही मान डोलावली.

•••

आज मी सुखात आहे. जिकडे-तिकडे माझे वर्तमानपत्रात फोटो येत आहेत. रकानेच्या रकाने भरून कौतुक होत आहे. पुन्हा आम्ही आमच्या 'स्वगृही' परतलो आहोत. आमची बँक 'देणगी' दिल्याशिवाय कुणाला नोकरीवर घेत नाही. मला संचालकानी सन्मानाने परत नोकरीवर घेतलं.

आता गुंडुदादाच्या मवाल्यांची मला भीती वाटत नाही!

श्रीमंती गेल्यामुळं सुखात असणारा या जगातील मी कदाचित् पहिलाच मानव असेन!

❖❖❖

# १७. बॉम्बस्फोट

आमच्या ऑफिसात संगीतप्रेमी मित्रांचा एक खास ग्रुप आहे. मुंबईच्या गजबजाटापासून दूर कुठं तरी शांत, निसर्गरम्य ठिकाणी तीन-चार महिन्यांतून जायचं, कुणा कलाकाराचं मनसोक्त गायन ऐकायचं, मस्तपैकी जेवणखाण करून भटकंती करायची, चांगलं ताजंतवानं होऊन परतायचं असा आमचा नेहेमीचा रिवाज होता. कधी खंडाळा, कधी लोणावळा, कधी कर्नाळा तर कधी एखाद्याच्या फार्म-हाऊसवर. यंदा आम्ही अलिबागजवळच्या किहिमच्या समुद्रकिनारी जमायचं ठरविलं होतं. शनिवारी हाफ-डे. दुपारी लवकरच बाहेर पडून आम्ही दादरला एकत्र जमलो आणि स्पेशल बसने निघालो. गायक कलाकार आणि त्याच्या साथीदारांना घेऊन बाकीचे दोघेजण मागाहून येणार होते. रात्री आठच्या सुमारास आम्ही किहिमला पोचलो. किनाऱ्याजवळ एक नारळी-पोफळींनी बहरलेली वाडी होती. अंगणात एक छोटेखानी बैठक सजवली होती. अजून जेवायला वेळ होता. शेजारीच असणाऱ्या सागरांच्या लाटांचा घोंघावणारा आवाज खुणावत होता. बसमध्ये बसून प्रवासात अवघडलेले पाय वाळूत जरा मोकळे करावेत म्हणून आम्ही मित्रमंडळी समुद्राकडे निघालो. पाच-दहा पावलं गेलो तेवढ्यात वाडीचे मालक, गावचे सरपंच वगैरे काही प्रतिष्ठित मंडळी भेटली.

त्यात जगन म्हात्रे होता.

त्याला बघून मी आनंदलोच. तो पण सुखावला. आम्ही दोघे वर्गमित्र. एकेकाळी आम्हा दोघांची मैत्री हा सर्वांच्या कुतूहलाचा विषय होता. कारण मी स्कॉलर तर तो सर्व खेळांचा राजा. मनाने एकदम सरळ आणि निष्कपटी. त्याच्या याच स्वभावामुळे तो मला इतरांपेक्षा प्रिय होता. तसे आम्ही दोन वर्षेच एकत्र होतो. मी आणि जगन गप्पा मारत एका कातळाशेजारी बसलो. तो कस्टममध्ये होता. त्याचं पोस्टींग सध्या या भागात होतं. मुंबईला ऑफिसच्या कामासाठी आला तर कधी कधी भेट होई. नेहमी खळखळून बोलणारा जगन आज मात्र गंभीर वाटत होता. आमची बरोबरची मित्रमंडळी परतायला लागली तसा मी पण उठलो. जगन गाण्याला यायला तयार नव्हता. सहज फिरत फिरत आला होता. तो परतला. अचानक वळला. त्याने विचारलं.

''मुंबईला केव्हा परतणार आहात?''

मी म्हटलं ''सकाळीच. बहुतेक आठपर्यंत निघूच. पहाटेपर्यंत कार्यक्रम होईल. सकाळी जरा समुद्रावर भटकू. चहा-पाणी झालं की लगेच निघू. म्हणजे दुपारी जेवण करुन रात्रीच्या जागरणाची झोप काढता येईल. का रे? तुला यायचंय का मुंबईला? गाडीत तशी जागा आहे.''

''नाही रे. मला यायचं नाही. पण थोडं काम होतं. सकाळीच येईन.''

त्याने निरोप घेतला. मित्रमंडळींना गाठण्यासाठी मी झपाझपा पावलं उचलली.

•••

रात्री छान सोलकढीचे आणि फणसाच्या भाजीचे जेवण झालं. नंतर गाण्याचा कार्यक्रम पहाटेपर्यंत रंगला. विशेष नाव नसलेला पण चांगल्या तयारीचा असा एक उत्तर हिंदुस्थानी गायक होता. समुद्रकाठचा रम्य परिसर. शांत वातावरण. निवडक पण दर्दी श्रोते. त्यामुळे गायक स्वत: रंगून गेला. यमन-कल्याणचा ख्याल, पिलूमधली ठुमरी, मध्यरात्रीनंतर मालकंसचा बडा ख्याल गाताना त्याने सर्वांना मंत्रमुग्ध करुन टाकले. पहाटे भैरवी झाल्यावर आम्ही सर्वजण समुद्रकिनाऱ्यावर गेलो. किनाऱ्यावर वाळूत बसलो. थंडगार वारं सुटलं होतं. झुंजूमुंजू होतं, त्यावेळच्या अर्ध्यामुर्ध्या उजेडात समोरच मुंबई दिसत होती. 'ताजमहाल' हॉटेल आणि आजूबाजूचा परिसर दिसत होता. त्या प्रसन्न वातावरणात त्या गायकाला अचानक सुरसुरी आली. साथसंगत नसताना एकदम धीरगंभीर आवाजात तो अहिर भैरवाचे स्वर आळवू लागला. खूप मजा आली. मी तर जगनला विसरुनच गेलो होतो.

पण जगन विसरला नव्हता!

आम्ही चहा घेत होतो तेव्हा तो आला. आम्ही गप्पा मारत एका कोपऱ्यावर आलो. तेव्हा आजूबाजूला कोणी नव्हतं. जगनने माझ्या हातात एक काळी ब्रीफकेस दिली. म्हणाला,

''या ब्रीफकेसमध्ये काही महत्त्वाच्या वस्तू-कागदपत्रे आहेत. घरी कोणी नाही. बायका-मुलं माहेरी गेलीत. माझी ड्युटी लागलीय बाहेरगावला. सात-आठ दिवसात मीच मुंबईला येईन तेव्हा ब्रीफकेस घेऊन जाईन.'' इतकं बोलून तो झपाझपा गेलासुद्धा. जाताना ब्रीफकेस जपण्याबद्दल पुन्हा सांगून गेला. क्षणभर मी चक्रावलोच. काहीतरी खुलासेवजा मी विचारायला हवं होतं. पण बहुदा रात्रीच्या जागरणानं मेंदू सुस्त झाला होता. आणि अंग पार आंबून गेलं होतं.

बसचा ड्रायव्हर हॉर्न देत होता.

•••

मुंबईला परतल्यावर प्रथम कुठली गोष्ट केली असेल तर ती म्हणजे जगनची ब्रीफकेस व्यवस्थित गोदरेजच्या कपाटात बायकोला बजावून ठेवून दिली.

रोजचं रुटीन चालू झालं. तीन-चार दिवस गेले.

दुपारी तीन वाजता चहाचा ट्रे आला. चहा बनवत होतो तेवढ्यात प्रचंड मोठा आवाज आला. ऑफिस एअर कंडिशन असल्याने बाहेरचा आवाज सहसा येत नाही. ऑफिसात एवढा मोठा आवाज आला म्हणजे काही वेगळाच प्रकार असावा असे वाटले. प्युनने पटापट लॉक असलेल्या खिडक्या चाव्या लावून उघडल्या. नरीमन पॉईंट, कफ परेड वगैरे मुंबईच्या अुत्तर भागातून आकाशात धुळीचे लोट उठलेले दिसत होते. बाहेर रस्त्यावर हलकल्लोळ माजला होता. लोक रस्त्याने भयभीत होऊन सैरावैरा धावत होते. ज्यांना रस्त्यावरुन धुराचे लोट दिसत नव्हते त्याना भूकंपाचाच धक्का वाटला असावा. भराभर ऑफिसेसमधून लोक रस्त्यावर धावत होते. तेवढ्यात कानठळ्या बसवणारा आणखी एक प्रचंड आवाज ऐकू आला. घाबरुन सर्व खिडक्या पटापट बंद झाल्या. आमच्या ऑफिसातील इमर्जन्सी बेल वाजली. पाठोपाठ माईकवरुन 'हॅलो, हॅलो' असा आवाज आला. ही बेल आणि माईक सिस्टीम आमच्या ऑफिसच्या सर्व म्हणजे पंचवीस मजल्यांवर एकाच वेळेस वाजत असे. अनौउन्समेंटवरुन कळलं की मुंबईत एकापाठोपाठ एक सात-आठ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले असून सुरक्षितता म्हणून ऑफिस खाली करण्यात येत आहे. सर्व लिफ्टस् बंद असून सर्वानी शांतपणे दोन्ही बाजूच्या स्टेअरकेसवरून खाली जावे. प्रत्येक मजल्याच्या मार्शलने आधी लेडिज आणि पेशंट असलेल्या स्टाफला जाऊ द्यावे. थोड्याच वेळांत आम्ही सर्वजण रस्त्यावर आलो. पोलीस व्हॅन्स, सायरनच्या गाड्या धावत होत्या. पाठोपाठ अॅम्ब्युलन्सेस, खाजगी गाड्या धावत होत्या. सर्व वाहनांतून रक्ताळलेले मानवी देह हॉस्पिटल्स्कडे नेण्यात येत होते. काही टॅक्सीज आणि खाजगी गाड्यांमधून हात तुटलेले, पाय तुटलेले देह, दारे अुघडी ठेवूनच नेण्यात येत होते; कारण एका वेळी अॅम्ब्युलन्सेस् तरी किती मिळणार? फोर्टमधली सर्व कार्यालये बंद झाली होती. घरी जाण्यासाठी प्रत्येकाची धावपळ चालू होती. पण जायचं कसं? बसेस्, टॅक्सीज, लोकलगाड्या सगळीकडे माणसांची मुंग्यांसारखी रांग लागली होती.

वरळीच्या भागात बॉम्बस्फोट होत असल्याच्या बातम्या ऐकून तर मी हबकलोच.

माझ्या बायकोचं ऑफिस वरळी नाक्यावर होतं. परीक्षा तोंडावर आल्यानं दोन्ही मुलं घरीच अभ्यास करत होती. आम्ही राहात असलेल्या प्रभादेवी भागांत खूप गडबड असल्याच्या बातम्या होत्या. अफवांना ऊत आला होता. बस, लोकल कुठंहि बॉम्बस्फोट होण्याची शक्यता होती. सुदैवाने मी तीन चार तासानंतर का होईना पण सुखरूप घरी पोचलो. बायको-मुलांना घरी पाहून आनंदलोच. पण हा आनंद किती क्षुद्र, स्वार्थी होता ते दुसऱ्या दिवशी उमगले. कारण किती तरी मित्रमंडळी, नातेवाईक बॉम्बस्फोटात सापडून ठार झाली होती. सगळं वाचून अस्वस्थ, उदासीन वाटत होतं. इतकं की आपण जिवंत असल्याची शरम वाटू लागली!

•••

पुढील पाच-सहा दिवस याच अस्वस्थतेत गेले. रोजचे दैनंदिन व्यवहार कसे तरी चालू होते. पहिले दोन-तीन दिवस कर्फ्यू होती. साधं दूध आणणं हे सुद्धा मोठ्या जोखमीचे काम वाटत होतं! कोणत्या क्षणी काय होईल याची टांगती तलवारच प्रत्येक मुंबईकराच्या डोक्यावर होती. जागोजागी दंगे उसळलेले होते. भयानक बातम्या कानांवर पडत. मुंबईत अनेक स्फोटके आली आहेत. कोणत्याहि क्षणी स्फोटकांची मालिका पुन्हा सुरु होईल. अनोळखी बॅगा, पिशव्या, गाठोडी वगैरे कुठल्याहि वस्तूला हात लावू नका अशा सूचना सर्वत्र- रेडिओ, टी.व्ही; स्टेशन्स अशा ठिकाणी दिल्या जात होत्या. कधी न ऐकलेल्या आर.डी. एक्सचं नाव सतत कानांवर आदळत होतं. एका रात्री बायको म्हणाली, ''सारखं टी.व्ही.वर तेच तेच ऐकून कंटाळा आलाय. चला गच्चीत जरा वाऱ्याला जाऊन बसू या.'' मला पण कल्पना आवडली. बायको जरा गंभीर वाटत होती. गच्चीत गेल्या गेल्या तिनं विचारलं,

''तुमचा तो जगन म्हात्रे कस्टममध्ये नोकरीला असतो ना?''

''हो, पण आत्ताच त्याची का आठवण झाली?''

''रोजचा पेपर वाचता ना?''

''??''

''तुमच्या रायगड जिल्ह्यातूनच, समुद्रमार्गाने आर.डी.एक्स. वगैरे स्फोटके मुंबईत येत आहेत ते वाचलंत ना?''

''बरं मग?'' अजून माझ्या डोक्यात काही प्रकाश पडला नव्हता.

''अहो, त्या अतिरेक्यांना कस्टमवाल्यांची साथ आहे. काही कस्टमचे ऑफिसर्स

पकडले आहेत ते वाचताय ना? त्या जगननं कसली ब्रीफकेस दिली आहे?''

ब्रीफकेसची आठवण झाल्यावर मला एकदम दरदरून घाम फुटला! म्हणजे त्यात काही काळंबेरं तर नसेल ना?

''तो जगन केव्हा येतो म्हणाला होता?''

''येईन पुढच्या सात आठ दिवसात असं म्हणाला होता.''

''मग आता किहिमहून तुम्ही परत आलात त्यालाच दहा दिवस झाले. अजून त्याचा पत्ता नाही.''

माझ्याकडे काही उत्तर नव्हतं.

''तुमचा नेहमीचाच बावळटपणा नडतो. पटकन मागचापुढचा विचार न करता कोणावरहि विश्वास ठेवता. आणि नसती ब्याद मागे लावून घेता. आता सांगा त्या काळ्या बॅगेत सोन्याची बिस्किटं आहेत, नोटांच्या थप्प्या आहेत का आर.डी.एक्ससारखी स्फोटकं आहेत? निदान ब्रीफकेस घेताना नीट विचारून तरी घ्यायचं.'' एवढ्या घाईनं माझ्याकडं का देतोस? मी नसतो भेटलो तर काय करणार होतास? त्याने आपली दिली ब्रीफकेस आणि भोटमामासारखी घेतलीत लगेच.''

खरंच, माझ्या हातून बावळटपणाच झाला. बायको जरा रागात बोलली पण खरं बोलली. आपण भेटलोच नसतो तर जगननं काय केलं असतं? निदान त्या ब्रीफकेसमध्ये काय आहे हे विचारण्याचा शहाणपणा तरी दाखवायला हवा होता. माझ्या हातून अनेकदा असा बावळटपणा झालेला आहे. बायको म्हणते ते काही खोटं नाही. दर खेपेला माझाच 'वापर' कसा होतो ते कळत नाही. आता हा जगन माझा बालमित्र. प्रामाणिक आणि सालस अशी सर्वांच्या मनात त्याची प्रतिमा होती. तीच माझ्या डोक्यात ठसली होती. पण नंतर तो वृत्तीने बदलू शकतो असा विचार माझ्या मनात कधी आलाच नाही. आता तो कस्टममध्ये नोकरीला आहे ही गोष्ट सुद्धा आत्ता माझ्या नीट ध्यानात आली! खरं म्हणजे बायकोनं आणून दिली! रायगड जिल्हा, स्मगलर मंडळींचे नंदनवन, त्यांचे आणि कस्टमवाल्यांचे संबंध यावर वर्तमानपत्रांतून रकानेच्या रकाने भरून बातमीपत्रे बघून मी हादरलोच.

मी आणि बायकोने बराच विचार केला. मित्रांची मदत घ्यावी का? पोलिसाना भेटावं का? का ही ब्रीफकेस कुठंतरी फेकून 'मोकळं' व्हावं? अशा अनेक पर्यायांचा विचार केला. पण सगळ्याच गोष्टी धोक्याच्या होत्या. अगदी संपूर्णपणे विश्वास टाकावा असा कोणी नजरेसमोर येईना. पोलिसात जाणं म्हणजे नसता ससेमिरा मागे लावून घेणे! बरं, ब्रीफकेस उचलून कुठं नाहीशी करायची म्हणजे भलतेच भयानक काम. खरंच

त्यात काही स्फोटक द्रव्यं असली तर? त्यांचा स्फोट झाला तर? छी थू होईल. नामुष्की होईल. खरं म्हणजे प्राणांवरच बेतेल! नामुष्की बघायला जिवंत कोण राहातंय? बरं ती ब्रीफकेस सांकेतिक पद्धतीच्या कुलुपाने बंद होती. आपल्या किल्ल्या लावून बघणं धोक्याचं. मार्केटमध्ये जाऊन किल्लीवाला गाठायचा, डुप्लिकेट किल्ली शोधायची म्हणजे आजच्या वातावरणात संकटालाच आमंत्रण! अशा अनेक शंकाकुशंकांच्या इंगळ्या मनाला डसू लागल्या. मन तर इतके भयभीत झाले की ब्रीफकेस ठेवलेल्या कपाटाकडे बघवेना! एरवी मी धडाधड कपाट उघडायचा. पण आता जवळ जायची पण भीती वाटायला लागली!

दुसरे दिवशी बायकोच्या सांगण्याप्रमाणे ऑफिसला सिक नोट पाठवून दिली. मुलं बाहेर गेल्यावर बायको म्हणाली,

''आता आपण एक धाडस करायचं.''

''काय?''

''ती ब्रीफकेस कपाटातून काढून आपण माळ्यावर ठेवून देऊ. मुलांना विश्वासात घेऊन काही सांगता येत नाही.''

''अगं पण माळावर ठेवताना काही झालं तर? त्यापेक्षा.....''

''हे बघा, तुम्ही आता काही विचार करु नका. तुम्ही फक्त स्टूल धरा.''

मग हलकेच कपाट अुघडून काहीशा दृढनिश्चयाने तिने एका जुन्या शालीत ब्रीफकेस गुंडाळली. स्टुलावरुन माळावर चढली आणि आमच्या पाण्याच्या सिमेंटच्या टाकीवर ती ब्रीफकेस ठेवली. एक जुनी मोठी जाडजूड पत्र्याची एक रिकामी ट्रंक आमच्याकडे होती. तिला झाकण नव्हतं. ती ट्रंक अुलटी करून तिनं ब्रीफकेसवर ठेवून दिली. म्हणजे अुंदरांनी कुरतडायची भीती नको.

एवढं 'ऑपरेशन' यशस्वीपणं झालं. मी चहा बनविला. चहा घेता घेता बायको म्हणाली.

''तुम्ही आता एक काम करायचं.''

''कोणतं?''

''आता तुमच्या त्या जगनच्या येण्याची आशा सोडून द्या. तुम्हीच अलिबाग-किहिमला जा आणि त्याचा शोध घ्या. मात्र अत्यंत सावधपणे. कस्टमच्या माणसाची विचारपूस करणंसुद्धा सध्या किती धोक्याचं आहे याचं पुरेपूर भान असू द्या. रजा वाढवावी लागली तरी चालेल. पण हे काम पुरं करुनच या.''

•••

मी दुसऱ्याच दिवशी अलिबागला गेलो. एका वर्गमित्राकडे उतरलो. किहिमला जाण्यास काहीतरी सबळ कारण हवं होतं. जगनचा पत्ता माहीत नव्हता. जास्तीत जास्त सरपंच वा अन्य कुणाकडं मी चौकशी करणार होतो. जागोजागी पोलीस चौक्या होत्या. गस्तीपहारे होते. गस्ती पथके हिंडत होती. अशा स्थितीत किहिमला काय किंवा अलिबागच्या कस्टमच्या ऑफिसमध्ये काय एखाद्या कस्टम ऑफिसरची चौकशी करणे म्हणजे आपणहून पोलीस चौकशीच्या फासात स्वत:ची मान अडकून घेण्यासारखंच होतं. भयानक बनलेल्या सद्य:स्थितीत निष्कारण तोहमत ओढवून घेणारं होतं. घरी, दारी, ऑफिसात बाजारात सर्वत्र प्रत्येकजण दुसऱ्याकडे संशयानं पहात होता. हा माणूस 'आपला' आहे का 'त्यांचा' आहे या एका संशयरेषेभोवतीच सगळी माणसं घोटाळत होती. मी आता जगनचा शोध घ्यायचा तरी कसा याबद्दल मनाशी उलटसुलट विचार करून पहात होतो.

आणि अगदी अनपेक्षितपणे मला उत्तर मिळालं!

मित्राकडे रात्री गप्पा मारत असताना आमचा एक जुना वर्गमित्र आला. गप्पांचा विषय अर्थातच् मुंबईचा बॉम्बस्फोट, अयोद्धेच्या बाबरी मशिदीच्या पाडावानंतर उसळलेल्या हिंदू-मुसलमान दंगली, समुद्रमार्गाने येणारी स्फोटके अशा ज्वलंत गोष्टींचा होता. आपल्या रायगड जिल्ह्याचे नाव बदनाम झाले, स्मगलरांच्या, देशद्रोही अतिरेक्यांच्या कारवायांचे नंदनवन असं रायगड जिल्ह्याचं वर्णन होतं म्हणून आमचा वर्गमित्र व्यथित झाला होता; पोलीस-कस्टम यंत्रणेतील भ्रष्टाचाराबाबत अत्यंत कडवटपणे बोलत होता. स्मगलिंग दादांबरोबर असलेल्या त्यांच्या साट्या-लोट्यांच्या रसभरीत हकीगती सांगत होता. मी चटकन् काही तरी आठवल्यासारखं करून जगनचा विषय काढला. तेव्हा तो म्हणाला,

''म्हणजे, जगनविषयी तुला काही कळलं नाही?''

''नाही.'' आता हा काय सांगतोय ह्या भीतीने माझ्या पोटात गोळा उठला! कुठं तरी जगन अडकलेला असला तर पोलीस चौकशीचे लोण माझ्यापर्यंत यायचं. मी चेहरा शक्य तितका निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न करीत त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहात राहिलो.

''अरे, तो आठ-दहा दिवसांपूर्वीच मेला.''

''म्हणजे?'' मी किहिमच्या भेटीविषयी बोलायचंच टाळलं.

''स्मगलर्सच्या टोळीबरोबर चकमक झाली. त्यात तो मारला गेला.''

''अरे बापरे!''

''आणि खरं सांगायचं तर....''

इकडे तिकडे पाहून तो हळू आवाजात म्हणाला, ''म्हणजे त्याला आपल्याच लोकांनी मारला असं म्हणतात.''

''अरे देवा, पण असं का म्हणून?''

''ते काय तू विचारू नकोस बाबा. त्यांचे काय काय हितसंबंध असतात देव जाणे.''

''जगनची बायकामुलं कुठे असतात?''

''ती महाडलाच वडिलांकडे महिनाभर होती. जगन गेल्यावर इकडे तिला आणली होती. त्यावेळी डिपार्टमेंटवाल्यांना खूप शिव्या घालत होती.''

''त्यांचा महाडचा पत्ता आहे का? तिला भेटायला हवं.''

''नाही. माझ्याकडं पत्ता नाही.''

मग थोड्या वेळाने गप्पा संपल्या. मी दुसऱ्याच दिवशी मुंबईला परतलो.

•••

बायकोला सगळी हकीगत सांगितली; अर्थात मुलांच्या नकळत. ती पण चक्रावली. परिस्थिती चांगलीच बिकट बनली होती. आता जगनच या जगात उरला नाही तर या ब्रीफकेसचं करायचं तरी काय? गुंता वाढतच चालला होता. नसतं लचांड मागं लागलं होतं. शेवटी धाडस करून सरळ पोलीसात जाऊन सगळी हकीगत सांगावी अशा निर्णयाप्रत आम्ही दोघं आलो. अनोळखी वस्तू-बॅगा, ब्रीफकेसेस् कशाहि वस्तूना हात लावू नका म्हणून पोलीस-यंत्रणा टाऽहो फोडून सांगत होती. आणि आम्ही मात्र एक अनोळखी बॅग घरात ठेवून सरकारला धोका देत होतो. आता पोलिसाना सांगायचंच; त्यातून जी काही खटली उभी राहतील, प्रश्नांची सरबत्ती होईल त्याला तोंड द्यायलाच हवं.

रात्री जेवताजेवता मुलगी म्हणाली.

''बाबा, काल संध्याकाळी एक पोलीस आला होता. तुम्हाला पोलीस स्टेशनवर येऊन जायला सांगितलंय.''

अरे बापरे, मी एकदम उडालोच. संपलं आता सगळं. पोलिसयंत्रणेला सगळा 'सुगावा' लागलेला दिसतोय. मी पाण्याचा घोट घेतला. बायको ओरडली,

''अगं मी कुठं होते? मला का नाही सांगितलंस? कशासाठी बोलावलं आहे? का बोलावलं आहे? सगळं विचारायचंस तरी.''

मुलगी आश्चर्यचकित झाली. कधी न ओरडणारी आई! भांबावलेले बाबा! मग ती म्हणाली,

''अगं, असं काय करतेस? बाबांनी मागं पासपोर्टसाठी अर्ज केला होता ना? त्या संदर्भात बोलावलंय.''

माझ्या मनावरचे ओझे उतरले. उगाचच काल्पनिक भीतीचे किती बागुलबुवे आपण स्वत:समोर उभे करत असतो

पोलिसांच्या माहितीसाठी किहिमला गेल्या दिवसापासून ते जगनच्या भेटीपर्यंतचा, नंतरच्या मन:स्थितीचा, त्याच्या शोधासाठी केलेल्या प्रयत्नांचा वगैरे सर्व वृत्तांताचे ब्रीफ मी तयार केले. पोलिसांसमोर उभं राहून निर्भय मनाने सर्व काही सांगायचे असं ठरवून मी शांत मनाने झोपी गेलो.

•••

पण पोलिसांकडे जाण्याची वेळ माझ्यावर आलीच नाही! दुसऱ्या दिवशी सकाळीच दारावरची बेल वाजली. दारात जगनची बायको आणि एक पोलिसी खाक्याचे, करड्या चेहऱ्याचे गृहस्थ. मी मनातल्या मनात चरकलो. म्हटलं आता आणखी कुठली भानगड निघतीय कुणास ठाऊक? जगनच्या बायकोला माझी बायको प्रत्यक्ष ओळखत नव्हती. बरोबरचे गृहस्थ तिचे वडिल असल्याचे कळल्यावर माझा जीव भांड्यात पडला. तिच्या वडिलानी जगनची सगळी हकीगत सांगितली. मी भेटलो त्याच्या तिसऱ्या दिवशीच जगनचा मृत्यू ओढवला होता. वरकरणी स्मगलर्सबरोबर झालेल्या चकमकीतील मृत्यू अशी नोंद असली तरी काही हितसंबंधी लोकांनी जाणूनबुजून घडवून आणलेली ती हत्याच होती. नात्यागोत्यातील सर्वांची आणि जगनला ओळखणाऱ्या सर्वांची तशी खात्री होती. सर्व हकीगत सांगणे चालू असतानाच जगनची बायको रडत होती. माझी बायको तिच्या पाठीवरुन हात फिरवत होती. मध्येच ती उठून आत गेली आणि कॉफी घेऊन आली. मी अजून ब्रीफकेसविषयी एकहि शब्द उच्चारला नव्हता. त्यांना ही ब्रीफकेसची गोष्ट माहीत आहे का नाही? कल्पना नव्हती. पण असणारच. नाही तर एरवी ही मंडळी माझ्याकडं कशाला येतील?

कॉफी पिऊन झाल्यावर जगनची बायको पुष्कळच सावरली होती. तिने आपल्या पर्समधून एक छोटीशी काळी डायरी काढली. ज्या दिवशी किहिमच्या किनाऱ्यावर आमचा गाण्याचा कार्यक्रम झाला त्याच दिवसाची जगनच्या हस्ताक्षरातील नोंद तिने आम्हाला दाखवली. माझ्या अनपेक्षित भेटीचा त्यात उल्लेख होता. ती म्हणाली,

''टिकमसाहेब, तुम्ही त्यादिवशी अगदी देवासारखे भेटलात असं म्हटलंय त्यांनी.''

''म्हणजे?''

''म्हणजे झालं होतं असं की माझी आई अचानक सीरीअस झाली म्हणून मी आबांकडे निघून आले. त्याच एक दोन दिवसात बऱ्याच घडामोडी झाल्या. कुठंतरी स्फोटकं उतरावयाची होती. खबर पक्की होती. कस्टमची शोध-पथकं मागावर जायची होती. पण कुठून कळ फिरली कुणास ठाऊक? ते 'ऑपरेशन'च रद्द झाले. त्या विषयावरून वरिष्ठांबरोबर यांची बरीच बाचाबाची झाली. रात्री घरी आल्यावर डायरीत त्यांनी बऱ्याच गुप्त गोष्टींच्या नोंदी केल्या. स्मगलर्सना सामील असणाऱ्यांची नावे त्यात होती. डिपार्टमेंटचे लोकच जाणूनबुजून सरकारची आणि लोकांची कशी दिशाभूल करत आहेत ह्याच्या त्यात नोंदी होत्या. काही जागांचे नकाशे होते.''

''मग हे सगळं माझ्याकडं द्यायचं कसं काय डोक्यात आलं?''

''तुम्ही भेटलात त्याच दिवशी दुसरीकडे त्यांची 'ड्युटी' लागल्याचे त्याना सांगण्यात आलं. आठ-दहा दिवस कुठं तरी ड्युटीवर दुसऱ्या दिवसापासूनच जायचं होतं. वरिष्ठांशी झालेल्या भांडणामुळे आपल्यावर काहीतरी संकटे आणली जातील अशी त्याना शंका होती. मात्र जीवावरचे संकट आणतील असं मात्र त्याना वाटलं नसावं. कुठं तरी अडचणीच्या दूर ठिकाणी पाठवतील, असं वाटलं होतं. मी घरात नाही. दुसरे दिवसापासून कुठल्या जागी 'ड्युटी' लागेल याची कल्पना नाही. तेव्हा मी येईपर्यंत फाईल कुणाकडं तरी सुरक्षित रहावी हा त्यांचा हेतू होता. बरं, ऑफिसच्या लोकांमध्ये किंवा गावामधील लोकांमध्ये एवढा विश्वास टाकावा असं कोणी त्याना दिसेना. शिवाय त्यांनी फाजील चौकशा केल्या असत्या. म्हणून अगदी देवासारखे तुम्ही भेटलात असं त्यानी म्हटलंय.''

''पण मला त्याची काहीच कल्पना दिली नाही.''

''देणार होते. पण एक तर त्यांच्या पाळतीवर कोणीतरी असेल अशी त्याना शंका होती; म्हणून त्यानी तुमच्याशी जास्ती बोलण्याचं टाळलं. त्यातून तुम्ही पण फारशी चौकशी केली नाहीत. दुसरं म्हणजे आपण लौकरच मुंबईला वरिष्ठ ऑफिसर्सना फाईल घेऊन भेटायला जाऊ तेव्हा सगळं तुम्हाला सांगायचं त्यानी ठरविलं होतंच; पण घडलं ते भलतंच.''

बोलता बोलता जगनच्या बायकोला रडू फुटलं. ती मुसमुसून रडू लागली. बायको तिला आत घेऊन आली.

मनात एक शंका होती. हिला एवढ्या सगळ्या गोष्टी कोणी सांगितल्या? डायरीत एवढ्या नोंदी दिसत नव्हत्या. माझ्या मनातलं ओळखल्यासारखं जगनच्या सासऱ्यानी एक पत्र दाखवलं. जगननं ब्रीफकेस माझ्याकडं दिल्यावर त्यांच्याकडे एक खुलासेवार पत्र पाठवलं होतं.

...

काही दिवसातच जगनच्या ब्रीफकेसने अनेक रहस्ये उलगडली. कित्येक स्मगलर्स गजाआड झाले. डिपार्टमेंटची मोठी धेंडं तडकाफडकी डिसमिस् झाली. जगनच्या इमानदारीबद्दल त्याला मरणोत्तर पारितोषिके, सन्मान प्राप्त झाले. माझाहि सरकारतर्फे सन्मान व्हावा म्हणून जगनच्या सासऱ्यांची आणि बायकोची फार इच्छा होती. त्यासाठी ते प्रयत्न करणार होते. माझा पण गौरव होणार होता. पण माझ्या बायकोनं या कल्पनेला विरोध केला. माझं नाव कोणत्याहि प्रकारे प्रकाशात येऊ नये म्हणून ती ठाम होती. आणि आम्हा पांढरपेशांच्या दृष्टीकोनातून ते रास्तहि होतं!

आणि न दाखवलेल्या धाडसाबद्दल सन्मान तो कसला? जगनमुळे राष्ट्रकार्यात माझा नकळत हातभार लागला हेच माझ्या लेखी खूप होतं!

❖❖❖

(सर्व पात्रे, प्रसंग काल्पनिक)

## १८. अंधारयात्रा

डिसूझाचं डिक्टेशन संपलं तेव्हा सुषमानं केबिनच्या काचेतून टॉवरच्या घड्याळाकडे बघितलं. दोन वाजले होते.

तेवढ्यात मोठ्ठा आवाज आला. धडाड्ऽऽधुम. धडाड्धुमऽऽ.

सगळ्या डिपार्टमेंटमध्ये गोंधळ उडाला. पुन्हा आवाज आले. भराभर काचेची केबिन उघडून बघितले तेव्हा चक्रवर्ती मोठ्यानं ओरडला. ''ओऽऽऽ माय गुडनेस. फायर. सी द फायर.''

त्याच्या बाजूच्या सगळ्या खिडक्या उघडण्यात आल्या. आख्खं डिपार्टमेंट तिथं गोळा झालं. परिचित स्टॉक एक्सचेंजची बिल्डिंग आगीच्या ज्वाळांनी लपेटलेली होती. तेवढ्यांत डिसोझा ओरडला, ''सी देअर.''

बापरे, एअर इंडियाची बिल्डिंग, नरीमन पॉइंटच्या काही बिल्डिंगस्‌ना आगी लागल्या होत्या. त्या बाजूला सर्व काळेकुट्ट वातावरण दिसत होतं. आकाशात उंचपर्यंत काळा धूर पसरलेला होता. त्या दरम्यान दिसणारी एक छोटीशी सहा मजली बिल्डिंग, लाकडाच्या सरणावर ज्वाळांनी लपेटलेली सती शांतपणे बसलेली दिसावी, तशी दिसत होती.

रस्त्यांवरुन मोठा गलका ऐकू येत होता. फायर फायटरचे बंब, पोलिसांच्या गाड्या धावत होत्या. सायरनचे आवाज वर विसाव्या मजल्यावरसुद्धा स्पष्ट ऐकू येत होते. लोक सैरावैरा धावत होते.

विष्णू पाटकर डिपार्टमेंटमध्ये धावत आला. धापा टाकत म्हणाला, ''बॉम्बे पेटलीय दोस्तानू. सगळीकडे बॉम्ब फुटतायत. शेअर मार्केटची बिल्डिंग पार उडालीय. एअर इंडिया बिल्डिंगच्या तळाशी चार स्फोट झालेत. बँक ऑफ ओमानची अख्खी मंडळी टेबल-खुर्चीसकट आकाशात उडालीत.''

''बाऽऽ परेऽऽऽ बाप, म्हणजे पुन्हा हिंदु-मुसलमान दंगली पेटलेल्या दिसतात.''

''फाटक, ही तुमची रथयात्रा बरं. बाबरी मशीद फोडलीत ना? मोठा पराक्रम केलात. आता आम्ही भोगतो त्याची फळं.'' काँग्रेसवाला पोट्या ढवळे गुरगुरला.

फाटक पिसाळून काही तरी बोलणार तेवढ्यात जोशीने त्याला शांत केलं. ढवळेला बाजूला नेलं. फाटकला सर्वजण 'अतिरेकी अडवानी' म्हणत, तर जोशीला 'सौम्य प्रकृती वाजपेयी' समजत.

नेहमीसारखी वादळी चर्चा सुरु होणार, एवढ्यात...

ऑफिसच्या माईकचा आवाज आला.

''हॅलोऽऽ, हॅलोऽऽ, युवर अटेंशन प्लीऽऽज''

सगळीकडे शांतता पसरली. श्रद्धांजलीला उभं राहावं तसे सगळे जिथल्या तिथेच थबकून उभे राहिले.

''हॅलोऽऽ, हॅलो, यू आर रिक्वेस्टेड टू व्हेकेट दी प्रिमायसेस इम्मिजिएटली. इन्सिडनसेस ऑफ बॉम्ब एक्सप्लोअर्स आर रिपोर्टेड इन दी सिटी. डोण्ट टेक एनिथिंग विथ यू. व्हेकेट इम्मिजिएटली अ‍ॅज पर डायरेक्शन्स ऑफ युवर फ्लोअर मार्शल.'' ऑफिसच्या २५ मजल्यांवरून एकाच वेळी अनौन्समेंट झाली.

रेचेल रडायला लागली. तिची दोन्ही मुलं कुलाब्याच्या सेंट्रल स्कूलमध्ये होती. लंब्या घारपुरे चरफडत केसकरला म्हणाला, ''साला वैताग आहे वैताग. बाबरी मशिदीपासून पोराचं डोकं आऊट झालं होतं. आमचं डोंबिवली म्हणजे नेपाळनंतरचं दुसरं हिंदुराष्ट्र ना? अयोध्येत कोवळी कोवळी पोरं मेली. मुंबईच्या सहा डिसेंबरच्या दंगलीत 'आमचे' लोक मेले; म्हणून 'त्यांचे' लोक मारायला बाहेर पडले. त्याच्या पाया पडून समजावलं. परीक्षा तोंडावर आल्यात. आता कुठं शांत झाला होता. पुन्हा दंगली सुरु झाल्या म्हणजे बघायला नको.''

केसकरला माहीत होतं. घारपुरेच्या मुलाला दहावीला नव्वद टक्के मार्कस् होते. या बारावीच्या परीक्षेवर त्याची इंजिनिअरींगची अ‍ॅडमिशन् अवलंबून होती. मुलगा या हिंदू-मुसलमान दंगलीत पुन्हा बिथरला तर नक्कीच आयुष्याचे मातेरे!

तेवढ्यात त्यांच्या विसाव्या मजल्याचे मार्शल राणेसाहेब आले. ते तिथल्याच एका टेबलावर उभे राहिले. हातांनी खुणा करुन त्यांनी सर्व स्टाफला आपल्याजवळ बोलावले. म्हणाले, ''शहरात एकापाठोपाठ बॉम्बस्फोट चालू आहेत. आपल्यापैकी लेडीज् लिफ्टने आधी खाली जातील. त्यांच्याबरोबर तनेजा आणि सोनावणे जातील.''

त्या दोघांची नुकतीच अँजिओप्लास्टी झाल्याचं सर्वांना माहीत होतंच. राणेसाहेब पुढे म्हणाले ''लिफ्टने खाली उतरल्यावर सरळ घरी जा. वाटेत कुठल्याही अनोळखी वस्तूला हात लावू नका. गाड्या बंद पडणे, बसेस् बंद पडणे असे प्रकार होऊन घरी पोचणं अशक्य झाल्यास इथं परत या. ऑफिसमध्ये रहाण्याची सोय करण्यात येईल. शहरात

जाळपोळ, लुटालूट, दंगली चालू असण्याची शक्यता आहे. वातावरण निवळेपर्यंत सर्वांची ऑफिसात रहाण्या-जेवण्याची सोय होईल. गुड लक्.''

सर्वजण लिफ्टकडे धावले. प्रत्येक मजल्यावर सहा लिफ्टस् होत्या. एकूण पंचवीस मजले. केव्हा नंबर लागेल कुणास ठाऊक?

सगळे हलले तरी आर. ए. एम. मोडक हलला नाही. गलितगात्र होऊन खुर्चीतच बसला. सगळा फ्लोअर व्हेकेट करण्याची जबाबदारी मार्शल या नात्याने राणेसाहेबांवर होती. ते त्याच्याजवळ गेले. त्यांनी त्याच्या खांद्यावर थोपटलं. मोडक लहान मुलासारखा ओक्साबोक्सी रडू लागला. ''राणे, मला फार भीती वाटते हो?''

''कसली रे?'' राण्यांनी आश्वासक स्वरात विचारलं.

''चिंचपोकळीच्या पुलाखाली मागच्यासारखा 'प्रकार' असला तर?''

राण्यांच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला! त्या मोडकला, त्याच्या आद्याक्षरांवरुन सर्वजण 'राम' मोडक म्हणत! पण त्याचं खरं नाव होतं रफिक अहमद महमद मोडक. आर.ए.एम्. मोडक. कोकणात जन्मलेला हा मुसलमान दिसायचा थेट चित्पावन ब्राम्हणासारखा! तीन महिन्यांपूर्वी बाबरी मशीदीवरून दंगल सुरु झाली तेव्हा चिंचपोकळी ब्रिजजवळ असलेल्या आपल्या घराकडे तो जात होता. ब्रिजच्या तोंडाशी माथेफिरुंचे एक टोळके होते. हिंदू आहेस का मुसलमान ह्याची खातरजमा करूनच त्या त्या माणसाला ट्रॅफिकमधून 'क्लिअर' करीत. कोकणस्थ ब्राम्हण दिसणारा मोडक त्या 'वेढ्या'तून सुटत होता तेवढ्यात कोणीतरी ओरडलं ''अरे तो xxx लांडा आहे.'' मोडक थरथरत होता. त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. मग कुणीतरी ओरडलं. ''पँट सोडा साल्याची.'' मोडकनं खूप गयावया केली. पण पुढच्या 'विटंबने'तून त्याची सुटका झाली नाही. त्याची 'रितसर' तपासणी झाल्यावर त्याच्यावर लाथा - बुक्क्यांचा वर्षाव सुरु झाला. तेवढ्यात पोलिसांच्या सायरन गाडीचा आवाज आला. सगळे पसार झाले. बलात्कार झालेल्या स्त्री-सारखा कपडे सावरत मोडक उठला. पोलिसांनी त्याला घरी पोहोचवले. पण त्यानंतर 'शॉकने' महिनाभर तो घरी निजून होता. आत्ताआत्ता धीर धरून तो ऑफिसला यायला लागला होता. पुन्हा मागचा 'प्रकार' होईल म्हणून थरथरत होता.

राणेंनी त्याला थोपटून धीर दिला. म्हणाले,

''आपल्याला बिल्डिंग खाली करायचा हुकूम आहे. तू समोरच्या रिक्रिएशन हॉलमध्येच रहा. घरी जाऊ नकोस. आपण काही तरी व्यवस्था करू.'' त्याला घेऊन राणे लिफ्टकडे आले. सहांपैकी फक्त एक लिफ्ट आली आणि थांबली. वरच्या तेवीस,

चोवीस मजल्यावरून आधीच भरून आलेल्या लिफ्टमध्ये सर्वजण शिरायला बघत होते. आतले लोक बाहेरून आत येणाऱ्यांना हुसकवत होते. लिफ्टमध्ये असलेल्या पुरुषांनी बाहेर यावं आणि लेडीजना आत घ्यावं म्हणून बाचाबाची सुरू होती. राणे पोचले तेव्हा चक्क मारामारीच सुरू झाली. राण्यांना नवल वाटले. रिझर्व्ह बँकेसारख्या प्रतिष्ठित ऑफिसची ही उच्चभ्रू माणसं? अशी कशी बेशिस्त वागत आहेत? शेवटी आपला जीव तेवढा प्यारा. सगळीकडेच हा प्रकार. मिलिटरीमधून आलेल्या राणेसाहेबांना ही गैरशिस्त कशी सहन व्हावी? ते लिफ्टसमोरच्या कॉरिडॉरमधील गर्दीला हटवण्यासाठी पुढे निघाले. एवढ्यात...

तेवढ्यात सगळे लाईट गेले. कॉरिडारमध्ये अंधार पसरला. लांबून कुठून तरी बॉम्बस्फोटाचे आवाज घुमले.

सगळीकडे पळापळ सुरू झाली. कोणी ओरडलं, 'आपल्या बँकेत बॉम्ब ठेवलाय, पळा, दौडो.' एकमेकांना तुडवत, ढकलत, सर्वजण पळायला लागले. पण पळायचं कसं? लिफ्ट तर बंद पडलेली. आता वीस मजले उतरून खाली जायचं? नुसत्या कल्पनेनंच सगळ्यांच्या पायात पेटके आले! पण दुसरा इलाज काय? लाईट येईपर्यंत वाट बघायची? लाईट आल्यावर लिफ्टस् सुरू होणार? मग बँकेचे इमर्जन्सी लाईटचे काय? ते तरी केव्हा येणार? जनरेटर केव्हा सुरू होणार? आणि तेवढ्यात बॉम्बस्फोट झाला तर? कोणी ओरडत होतं की एके-४७ घेऊन बँकेत अतिरेकी शिरलेत. आपली बँक म्हणजे देशाची बँक. अतिरेक्यांच्या 'हिट' लिस्टवर आहे. म्हणजे नक्कीच बॉम्ब बँकेत पेरलेले असणार? सगळ्यांची कुजबुज वाढायला लागली. आता लिफ्टची वाट बघण्यात काही अर्थ नाही. काय होईल ते होईल. आता सुरक्षितपणे बाहेर पडायचं म्हणजे सरळ वीस जिने उतरून खाली जाणे.

सगळे जिन्यापाशी आले. एव्हाना पंचवीसाव्या मजल्यावरून येणाऱ्या स्टाफच्या लोकांची जिन्यात गर्दी झाली होती. जिन्यावरून वळताना जो मध्यभागी झरोका होता त्यातून बाहेरचा उजेड दिसायचा. पण परत वळलं की पायऱ्यावरून अंधारच अंधार. घारपुरे मॅडमनी आज वाढदिवस म्हणून सासूच्या नाकावर टिच्चून घसघशीत सोन्याचे तोडे केले होते. ते त्यांनी घातले होते. सहा वाजता नवरा येणार होता. दोघं मिळून मेट्रोच्या सिनेमाला जाणार होते. नंतर बाहेरच जेवणार होते. आता कसलं काय नि काय? नवरा सेंट्रल बँकेत कुलाब्याला होता. तिकडे काय परिस्थिती आहे देव जाणे? ह्या पुरुषांना वाट्टेल ते बोलायला काहीच कसं वाटत नाही? म्हणे, कुलाबा, नरीमन पॉईंटला दोन बसेस स्फोटात उडाल्या. त्यातली माणसं फुटबॉलसारखी आकाशात उडाली!

तेवढ्यात मोठ्यानं आरडाओरडा झाला. सहा फूट उंचीचा आणि तेवढ्याच आडव्या देहाचा विशालकाय तनेजा जोरात ओरडून पडला होता. जिन्याच्या पायरीवरच तो आडवा झाला होता. आता निपचित पडला होता. हार्ट पेशंट असल्याने काळजी होती. कुणी कुणी जवळचे सिगारेट लाईटर्स पेटवले. कुणी काडेपेट्यांच्या काड्या ओढल्या. तनेजाला दरदरून घाम आला होता. कुणी तरी जवळच्या मजल्यावर पाणी आणायला गेला.

सगळा ट्रॅफिक खोळंबला होता. खंडाळ्याच्या घाटात अडकावा तसा. एरवी डिपार्टमेंटमध्ये तनेजाला सर्वजण सहानुभूती दाखवत. पण आता सगळे शिव्या घालायला लागले. एवढा हार्ट ट्रबल आहे तर कशाला नोकरीसाठी कलमडतो? बायको नोकरी करते, मुलं मिळवती झालीत. उगाच ऑफिसला कटकट! मग एकजण म्हणाला, 'बँकेची रिएम्बर्समेंट मिळते ना? याच्या सगळ्या बिलांची बँकेवर जबाबदारी! आजाराच्या नावाखाली लाईट डेस्क पाहिजे. लवकर घरी जायला पाहिजे.'

प्रत्येक क्षण न् क्षण युगासारखा भासत होता. कोणत्या क्षणी बँकेत ठेवलेला बॉम्ब फुटेल आणि आपल्या चिंधड्या उडतील ते सांगता येत नव्हतं. मृत्यू क्षणाक्षणाला पुढे सरकत होता. दुरून कुठूनतरी अस्फूट किंकाळ्या ऐकू येत होत्या. नेहमीच अभद्र बोलणारा गोडबोल्या म्हणाला की, बहुतेक लिफ्टमध्ये अडकलेली माणसं ''सोडवा सोडवा'' म्हणून ओरडत असावीत. शक्यता नाकारता येत नव्हती. सर्वांच्या अंगावर एकदम शहरे आले! बाप रे, बंद लिफ्टमध्ये गुदमरून मरायचे? पूर्वीच्या लोखंडी लिफ्टस् बऱ्या होत्या. निदान थोडी तरी हवा खेळायची? या नव्या लिफ्टस् म्हणजे मोठे मोठे व्हॉल्टस्च. आत अडकलेल्या लोकांचे काय झाले असेल कुणास ठाऊक? कशाला एवढ्या अजस्र, उंच बिल्डिंग्स् बांधतात कुणास ठाऊक? रश्मी वैद्यनाथनने मनोमन देवाचे आभार मानले. लिफ्टमध्ये घुसायला मिळाले नाही म्हणून!

पाण्याचे सपकारे मारून तनेजाला जागे करण्यात आलं. त्याच्या दोन्ही बगलेत आधार देऊन सावकाश सावकाश 'अंधार यात्रा' पुन्हा सुटकेच्या आशेने सरकू लागली!

मगाशी जरा भरभर तरी जाता येत होतं. आता या तनेजाच्या 'लायबिलीटी' मुळे प्रगती मंद होत होती. पण मोठ्यानं कुरकुरता पण येत नव्हतं. पंचविसाव्या मजल्यावरची इना रेबेलो धावत आली होती. तनेजा आता तिच्या 'केअर' मध्ये होता. इनाला सर्वजण मदर तेरेसा असंच म्हणत. कुणाच्याही, अगदी जात-भेद विसरून मदतीला धावून जाण्यातच तिला आपल्या जन्माचे सार्थक वाटत असे.

अंधाऱ्या रस्त्याने-जिन्यामुळे आपण कुठल्या मजल्यापर्यंत खाली उतरलो तेच कळत नव्हतं. जिन्यात पाय अडकायचे. पायरी चुकून घसरायला व्हायचं. पण एकमेकांना

घट्ट धरून जात असल्याने पडायला मात्र होत नव्हतं. घारपुरे मॅडमना जिन्यातील एकसारख्या वळणामुळे घेरी आल्यासारखी वाटत होती. पण जगण्याची दुर्दम्य आशा सगळ्यांना पुढं पुढं रेटत होती.

असं म्हणतात की सगळीकडून अंध:कार दिसायला लागला की परमेश्वर कुठून तरी प्रकाशाचा किरण दाखवतो...

ओऽहो! खरंच प्रकाश दिसतोय की काय?

शंकाच नको, चांगला उजेड दिसतोय,

पुढची मंडळी एकदम ओरडली. ''आला, ग्राऊंड फ्लोअर आला!''

कोलंबसाला 'जमीन' दिसल्याचा आनंद काय होता याची एका क्षणात सगळ्यांना कल्पना आली.

हळुहळू सर्वजण बिल्डिंगखाली आली. समोरच्या मोकळ्या जागेत प्रचंड गर्दी होती. फर्स्ट एड्‌चे सामान घेऊन, लिंबूपाण्याचे पेले घेऊन ऑफिसर्स लाऊंजचा स्टाफ उभा होता. कुणी तत्परतेने जाऊन केळी, बिस्किटे, खारे दाणे-चणे मिळेल ते आणलं होतं. तिकडे अवघ्या मुंबईत माणसं, एकमेकांच्या उरावर बसून नरडीचे घोट घेत होती तेव्हा एकाच बँकेच्या छत्राखाली वावरणारी माणसं वीस वीस, पंचवीस पंचवीस जिने उतरत आलेल्यांना प्रेमानं मिठ्या मारत होती. सर्वांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वहात होता.

समोरच्या टॉवरच्या घड्याळात दुपारचे अडीच वाजले होते. वरून खाली यायला फक्त अर्धा तास, अवघी तीस मिनिटे! पण युगं लोटली असं वाटलं.

प्रत्येक सेकंद मरण्याच्या विचारातच घालवल्यानं सर्वांना पुनर्जन्म झाल्यासारखा वाटत होता.

बँकेची आकाशात उंचवर गेलेली बिल्डिंग अजून तरी दिमाखात उभी होती. बॉम्ब ठेवल्याची अफवाच होती.

अंधार यात्रा संपली होती. मात्र...

एका मरणाच्या दारातून बाहेर पडलेली माणसं पुन्हा दुसऱ्या मरणाच्या दारात प्रवेश करायला सज्ज होत होती!

❖❖❖

# १९. पापी 'पोटाचा' प्रश्न

भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी गोवा भाग पारतंत्र्यात होता. पोर्तुगीजांच्या अमलाखाली होता. कुणीतरी गोव्याच्या स्वातंत्र्याचा प्रश्न पं. नेहरुंकडे उपस्थित केला तेव्हा ते हसून म्हणाले ''अरे गोवा म्हणजे भारताच्या चेहेऱ्यावरची छोटीशी पुटकुळी आहे.'' पण नंतर गोवा-मुक्तीसाठी केवढं आंदोलन झालं; या छोट्याशा पुटकुळीचा केवढा मोठा 'नायटा' झाला हा इतिहास सगळ्यांना माहीत आहेच. सागायचं कारण म्हणजे माझं पोट! एकेकाळी माझ्या पोटाचा प्रश्न अवघा 'टीचभर' होता हो, पण बघता बघता हा प्रश्न ''पोटभर'' झाला. सर्व शरीरात या बेट्या पोटानं आपलं स्वतंत्र राज्य प्रस्थापित केलं आहे. आता या 'प्रस्थापिता'चा नायनाट करण्यासाठी मला मोठं आंदोलन छेडायची वेळ आली आहे! गोव्यासारखा काट्याचा नायटाच झाला म्हणानात.

लहान दिसणारं मूल पहाता पहातां केव्हा मोठं होतं ते कळत पण नाही. ''अरे बाळ्या केवढा मोठ्ठा झाला? कालपर्यंत तर एवढासा पिटुकला होता.'' असे कौतुक ह्या बाळ्याच्या नशीबी असतं. पण माझं बिचारं टीचभर पोट बघता बघता केवढं 'मोठं' झालं याचं कौतुक तर सोडूनच द्या; पण बिचाऱ्याची सारखी टिंगल-टवाळी चालली आहे. हल्ली मला डायनिंग टेबलवर बसता येत नाही. पोटामुळे! माझ्या पोटाचा 'विस्तारवाद' आणि डायनिंग टेबलचा ''जडवादी'' स्वभाव, ''अचल'' वृत्ती, आपल्याच जागेवर 'ठाम' राहण्याचा हट्टीपणा, या संघर्षात मला जेवायला जमत नाही. पण त्याची हल्ली मला भलतीच शिक्षा मिळते! एखाद्या रोग्याला कसं ''क्वारंटाईन''मध्ये टाकतात तसं मला बिनहाताच्या खुर्चीत बसवतात आणि समोर स्टूल ठेवून त्यावर माझं ताट असतं! त्यामुळं हिंदी सिनेमातून, टी.व्ही. सीरिअल्समधून आपण वाढून घ्यायचं, आपल्या गेस्टस्ना 'सर्व्ह' करायचा 'रुबाबदार'पणा मला हल्ली दाखविता येत नाही! मुलगा म्हणतो ''बाबा, तुम्हाला डायनिंग टेबल हवंच कशाला? आता काही दिवसातच मस्तपैकी थाळी पोटावरच ठेवून जेवता येईल. चहाचा कप ठेवता येईल. पोटाचं 'एक्स्टेंशन'च तुम्हाला डायनिंग टेबल म्हणून वापरता येईल! सेल्फ कंटेण्ड!'' मुलगी म्हणते, ''बाबा, आपली पृथ्वी गोल आहे ह्याची जी अनेक कारणं आम्ही लहानपणी भूगोलात वाचली त्यातलं एक कारण तुम्ही रस्त्यावरुन यायला लागलात की पटतं.'' मग जावई मुद्दाम

विचारतो, ''कोणतं ग?'' मग ती म्हणते 'ते, रे, दूर अंतरावरून जहाज येत असलं की जहाजाचा मधला भाग आधी दिसतो, वगैरे वगैरे. तसं बाबा लांबून यायला लागले की गोलमटोल पोट आधी दिसतं; नंतर बाबांचा चेहरा वगैरे वगैरे.''

आता माझी धर्मपत्नी दारावर आलेल्या भोवारणीला, भांडी घेताना, निमूटपणे जुने कपडे देईल तर काय बिघडेल काय? जुन्या पँटस् देताना ''हल्ली ह्यांच्या पोटाला होत नाहीत ना?'' अशी अमूल्य माहिती कशाला पुरवत बसते? त्यामुळे उगीचच ती भोवारीण माझ्या पोटाकडे ''कृतज्ञतेने'' बघतेय असा मला भास होतो!

मित्र तर काय विचारायलाच नकोत. कधी सरळ हाक मारतील तर शपथ. मि. पोटे काय, अरे पोट्या, अरे ढेरपोट्या ही काय सभ्य माणसांची हाक मारण्याची पद्धत झाली का? साधं विठोबा मंदिरापर्यंत फिरायला जायची गोष्ट. पण सगळ्यांची प्रेमळ चौकशी एकच. ''अरे मि. पोटोबा आले का? ते आल्यावरच निघू. म्हटलंच आहे. आधी पोटोबा, मग विठोबा!'' आता आमचा भावंड्या. जिन्यावरून आपल्या ब्लॉककडे जाताना कधी सरळ जाईल का? प्रेमळपणे चौकशी केल्यासारखे दाखवेल; आणि जिन्यात एकदम मोठ्याने सांगेल, ''अरे सांगायचं विसरलोच बघ. आज संध्याकाळी चांगलं व्याख्यान आहे. मी अभावितपणे विचारतो. ''कशावर रे?'' तो आणखी मोठ्यांदा सांगतो. ''वाढत्या पोटाच्या समस्या.''

पण काय सांगू मित्रांनो, सगळ्यांच्या कुचेष्टा मी सहन केल्या. शिंपी म्हणाला, ''साहेब, आता पँट अल्टर करता येणार नाय. सीटला आता मायाच उरली नाय.'' सगळे 'पोटभर' हसले. माझ्या पोटाचा बळी देऊन! पण एक दिवस माझ्या परमप्रिय नातवाने सुद्धा माझी चेष्टा केली. हो! चांगला त्याला शाळेतून आणायला गेलो होतो. वाटेत एक पावसाची सर आली म्हणून आडोशाला थांबलो. घरी आल्यावर मुलीने त्याचे डोकं चाचपून विचारलं. ''सोन्या, भिजला कसा नाहीस?'' तर हा माझा सोन्या सांगतो कसा? ''अगं मम्मा, मी आजोबांच्या ''पोटाखाली'' उभा होतो ना? श्रीकृष्णाने कसा गोवर्धन गिरी''..... जय महाभारत. धन्य तो बी.आर.चोप्रा!'' आमचे शहाणे बुजुर्ग म्हणत ते काही खोटं नाही. जावयाचं पोर; हरामखोर!''

नातू म्हणजे मला प्राणांपलीकडे प्रिय असलेली एकमेव चीज; त्यानं पण माझी खिल्ली उडवावी? याच्या मला प्राणांतिक वेदना झाल्या. पण त्या प्रसंगानं मी अंतर्बाह्य ढवळून निघालो. तो माझा ''टर्निंग पॉईंट'' ठरला.

त्या दिवसापासून मी गंभीरपणे विचार करू लागलो. आपल्या 'पोटाचा' प्रश्न आपल्यालाच सोडवायला नको का? असं बालगंधर्वांच्या लडिवाळ सुरात स्वत:लाच विचारलं! अंतर्मनाच्या खोल गाभाऱ्यातून (म्हणजे नक्की कुठून, कुणास ठाऊक?)

''होकार'' आला. आतून ''आदेश'' मिळाल्यानं मला बरं वाटलं. मी कामाला लागलो.

कामाला लागलो म्हणजे काय तर अंतर्मुख होऊन विचार करु लागलो की सारं घडलं कसं? ''नकळत सारे घडले.'' अशी उगाच स्वत:ची समजूत घालण्यात काही मतलब नाही. कुठल्याही प्रॉब्लेमच्या अगदी 'पोटात' उतरून पहाणं मला आवडतं. विचार केल्यावर पहिल्यांदा माझ्या डोळ्यांसमोर आला तो आमचा ऑफिसातला सुब्रम्हण्यम् उर्फ सुब्बु. त्या बेट्याला चमचमीत आणि गोड पदार्थ खायची भारी आवड; त्यापेक्षा दुसऱ्याला खिलवण्याची. माझ्या भिडस्त स्वभावाचा फायदा-सॉरी-गैरफायदा घेऊन त्यानं मला सगळ्या हॉटेलातून फिरवलं. मद्राशी अप्पम काय, डोसे काय, फरसाण काय नि रबडी काय? पुन्हा वर तऱ्हेतऱ्हेची आईस्क्रिमस्. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. हळूहळू पोट 'दिसू' लागलं! पॅंट्स् बसेनात. पट्ट्याला ॲडिशनल भोकं पडायला लागली तेव्हा कुठं पोटाचा 'होल्डाल' बांधता यायला लागला. पॅंटची बटनं-चेन लागली आहेत ना याची खात्री करुन घेण्यासाठी समोरच्या मोठ्या आरशात बघायची 'गरज' पडायला लागली; कारण मान खाली करून बघावं तर पोटच पोट पसरलेलं दिसायचं! त्या पलीकडचं काही दिसायचंच नाही! आणि आमचा सुब्बु वर म्हणायचा, ''अरे यार, आपल्या मिडल् एजला पोटं सुटणारच. Middle Age is that when middle portion comes out... साईन ऑफ प्रॉस्पिरीटी यार! ह्या सुब्बुने मला ऑफिसात नेहमी गाफील ठेवलंय. प्रमोशनचे इंटरव्ह्यू केव्हा आहेत, डेप्युटेशनवर पाठवायचं आहे, इन्स्पेक्शन केव्हा यायची आहे असल्या सर्व बाबतीत जसं मला तो गाफील ठेवायचा तसं त्यानं या पोटाच्या बाबतीत पण केलं.

ते काही असो. पण आता 'पूर्ववत्' होण्यासाठी काही उपाय तर केले पाहिजेत! सर्वानुमते उत्तम उपाय म्हणजे मॉर्निंग वॉक, म्हणजे ब्रिस्क वॉक. गावात बरेच वॉकर्स क्लब होते. त्यातील मंडळी तीन चार मैलांची रपेट करत. पहिले तीन-चार दिवस मी स्वेटर, मंकीकॅप वगैरे आयुधे घेऊन उत्साहाने गेलो. पाचव्याच दिवशी मला ताप भरला. थंडी वाजू लागली. मग बरेच दिवसांचे मध्यंतर झालं. नंतर एकजण म्हणाला, ''अहो, एवढं लांब कशाला जाताय फिरायला? तुम्ही राजवाडा वसाहतीत राहता ना? तिथल्या पटांगणात दोन तीन फेऱ्या पळून काढा. दोन महिन्यात पोट कमी होतंय का नाही ते बघा.'' मला पटले. उगा गावाबाहेर तीन-चार मैल चालण्यापेक्षा हे बरं. मी लागलीच उत्साहाने कॅनव्हास शूज आणले. दुसरे दिवशी पहाटेसच गेलो. दिवस उगवल्यावर लोक दुधाला बाहेर पडतात. तेव्हा त्यांच्यासमोर हाफ-पॅंटवर पळताना उगाच संकोचायला होतं. ''जय पी.टी. उषा, जय मिल्कासिंग'' असं मनोमन म्हणत मी ताशी तीन-चार किलोमीटर्सच्या 'वेगाने' पळायला सुरुवात केली. आणि हाय रे दुर्दैवा, पहिल्याच दिवशी

मांजर, सॉरी, कुत्रं आडवं आलं! त्या पटांगणात अनेक कुत्री जमिनीत उकरुन त्यात आपल्या देहाचं वेटोळं करुन झोपतात हे मला काय माहीत? पळताना अंधारात अशाच एका निद्रिस्त श्वानावर माझा पाय पडला मात्र, काय त्वेषाने ते श्वान भुंकलं म्हणता? मी गर्भगळीत झालोच पण शेजारी एका स्थितप्रज्ञ अवस्थेत उभे असलेलं गर्दभहि घाबरुन त्याचा काही अपराध नसताना पळत सुटलं. काही क्षणातच त्या गाढवानं मला मागं टाकलं आणि ज्याची आगळीक मी काढली होती ते कुत्रं मला पाठीमागून भिडलं. चौदा इंजेक्शन्स् माझ्या डोळ्यांसमोर चमकली! आणि तेवढ्यात समोरुन आलेल्या दूधवाल्याने दांडका उगारल्याने त्या कुत्र्याने माघार घेतली आणि माझी सहीसलामत सुटका झाली. पण त्या सुटकेच्या आनंदाला एका य:कश्चित गाढवाने आपल्याला पळण्यात सहज मागे टाकावं या दु:खाची किनार होती! मग वसाहतीमधील एकानं मला सांगितलं. ''तुम्ही या भागात नवे आहात म्हणून तुम्हाला माहीत नाही. राजवाड्यातील मोकाट सुटलेल्या या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी अनेकांनी नगरपालिकेत पत्रे लिहली, खेटे घातले पण व्यर्थ. म्हणून तर वसाहतीमधील कोणीच पहाटे या पटांगणात जात नाहीत!''

काही दिवसानी एक ज्येष्ठ मित्र म्हणाला. ''खरं सांगू? या वयात आपण व्यायामापेक्षा डायटिंग करावं हे उत्तम. तू दिवसाचं जेवण सोड. फक्त रात्री एकदाच जेव. ते सुद्धा मी सांगेन तेवढंच. दिवसा अगदी असह्यच झालं तर मोड आलेले मूग, मटकी खायचे आणि पाणी प्यायचे.'' हा उपाय मला ठीक वाटला. मूग-मटकीचा वाससुद्धा मला सहन होत नव्हता. पण प्राणप्रिय नातवाच्या मनात आजोबांची टवाळी यावी हे पण सहन होण्यासारखं नव्हतं. म्हणून नेटाने मी डायटिंग चालू ठेवलं. मला तरी, पोट आता हळूहळू कमी होतंय असं वाटत होतं. पण सुज्ञपणे कुणाला विचारलं नाही. उगाच टवाळकीला आमंत्रण! पंधरा एक दिवसातच मी कंटाळलो. मूग गिळून किती दिवस गप्प बसायचं? मग एक मित्र म्हणाला, ''असलं डाएटिंग वगैरे चुकून करु नकोस हं.'' मला 'सुटका' दिसू लागली. मी विचारलं, ''का रे बाबा? हे तर प्रकृतीला फार चांगलं असं म्हणतात.'' तो म्हणाला, ''अरे वेडा आहेस का? या वयात भूक मारली ना तर पुन्हा भूक लागायचीच बंद होते. डॉक्टरांची औषधं घेऊन सुद्धा भूक पहिल्यासारखी लागत नाही. मग आपला 'इनटेक' कमी झाला की आपली एनर्जी कमी होते. कुठं तरी पडशील बघ रस्त्यात.'' आता एवढं आपुलकीने आजकाल कोण सांगतोय? मी तत्क्षणी मूगमटकीला सोडचिठ्ठी दिली.

सध्या माझी स्थिती कुरुक्षेत्रावर भांबावलेल्या अर्जुनासारखी आहे. आपलं नेमकं 'कर्तव्य' कोणतं? कोणतं 'कर्म' केलं म्हणजे या पापी पोटापासून आपली सुटका होईल या संभ्रमात मी पडलेला आहे. कोण म्हणतं गोड सोड. कोण म्हणतं तेलकट सोड. कोण

म्हणतं एक वेळंचं, तर कोण म्हणतं जेवण अजिबात वर्ज्य कर आणि दूध आणि फळं एवढाच आहार ठेव. मी एक बघितलंय. आपल्याकडे बाकी वस्तुंचे कितीहि तुटवडे पडोत पण सल्ला देणारांचा तुटवडा कधीच पडत नाही. त्यातहि विशेष म्हणजे प्रत्येकजण आपलाच सल्ला कसा बिनतोड आहे हे अगदी छातीठोकपणे सांगत असतो. तेव्हा या मतामतांच्या गलबल्यात मी पार गडबडून गेलो आहे.

तुमचा काय सल्ला आहे?

❖❖❖

# २०. ईश्वरी शापित

एक सफाईदार वळण घेऊन टॅक्सी हॉस्पिटलच्या पोर्चमध्ये उभी राहिली. प्रवेशद्वारापाशी असलेल्या श्री गजाननाच्या भव्य मूर्तीपाशी सुमती हात जोडून भक्तीभावे उभी राहिली. मी कधी पूजा-अर्चा करीत नसे. ते सगळं सुमतीकडे लागलं होतं. सतत कार्यमग्न असणाऱ्यांना देवपूजेसाठी कुठं वेळ मिळतो असं मी तिला चिडवायचा. बुद्धिवादी म्हणवून घेण्यात मला प्रौढी वाटायची. पण आयुष्यात सगळ्याच गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नसतात. बुद्धिवादाच्या कसोटीवर त्या घासता येत नाहीत ह्याची मला या आजारात प्रकर्षाने जाणीव झाली. मी पण मनोभावे गणेशमूर्तीसमोर उभं राहून प्रार्थना केली.

माझा बेड हॉस्पिटलच्या आठव्या मजल्यावर होता. रुम अगदी कडेची होती. मोठी प्रशस्त आणि हवेशीर होती. माझ्या रुममध्ये आणखी एक बेड दिसत होता. हॉस्पिटलचे सारे सोपस्कार होईपर्यंत संध्याकाळचे सात वाजायला आले. व्हिजिटिंग अवर्स संपल्याची जोरदार बेल झाली, तशी पेशंटना भेटायला आलेल्या मंडळींची लगबग उडाली. सुमतीला निघणे भाग पडले. मला एकट्याला सोडून जाणे तिच्या जीवावर आलं होतं, पण इलाजच नव्हता. ऑपरेशन होईपर्यंत तरी मला स्वतंत्र रुम मिळणार नव्हती. सुमतीला लिफ्टपर्यंत पोहोचवून मी माझ्या बेडशी आलो. सिस्टरने दिलेल्या गोळ्या घेतल्या. वॉर्डबॉयने भरून ठेवलेल्या स्वच्छ काचपात्रातून पाणी घेतलं. थोड्या वेळाने कंटाळा आला म्हणून उठलो. पश्चिमेच्या बाजूला छोटीशी गच्चीवजा बाल्कनी होती. तिथं खुर्ची ओढून बसलो.

संध्याकाळ होऊन सूर्यास्त झाला होता तरी अजून चांगला संधिप्रकाश होता. समुद्रावरच्या थेट येणाऱ्या गार वाऱ्यामुळे जूनमधील उकाडा तिथं जाणवत नव्हता. दूरवर क्षितिजरेषा अगदी स्पष्ट दिसत होती. आकाशात निसर्गाने सप्तरंग उधळून दिले होते. त्या विविधरंगी ढगांच्या पडछाया समुद्रपृष्ठांवर पडल्या होत्या. समुद्र शांत दिसत होता. इतका की त्यामुळे सारी जहाजे, गलबते, होड्या एखाद्या निर्जन रस्त्यावर उभ्या कराव्यात तशा दिसत होत्या. मध्येच माझे लक्ष आकाशातून डौलात उडत जाणाऱ्या विमानाकडे गेले. त्याचे उघड-झाप करणारे लाल-हिरवे दिवे जणू मला वेडावत होते.

अशाच एखाद्या विमानातून मी माझ्या आवडत्या इंग्लंडकडे झेपावणार होतो. पण कसचं काय? उंच उंच विहरणाऱ्या माझ्या नशीबाची दोरी दैवाने कटकन् कापली आणि.... मी या हॉस्पिटलच्या बेडवर येऊन कोसळलो!

''साब, आपका टेंपरेचर लेना है।'' सिस्टरच्या शब्दांनी मी भानावर आलो. सिस्टरने थर्मामीटर लावला. नंतर ब्लड-प्रेशर घेतलं. एका चार्टवर नोंद करून तो तेथेच कॉटला अडकवला. बाजूला तांबडा बिल्ला लावला होता. त्यावर लिहि ने होते 'No salt.' सारं जीवनच खारट झालं होतं तिथं आता या आळणी जेवणाचं काय? थोड्या वेळाने वॉर्ड-बॉय आला.

''साब, अपना कपडा बदली करो.''

मी माझा नेहमीचा पँट-बुशकोट काढून ठेवला. हॉस्पिटलचा पांढरा डगला चढविला. मनात म्हटलं, ''परमेश्वरा, हा डगला किती दिवस मी अडकवून बसणार आहे? माझी सुटका सुखरूपपणे होईल ना या डगल्यातून? माझ्याच हातांनी मी हा कुडता-पायजमा उतरुन घरी जाईन ना? का? का...?'' त्या भयानक शंकेसरशी माझ्या अंगावर सरसरून काटा आला.

हॉस्पिटलमधील ती पहिली रात्र मी अत्यंत अस्वस्थतेत घालवली. आई-वडील, भाऊ-बहिणी यांच्यासाठीची सारी कर्तव्ये, बिनतक्रार पार पाडली. सगळ्या विवंचना बिनबोभाट झेलल्या. परमेश्वराने पोटी संतान दिलं नाही. ते दु:खही स्वीकारलं. अनितीनं वागून ऑफीसात अमाप पैसा चारचौघांसारखा करता आला असता, पण तसा विचारसुद्धा कधी मनाला शिवला नाही. नेकीनं केलेल्या कामाचं ऑफिसात चीज झालं होतं. ऑफिसतर्फे इंग्लंडला एका वर्षाच्या प्रशिक्षणासाठी जाण्याची संधी मला प्राप्त झाली होती. मी हरकून गेलो होतो. इंग्रजी माणूस आणि त्यांच्या लोकशाही परंपरा, त्यांचे वाङमय हा माझ्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. साता समुद्रापलीकडून येऊन मूठभर लोकांनी आमच्यावर वर्षानुवर्षे अधिसत्ता गाजवावी, ह्यात त्यांच्या शहाणपणाचा भाग अधिक की आमच्या मूर्खपणाचा, याचे मला नेहमी कुतूहल वाटे. त्याच औत्सुक्यापोटी मी जेवढे म्हणून वाचता येईल तेवढे वाचले होते. आणि अशा या इंग्लंडमध्ये मला जायला मिळत होतं; जवळून सारं काही पाहण्याची, अभ्यासण्याची सुवर्णसंधी आली होती. मी मनाशी प्रथमच स्वत:साठी काही आशा धरली आणि अशा नेमक्या वेळी दैवाची माशी कशी शिंकली, का शिंकली? ते एक तो देवच जाणे! मी मात्र या हॉस्पिटलच्या तुरुंगवासात येऊन अडकलो खरा.

सुमती, नातेवाईक, मित्रमंडळी भेटायच्या वेळेत येत. तेव्हा वरकरणी मी सर्वांशी हसून बोलायचा. उसनं अवसान आणून उत्साह दाखवायचा पण मनातून मी फार

चिडचिडा झालो होतो. पहिले दोन-चार दिवस मी माझ्या 'कोशातून' बाहेरच पडत नव्हतो. मग जरा हळूहळू इतर वॉर्डस्‌कडे लक्ष जायला लागले. माझ्या वॉर्डमध्ये माझ्यासारखे दोन-तीन वयस्क सोडले, तर इतर सारे पेशंटस् एक तर तरूण होते, नाही तर लहान लहान मुलं होती. डॉक्टरांचे राऊंडस् होत. त्यांच्याबरोबर असिस्टंट डॉक्टर्स, सिस्टर्स ह्यांचा मोठा फौजफाटा असे. एकदा मेट्रनचा राऊंड होई तेव्हा सगळ्या स्वच्छतेकडे तिचे करडे लक्ष असे. कुठे काही कमीजास्त दिसले की ती खूप मोठमोठ्याने आरडाओरडा करी. रक्त तपासणीसाठी हॉस्पिटल स्टाफ येई. पोरं रक्त घेताना किंचाळून रडत असत. त्यांच्या आया डोळ्यातून पाणी काढत. व्हील चेअरवरून कोणाला एक्स-रे, ई.सी.जी. साठी बाहेर काढलं जाई, तर कधी कॅथेड्राईनसाठी. आमच्या वॉर्डच्या एका टोकाशी ऑपरेशन थिएटर होते. स्ट्रेचरवरून पेशंटला तेथे नेले जाई; तोपर्यंत स्ट्रेचरवर पडल्यापडल्या त्याच्या मनाची काय उलाढाल होत असेल? ऑपरेशन झाल्यावर पेशंटला स्ट्रेचरवरूनच जवळच्याच इंटेसिव्ह केअर युनिटमध्ये नेले जाई. नाकाला नळ्या, ऑक्सिजनची सिलिंडर्स, हाताला सलाईनची बाटली वगैरे ती 'शोभायात्रा' बघितली की मनाचा थरकाप उडे. मी मनोमन एवढा भीतीने गांगरून गेलेला असायचा, पण वॉर्डमध्ये तर सारी मंडळी कशी मजेत दिसायची. हास्य-विनोद करायची. गप्पा छाटायची. जशी काय पिकनिकसाठीच एखाद्या लॉजवर येऊन उतरावीत तशी. मला त्यांचा हेवा वाटायचा. त्यांच्यात कोणीतरी मनोहरन् म्हणून केरळी तरुण होता. अस्खलीत मराठीत, हिंदीत बोलायचा. त्याची सगळ्यांशी दोस्ती दिसत होती. हृषिकेश मुखर्जींच्या 'आनंद'च्या नायकासारखाच आनंदी आणि उत्साही दिसायचा. सगळीकडे आनंदाची उधळण, हास्याची पखरण करत साऱ्या वॉर्डमध्ये त्याचा संचार असायचा!

एकदा तो माझ्याकडे सुरी मागायला आला. समोरच्या पेशंटला, चित्राला सफरचंद कापून द्यायची होती. मी सुरी दिली.

''काय होतय् चित्राला? तुझी कोण नातेवाईक तर नाही?''

''भाईसाब, इथं सगळ्यांचा आजार एकच तो म्हणजे 'हा'.'' छातीवर हात ठेवीत तो म्हणाला.

''आणि नातं म्हणाल तर सगळ्यांचे 'हृदयापासूनचे' संबंध! दर्द का रिश्ता!''

मला त्याच्या बोलण्याची गंमत वाटली. खरंच सगळ्या हार्ट-पेशंटस्‌चा वॉर्ड. तेव्हा सगळ्यांचीच दुखणी हृदयाची. ती सारीजणं याच एका नात्यानं एकमेकात गुंतून गेली होती. थोडी ओळख झाल्यावर मनोहरनने मला विचारले,

''भाईसाब, तुम्हाला काय तकलीफ आहे? हार्टला होल आहे, का हृदयातली झडप बदलायची आहे?'' एखाद्याला सायकल दुकानदारानं पंक्चर वगैरे विचारावं इतक्या सहजपणे तो विचारत होता. माझ्या आजाराविषयी मला स्वत:ला एक शब्दसुद्धा बोलायला नको वाटायचा. पण इथं तर मरणयात्रेच्या मार्गावर तंबू ठोकूनच ही माणसं जमली होती! कुणी कुणापासून काय लपवायचं? मी मनोहरन्‌ला माझी सारी हकीगत सांगितली.

''बायपास्‌ सर्जरी? अगदीच किरकोळ. उगाचच तुम्ही एवढे घाबरून बसलात! शहा, सक्सेना, एकापेक्षा एक बडे बडे निष्णात सर्जन्स आहेत इथं. बायपास सर्जरी एखाद्या टॉन्सिल्सच्या ऑपरेशनसारखी समजा तुम्ही.'' त्याच्या बोलण्याने नाही म्हटलं तरी माझी बरीच भीती कमी झाली होती.

''आता उद्यापासून या वॉर्डमध्ये आपण फिरत जाऊ. एकमेकांची ओळख होईल आणि दुखण्यांची पण.''

मग खरोखरच दुसऱ्या दिवसापासून दुपारची जेवणं झाली की मनोहरन्‌ बरोबर माझा 'राऊंड' सुरू होई. तीन महिने बिछान्याला खिळलेली 'चित्रा' बघितली. हैद्राबादची आठ वर्षांची कोवळी गोड मुलगी 'ममता' बघितली. त्यांचे तर मुंबईत कोणीच नव्हतं. आईला ममतापाशी राहायला मिळायचं पण बाप बिचारा एका जैन धर्मशाळेत राहायचा. फुलके-भाजी खायचा. तसाच एक डबा बायकोला आणायचा. मुंबईची माहिती नाही. रस्ते क्रॉस करायला जमायचे नाही. बस नंबर कळायचे नाहीत आणि टॅक्सी परवडायची नाही. बरं ऑपरेशन्‌ केव्हा होणार? ते पण डॉक्टर लागलीच सांगायचे नाहीत. अगदी इमर्जन्सी नसेल तर सगळ्या पेशंटस्‌ना ऑपरेशन ठरण्यापूर्वी कमीत कमी एक महिना 'ऑब्जर्व्हेशनखाली' रहावेच लागे. त्यातून ठरलेल्या तारखेला ऑपरेशन होईलच याची शाश्वती नसे. कधी एखादी 'इमर्जन्सी' केस उपटायची. पाच वर्षांच्या मनोजला ऑपरेशन करायचं म्हणून उपाशी ठेवलं होतं. सारखा खायला मागायचा. आई-वडील, भाऊ-बहीण कुणाचं ऐकेना. रडून रडून सारा वॉर्ड डोक्यावर घेतला. मनोहरन्‌ने छान छान गोष्टी सांगत त्याला दोन तास रमविले; पण गोष्टी ऐकून त्याचे पोट थोडेच भरणार? आणि इतके करून पहिले ऑपरेशन, काही कॉंप्लिकेशन्स्‌ निर्माण झाल्यामुळे लांबणार असे दिसल्यावर डॉक्टरांचा १२ नंतर निरोप आला की मनोजचे ऑपरेशन्‌ कॅन्सल! दूरगावाहून आलेले नातेवाईकपण मग परत गेले. नागपूरच्या १४-१५ वर्षांच्या राजकुंवरची कथा तर अगदीच वेगळी. चित्राची त्याहून दर्दभरी. अमोलबद्दल तर काय सांगावं नि किती असाच प्रश्न. हळूहळू मी सगळ्यांमध्ये रुळावलो. मनोहरन्‌च्या बरोबरीने मी सगळ्या वॉर्डमधील पेशंटस्‌कडे वडिलकीच्या नात्यानं बघू लागलो. स्वत:च्या दु:खातच गुरफटून बसण्याची माझी प्रवृत्ती आपोआप कमी झाली.

त्या दिवशी रविवार होता. ऑपरेशन्स नसल्याने नेहेमीची धावपळ नव्हती. मी माझं आवडतं पुस्तक "Towards the Silver crescents of Himalayas' वाचत बसलो होतो. तेवढ्यांत चित्राच्या वॉर्डमधून खूप आरडाओरडा ऐकू आला. चित्रा हुडहुडी भरून नुसती उडत होती. तिला कापरं भरलं होतं. अंगावर सगळीकडे रॅश उठला होता. सिस्टर्स तिला ऑक्सिजन लावत होत्या. मी चित्राला थोपटत बसलो. मनोहरन्ने तिच्या बेडभोवतीची गर्दी दूर केली. चित्राच्या आईला तो समजावत बसला. थोड्या वेळाने चित्रा पूर्णपणे शुद्धीवर आली. आम्ही आपापल्या वॉर्डात परतलो.

मी बेडवर बसलो. मनोहरन् खुर्चीत. पलीकडे राजकुंवरचे वडील बसले होते. मनोहरन् म्हणाला,

''आज सकाळीच चित्राला रक्ताची बाटली लावली होती. कधीकधी आपलं शरीर असं बाहेरून दिलेलं रक्त रिजेक्ट करते अन् रक्त नीट सूट झालं नाही की मग अशी रिॲक्शन येते.''

राजकुंवरच्या वडिलांनी विचारलं,

''चित्राला असा त्रास तर कसला आहे.'' तेव्हा मनोहरन् म्हणाला,

''सहा-सात महिन्याखाली तिची ओपन हार्ट सर्जरी झाली. तिला कृत्रिम झडप बसविली आहे. ऑपरेशन चांगलं होऊन आपल्या पायांनी ती घरी गेली. ऑफिसात जायला लागली.''

''चित्रा नोकरी करते? केवढी लहान मुलीसारखी दिसते.''

''भाई, तुमचा विश्वास बसणार नाही. चित्रा चांगली २४ वर्षांची आहे. कॅनरा बँकेत नोकरी आहे. एकदा बँकेच्या टीममधून खेळता खेळता अचानक पडली. भोवळ आली. रक्ताची उलटी झाली. आणि हे दुखणं मागं लागलं. गेल्या ऑगस्टमध्ये तिची एक झडप बदलली. तीन महिने हॉस्पिटलमध्ये काढून आपल्या पायांनी आनंदात घरी गेली. मधले काही महिने बरे गेले; पण मग नंतर एकसारखा ताप यायला लागला, भूक मंदावली, वजन झपाट्याने खाली यायला लागलं. कोणत्याही औषधांची मात्रा चालेना म्हणून पुन्हा इथे ॲडमिट् केलं. ती नवीन बसविलेली फॉरेनची व्हॉल्व तिच्या शरीराला सूट होत नाही.

'डॉक्टर काय म्हणतात?''

''काय म्हणणार? एकदा ओपन हार्ट सर्जरी केली की पुन्हा करणं कठीण. त्यातून चित्रा अगदीच खंगलीय. सारख्या रक्ताच्या बाटल्या लावाव्या लागतात. डॉक्टर वेगवेगळे प्रयत्न करून बघतात. बघा, कशी एखाद्या शाळकरी मुलीसारखी दिसतीय बिचारी.''

चित्राला झोप लागली अन् मग आम्ही तिथून उठलो. माझ्या वॉर्डात शिरता-शिरता मनोहरन् म्हणाला,

''तो गोरटेला अनिल तिला भेटायला येतो, तो माहित आहे ना?''

'हो', चित्राचे आई-वडील, बहिणी, सारीजणं आता माझ्या माहितीची झाली होती.

''त्या अनिलबरोबर चित्राची एंगेजमेंट व्हायची होती.''

''म्हणजे? आता...''

''तो काय करणार? सर्वांनी त्याची समजूत काढली. अशा दुखणेकरी मुलीशी लग्न करु नको म्हणून. पण अजून त्याची समजूत पटत नाही. फार निष्ठावान आहे. चित्रावर त्याचं मनापासून प्रेम आहे. आजकाल असे तरुण दिसणं कठीण. सगळे तू नही तो और सही म्हणणारेच जास्त.''

''चित्राला कल्पना आहे?''

''बहुधा नसावी. पण ती शहाणी, समंजस आहे. ती जरा बरी झाली की स्वत:च त्याला समजावेल.''

तेवढ्यात मनोहरन्‌ला शोधत अजयची आई आली. सकाळपासून बाथरुमला तिचा अंघोळीसाठी नंबरच लागत नव्हता. आता लागला तशी अजयच्या आणि तिच्या कपड्यांचं बोचकं घेऊन ती बाथरूमकडे निघाली होती. तिच्या एक वर्षाच्या अजयजवळ बसून त्याला थोपटत बसायचं काम आता मनोहरन्‌कडे होतं.

मी पुन्हा पुस्तक हातात धरलं, पण पुस्तकात मनच रमेना. आजूबाजूला पसरलेली दु:खाची दुनिया मला अगदीच अनोखी होती. किती किती कोवळे जीव मरणाच्या दारात उभे होते. ओपन हार्ट सर्जरी (fallots tetralogy) झालेला आणि ऑपरेशननंतर गेले चाळीस दिवस बेशुद्ध, कोमामध्ये असलेला चार वर्षांचा मनोज. कधी तरी तो कोमातून बाहेर येऊन पूर्वीसारखी आपल्याला 'आई' म्हणून हाक मारेल अशा वेड्या आशेने चोवीस तास त्याच्या शेजारी बसणारी त्याची आई. जसा काही मनोज जागाच आहे असं समजून ती त्याच्याशी गप्पा मारायची, हलक्या आवाजात अंगाई म्हणायची, टेपरेकॉर्डरवरील त्याने म्हटलेली बोबड्या आवाजातील गाणी ऐकवायची, सिस्टरच्या बरोबरीने त्याच्या नाकातून घशात घातलेल्या नळीतून दूध पाजवायची, मोसंब्याचा रस द्यायची. राजकुंवरची तर कथाच वेगळी. तिच्या शरीरात असा काही विचित्र दोष होता की एखादी किरकोळ जखम होऊन रक्त यायला लागलं की थांबायचंच नाही. खवलीच धरली (clot formation) जायची नाही. तिच्या हृदयातील एक झडप पूर्णपणे

निकामी होती. ती बदलायची होती तर दुसरीचा पॅसेज अगदी अरुंद होता, तो रुंद करायचा होता. ऑपरेशनला २५-३० हजार रुपये तरी खर्च येणार होता. वडील नागपूरला पोस्टात. कुठून कुठून पैसे उभे करण्यासाठी त्यांचा खटाटोप चालला होता. आणखी राजकुंवरच्या पाठीशी दोन-तीन भावंडं होती. १६ वर्षांच्या राजकुंवरला आई-वडिलांचे हाल बघवेनात, म्हणून एकदा ८व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्त्या करायचा तिने प्रयत्न केला, पण वॉर्डबॉय गोविंदाच्या जागरुकतेने तिचा प्रयत्न फसला. दिवसभर तिचे आई-वडील तिला पोटाशी धरून ओक्साबोक्सी रडत होते.

जयपूरच्या किसनलालची आई म्हणाली तेच खरं होतं. तिच्या आठ वर्षांच्या किसनलालचं ऑपरेशन व्हायचं होतं. किसनलालचे वडील जयपूरला होते. टूरीस्टबरोबर हिंडून गाईडचं काम करीत. पैसा मिळविण्यासाठी त्यांना तेथेच राहाणं भाग होतं. इथे हॉस्पिटलमध्ये आई एकटीच रहायची. छोटा किसन एकदम गोड मुलगा होता. काळेभोर लांब केस आणि बोलके मोठे काळेभोर डोळे. सगळ्यांना जयपूरला यायचं आमंत्रण द्यायचा. दद्दाजींबरोबर हिंडून सारा राजपूताना दाखवीन म्हणायचा. बोलता बोलता त्याची अर्धशिक्षित आई एकदा म्हणाली,

''ही सगळी छोटी छोटी, प्यारी प्यारी मुलं बघितली की त्या परमेश्वराचा रागच येतो. त्यानंच या सर्वांना 'शाप' देऊन या जगात पाठवलं. माणसानं माणसांना छळलं, लुबाडलं तर बोलता येतं, रागावता येतं, चार शिव्या घालता येतात. पण ईश्वरानेच शाप देऊन पाठविलेली ही मुलं. काय बोलायचं त्या ईश्वराला?

खरंच किती सार्थ होतं तिचं बोलणं! प्रमोशनच्या मार्गात आडवा आला म्हणून आपण साहेबाला शिव्या घालतो. डिपॉझिट-पागडी कमी करत नाही म्हणून घरमालकाला बोल लावतो. पैसे घेऊन फसवलं म्हणून बिल्डरचे आई-वडील उद्धारतो, कोर्टात जाऊन दाद मागतो. माणूस माणसावर डाफरू शकतो. पण इथं तर सारं भांडणच परमेश्वराबरोबर! असा 'हृदयावरच घाव' घालायचा होता, तर या बालकांना जन्माला तरी कशाला घालावे? तो एक वर्षाचा अजय; त्याची देखणी आई. उमदा तरुण बाप. गडगंज श्रीमंती उतू जातेय्. पहिलाच मुलगा. किती कौतुकाचा आणि त्यांच्या नशीबी ही अवस्था? काय हिशेब असतात परमेश्वराकडे? त्याचा तोच जाणे!

विचार करता करता केव्हातरी मला डुलकी लागली. पण सगळ्यांच्या आरड्याओरड्याने जाग आली. मनोहरन् अजयजवळ बसला होता. कसल्यातरी आवाजाने अजय एकदम जागा झाला. आई जवळ दिसली नाही म्हणून मोठमोठ्याने रडायला लागला. मनोहरन्ने बाथरूमशी त्याला नेले. आतून आईने 'अजय मैं अभी आयी' करत आवाज दिला. पण ती काही पटकन् आवरून बाहेर येऊ शकली नाही.

तेवढ्या अवधीत अजयने डोळे फिरविले. बघता बघता काळानिळा पडून बेशुद्ध झाला. सिस्टर्स धावल्या. असिस्टंट डॉक्टर आला. ऑक्सिजन लावला आणि अजयला ताबडतोब इंटेंसिव्ह केअर युनिटमध्ये नेण्यात आले. अजयची आई रडत होती. सारेजण तिची समजूत काढत होते. तासाभरानंतर अजय शुद्धीवर आल्याचे सिस्टरने सांगितले, तेव्हां ती शांत झाली.

एकदा दुपारी केव्हातरी मनोहरन् म्हणाला म्हणून मी चित्राजवळ बसलो होतो. त्याची कसलीशी टेस्ट व्हायची होती. चित्राला मासिकातील एक-दोन कथा वाचून दाखविल्या. तिचे दादा सांगत तशा इकडच्या तिकडच्या गंमती-जंमती सांगितल्या. जराशी हंसली. थोडी थोडी बोलायला लागली. इतकी की मग थांबेच ना. तिलाच झेपणार नाही, बोलण्याच्या श्रमाने थकवा येईल म्हणून मी तिला थांबवत होतो. पण ती अजिबात ऐकायला तयार नव्हती. सगळं बोलायची जणू तिला घाई झाली होती. आपला सगळा जीवन-वृत्तांत सांगत ती म्हणाली,

''आमचे दादा आता फार दमतात हो काका. माझ्या आजाराने खूप थकलेत. रोज ठाण्याहून लोकलने ये-जा त्यांना झेपत नाही. माझ्या आजाराने सारं कुटुंबच आजारी झालंय. सगळेच कंटाळलेत. केव्हा एकदा सगळं संपेल असं मला झालंय.'' बोलता बोलता चित्राच्या डोळ्यांत पाणी जमा झालं! तिच्या मस्तकावरून हलकेच हात फिरवत मी म्हटलं,

''चित्रा, तू शहाणी ना? जरा धीर धर. डॉ. शहा बघ तुझ्यासाठी किती धडपडत आहेत? त्यांच्यावर विश्वास ठेव. तू नक्की लवकर बरी होशील आणि तुझ्या अनिलबरोबर संसाराला लागशील.''

''काका!'' एकदम काहीशा निश्चयाने चित्रा उठू लागली. तिला उशीचा आधार देत मी बसवले. नीट बसल्यावर चित्रा म्हणाली,

''काका, माझं एक काम कराल?''

''हो, अवश्य.''

''काका, या आजारातून आता मी नक्कीच उठत नाही. अनिलला तुम्हीच समजवा. फार हळवा आहे तो. लौकरात लौकर त्याला अनीताशी लग्न करायला लावा.''

''ही अनीता कोण?''

''माझ्याच ऑफिसातील माझी मैत्रीण आहे. तिलापण अनिल मनापासून आवडतो. पण माझ्याशी ठरलं म्हणून ती गप्प राहिली. तुम्हीच पुढाकार घ्या. घ्याल ना काका?''

मला मनाशी हसू आलं. एक मरणाच्या दारात! दुसरा वाटचाल करतोय!! आणि त्याला ती मित्राच्या लग्नाच्या कामात पुढाकार घ्यायला सांगत्येय. पण यातलं काहीच न दर्शविता मी म्हटलं,

''चित्रा, काही वेडावाकडा विचार मनात आणू नकोस. तू लौकरच चांगली बरी होशील.''

पण आता चित्राचं माझ्याकडे, माझ्या बोलण्याकडे लक्षच नव्हते. स्वत:शीच बोलल्याप्रमाणे तिचे स्वगत चालू होते. बराच वेळ बोलायला लागली तेव्हा मी सिस्टरला बोलावले. तिच्या मदतीने चित्राला झोपवले. सिस्टरने तिला कसलंसं इंजेक्शन दिले. एखाद्या लहान अजाण बालकासारखी ती शांत झोपली होती. अर्धवट हसल्यासारखी दिसत होती. मी तिची चादर नीट केली आणि हलकेसे थोपटून माझ्या वॉर्डात बेडवर येऊन पडलो.

त्या रात्रीच चित्रा गेली. अगदी शांतपणे. सर्वांना वाईट वाटले. पण माझ्याखेरीज सर्वांनाच ती गोष्ट समजल्यासारखी होती. त्या मानाने मलाच तिचा मृत्यू अनपेक्षित होता.

•••

दोन तीन दिवस गेले. हॉस्पिटलचे रुटीन चालूच होते. वातावरणात मात्र उदासीनता होती. रोजच्या गप्पात थोडा खंड पडला. समोर कुणी आलं तरी प्रत्येकजण काहीतरी जुजबी बोलून निरोप घेई. दुपारी जेवणानंतर मनोहरन् माझ्याकडे आला तेव्हा मला जरा बरे वाटले.

''भाई, चला. जरा तळमजल्यावरच्या गणपतीपर्यंत जाऊन येऊ.'' त्याचा चेहरा नेहमीइतका प्रसन्न नव्हता. काही न बोलता मी मान हलविली. सिस्टरला सांगून आम्ही लिफ्टने खाली आलो. गणेशाच्या भव्य मूर्तीसमोर बसलो. मनोहरन् पद्मासन घालून बसला. गणपतीच्या मूर्तीला भला मोठा हार त्याने घातला. उदबत्ती लावली. आणि थोडा वेळ शांतचित्त बसला. नंतर आम्ही तिथल्याच एका बाकावर बसलो. शांतपणे तो म्हणाला,

''भाई, उद्या माझे ऑपरेशन आहे.''

''आँ? मग आधी बोलला नाहीस?''

''डॉक्टरांनी तसं चार-पाच दिवसांपूर्वी सांगितलं, पण आजच कन्फर्म केलं.''

''ऑल द बेस्ट मनोहरन्. सगळं व्यवस्थित होईल.'' मी त्याच्या पाठीवरुन हात फिरवीत म्हणालो.

''भाई, सगळं व्यवस्थित झालं पाहिजे. पण माझं नाही, तर त्या मनोजचं!''

माझ्या प्रश्नार्थक चेहऱ्याकडे पाहात तो पुढे म्हणाला,

''भाई, तुम्हाला माहीतच आहे, केरळातील एक अनाथ मुलगा मी. या अफाट विश्वाच्या पसाऱ्यात खरं म्हणजे केव्हाच मी संपून जायचा. पण तुमच्यासारख्या एका भल्या कुटुंबात राहिलो. त्यांच्या आश्रयाने वाढलो, शिकलो. मुंबईत नशीब काढण्यासाठी आलो. चांगली नोकरी मिळाली. लग्न करून संसार करायचा विचार मनात यायला आणि हा आजार उद्भवायला गाठ पडली. माझ्यासाठी आता पाठीमागे रडणारं कोणी नाही. मी आत्ताच गणपतीला सांगितलं की मला 'ने' पण त्या मनोजला लवकर बरा कर.'' मनोहर शांत होता. मलाहि शांततेचा भंग करवेना.

''चला भाई, वॉर्डात जाऊ. परमेश्वराला मी साकडंच घातलय्. हट्टच धरलाय्. मला तुझ्याकडे घेऊन चल. पण त्या चाळीस दिवस बेशुद्ध असलेल्या मनोजला शुद्धीवर आण. त्याला वाचवा. भाई, खरंच परमेश्वराने असं केलं तर या गणपतीपुढे माझ्यावतीने पेढे ठेवा. मोठ्ठा हार घाला त्याला.''

दुसरे दिवशी मनोहरन्चे ऑपरेशन झाले. आणि त्याची इच्छाशक्ती बलवत्तर ठरली. तो गेला. हसतमुखाने ऑपरेशन थिएटरकडे जाणारी मनोहरन्ची मूर्ती माझ्या डोळ्यांसमोरून हलेच ना. ''वासांसि जीर्णानी यथा विहाय... किंवा जातस्य ध्रुवो मृत्यू.'' हे सारं आम्ही वाचलेलं. पण अंगावरचा कपडा अगदी सहजतेने फेकून द्यावा तसं त्यानं आपलं शरीर परमेश्वरचरणी अर्पून टाकलं!

साऱ्या वॉर्डभर खिन्नता पसरली. सारीजण शोकमग्न होती. त्याच्या भाषेत म्हणजे त्याचे सगळ्यांशीच 'हृदया'पासूनचे संबंध होते. कुणाचा भाऊ, कुणाचा मुलगा, कुणाचा अंकल असा प्रत्येकाचाच तो नातेवाईक होता. दोन दिवस भयाण शांततेत गेले. प्रत्येकजण समाचाराला यावं तसं माझ्याकडे येई इतकी त्याची माझी जवळीक सर्वांच्या परिचयाची झाली होती. मनोहरन्च्या आठवणी सांगत. मनोजची आई तर सर्वांपेक्षा अधिक रडत होती. आता तिला धीर देणारं कोणीच उरलं नव्हतं. स्फुंदत स्फुंदत ती म्हणाली,

''भाई, काय सांगू तुम्हाला त्याच्या आठवणी? मनोज त्याचा जीव की प्राण होता. काय दोघांची गट्टी जमायची देव जाणे? हॉस्पिटलचा स्टाफ जेव्हा रक्त घ्यायला येई तेव्हा मनोज रडून रडून सारं हॉस्पिटल डोक्यावर घेई. मग मनोहरन् त्याला मांडीवर घेई. थोपटून थोपटून गंमती सांगे. आणि स्टाफला खूण करी. मग ते लोक केव्हा सुई

खूपसून ब्लड काढत ते मनोजला कळायचं पण नाही. इतका मनोहरन् त्याला गोष्टीमध्ये गुंतवून टाकत असे! कधीकधी मनोज हॉस्पिटलला खूप कंटाळायचा. सारखं घरी चल म्हणून रडायचा. मग मनोहरन् त्याला १२व्या मजल्यावर फिरायला घेऊन जाई. ते मोठे क्रिकेटचं गरवारे स्टेडियम दाखवी. तुला मोठा क्रिकेटीयर व्हायचंय ना? मित्रांत तुला खूप खेळायचंय ना? मग घरी जाऊन कसं चालेल? इथले डॉक्टर्स तुला चांगलं बरं करणार आहेत. मग तुला खेळतांना, धावतांना आत्ता लागते तशी धाप मुळीच लागणार नाही. सगळ्यांसारखा तू खेळशील.''

''खरंच अंकल.'' मनोजला सारं पटायचं. आणि मग घरी जाण्याचा त्याचा हट्ट थांबायचा. खरंच भाई, जगात कुणाकुणाचे कसे कसे ऋणानुबंध असतात देव जाणे.''

त्यानंतरच्या दोन दिवसातील गोष्ट. दुपारच्या गप्पा आता पूर्णपणे थांबल्या होत्या. तरी कलकलाट ऐकू आला म्हणून मी वॉर्डातून बाहेर आलो. मनोजच्या वॉर्डमध्ये गर्दी जमली होती. माझ्या मनात चर्रर झालं! मी वॉर्डात गेलो तर सगळी आनंदात हसत होती. मनोजची आई त्याच्या बेशुद्धावस्थेतच नेहमीप्रमाणे त्याला गोष्ट सांगत होती; आणि कोकणातल्या फुकटात नारळ मिळविणाऱ्या त्या 'भटो भटो कोकणातल्या' वाल्या भटाची कथा ऐकताना मनोज अर्धवट हसला! नेमका त्याच वेळी मेरी सिस्टरचा राऊंड चालला होता. तिने मनोजच्या डोळ्यासमोर आपलं हातातील रिस्टवॉच धरलं. तिने सांगितले त्याप्रमाणे मनोजच्या आईने मनोजला मोठमोठ्याने हाका मारीत म्हटले. ''मनोज, ए मनूऽ हे घड्याळ बघ. मेरीमावशी तुला देतीय्.'' अन् काय आश्चर्य! मनोजने चक्क हात उचलून घड्याळ पकडण्याचा प्रयत्न केला; नि थोड्या वेळाने ते पकडले सुद्धा! मग सगळ्यांचा हाच खेळ चालू होता. कुणी म्हणायचं मनोज चेंडू पकड, तर कुणी म्हणायचं मनोज भांडं पकड आणि मनोजला ते कळायचं. डोळे मिटूनच तो प्रयत्न करायचा. मनोज अर्धवट का होईना शुद्धीवर आल्यामुळे वॉर्डात प्रथमच सर्वजण आनंदात होते.

मला चटकन् मनोहरन्ची आठवण आली आणि एखादा साक्षात्कार व्हावा तसा माझ्या मेंदूत लख्ख प्रकाश पडला! ओऽ हो! मनोहरन्चा आत्मा मनोजमध्ये शिरला होता तर! त्याची प्रार्थना फलद्रूप झाली होती. इतर कोणी सांगितलं असतं तर माझ्या बुद्धीवादी मनाने त्याला वेड्यातच काढलं असतं. इथं तर ह्या घटनेचा म्हणजे मनोहरन्च्या मृत्यूचा, त्याच्या प्रार्थनेचा आणि मनोजच्या शुद्धीवर येण्यामागील कार्यकारणभाव जाणणाऱ्या 'गूढार्थाचा' मी एकमेव साक्षीदार होतो. माझा बुद्धीवाद पार गळून पडला होता. पूर्वजन्म, पुनर्जन्म, आत्मप्रवेश, आत्म्याचे आत्म्याशी मीलन, त्यांचा 'संवाद' ह्या साऱ्या गोष्टी माझ्या प्रत्ययाला आल्या होत्या. मृत्युशय्येवरील हुमायुनाचा प्राण वाचवण्यासाठी बाबर आपली जान अल्लाला कुर्बान् करतो आणि हुमायून वाचतो! ही

नुसतीच दंतकथा नाही तर!

मी मनोमन भक्तीभावाने 'त्या' अज्ञात शक्तीला, सर्वश्रेष्ठ परमेश्वराला प्रणाम केला.

•••

आता माझे ऑपरेशन दोन दिवसांवर आले आहे. ह्या हॉस्पिटलमध्ये पाऊल टाकले तेव्हा मी केवढा भयभीत झालो होतो? नुसत्या मृत्यूच्या कल्पनेनेसुद्धा मनाचा थरकाप उडाला होता. आज मात्र अगदी 'स्थिरचित्त' झालो आहे. माझी सुमती, नातेवाईक, मित्रमंडळी, पैसाअडका, आता कशा कशाचा मला मोह नाही. खऱ्या अर्थाने मी आता 'निर्मोहि' झालो आहे.

मनोहरन्‌ने आता मला मरण्याची नवी 'दृष्टी' दिली आहे. प्रज्ञावंत जगण्याची दिशा दाखवितात, पण मनोहरन्‌सारख्या जगाला सर्वस्वी अनोख्या असलेल्या एका महान विभूतीने कसं सुंदर 'मरावं' ह्याचा जणू आदर्श वस्तुपाठच घालून दिला आहे. ईश्वराने या जगात अनेक 'शापित' जीव जन्माला घातले. त्या शापित जीवांचे पूर्वजन्मांचे काही 'देणं' असेल तर माझ्या जीवनाची 'देणगी' देऊन मी त्यांचे ऋण परमेश्वराकडे चुकते करणार आहे.

वॉर्डबॉय गोविंदाने आणून दिलेला मोठा हार तळमजल्यावरील गणेशाच्या मूर्तीसमोर मी ठेवेन. पेढ्याचा पुडा ठेवेन. मागणं एकच. मला 'तुझ्याकडे' घेऊन चल. शरीराने मी केव्हाच 'मोकळा' झालोय. माझा आत्मा आता त्या एक वर्षाच्या गोंडस अजयच्या शरीरात प्रवेश करू दे. त्याने हे सुंदर जग बघितले नाही. त्याला माझे जीवन लाभू दे. त्याला चांगला मोठा कर.

एका ''ईश्वरी शापिताला'' वाचविण्याचं, जीवदान दिल्याचं पुण्य मला लाभू दे! परमेश्वरा, ऐकशील ना एवढी माझी अखेरची प्रार्थना!

❖❖❖

# २१. निखळलेलं मोरपीस

आमच्या कंपनीचा मद्रासला रिफ्रेशर कोर्स असतो. एकदा मद्रासला गेलं की शेवटचे सेशन् झाल्यावर प्रत्येकाची धाव असते ती टी.नगरमधील 'नल्ली' सिल्क शॉपकडे. सुंदर-सुंदर डिझाइन्सच्या आणि मनोहारी रंगाच्या सिल्क साड्यांचं प्रदर्शनच असतं म्हणानात. शनिवारी दुपारी प्रिन्सिपॉलचे फेअरवेल पार्टीचे लेक्चर झाल्यावर ऑटो करून ताबडतोब मी नल्ली शॉपकडे निघालो. आज इथलं काम आटोपलं की उद्या सकाळी बर्मा बझार आणि वेळ मिळाल्यास काशी-चेट्टीकडे जाऊन खरेदी आटोपता येईल असा मनाशी हिशोब केला. रविवारी रात्रीच्या मद्रास मेलने मला परतायचं होतं.

नल्ली शॉपमध्ये तुफान गर्दी होती. कदाचित दिवाळी तोंडावर आली असल्यामुळे असेल. सगळ्या काउंटरवर खरेदीसाठी सगळ्यांची झुंबड उडालेली दिसत होती. अनेक साड्यांचे ढिगारेच्या ढिगारे पसरलेले दिसत होते. त्यातून निरनिराळ्या साड्या उलटसुलट करून पाहताना एक गुलबक्षी रंगाची साडी माझ्या हाताला लागली. मला आवडते तशी रुंद काठाची, भरघोस पदराची. पोटात नाजूक डिझाइन होतं. सुमती ललितासारखी गोरीपान असती तर कोणताच विचार न करता मी साडी पॅक करायला सांगितली असती. पण असे गडद रंग सुमतीला आवडत नसल्याने मी तो विचार सोडून दिला. क्षणभर मनाशी माझं मलाच हंसू आलं. ललिता माझ्या आयुष्यातून निघून गेली त्या गोष्टीला आता चांगली पंचवीस-तीस वर्षं सहज उलटून गेली असावीत. पण अजूनही मनाच्या सांदी-कोपऱ्यात दडून बसलेली तिची आठवण जात नाही कशी?

मी ती साडी बघत होतो, तेवढ्यात काउंटरवरचा मद्रासी विक्रेता म्हणाला,

''एक्स्क्यूज मी सर, दॅट पीस हॅज ऑलरेडी बीन सिलेक्टेड बाय मॅडम.''

''ओऽ, आय ॲम सॉरी!'' म्हणत मी ती साडी त्याच्या हातात दिली. इथल्या मद्राशिणीला ह्या रंगाची साडी कशी काय शोभणार बुवा, ह्याचं आश्चर्य करीत साडी खरीदणाऱ्या बाईकडे मी कुतूहलाने बघितलं. पुन्हा बघितलं. पुन्हा पुन्हा बघितलं, आणि बघतच राहिलो. ती पण बघता-बघता जवळजवळ ओरडलीच,

''अरे, अवि तू इथं? व्हॉट अ प्लेझंट सरप्राईज! किती वर्षांनी भेटतोय आपण?''

तिनं पटकन् माझा दंड पकडला. तिच्या डोळ्यात असीम आश्चर्य आणि आनंद होता. आजूबाजूची माणसं बघत होती, त्याचं भाग टेवून मीच ललिताला म्हटलं,

''तुझी खरेदी आटप. तोवर मी थांबतो.''

'अरे, तू इतक्या वर्षांनी भेटलास, आता कसली खरेदी! चल आपण बाहेर पडू.''

पुन्हा क्षणभर ती रेंगाळली. काऊंटवरच्या मद्राशाला तिनं ती गुलबक्षी साडी पॅक करायला सांगितली. कॅश-काऊंटरवर जाऊन तिनं बिल दिलं. शंभराच्या वीस-एकवीस तरी नोटा असतील. म्हणजे दोन एक हजाराची साडी असणार! मी तेवढ्या पैशात दोन-तीन साड्या 'बसवायला' बघितल्या असत्या! बिल देताना मी कौतुकानं ललिताकडे पहात होतो. तीस वर्षांपूर्वी ललिची जी इमेज मी मनात जपली होती त्यात तसा काहीच फरक नव्हता; निदान त्या इमेजला तडा जाण्यासारखा. निळसरपणाकडे झुकणारे डोळे, मागे सरकत गेलेलं भव्य कपाळ, गुबगुबीत गोबरे गाल, लिपस्टिक लावलीय् असे भासविणारे लालचुटूक ओठ. तिची उत्साही आणि हसरी मुद्रा. एकेकाळी काळेभोर लांबलचक आणि जाड असणारे केस मात्र आपला दिमाख गमावून बसले होते! केसांचा शोल्डर कट् झाला होता आणि देह मात्र चहूबाजूंनी सुटला होता. मात्र गर्द जांभळ्या सिल्क साडीमुळे आणि मूळच्या सतेज गौरवर्णामुळे ती आकर्षक दिसत होती.

साडीचं पॅकींग माझ्या हातात देत ती म्हणाली,

''चल, आपण बाहेर पडू.''

आम्ही बाहेर पडलो. तिने जवळच गाडी पार्क केली होती. गाडी सुरू केल्यावर मला म्हणाली,

''बोल, किती दिवस मद्रासमध्ये आहेस?''

मग मी माझी हकीकत सांगितली.

''नशीब माझं! आजचा दिवस तरी आहेस. आता आपण जरा भटकून घरी जाऊ. सकाळी उठल्यावर दिवसभर भटकू. तुझ्या माऊंटरोडवरच्या हॉटेलमध्ये कळवायला पाहिजे असेल तर तिकडे गाडी घेऊ का?''

''तशी काही गरज नाही. फक्त उद्या मला रूमचा चार्ज द्यायला संध्याकाळी जावं लागेल.''

मग आमची गाडी मरीना बीचच्या दिशेने धावायला लागली. संध्याकाळचे पाच वाजून गेले होते. हिवाळ्याचे दिवस असल्याने आणि कदाचित पाऊस यायची शक्यता असल्याने थोडेसे अंधारून आले होते. मरीना बीचचा विस्तीर्ण किनारा दिसू लागला. ललिताने रस्त्याच्या कडेला गाडी पार्क केली. आम्ही वाळूतून चालायला लागलो. तेवढ्यात समोरच एक टेलिफोन बूथ बघून ललिताला काहीतरी आठवल्यासारखं झालं. मला तिथेच थांबायला सांगून ललिता फोन करायला गेली. पाच मिनिटांत येते म्हणून.

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात मी स्वत:शीच आश्चर्य करीत होतो, ते या अकल्पित भेटीचं. तिचा माझा संबंध सुटल्याला वीस वर्ष झाली. ती गुलबक्षी साडी बघितल्यावर मनातली मोरपिशी आठवण जागी व्हायला आणि ललिता भेटायला एकच गाठ पडली. इंटर सायन्सची परीक्षा जवळ आली असतानाच तिच्या आकस्मित विवाहाची बातमी तापलेल्या सळीसारखी माझ्या कानात शिरली. सारी दुनिया माझ्याभोवती गरागरा फिरू लागली. तो वज्राघात मी सहन करू शकलो नाही. पुरा हादरून गेलो होतो त्या दिवशी.

एवढ्यात ललिता आली. हसत-हसत. आम्ही समुद्राच्या खूप जवळ जाऊन कोरड्या वाळूत बसलो. ललिता म्हणाली,

''बोल आता. काय करतोस? कुठं असतोस? बायका-मुलं काय करतात? सगळं सांग.''

''सुरूवात कुठून करू? तू मला सोडून गेलीस तिथून करू?'' मी हसत-हसत विचारलं. तसा ललितानं माझ्या पाठीत एक बुक्का मारला.

''ए, आता इतक्या वर्षांनी भेटतोयस, आता शिष्टपणा नाही करायचा. नाही तर असं करू. आता घरीच बोलू. आधी जरा या बीचवर भटकूया.''

''छान कल्पना. तुझं हे मद्रास मला मुळीच आवडत नाही. फक्त हा बीच आणि गोल्डन बीच तेवढे आवडतात.''

उन्हं कललेली होती. समुद्रावरून खारा वारा येत होता. सूर्यबिंब क्षितिजाकडे हळूहळू सरकत होतं. त्याच्या लालसर छटा आजूबाजूच्या परिसरावर पसरलेल्या होत्या. त्याच्या पडछाया समुद्राच्या पृष्ठभागावर प्रतिबिंबित होत होत्या, असं सुंदर दृश्य समोर आणि शेजारी जन्मजन्मांतरीची सोबतीण होणार होती अशी सखी. मी रोमांचित झालो. पटकन् ललिताचा हात धरला. म्हटलं, ''चल जरा पाण्यात शिरू.''

ती नको नको म्हणत असतानासुद्धा आम्ही पाण्यात शिरलो. लाटांमागून लाटा समुद्राच्या पोटातून येत होत्या. आमच्या पायाशी येऊन फुटत होत्या. मग एकदम जोरदार लाट आली. पायाखालची वाळू सरकली. ललिता पडू लागली तशी मी तिला घट्ट धरलं. एवढ्यात पावसाच्या सरी येऊ लागल्या. खरं म्हणजे मला असंच भिजत रहावंसं वाटत होतं. त्याक्षणी सर्व काही विसरायची माझी तयारी होती. समुद्राने आपल्या विशालकाय उदरात आम्हां दोघांची कायमची जलसमाधी बांधली असती तर मोठ्या आनंदानं ती स्वीकारायची माझी इच्छा होती.

पण ललितानं खेचतच मला पाण्याबाहेर काढलं. पुन्हा आम्ही रेतीत आलो.

पाण्याच्या तुषाराने तोंड खारट अन् अंग चिकचिकीत झालं होतं. पाऊस जोरात नसला तरी येण्याची शक्यता होती. मद्रासला असा केव्हाही पाऊस येतो. तसेच धावत आम्ही गाडीपाशी आलो. कपडे झटकले. ललिताने गाडी भरघाव सोडली. मद्रास टी.व्ही.टॉवरचे तांबडे दिवे दूर-दूर दिसायला लागले. अन्नादुराईच्या पुतळ्याजवळची दिव्यांची रोषणाई मागे पडली. मद्रासच्या कोणत्या भागातून ललिता गाडी नेत होती तेच कळत नव्हतं. गाडीच्या काचांवर पावसाच्या पाण्याने पडदा धरला. शहरी झगमगाट मागे पडला. व्हायपर्सच्या मधून काचेतून नागरी वस्ती, इमारती विरळ होत असल्याचं दिसत होतं. तेवढ्या पावसातून ललिता गाडी छान पळवीत होती. मी कौतुकाने तिच्याकडे पहात होतो. तिचं मात्र ड्रायव्हिंगवर लक्ष होतं, म्हणून मी काही बोलायचा प्रयत्न केला नाही. एका आलिशान बिल्डिंगच्या पोर्चमध्ये ललिताने गाडी पार्क केली. वॉचमन माझ्याकडे निरखून बघतोय असं उगाचच मला वाटलं. लिफ्टने आम्ही वर आलो. लॅचकीनं ललितानं तिच्या फ्लॅटचं दार उघडलं. लाइट ऑन केले. मला मोठ्या महालात शिरल्यासारखं वाटलं. अभावितपणे मी म्हटलं,

''अरे वा! मस्त आहे तुझा हा ललितामहाल!''

ललिता हसली. घाईघाईनं आतील रूममध्ये जाऊन माझ्या हातात एक मोठा टॉवेल, एक लुंगी आणि एक टी शर्ट आणून दिला आणि म्हणाली,

''आधी ओले कपडे बदलून हँगरवर ठेव. आंघोळ कर. गरम-गार पाहिजे तसा वॉश घे.''

मी मुकाट्याने बाथरूममध्ये शिरलो. गरम पाणी अंगावर घेतल्यावर खरंच बरं वाटलं. केसातील, अंगावरची वाळू आणि खारट झालेलं अंग स्वच्छ धुवून निघालं. चांगला ताजातवाना होऊन मी बाहेरच्या दिवाणखान्यात आलो. तेवढ्यात ललिता बाहेरून आली.

''मी आता आंघोळ करते. नंतर आपण ड्रिंकस् घेऊ. घेतोस ना? का अजून वाईकर भटजीच आहेस?''

''नाही, नेहमी घेत नाही. पण आज घ्यावीशी वाटतेय.''

''बरं, जेवायला काय?''

''म्हणजे आता तू करणार?''

''नाही रे बाबा, आताच मी वॉचमनला सांगितलंय. नॉन-व्हेज चालतं ना?''

मी मान डोलावली. पण का कोणास ठाऊक मला अचानक सुमतीच्या हातच्या खुसखुशीत भाजणीच्या थालीपीठाची आठवण झाली!

''मग, चिकन् तंदुरी-बिर्याणी मागवून घेते.'' ललिताने तामीळमधून फोनवरून वॉचमनला काहीतरी सांगितलं.

''तू बस आता ही टी-पॉयवरची मासिकं बघत. नाहीतर थांब. तुझ्या लाडक्या तलतची कॅसेटच लावते. मी वॉश घेऊन येते.'

कॅसेट सुरू झाली. ''शामेऽ गम् की कसम.'' सुरू झालं. अजून ललिताला माझी आठवण आहे तर! नाही तर माझी तलतची आवड तिच्या कशाला लक्षात राहिली असती? माझं मन मोहरून गेलं. डोळे मिटून गाणं ऐकता ऐकता भूतकाळात शिरलं.

•••

एके काळी म्हणजे हायस्कूलची शेवटची दोन वर्षे आणि कॉलेजची पहिली दोन वर्षं ललिता आणि मी एकमेकांत पुरे गुंतून गेलो होतो. खरं म्हणजे, पंधराव्या-सोळाव्या वर्षी प्रेम ही काय चीज आहे हे कळणं दुरापास्तच. पण मला मनापासून वाटतं की, आम्हाला त्या कोवळ्या वयातसुद्धा प्रेमाचा अर्थ कळला होता. कारण नुसत्या शारीरिक आकर्षणात आम्ही गुंतून राहिलो नव्हतो. काव्य-शास्त्र-विनोदाच्या महासागरात आम्ही किनाऱ्या किनाऱ्याने का होईना पण सतत डुंबत होतो. वर्गात पहिला-दुसरा नंबर मी कधीच सोडला नाही. ललिता अभ्यासापेक्षा संगीत-बॅडमिंटन क्षेत्रात अधिक रमायची. तिच्या बंगल्याच्या आऊटहौसमध्ये आमचं बिऱ्हाड होतं. तिचे वडील मिलिटरीत मोठ्या हुद्यावर होते. त्यांच्या वरचेवर बदल्या होत, म्हणून त्यांनी ललिताला वाईलाच त्यांच्या आई-वडिलांकडे ठेवलं होतं. ललिताचे आजोबा करड्या शिस्तीचे तर आजी अत्यंत प्रेमळ. आम्ही तिला माई म्हणायचो. माईचा माझ्यावर विशेष लोभ असायचा. कारण त्या काळात आकाशवाणीवरून प्रसृत होणारी गीतरामायणातील गाणी मी त्यांना तन्मयतेनं म्हणून दाखवायचो. आजोबा करड्या शिस्तीचे असले तरी एका पायाने अधू असल्याने त्यांची बरीचशी कामे मी आपणहून करायचो. ललितेसाठी त्या दोघांची 'मर्जी' मी सांभाळून ठेवणे आवश्यक आहे हे तिनंच मला सुचविलं होतं. माईना आम्हा दोघांचं खूप कौतुक होतं. संध्याकाळी वाड्यातील मुलं रामरक्षा म्हणायला जमत. त्यानंतर माईना आणि आजोबांना मी धार्मिक पुस्तकं वाचून दाखवी. रामायणातील युद्धकांड वाचताना आजोबा इतके हरकून जात की मी दमलोय हे त्यांच्या कधी लक्षांतच यायचं नाही. पुढे वाच-पुढे वाच, असं सारखं त्यांचं चालायचं. शेवटी माईनाच माझी दया यायची. त्या दोघांची नजर चुकवून ललितेच्या दंडाला चिमटा काढत मी हलकेच पुटपुटायचो, ''हे सारं तुझ्यासाठी बरं का!'' ललिता गोड हसली की माझे सारे श्रम मी विसरून जाई. ती माझ्यात किती खोलवर गुंतली होती हे मला माझ्या मॅट्रिकच्या

रिझल्टच्या वेळी कळलं. ललिता फर्स्टक्लासमध्ये पास झाली तर डिस्टिंक्शन मिळवून मी शाळेत पहिला आलो. नेहमीप्रमाणे कृष्णा नदीच्या काठाने फिरत आम्ही पसरणी घाटाच्या बाजूच्या शेतात पाचगणी-महाबळेश्वरच्या डोंगराकडे पहात बसलो होतो. मी माझ्या यशाने हुरळून गेलो होतो. नेहमी माझ्या सान्निध्यात हसत-खिदळत असणारी ललिता त्या दिवशी बरीच गंभीर होती. ती एकदम म्हणाली,

''आता तू काय करणार?''

''म्हणजे?''

''म्हणजे ॲडमिशन कुठे घेणार? सायन्सला की आर्टसला?''

''अर्थात आर्टसला! तू तिथं मी! आणि इथं सायन्स कुणाला आवडतंय? छान शेक्सपीअर वाचू. मेघदूत-शाकुंतल वाचू. तू बरोबर असल्यावर मेघदूत वाचायला काय मजा येईल!''

''नको. तू सायन्सलाच जा. आर्टसला गेलास तर नुसताच मास्तर होशील; फार तर प्रोफेसर. सायन्सला गेलास तर चांगला इंजिनीअर होशील.''

''मला सायन्स आवडत नाही.''

''पण आमच्या पप्पांना त्यांचा जावई इंजिनीअर - डॉक्टरच हवाय, त्याचं काय?''

''ललिता!'' मी पण आता गंभीर झालो. मी नुसता आमच्या प्रेमातच मस्त मश्गूल होतो. व्यावहारिक जगाची मी कधीच जवळीक केली नव्हती. तरीच आईने दोन-तीन दिवसांपूर्वीच मला विश्वासात घेऊन, मायेने चार गोष्टी सांगितल्या होत्या. माझी अन् ललिताची सलगी तिला विशेष माहीत होती. तिच्या उपदेशाचा इत्यर्थ एवढाच होता की ललिता ही श्रीमंताघरची पोर आहे. आपल्या व तिच्या परिस्थितीत फार मोठी तफावत आहे. तेव्हा मी काही तिच्यात गुंतून जाऊ नये. शाळेपर्यंत ठीक होतं. आता कॉलेजात जायचं होतं. तेव्हा संभाळून राहणं आवश्यक आहे. मला आईच्या बोलण्याचा अर्थ समजला तरी मी तो फारसा मनावर घेतला नाही किंवा मला घ्यावासाही वाटला नाही. माझं आणि ललिताचं भावविश्व इतकं वेगळं होतं की त्याला कोणाचं नख लागेल ही कल्पनासुद्धा माझ्या मनाला शिवू शकत नव्हती आणि आता मला ललिता सायन्सला जाऊन डॉक्टर - इंजिनीअर व्हायला सुचवत होती. नाही तर तिचे पप्पा...

•••

''काय रे, कुठं एवढी तंद्री लागलीय्! कॅसेट केव्हाच संपून गेलीय.''

मी एकदम भानावर आलो. हसत म्हणालो,

''वाईला घाटावर कृष्णेच्या पात्रात पाय सोडून बसलो होतो.''

''अजून विसरला नाहीस काही?''

''कसा विसरेन? माझ्या मनाचा कोपरा नि कोपरा त्यावेळी तू व्यापून टाकला होतास.''

माझी अपेक्षा होती की ललिता पटकन् माझ्या शेजारी येऊन मला बिलगेल; जुन्या दिवसांच्या आठवणी काढत ती माझ्यासारखीच भावविवश होऊन जाईल. पण तसं काही झालं नाही. ती आत गेली. येताना हातात काचेचे ग्लास होते. नंतर तिने काजू, वेफर्स असे एका प्लेटमध्ये आणून ठेवले; दोन्ही ग्लासमध्ये व्हिस्की ओतली. माझ्या हातात एक ग्लास दिला; चिअर्स केले. आम्ही एक-दोन घुटके घेतले. आम्ही आल्याबरोबर सुरू केलेला एअर - कंडिशनर चालू झाला होता. त्यामुळे आता चांगलं गार-गार वाटायला लागलं होतं. माझ्या लक्षात आलं की आंघोळ झाल्यावर ललितानं उंची गुलाबी मॅक्सी घातली होती. बहुधा इंपोर्टेड असावी. या वयातसुद्धा ललिता चांगली सेक्सी दिसत होती, विशेषत: या मॅक्सीमध्ये. मला मात्र ती साडीमध्येच जास्ती आवडली असती! मी तिच्याचकडे निरखून बघतोय हे लक्षात आल्यावर सोफ्यावर ती माझ्या शेजारी येऊन बसली. व्हिस्कीचे घोट आणि शेजारी ललिता. मला स्वत:ला तर मी जहाँगीर बादशहा असल्याचा भास होत होता. पण मी स्वत:ला सावरलं. वातावरणाचा कैफ मनावर चढण्यापूर्वी जरा बोलण्यात मोकळेपणा आणावा म्हणून मी ललिताला म्हटलं,

''ललिता, आता तुझा नवरा आला तर आपल्याला गोळी घालील का ग? नाही तर पुन्हा एक नानावटी-अहुजा केस उभी राहायची!''

''नाही रे बाबा! एक तर तो सिंगापूरला गेलाय् आणि एवढा माझा नवरा पझेसिव्ह असता तर माझी ही अवस्था झाली नसती?''

''म्हणजे? तू तर चांगली ऐश्वर्यात दिसतेस, सुखात लोळतेस असंच वाटतंय्.'' तिच्या सुटलेल्या देहाकडे पहात मी म्हटलं.

क्षणभर ललिता थबकली. काही तरी बोलायचं तिच्या मनात असावं. मी पटकन् तिचा ग्लास पुन्हा भरला. एक-दोन घोट गेल्यावर ती आपणहून बोलायला लागेल अशी माझी अटकळ होती. आणि तसंच झालं. ती म्हणाली,

''गेल्या पंचवीस-तीस वर्षात माझी काही खुशाली-चौकशी करावीशी तुला

वाटली नाही?''

''हाच प्रश्न मी पण तुला विचारू शकतो ललिता! आणि खरं सांगू? तुझ्या आई-पप्पांनी अचानक तुला वाईतून ग्वाल्हेरला नेलं. तुझं लग्न ठरलं असं कळल्यावर मी पार वेडापिसा झालो. तू गेल्यावर माझा पुरा देवदास झाला. कॉलेजात जायचा मी बंद झालो. पुढं आमचं वाईतून बिऱ्हाडपण हललं.''

''हललं नाही; हलवलं गेलं!''

''म्हणजे?''

''त्या सगळ्या अनर्थाला मीच कारणीभूत आहे.''

'' म्हणजे? असं झालं तरी काय?''

''तुला आठवतं? आपण इंटरला असताना, मी फेब्रुवारीमध्ये, माझ्या मामाच्या लग्नासाठी ग्वाल्हेरला गेले होते ते?''

''हो, आणि जाताना मला बजावलंस पण. मी आता आठ-पंधरा दिवस नाही तर चांगला भरपूर अभ्यास करून घे. तुला फर्स्ट क्लास मिळायलाच हवा. तरच इंजिनीअरिंगला किंवा मेडिकलला जाता येईल.''

'मी ग्वाल्हेरला गेल्यावर मामाचं लग्न वगैरे व्यवस्थित झालं. सगळे घरातले पाहुणे परतले आणि मला तुझी फार-फार आठवण यायला लागली. त्यातच आई आजारी पडल्याने माझं परतणं आणखीनच लांबलं. मी परीक्षेचा अभ्यास बुडवायचा नाही म्हणून मेघदूत वाचायला नेलं होतं. तू शिकविलेलं मेघदूत सारखं आठवायचं.'

''खरं म्हणजे सायन्सला असूनसुसुद्धा मी तुला मेघदूत शिकवायचो. तू म्हणायचीस पण, की कॉलेजात सरांनी शिकविल्यापेक्षा तू शिकवलेलं जास्ती कानात घुमतं; अधिक चांगलं समजतं.''

''तेच सगळं नडलं. उज्जैनला जाऊन आल्यानंतर एके दिवशी कालिदासाच्या काव्यावरून मैत्रिणीत बोलताना, मी तुझ्याविषयी त्यांना खूप खूप कौतुकाने भरभरून सांगत होते; त्यावरून त्यांनी माझी चेष्टा पण केली. त्या गंमतीने म्हणाल्यादेखील की 'मेघदूतात यक्षाने पाठविला तसा संदेश तू का नाही तुझ्या अविला पाठवत?' मग काय, माझ्या मनानं लागलीच साद दिली; रात्री टेबललँपजवळ बसून तुला मी भरपूर मोऽठं असं पत्र लिहिलं. लिहिताना काय रोमांचित झाले होते म्हणून सांगू?''

''मग, पुढे काय झालं?''

''पुढेच सगळा घोटाळा झाला. मी पत्र लिहिलं; गादीवर पडून पुन्हा-पुन्हा वाचलं, तुझ्यासारखं काव्यमय भाषेत मला लिहिता आलं ह्याचा आनंद... आणि पत्र वाचल्यावर

तू कसा खूष होशील ह्या कल्पनेच्या तंद्रीत मला केव्हा तरी झोप लागली. शांत, समाधानी झोपेतून डोळे चोळत सकाळी उठले ते समोर आई आणि पप्पा हातात पत्र घेऊन समोर बसलेले. मला सगळ्या अनर्थाची कल्पना आली. पप्पांनी त्यांच्या मिलिटरी खाक्याप्रमाणे मला भरपूर बदडून काढलं.''

''अरे बापरेऽऽ!'' माझ्या ललितेला कोणी मारतंय ही कल्पनासुद्धा मला सहन होण्यासारखी नव्हती. जसं काही आत्ता डोळ्यासमोरच ही घटना घडतेय असं वाटून मी ललितेला थोपटलं.

''आणि मग काय? वाई मी कधीच बघितली नाही.'' ललितेच्या डोळ्यात अश्रू डबडबलेले होते. अश्रू कसले? सगळे मोती होते मोती; आणि त्या साऱ्या मोत्यांचा मी एकच जवाहिरा होतो!

''पुढचं तुला नीट माहीत नसेल ना?''

''नाही; तुझे आई-पप्पा आले; तुझं सगळं सामान-सुमान घेऊन गेले. तुझं लग्न ठरलंय. मामाच्या लग्नातच तुला कुणी नेव्हीमधल्या देखण्या तरुणानं मागणी घातलीय. तो लागलीच इंग्लंडला ट्रेनिंगसाठी जाणार म्हणून आमच्या कानावर आलं; मग आमच्या बाबांची बदली दूर मराठवाड्यात झाली, आणि आमचं बिऱ्हाड तेथून हाललं.''

''ती सगळी आमच्या पप्पांची कारवाई! एका फडतूस कारकुनाच्या आणि आमच्याच घरात भाडेकरू असलेल्या कंगाल माणसाच्या मुलावर माझी मुलगी प्रेम करते म्हणजे काय? पप्पांनी सगळा सूड बिनबोभाट उगवला. त्यांच्या सगळीकडे दांडग्या ओळखी होत्या. आरडाओरडा केला तर आपलीच अब्रू जाईल म्हणून सगळं काही ह्या कानाचं त्या कानाला कळू न देता त्यांनी पार पाडलं.''

''मग खरं काय होतं? तुझं लग्न झालं लगेच...?''

''नाही रे. हे केवळ तुझ्या कानावर जाण्यासाठी होतं. पण अर्धवट खरं होतं. पप्पांच्या मित्राच्या घरी मी सर्वांना आवडायची म्हणे. त्यांचा मुलगा दिलीप नेव्हीमध्ये होता. म्हणजे माझा नवरा.''

''मग लग्न केव्हा झालं? कॉलेज जॉईन केलंस?''

''ते इंटरचं वर्ष फुकटच गेलं. घरी मी रडून रडून दिवस काढले. पण पप्पांना दया येणं शक्यच नव्हतं; आईला तर माझं वाईला राहणं पहिल्यापासूनच पसंत नव्हतं; आधीच तिचं आणि माईचं विळ्याभोपळ्याचं सख्य! तिनंच फूस दिल्यामुळं माझं हे सारं प्रेम-प्रकरण घडलं असं म्हणून तिनं माईवरच आग पाखडली. तुझा ठावठिकाणा माहीत नसल्याने तुलाही मी चोरून पत्र लिहू शकत नव्हते; आणि माहीत असतंही तरी तसं

केलं नसतं!''

''का?'' मी आश्चर्यानं विचारलं.

''तू जर पत्र टाकलंस तर त्या xxxx आव्याला गोळी घालून कायमचा खतम् करीन असं पप्पांनी मला शंभरदा बजावलं होतं; आणि तुला माहीत आहेत, आमचे पप्पा किती गरम डोक्याचे होते ते. मुकाट्याने कॉलेजला नाव घातलं. पण अभ्यासात प्रगती शून्य. एकंदरीत माझा रागरंग बघून पप्पांनी माझं लग्न लावून दिलं. त्यावेळी दिलीपचं पोस्टींग विशाखापट्टणमला होतं. आणि तू मला क्षमा कर अवि, मी हळूहळू तुला विसरतच गेले.''

क्षणभर थांबून ललिता म्हणाली,

''आता तुझं सांग.''

''माझं सांगण्यासारखं काही नाहीच. तुला तडकाफडकी ग्वाल्हेरला नेलं आणि तुझ्या लग्नाची बातमी ऐकल्यावर मी पार हादरून गेलो. इंटर सायन्सची परीक्षा तोंडावर आलेली. मला परीक्षेला बसायची इच्छाच नव्हती. पण आईच्या डोळ्यातील पाणी बघून बसलो. अपेक्षेप्रमाणे फर्स्ट क्लास चुकलाच. सेकंड क्लास मिळाला आणि इथे हवा होता कुणाला फर्स्ट क्लास आणि डिस्टिंक्शन? तू गेलीस आणि जीवनाची सारी चवच गेली.''

''सॉरी हं अवि, तुला आवड नसताना तुझं मन मारून तू सायन्स साईडला गेलास. तू इंजीनिअर-डॉक्टर व्हावास म्हणजे आई-पप्पांना तू ॲक्सेप्टेबल झाला असतास अशी माझीच भाबडी कल्पना; त्यावेळी खरं काही कळतच नव्हतं बघ.''

''मग नंतर काय केलंस?''

''वाईत रहाणं शक्यच नव्हतं. मी रिझल्टची पण वाट न बघता आपले ते समोरच्या गंगापुरीवाले सबनीस होते ना, त्यांच्या ओळखीने एका फार्मास्युटिकल कंपनीत मुंबईला नोकरीला लागलो. फिरत्या होत्या. भटकायचो. तलतच्या गजला ऐकत मनातल्या मनात तुझी आठवण जागवत बसायचो. याच काळांत शरच्चंद्रांच्या देवदासने माझ्या मनात घर केलं होतं. स्वच्छंदी जीवन जगत जगायचो. हिंदी-इंग्रजी चित्रपट बघत त्यातून तुझी प्रतिमा डोळ्यांसमोर आणायचा प्रयत्न करायचो; पण आई बाबा माझा पिच्छा सोडेनात. शिक्षण तर केव्हाच सोडून दिलं होतं. तू तर माझ्यापासून दूर गेलीस मग आता कशाला शिकायचं आणि माझ्या नोकरीत अधिक शिकायची तशी गरजच नव्हती. आणि खरं सांगू ललिता, माझ्यातील जिद्द, महत्त्वाकांक्षा सारं काही ठार मरून गेलं होतं. एकदा वेडाच्या भरात मी ग्वाल्हेरला पण निघालो होतो. आता हसू येतंय पण कोणता विचार होता मनात, माहीत आहे? चक्क तुला पळवून न्यायचा. आणि अळू-

भाताचं आमचं शौर्य ते कसलं? म्हणून तर आपल्यात बाजीराव पण एखादाच व्हायचा!''

''मग लग्न केव्हा केलंस?''

''आई फारच भरीस पडली आणि तुला आता विसरायलाच हवं ह्या कटू वस्तुस्थितीची जाणीव झाल्यावर, आईला आवडलेल्या मुलीशी लग्न करून टाकलं. तुझा शोध घ्यायचा प्रयत्न केला पण तुझे नातेवाईक ताकास तूर लावून देत नसत. काही-काही तर फिदीफिदी हसायचेसुद्धा. मग निमूटपणे सर्वसामान्य माणसारखा संसाराला लागलो. तलतच्या रेकॉर्डस् - मेघदूत - शांकुतल माळ्यावर टाकून दिलं. परमेश्वरानं तुझ्या रुपानं एक सुंदर संपूर्ण वर्तुळाकार इंद्रधनुष्य दाखविलं हेच आपलं परमभाग्य. आणि असं इंद्रधनुष्य सदा-सर्वकाळ आकाशात राहूच शकत नाही. ह्या वस्तुस्थितीची पण मला हळूहळू जाणीव झाली. सुदैवानं सुमतीसारखी सद्गुणी, सालस बायको मिळाली. आता माझी मुलगी डॉक्टर होतेय. धाकटा मुलगा इंजिनीअरींगला गेलाय्. तुझ्यासारखा ललितमहाल नसला तरी तीन खोल्यांच्या छोट्याश्या ब्लॉकमध्ये साधारण मध्यमवर्गीयाचा सुखी संसार व्यवस्थित चालला आहे. एक चूक मात्र मी सदोदित करायचो, आणि अजूनही करतो कधी कधी.''

''ती कोणती?''

''सुमतीमध्ये मी सतत तुला शोधायचा प्रयत्न करायचो आणि स्वत:ला खट्टू करून घ्यायचो.''

''तिला सगळं सांगितलं होतंस?''

''मी नाही, पण लग्नाआधी बहुतेक आईनं सगळं सांगितलं असावं; पण तिनं कधीच विचारलं नाही. आता मला हसूं येतंय.''

''ते कशाचं?''

''ते अशा गोष्टीचं की एका अप्राप्य गोष्टीसाठी मी स्वत:ला उगाचच झुलवत ठेवलं. तुझं रुप, तुझी श्रीमंती ह्या साऱ्यांच्या तुलनेत मी अत्यंत नगण्य होतो, हे सगळ्यांना ठाऊक होतं, मला पण पटत होतं, पण मी पटवून घेत नव्हतो. पण एक सांगतो ललिता.''

''काय?''

''आपला चार-पाच वर्षांचा सहवास म्हणजे माझ्या आयुष्यातील एक संगमरवरी स्वप्न होतं. वास्तवात आल्यावरही विरहवेदना किती सुखकारक असतात ह्याचा मी आजवर सतत अनुभव घेत आलोय्. वाटतं, आयुष्यात प्रत्येकानं एकदा तरी प्रेमात पडावं. काय अनुपमेय अनुभव असतो तो? खरं म्हणजे तुझा मला खूप राग यायला हवा. माझं गाणं, माझं लेखन, काव्य-लेखन हे सारं, तुझ्यामुळे संपून गेलं. आज आजूबाजूला

मी बघतो तेव्हा वाटतं की या सर्वांपेक्षा मी एका वेगळ्या उंचीवर आहे, फक्त ते कधी मी सिद्ध करू शकलो नाही. करू शकणार पण नाही.''

''मग आता, तुला माझा तिरस्कार वाटत असेल ना?''

''अजिबात नाही. तू मला आयुष्यभर सतत आठवत बसावं असं काही तरी दिलंस. हा ठेवा मी मनाशी बाळगत आलो. माझं, माझं खूबसूरत दु:ख मी कौतुकानं गोंजारत आलो. आणि ह्यामुळेच माझ्या मुलीनं एका परजातीच्या तरुणाशी लग्न करू का? असं विचारलं तेव्हा मी थोडीसुद्धा खळखळ केली नाही. अतिशय सद्गुणी बुद्धिवान डॉक्टर मुलगा आहे तो. पण दोघांच्या ऐहिक सुखसंपत्तीपेक्षा त्या दोघांच्या मानसिकतेचा विचार मी अधिक केला. आप्तेष्टांनी पुष्कळ कोल्हेकुई केली, पण त्या दोघांच्या प्रेमाच्या घरट्याला यत्किंचितही धक्का लागणार नाही ह्याची मी सर्वतोपरी काळजी घेतली.''

एवढ्यात बेल वाजली. वॉचमन सगळे खाद्यपदार्थ घेऊन आला होता. ललितानं सगळं कारपेटवरच मांडलं. आम्ही दोघं खालीच बसलो. ड्रिंकचे घुटके घेत - घेत बसलो. मी ललिताला म्हटलं,

''मी माझंच सगळं सांगत बसलोय. तुझं बोल ना! 'अपनी कहो, कुछ मेरी सुनो,' असं झालं पाहिजे ना? बोल. आमचे कमांडरसाहेब काय करतात? तुझी मुलं काय काय शिकतात?''

''तू जेव्हा मघाशी म्हणालास ना की आता कमांडरसाहेब आले आणि जर आपल्याला त्यांनी बघितलं तर रिव्हॉल्व्हर तर काढणार नाहीत ना? तेव्हाच मला तुला सांगायचं होतं.''

''काय?''

''हेच! की दिलीपचं इतकं प्रेम माझ्यावर असतं तर मला खूप बरं वाटलं असतं.''

''म्हणजे? तुम्ही एकत्र आहात ना?'' मी काळजीनं विचारलं.

''हो, तसे एकत्रच आहोत; पण मनानं फार, फार दूर आहोत. आमचं लग्न झालं तेव्हा दिलीप खूप चांगला होता. नेव्हीमध्ये एकामागोमाग एक अशी प्रमोशन्स मिळावीत म्हणून धडपड करणारा एक चांगला करिअरिस्ट होता.''

''मग बिघडलं कुठं?''

''एका प्रमोशनच्या वेळेस त्याचं सिलेक्शन झालं नाही. काही तरी वशिलेबाजी झाली असं त्याचं म्हणणं. मग रागाच्या तिरीमिरीत त्याने नोकरी सोडली. भरपूर पिणं सुरू झालं!''

''मग? तू त्याला सावरलं नाहीस?''

''खूप प्रयत्न केला. पण जमलं नाही. त्यावेळी आम्ही लांब विशाखापट्टणमला असल्यानं कोणाला बोलावणं पण जमलं नाही. पिणं वाढत गेलं; तशी त्याची संगत बिघडत गेली. त्यातच सुलेमान आणि रुस्तुम भेटले.''

''हे कोण?''

''बडी व्यापारी मंडळी आहेत; त्यांच्या आग्रहाने नोकरी सुटल्यावर दिलीपनं त्यांच्याच फर्ममध्ये नोकरी घेतली. त्यांचा इंपोर्ट-एक्सपोर्टचा बिझिनेस आहे असं ते सांगायचे; त्या नोकरीनिमित्ताने आमचं वास्तव्य मद्रासला आलं. दिलीपच्या सिंगापूर-हाँगकाँग-बँकॉक अशा फेऱ्या सुरू झाल्या. काही वर्षं आम्ही तिकडेच काढली आणि तिथेच माझ्या सर्वनाशाला सुरुवात झाली.''

''म्हणजे?''

''सुलेमान आणि रुस्तुम ही बडी स्मगलर मंडळी होती. दिलीपला पैशाची जबरदस्त चटक लागली. पैशाच्या जोरावर मिळणारे सर्व उपभोग घेण्यात नीती-अनीतीची कोणतीही चाड त्याला वाटेनाशी झाली. आणखी... आणखी काय सांगू?''

''म्हणजे? तुझाही...''

''हो, या बिझिनेस-एटिकेट्स्मध्ये स्त्रीचं सौंदर्य महत्त्वाचं, तिचं चारित्र्य नाही! ह्या पैशाच्या हव्यासापोटी एके दिवशी माझाही बळी दिलीपनं दिला. रुस्तुम आणि सुलेमान कंपनीची मी 'स्लीपिंग' पार्टनर झाले!''

''ललिता!'' मी माझ्या नकळत ओरडलो. ''हे खरं बोलतेस..? की तुला व्हिस्कीची किक् आलीय?''

''नाही रे. आता कशाचीही किक् येण्याच्या पलीकडे गेलेय मी.''

माझ्या अंगावर सरसरून काटा आला. संध्याकाळी वाईच्या घरात हात जोडलेली आणि रामरक्षा म्हणणारी माझी ललिता मला आठवली. ललितेची कणव येण्याऐवजी मला घृणा आली. मनात तिरस्कार दाटून आला. अंग-प्रत्यंग दाखविणाऱ्या-माझ्यासमोर गुलाबी मॅक्सीत बसलेल्या ललितेच्या एक जोरात मुस्कुटात द्यावीशी वाटली; कदाचित त्या आविर्भावात माझा हात उगारलाही गेला असावा. कारण एकदम ललिता म्हणाली,

''मार, खरंच मार मला; तेवढा अधिकार फक्त तुझाच आहे.''

आणि तिच्या नजरेतील खरेपणामुळे मला एकाएकी तिची खूप दया आली; तिला जवळ घेऊन थोपटावं असंही वाटलं. अचानक काही तरी आठवून मी म्हटलं,

''ललिता, मुलांचं काय?''

''ते आणखी एक दुर्दैव.'' दीर्घ सुस्कारा टाकून ती म्हणाली, 'सुदैवानं म्हण किंवा दुर्दैवानं म्हण. दोन्ही वेळेला मिसकॅरेज झालं. आता असं वाटतंय की आम्हा दोघांच्या रक्तामांसाचा जीव आमच्यामध्ये असता तर त्या मधल्या दुव्यामुळे तरी दिलीप मला दुरावला नसता.'

''मग तू आई-पप्पांना का नाही बोलावून घेतलंस?''

''कशाला? माझ्या अब्रूची लक्तरं बघायला? दिलीप जसजसा घसरायला लागला तसतसा आमच्याकडील सर्वांचा येण्याचा राबताही कमी झाला. माझंही महाराष्ट्रातील येणं-जाणं कमी झालं. खरं म्हणायचं तर मीच कमी केलं. उगाच नको ती चर्चा व्हायची. आई-पप्पा दोघंही गेले. त्यामुळे अलीकडे तर अजिबातच गेले नाही. आता कसलंच बंधन माझ्यावर उरलं नाही. ना नवऱ्याचं, ना मुलांचं, ना आई-वडिलांचं. आता दिलीपच्या खेळातील मी एक सोंगटी आहे. त्याच्या दृष्टीनं फायदेशीर असणाऱ्या 'घरात' ठेवायची, त्याचं काम झालं की काढून घ्यायची!''

ललितेच्या ''स्पष्ट'' सत्यकथनानं मी दिग्मूढ झालो. तरीपण मला पटत नव्हतं. ती खरं म्हणजे काही लपवत नव्हती; आणि माझी- एका अनाहुताची सहानुभूती मिळवून तिला कोणताच स्वार्थ साधायचा नव्हता. माझ्या मनात एक प्रश्न वारंवार येत होता, म्हणून मी तो अखेरीस विचारलाच.

''ललिता, अशा परिस्थितीला तू शरण का गेलीस? घटस्फोटाचा विचार करता आला असता, कदाचित आत्महत्या करणंसुद्धा योग्य झालं असतं!'' खरं म्हणजे, मी फारच क्रूरपणे माझ्या मैत्रिणीशी वागत आहे असं क्षणभर तरी मला वाटलं; पण ललिता शांत होती. तिला माझ्या प्रश्नाचा राग आला नाही. ती म्हणाली, ''तू म्हणतोस ते खरं आहे. मी स्वत:शीच कधीकधी अंतर्मुख होऊन विचार करते, तेव्हा मला पण हाच प्रश्न पडतो. का नाही मी जीवनाचा अंत करून घेतला? पण खरं सांगू अवि? जीवनाचा मोह विलक्षण असतो. आणि तुझ्यापाशी कबूल करायला हरकत नाही.''

''काय?''

''मीच हळूहळू या स्वैर, भोगी जीवनाला चटावले. लहानपणी तूच एक संस्कृत श्लोक शिकवला होतास. आता नीटसा आठवत नाही. यथा मलिनैवस्त्रै: यत्र कुत्रोपि उपविश्यते'' असा काहीसा आठवतोय. अंगावर छान कपडा असला की त्याला कुठं, कसली घाण लागून तो मलीन होऊ नये म्हणून आपण किती जपतो? पण एकदा का तो घाण झाला, एखादा डाग पडला की मग आपण त्या कपड्याची फिकीर करत नाही.

सिंगापूरच्या एका टूरमध्ये माझं शरीर पहिल्यांदा मलीन झालं, तेव्हा मी खूप रडले, भेकले, पण एक तर मी सर्वस्वी परक्या मुलुखात होते आणि ज्यानं भडकून उठायला हवं त्या माझ्या नवऱ्याच्याच संमतीनं सगळं चाललेलं. आता समर्थन करण्यात काही अर्थ नाही, पण जीव देण्याची वेळ तेवढीच आणि तीच होती. पुढचं सारं आयुष्य जिवाचे चोचले पुरविण्यातच गेलं.''

''ललिता, या साऱ्या प्रकारात तुला माझी कधी आठवण आली नाही?''

''खूप आली; खूप वेळा आली. सिंगापूरच्या त्या प्रकारात तर फार आली. कदाचित तूच मला त्यावेळी सावरू शकला असतास!''

''कसं शक्य होतं? एक तर तुला तुझा नवरा होता. बरं, आर्थिकदृष्ट्या मी अगदीच फाटका; सामाजिकदृष्ट्या नगण्य. मग कोणत्याही बरोबरीच्या नात्यानं मला तुम्ही सामावून घेतलं नसतंत.''

''तेही खरंच म्हणा. पण मला त्या वेळेला तुझी खूप आठवण आली आणि तुझ्या प्रेमाची मला त्यावेळी खूप गरजही होती. तू माझा नुसताच प्रियकर नव्हतास, त्याहून चांगला मित्र होतास ह्याची मला तेव्हाही खात्री होती; आणि आज तीस वर्षांच्या गॅपनंतरसुद्धा माझी तीच भावना आहे. म्हणून तर आज मी इतकी बोलले. अशी आजवर कुणाशीही बोलले नव्हते.''

भावनाविवश होऊन ललिता माझ्या शेजारी येऊन बसली. माझ्या मांडीवर डोके टेवून पडली; डोळे मिटून झोपली. व्हिस्कीचा अंमल तिच्यावर चांगलाच चढला होता. मी दोन-तीनच पेग घेतले पण ती बाटलीच्या बाटली फस्त करीत होती. तिला मी तशीच पडू दिली. शेजारीच पडलेली परदेशी उंची सिगारेट शिलगावली; धुरांची वलयं सोडत विचार करीत बसलो. बराच वेळ गेला. ललिता गाढ झोपून गेली होती. मांडीवरील तिचं मस्तक आता जड वाटायला लागलं होतं. मांडी अवघडून गेल्यावर तिला उठविण्याचा प्रयत्न न करता मी जवळच्याच सोफ्यावरची एक उशी ओढली आणि हलकेच मांडीवरील तिचं मस्तक त्या उशीवर ठेवलं. मी जड पायानं उठलो. समोरच्या ऐसपैस सोफ्यावर अंग पसरून पडलो. सिगारेट ओढायची मला तशी सवय नव्हती. पण झोप येत नव्हती म्हणून ओढत बसलो. समोर माझी लाडकी ललिता ऐसपैस पडली होती. मी काही करू शकलो असतो, पण काहीही 'करायची' माझी इच्छा नव्हती. माझ्या मनात वर्षानुवर्षे जपलेली ललिता वेगळी होती आणि ही समोर पडलेली ललिता सर्वस्वी अनोळखी, अपरिचित होती. कुऱ्हाड सोन्याची असली तरी मला त्या सोन्याची अजिबात हाव नव्हती. विचार करता-करता केव्हा तरी मला झोप लागली.

•••

सकाळी केव्हा तरी मला ज़ाग आली. समोरच्या कांचेच्या खिडकीतून वारा येत होता. रात्रीत केव्हा तरी ललितानं माझ्या अंगावर शाल टाकली होती. मला आठवलं की सकाळी उठून गोल्डन बीचवर जायचं आम्ही ठरविलं होतं. मी तडकाफडकी उठलो. ललिता बहुधा बाथरूममध्ये असावी. शॉवरचा आवाज येत होता. मी वॉश बेसिनवर तोंडावर पाण्याचे सपकारे मारले. खूप बरं वाटलं, घाईघाईत अंगावर कपडे चढविले. माझी छोटी ब्रीफकेस शोधली, एवढ्यात ललिता आली.

''हे काय? निघालास काय तू?''

मी नुसतीच मान हलविली, खरं तर ललिता बाथरूममधून बाहेर यायच्या आतच सटकायचा माझा विचार होता. ललिता काय ते समजली, खिन्नपणाने म्हणाली,

''मला माहीत आहे, आता तू कधीच मला भेटणार नाहीस. होय ना?''

''छे, छे तसं काही नाही; अजून पुष्कळ खरेदी करायची आहे म्हणून लवकरच निघतो झालं.''

''कशाला उगीच मला फसवतोस? आणि स्वत:लाही? बरं, चहा तरी घेणार का?''

''नको, नको, मला हँग ओव्हर आल्यासारखा वाटतोय्. चहाने आणखीनच ढवळेल. निघतो मी आता.''

''मला माहीत आहे, आता कितीही आग्रह केला तरी तू आत्ता थांबणार नाहीस, बरं तुला अडविण्याचा हक्कपण मी गमावून बसलेय. फक्त माझा तिरस्कार कधी करू नकोस.''

बोलता बोलता ललितानं मला घट्ट मिठी मारली. माझ्या कपाळाचं हलकेच चुंबन घेतलं. मी पण तिला हलकंसं थोपटल्यासारखं केलं आणि निघालो. दारापाशी पोचतो तो पुन्हा ललिता काही तरी आठवल्यासारखं करून 'थांब' म्हणाली. मी प्रश्नार्थक चेहरा करून उभा होतो. तेवढ्यात ती बेडरूममध्ये जाऊन आली. तिच्या हातामध्ये कालच्याच साडीचं पॅकेट होतं. दोन हजाराची साडी? मी हात एकदम मागे घेतले. तेव्हा ती म्हणाली, ''प्लीज आता नाही म्हणू नकोस. काल आपण खूप बोललो. बरं वाटलं. पहाटे उठून तुझ्याकडे पहात मी बराच वेळ रडत होते. आयुष्यात इतकी समाधानाने मी प्रथमच रडले. आता आपण आयुष्यात पुन्हा कधीच भेटणार नाही. निदान तुला तरी नक्कीच मला भेटावंसं वाटणार नाही. तेव्हा माझी आठवण म्हणून ही साडी तुझ्या बायकोसाठी ठेव आणि ही अंगठी माझ्या समाधानासाठी बोटात घाल.''

तिच्या डोळ्यांत तरळणारे अश्रू बघून मी मुकाट्यानं हात पुढे केला आणि गुलाबी खड्याची अंगठी बोटात घालून घेतली.

•••

मद्रास मेल मुंबईकडे धावत होती, त्याहून अधिक वेगानं माझं मन सुमतीकडं धाव घेत होतं. इतकी वर्षं तिच्यावर केलेल्या अन्यायाचं परिमार्जन आता मला करायचं होतं. तिच्यामध्ये सतत ललितेला शोधण्याची चूक मी आजवर करीत आलो होतो. आता मी शापमुक्त झालो होतो. स्वत:लाच विनाकारण एका अनामिक शापात मी गुंतवून घेतलं होतं. जी ललिता माझ्या अंतर्मनात खोलवर रुतून बसली होती, तिथं आता फक्त सुमती राहणार होती.

सुमती मला फक्त सुमती म्हणूनच आता बघायची होती. बंधमुक्त विहंगासारखं माझं मन माझ्या मुंबईच्या घरट्याकडे धावत होतं. रूळ बदलल्यावर गाडीचा खडखडाट होतोच. तेवढाच मुंबईकडे धावणाऱ्या मद्रास मेलचा खडखडाट माझ्या लेखी होता.

बाकी मन कसं शांत, स्वच्छ झालं होतं.

❖❖❖



## अविनाश टिळक

मूळ सांगलीकर. मुंबईला रिझर्व्ह बँकेत अधिकारी म्हणून कार्यरत असणाऱ्या श्री. अविनाश टिळक यांच्या हातावर साहित्यरेषा अुमटली ती वयाची पन्नाशी जवळ येऊन ठेपल्यावर! कै. पु. भा. भावे कथा-स्पर्धा, दै. लोकसत्ता ग्रंथ परीक्षण स्पर्धा, कै. सी. डी. देशमुख निबंध स्पर्धा अशा स्पर्धांमधून पारितोषिके मिळवणाऱ्या टिळकांच्या कथा 'सुगंध', 'तरुण भारत (मुंबई), 'लोकप्रभा', 'दैवज्ञश्री', 'विशाल विटा', 'केसरी', 'आरती', 'स्वप्ना' अशा अनेक दिवाळी अंकांमधून प्रसिध्द झाल्या आहेत.

संगीत, क्रिकेट, कॅरम, ब्रिज, ट्रेकिंग अशा विविध विषयात रुचि असणाऱ्या टिळकांचे स्फुट लेखन दै. महाराष्ट्र टाईम्स्, लोकसत्ता, लोकमत, सकाळ, पुढारी, केसरी, तरुणभारत आदी वृत्तपत्रांमधून विपुल प्रमाणात प्रसिध्द. 'आधारवड' हा त्यांचा १९९४साली प्रसिध्द झालेला पहिला चरित्र-ग्रंथ. ज्येष्ठ समाजसेवक श्री. दादासाहेब ताटके यांच्या विविधांगी समाजकार्यास आणि त्यागमय जीवनास अत्यंत ओघवत्या भाषेत टिळकांनी या पुस्तकात शब्दबध्द केले आहे. ३५ वर्षे रिझर्व्ह बँकेत नोकरी करुन श्री. टिळक १९९६च्या अक्षय तृतीयेला सांगलीत स्थायिक झाले. सांगली नगरीच्या अतीव प्रेमापोटी सतत ४-५ वर्षे अखंड परिश्रम करुन सांगलीच्या २००व्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी 'सांगली आणि सांगलीकर' हा मौलिक ग्रंथ २५ मार्च २००१ रोजी प्रकाशित केला. या पुस्तकाचे वाचकांनी उत्स्फूर्त स्वागत केलेच, पण अनेक विद्वज्जनांनी महत्त्वाचा संदर्भग्रंथ म्हणून या पुस्तकाचा गौरव केला.

अविनाश टिळक यांना सांस्कृतिक, सामाजिक कामाचीही खूप ओढ असते. नोकरी काळात डोंबिवलीत वास्तव्य असताना, डोंबिवलीवासी रिझर्व्ह बँक कर्मचाऱ्यांची 'स्नेहवर्धिनी' ही सांस्कृतिक संघटना उभी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. रिझर्व्ह बँक महाराष्ट्र वाङमय मंडळाचे ते पदाधिकारी होते. सांगलीत स्थायिक झाल्यापासून, सांगली (जिल्हा) नगरवाचनालय, अनाथ विद्यार्थी सहाय्यक मंडळ, यादे सिनेसंगीत क्लब, संस्कारभारती आदी संस्थांबरोबर पदाधिकारी म्हणून ते संबंधित आहेत.

'निखळलेले मोरपीस' हा श्री. अविनाश टिळक यांचा कथासंग्रह असा पहिलाच. त्यामध्ये दिवाळी अंकांमधून गेल्या १५ वर्षांमध्ये प्रसिध्द झालेल्या त्यांच्या २१ कथांचा समावेश आहे.